म. ग्रं. सं. ठाणे.
विषय भू-प्र
क्र. ५२७
REFBK-0022148
REFBK-0022148

# केल्याने देशाटन

( प्रवासवर्णनात्मक निवडक लेखांचा संग्रह )

संपादक
डॉ. स. गं. मालशे

REFBK-0022148
REFBK-0022148

सुविचार प्रकाशन मंडळ
पुणे - नागपूर

‘ केल्याने देशाटन ’
प्रवासवर्णनात्मक निवडक लेखांचा संग्रह

पुनर्मुद्रण : जून १९७६

सर्व हक्क सुरक्षित

किंमत : आठ रुपये

प्रकाशक
श्यामकान्त श्रीनिवास बनहट्टी
सुविचार प्रकाशन मंडळ
४६१/४ सदाशिव, पुणे ४११ ०३०
धनतोली, नागपूर ४४० ०१२

मुद्रक
शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

# प्रस्तावना

प्रवासाची ओढ किंवा आकर्षण हे मानवाच्या मूलभूत प्रवृत्तीचेच एक महत्त्वाचे अंग आहे. या ओढीतूनच मानवाने साऱ्या पृथ्वीला केव्हाच गवसणी घातली आहे आणि चंद्रावर पाय रोवून ' ज्ञातातून अज्ञाता 'कडे त्याने झेप घेतली आहे. वास्तविक प्रवास ही एक शारीरिक कष्टाची, दगदगीची, जिकीरीची बाब; परंतु तिची तमा न बाळगता माणूस निसर्गातल्या चैतन्याला साद देत अखंड परिभ्रमण करीत राहिला आहे. मानवाची साहसवृत्ती, त्याची सौंदर्यासक्ती, निसर्गाची विविध रूपे आणि मानवी कर्तृत्वाचा पसारा न्याहाळण्याची त्याची तीव्र जिज्ञासा यांमुळे या अखंड गतिशील अशा जगद्रूपाशी त्याने खरेखुरे नाते प्रस्थापित केले आहे. माणसाच्या अनुभवविश्वाचे फार मोठे क्षेत्र त्याच्या या जिज्ञासेपोटी संपन्न, समृद्ध आणि विश्वव्यापक बनले आहे.

मानवी हालचालीतील नाट्याचा शोध घेत त्याच्या वाट्याला येणाऱ्या असंख्य भोगांचे चित्रण करता करता माणसातल्या माणूसपणाचा शोध घेणे, हेच तर कोणत्याही वाङ्मयप्रकाराचे महत्त्वाचे साध्य असते. जेव्हा एखाद्या अनोळखी मुलुखात माणूस प्रवासाला निघतो तेव्हा स्वतःच्या स्वास्थ्यासाठी निर्माण केलेल्या साऱ्या सुविधा व सुखे स्वेच्छेने धुडकावून देऊन जाणूनबुजून स्वतःला काही अज्ञात अशा प्रसंगांत लोटून देण्याच्या तयारीनेच तो निघतो. नवे जग, नवी क्षितिजे, नवी माणसे, नवे आचार-विचार, नव्या जाणिवा यांनी युक्त अशा अज्ञात क्षेत्रात विहार करताना, त्यासाठी घेतलेले कष्ट, केलेली पदरमोड आणि साहिलेली संकटे यांचा त्याला विसर पडतो आणि मनाला होणाऱ्या उत्कट आनंदाच्या साक्षात्कारामुळे त्याच्या जीवनधारणेला बळ येते, तिला अर्थपूर्णता लाभते. कष्टमय, सहनशीलतेचा अंत पाहणाऱ्या, प्रसंगी जिवावरही बेतणाऱ्या या प्रवासाचे भूत एकदा मानगुटीवर बसले म्हणजे मग ' पाहावे तितके, हिंडावे तितके थोडे ! ' पण अशा भावनेने प्रेरित होऊन बाहेर पडणाऱ्या वेड्या माणसांनीच या जगाला मोठे पाथेय पुरविले आहे, हे जगाच्या इतिहासाची काही पाने चाळणाऱ्यांना सहज दिसून येईल.

आगळ्यावेगळ्या जीवनानुभूतीचा स्पर्श झाल्यामुळे अशा व्यक्ती ज्या वेळी आपल्या अनुभवांची मांडणी प्रवासवर्णनात्मक लेखनाच्या रूपाने करू लागतात, त्या वेळी हे वर्णन त्यातील अनुभवांच्या चित्रणाच्या वेगळेपणामुळे आकर्षक, रंजक व उद्बोधक ठरते.

" केल्याने देशाटन पंडितमैत्री सभेंत संचार
शास्त्रग्रंथ विलोकुन मनुजा चातुर्य येतसे फार "

या प्रकारे जुन्या काळात देशाटनाचे महत्त्व कोणा कवीने सांगितले आहे. हा कवी उघड उघड जुन्या शास्त्रीपंडितांच्या पठडीतला आहे, हे त्याने वर्णिलेल्या विशेषांवरून तात्काळ लक्षात येते. विद्वत्तेची शालजोडी मिरवीत गावोगावी शास्त्रचर्चा,

वादविवाद करीत, फड जिंकीत, बिदागी गोळा करणाऱ्या शास्त्रीपंडितांचा एक वर्ग अगदी अव्वल इंग्रजीच्या काळानंतरही अस्तित्वात होता. अशांची फारशी लक्षात न राहिलेली काही प्रवासवर्णने उपलब्ध आहेत. प्राचीन भारतीयांनी आपल्या धर्माचा व संस्कृतीचा ठसा भारताबाहेर विशेषतः अतिपूर्वेकडील देशात उमटविलेला दिसून येतो. पण मध्ययुगीन काळात मात्र ही प्रवृत्ती पार लुप्त झाली. इंग्रजांच्या सान्निध्यामुळे सार्वजनिक विषयावर भाषणे करणाऱ्या व लोकजागृतीचा ध्यास घेतलेल्या व्यक्तींचीही काही प्रवासवर्णने आहेत. गोविंद बाबाजी जोशी हे अशा प्रकारचे एक नादी गृहस्थ होत. त्यांची आपल्या दौऱ्यांच्या हकीगती सादर करणारी प्रवासवर्णने उपलब्ध आहेत.

सिंधुबंदी, परदेशगमननिषेध यांमुळे भारतीयांच्या परदेशप्रवासाच्या ऊर्मी सदैव दबलेल्या राहात. चारी धाम, बारा ज्योतिर्लिंगे यांच्या यात्रा धर्मप्रेरणेने केल्या जात आणि जुन्या काळाचा प्रवास तुलनेने मोठा खडतर व जिवावरचाच असे. प्रांतोप्रांती भरणाऱ्या यात्रादिकांच्या, यज्ञयागांच्या निमित्ताने द्रव्यलोभाने या देशातील ब्राह्मण सबंध देशभर संचार करीत असत; परंतु सर्वसामान्य समाजाचा घटक आपल्या अवती-भवतीच्या ग्रामदेवतांच्या यात्रा-उत्सवांतच समाधान मानीत असे. पेशवाईच्या काळात मोहिमांच्या निमित्ताने भीमथडीचे घोडे गंगथडीपर्यंत विहार करू लागले. मात्र धका-धकीच्या जीवनप्रणालीमुळे मराठ्यांनी आपले हे अनुभव लेखननिविष्ट केलेले दिसत नाहीत. इंग्रजांच्या अमदानीत हळूहळू आमची मने बंदीच्या, निषिद्धाच्या बेड्यांतून मुक्त होऊ लागली. तरीसुद्धा व्यापाराकडे महाराष्ट्रीयांचा कल जात्याच नसल्याने त्या निमित्ताने परदेशगमन असे फारसे झालेच नाही. साताराच्या पदच्युत छत्रपतींची लंडनच्या राजदरबारी कैफियत मांडून न्याय मिळविण्याची खटपट करणाऱ्या साताराच्या रंगोबापूजींची काही कागदपत्रे हा परदेशयात्रेचा मराठीला झालेला पहिला साक्षात्कार. लोकहितवादींचे चिरंजीव विलायतेला जाऊन आल्यामुळे लोकहितवादींवर अनवस्था प्रसंग ओढवला; मात्र त्यांच्या चिरंजिवांनी आपल्या अनुभवांची नोंद कुठे केल्याचे सापडत नाही. अमेरिकेत राहून वैद्यकविद्येत पारंगत झालेल्या डॉ. आनंदीबाईंची पत्रे हा त्यातल्या त्यात काही दिलासा. परंतु परदेशप्रवासातील अनुभवांचे पुस्तक लिहिले ते मात्र पंडिता रमाबाईंनी— ‘ युनैटेड स्टेटस्‌ची स्थिती ’ या नावाने. पावगींचा ‘ विलायतचा प्रवास ’ आणि प्रो. पां. दा. गुणे यांचा ‘ माझा युरोपचा प्रवास ’ ही त्यानंतर लिहिली गेलेली अशा प्रकारची पुस्तके.

इंग्रजांच्या आगमनापूर्वी या देशात प्रवासवर्णनवजा लेखनाची अगदीच वानवा होती, असे नाही. केवळ मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचाच विचार केला तर महानुभावीयांचे ‘ लीळाचरित्र ’ म्हणजे चक्रधरांची भ्रमणगाथाच होय असे म्हणावे लागते. मात्र ती चक्रधरोक्त नसून त्यांच्या शिष्यांनी संकलित केली आहे. संत नाम-देवांचे ‘तीर्थावळी’चे अभंग, पेशव्यांच्या घराण्यातील व्यक्तींच्या तीर्थयात्रेच्या निमित्ताने झालेला, ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये दडलेला पत्रव्यवहार यांमध्ये प्रवासवर्णनात्मक

लेखनाची बीजे सापडतील. नाना फडणविसांच्या आत्मचरित्रातील काही लक्षणीय भाग प्रवासवर्णनात्मकच आहे आणि 'भाऊसाहेबांच्या बखरी'तील दत्ताजी शिंद्यांच्या मृत्यूनंतर शिंद्यांच्या फौजेची झालेली होलपट आणि पानपतच्या पराभवानंतर मराठ्यांच्या सैन्याची वर्णिलेली पळापळ ही मराठी वाङ्मयातील प्रत्ययकारी प्रवासवर्णनात्मक लेखनाची उदाहरणे होत. भाऊसाहेबांच्या बखरीचा लेखक कोणी का असेना, त्याने असे प्रसंग साक्षात अनुभविले असले पाहिजेत. त्याखेरीज त्याच्या लेखनात इतकी प्रत्ययकारिता येणे असंभवनीय आहे.

परंतु इंग्रजांच्या सान्निध्यामुळे प्रवासवर्णनात्मक लेखनप्रकाराची एक नवी जाणीव महाराष्ट्रामध्ये निर्माण झालेली दिसते. 'मराठी ज्ञानप्रसारका'मध्ये १८६३ साली नासिकच्या सफरीचे एक लक्षात राहावे असे वर्णन प्रसिद्ध झाले आहे. पुण्याहून काशीयात्रेला निघालेल्या एका गृहस्थांनी 'एडिटरांचा स्नेही' या नावाने 'ज्ञानप्रकाशा'ला वेळोवेळी आपल्या प्रवासातील अनुभव कथन करणारी पत्रे १८७२ मध्ये 'काशीयात्रा' या नावाने संकलित झालेली दिसतात. बाबा पदमनजी आणि दादोबा पांडुरंग यांच्या आत्मचरित्रांतूनही प्रवासवर्णनपर लेखनाचा आविष्कार घडलेला दिसतो. या सर्व प्रयत्नांपेक्षा गोडसेभटजींचे 'माझा प्रवास' हे अनुभवसंपन्न पुस्तक मोठे लक्षणीय मानावे लागते. १८५७ च्या बंडाच्या वणव्यात सापडलेल्या या व्यक्तीने आपल्या प्रवासाच्या हकीकती त्यानंतर सुमारे २५ वर्षांनी लिहिल्या आणि त्या हकीकतींमुळे १८५७ चा कालखंड, बंडातील महत्त्वाच्या व्यक्ती आणि तत्कालीन राजकीय परिस्थिती एकदम जिवंत होऊन उठली. या पुस्तकाने गोडसेभटजी नावाचे एक व्यक्तिमत्त्व मराठी वाङ्मयात चिरंतन होऊन बसले.

गोडसेभटजींच्या या प्रवासवृत्ताने या लेखनप्रकाराला वाङ्मयीनदृष्ट्या महत्त्व का व कसे प्राप्त होते, याचा उलगडा व्हायला लागतो. गोडसेभटजींना आपल्या हातून लालित्याचा स्पर्श झालेले पुस्तक लिहिले जाते आहे, याची जाणीव असावी असे वाटत नाही. मग या पुस्तकातील वाङ्मयीन सौंदर्याचे रहस्य कोणते, असा साहजिकच प्रश्न मनात उभा राहतो. १८५७ चा अगदी अनपेक्षित आणि विलक्षण असा जीवघेणा अनुभव पंचवीस वर्षांनंतर गोडसेभटजी न्याहाळायला लागतात, तेव्हा साहजिकच त्या अनुभवाची विलक्षणताच जणू काही चेटूक करून जाते. आणि एकेक प्रसंग जसजसा उलगडत जातो, तसतसे गोडसेभटजी स्वतः त्या काळात पुन्हा उभे असल्यासारखे भासू लागतात. जणू काही पंचवीस वर्षे या आठवणी त्यांच्या मनाच्या खोल गाभाऱ्यात कुठे तरी घर करून होत्या ! एखादी स्वप्नभूमी तळापासून उसळून वर यावी त्याप्रमाणे या आठवणी त्यांच्या लेखणीतून झरत गेल्या आणि त्या साकार होताना जणू काही काल घडाव्यात इतक्या साक्षित्वाने उत्कट होऊन उठल्या. गोडसेभटजी अगदी तटस्थतेने आठवणींतून स्वतःला न्याहाळताहेत, त्या अनुभवातील व्यक्ती व प्रसंग यांची मनावर कोरल्यासारखी पुनर्निर्मिती करण्याचा प्रयत्न करीत

आहेत, असे सारखे दिसते.

मराठीतल्या बहुतेक साऱ्या चांगल्या प्रकारच्या प्रवासचित्रणात्मक लेखनाला वाङ्मयीन प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे, ती या व या प्रकारच्या काही लालित्याच्या संस्कारांमुळे प्रवासवर्णन म्हणजे पाहिलेल्या स्थळांच्या जंत्रीवजा रूक्ष नोंदी, अशा स्वरूपाचे लेखन वाङ्मयीन दृष्ट्या महत्त्वाचे नसते. गो. चि. भाटे यांची बहुसंख्य प्रवासवर्णने व कित्येक संस्थानिकांची प्रवासवर्णने या दृष्टीने आज वाचकांची मने क्वचितच आकर्षून घेतात, कारण लेखकाच्या मनातील भावनात्मक आंदोलनांच्या नोंदी अशा वर्णनात विरळा आढळतात. 'माझी तीर्थयात्रा' लिहिणारे नेरळचे फडके हे तसे जुन्या पठडीतलेच लेखक आहेत. परंतु त्यांचा जबरा उत्साह, माहितीच्या संकलनातील विविधता, बहुश्रुतता, धाडसी बाणा, आणि आपण करीत असलेल्या कार्याच्या वेगळेपणाची जाणीव यांमुळे त्यांची वर्णने आजही वेधक वाटतात.

काणेकरांनी प्रवासवर्णनाच्या क्षेत्रात प्रवेश केला आणि प्रवासवर्णनांचा मोहराच बदलून टाकला. रंजक माहितीचे संकलन करावे, आपण पाहिलेले जग दुसऱ्यांना समजावून देऊन त्यांना प्रवासास प्रेरित करावे, किंवा भौगोलिक माहिती देऊन वाचकांच्या माहितीत भर टाकावी, या हेतूने काणेकर लिहीत नाहीत. त्यांची प्रवासवर्णने वाचताना मुख्यत्वेकरून काणेकरांचे संस्कारी मन जाणवते. अनौपचारिक रीतीने खेळकरपणाने आपल्या अनुभवांची ते ज्या वेळी मांडणी करतात, त्या वेळी त्यांच्या प्रसन्न खेळकर व्यक्तिमत्त्वाच्या दर्शनाने वाचकाला जो आनंद होतो, तो मुख्यतः ललित वाङ्मयाच्या आस्वादाचा असतो. कालेलकर, काकासाहेब गाडगीळ, किंबहुना त्यानंतरच्या बहुतेक लेखकांच्या लेखनातून हाच प्रत्यय येत राहतो. लंडन, रायगिरी, वेंकटेश्वर, कारवारचे जंगल यांच्यातून फेरफटका करण्याच्या निमित्ताने आपणाला पु. ल. देशपांडे, गो. नी. दांडेकर, श्री. ना. बनहट्टी, आचार्य अत्रे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. स्थल, काल व व्यक्तिमत्त्व अशा तिपेडी विणीने युक्त असे लेखन प्रतिभासामर्थ्याने उजळून निघालेले असल्यामुळे त्याला रमणीयता येते.

म्हणून अशा प्रकारच्या प्रवासवर्णनात्मक लेखनाचा समावेश अपरिहार्यपणे ललित वाङ्मयातच करावा लागतो. अर्थातच प्रत्येक लेखकाच्या लेखनधर्मानुसार वेगवेगळ्या वैशिष्ट्यांचा प्रादुर्भाव त्यांच्या या प्रवासवर्णनातही झालेला आढळतो. पु. ल. देशपांडे यांचे कुठलेही प्रवासवर्णन वाचताना विनोदी लेखक म्हणून त्यांची जी वैशिष्ट्ये आहेत ती सारी तिथे आविष्कृत झालेली आहेत, हे लक्षात येते. जीवनातील संगती-विसंगतीचा शोध घेत घेत अत्युक्तीच्या साहाय्याने खेळकरपणाने ते आपल्या अनुभवांची नाट्यपूर्ण मांडणी करतात. गंगाधर गाडगीळ हे अव्वल दर्जाचे नवकथाकार आहेत, हे त्यांच्या या प्रवासवर्णनातही जाणवते. मानवी विकारांच्या मुळाशी भेदकतेने नजर टाकून ते मनाच्या अलक्षित अंगावर प्रकाशझोत टाकतात. प्रा. बनहट्टींचे श्रद्धायुक्त मन आणि आपल्या कुलदेवतेवरची नितान्त श्रद्धा त्यांच्या चिकित्सक वृत्तीवर मात करीत

असल्याचे पाहून गंमत वाटते आणि बनहट्टी चांगल्या रीतीने कळण्यास मदत होते. प्रा. रा. भि. जोशी यांचे या क्षेत्रातील महत्त्व चटकन जाणवते. एखाद्या ठिकाणास भेट देण्यापूर्वी जोश्यांनी त्या ठिकाणासंबंधीचे विविध संदर्भ साक्षेपाने जोपासलेले असतात आणि त्या स्थळाच्या भेटीच्या निमित्ताने त्यांचे संस्कारक्षम मन त्या संदर्भांच्या जाणीवांच्या नाजुक धाग्यांना स्पर्श करीत भावगर्भ वातावरणाची निर्मिती करते. त्यामुळे त्यांचे प्रवासचित्र एकदम मंतरल्यासारखे होऊन हळुवारपणाने मनात झिरपायला लागते आणि त्यांच्या संपन्न परंतु संयत व्यक्तिमत्त्वाची जाणीव होऊन मन प्रसन्न होते. भाषेच्या बाबतीतही असेच घडते. ना. सी. फडके, अत्रे, गाडगीळ, पु. ल. देशपांडे यांची इतर वाङ्मयप्रकारांमध्ये आढळणारी भाषेची वैशिष्ट्यपूर्ण धाटणी इथेही त्याच पद्धतीने आविष्कृत होते. मात्र इथे आत्मपरतेमुळे ती अधिक सहज बनते इतकेच. केऱ्यांच्या बाबतीत वऱ्हाडी बोलीमुळे वर्णनाला चांगलाच टवटवीत ताजेपणा येण्यास मदत होते.

आत्मचरित्राप्रमाणेच प्रवासवृत्तातही कलावन्ताला आत्मविस्मृतीची किमया साधावी लागते. स्वतःच्या मनाच्या क्रियाप्रतिक्रिया नोंदवीत असताना अहंकाराच्या, आत्मप्रौढीच्या किंवा आत्मप्रदर्शनाच्या अतीत होऊन बाह्य जग आणि त्याची आपल्यावरची प्रतिक्रिया यांच्या भावगर्भ नोंदी कुतूहलाने कराव्या लागतात. ही किमया साऱ्यांनाच साधते असे नाही. आत्मप्रदर्शनामुळे तोल ढळलेल्या प्रवासवर्णनात्मक लेखनाची उदाहरणे पाहणाऱ्यांना अनेक सापडतील.

प्रवासवर्णनलेखनामध्ये ‘ मी ’ हा अपरिहार्य असतो, परंतु हा ‘ मी ’ कोणत्या स्वरूपात साकार होतो, यावर त्या लेखनाला येणारे स्वरूप अवलंबून असते. स्वतःच्या मानसिक क्रियाप्रातिक्रियांची कसलीही नोंद न घेता केवळ ‘ मी ’चा होणारा उल्लेख लेखनाला कोणत्याही स्वरूपात लालित्याचा स्पर्श होऊ देत नाही, उलट अशा नोंदी करता करता लेखकाच्या भावनांचे, तो पाहात असलेल्या, अनुभवीत असलेल्या घटना-प्रसंगांशी अविभाज्यत्व निर्माण झाले की, तेथे एक प्रकारची नवनिर्मिती होत राहते. कारण मग ते केवळ त्या स्थलाचे वर्णन न राहता, लेखकाच्या तत्कालीन भाववृत्तीच्या रंगात न्हाल्यामुळे ते जणू काय वेगळेच चित्र बनते. ते चित्र केवळ छायाचित्राप्रमाणे प्रतिकृती न राहता अभिजात चित्रकाराच्या कलाकृतीचे सामर्थ्य त्याला येते. लेखक अशा प्रसंगी स्वतः पाहत असलेल्या जगाशी निगडित होतो आणि आपण पाहत असलेल्या, अनुभविलेल्या प्रत्येक घटकालाही काही एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे, याचा एक नित्य नवा साक्षात्कार खुद्द त्याचा त्यालाच सारखा होत राहतो. अशा साक्षात्काराने उजळून निघालेले लेखन अलीकडच्या प्रवासवर्णनाच्या निमित्ताने मूर्तिमंत साकार होत असल्याचा एक सुखद अनुभव मराठी वाचकास येऊ लागला आहे. निसर्गसौंदर्याने बिनटलेला भूभाग, मोठमोठी शहरे, भूतकालीन भव्य वास्तू, शिल्पकृती, तीर्थक्षेत्रे, नवा भूप्रदेश आणि तिथल्या माणसांनी घडविलेली पृथगात्म समाजरचना यांच्याबद्दलचे

अंगभूत आकर्षण उरी बाळगून प्रवासाला निघालेल्या व्यक्तीला आपल्याला येणाऱ्या अनुभवांचा वेगळेपणा सांगावासा वाटतो. तो सांगत असताना त्या अनुभवाला चिकटलेले अनेक रंग जणू काही तिला खुणवीत असतात. त्यांतला कोणता रंग अधिक महत्त्वाचा हे ज्याच्या त्याच्या व्यक्तिमत्त्वानुसार ठरत असते. कोणाला भौगोलिक प्रदेशाचा वेगळेपणा चित्रित करण्याचे जबरदस्त आकर्षण असते, तर कोणाला त्या प्रदेशातील माणसांच्या चालण्याबोलण्याची अपूर्वाई असते, तर कोणाला अनुभविलेल्या प्रसंगांतील नाट्यच नेटकेपणाने सांगावेसे वाटते. कोणाला आपल्या अनुभवांच्या मागे असलेल्या विशिष्ट ऋतुमानाची, काळवेळाची कल्पना दिल्याखेरीज आपल्या वर्णनास अर्थपूर्णता येत नाही असे वाटते, कधी कधी अनाहूतपणे एखाद्या अकल्पित प्रसंगांना साक्षीभूत व्हावे लागते, तर कधी कधी एखादी व्यक्तीच आपले सारे मन व्यापून टाकते. लेखक आपल्या संस्कारानुसार मनाने पुन्हा एकदा आपल्या अनुभवांना उजाळा देण्याचा ज्या वेळी प्रयत्न करतो, त्या वेळी साहाजिकच एक प्रकारे तो पुनः प्रत्ययाचा आनंद अनुभवतो आणि अशा रीतीने एका कलाकृतीचा जन्म होतो. प्रवासवर्णनाच्या निरनिराळ्या तऱ्हा पाहिल्या की, त्यांना प्राप्त झालेल्या कलात्मक घाटामध्ये लेखकांनी अवलंबिलेल्या रचनाप्रकारातील विविधताही लक्षात घेण्यासारखी असते. कोणी दैनंदिनीचा, कोणी ललित-निबंधाचा, कोणी आत्मनिवेदनाचा, कोणी वर्णनात्मकतेचा तर कोणी कथात्मकतेचा घाट घेऊन आपल्या अनुभवांना परिणामकारक रूप देतो.

काही तरी वेगळे आगळे, भव्यदिव्य पाहिल्याची एक धुंदी, एक कैफ काहींच्या लेखनात आढळतो. त्या धुंदीने एक प्रकारची प्रवासाची बेहोषी त्यांच्यामध्ये आलेली असते. ही धुंदी, हा कैफ हेच त्यांच्या लेखनाचे सामर्थ्य असते. गो. नी. दांडेकर व प्रभाकर पाध्ये यांचे लेखन या प्रकारचे असते. या धुंदीमुळे त्यांच्या लेखनाला एक प्रकारची रम्याद्भुतता येते, आकर्षकता येते.

प्रवासवर्णनांच्या निरनिराळ्या तऱ्हा निर्माण होतात, त्याही लेखकांच्या वृत्ति-प्रवृत्तीमुळे. व्यंकटेश माडगूळकरांना ऑस्ट्रेलियातील एका व्यक्तीने व त्या व्यक्तीच्या बाबतीत घडलेल्या एका महत्त्वाच्या घटनेने पंधरा वर्षे धरून ठेवले आहे, असे म्हणण्यापेक्षा माणदेशातील माणसं पाहणाऱ्या या लेखकाला ऑस्ट्रेलियातील तसलाच एक माणूस खुणावतो आहे व त्याचेच त्याला आकर्षण आहे असे का म्हणू नये ? पाध्यांना जपानच्या माणसांपेक्षा त्या माणसांनी निर्माण केलेल्या विलोभनीय संस्कृतीत रस अधिक आहे हे खरे, परंतु त्यामुळेच पाध्यांचे उत्साही व्यक्तिमत्त्व व त्यांच्या आवडीनिवडी लक्षात येतात हेही तितकेच खरे.

काही काही वेळा प्रवासाच्या निमित्ताने आलेले अनुभवच इतके काही नाट्यपूर्ण असतात की, त्या अनुभवानेच माणूस झपाटला जातो व आपल्या लेखणीच्या सामर्थ्याने त्या अनुभवालाच तो मूर्त करतो. कारवारच्या जंगलाने अत्र्यांना असेच

झपाटले आहे तद्वतच पाध्येही ‘ अतामी ’च्या प्रेमात पडले आहेत हे जाणवते. ना. सी. फडक्यांचेही कश्मीरच्या बाबतीत असेच झाले आहे. कारवारच्या जंगलाची अत्र्यांना आलेली भयकारी प्रतीती, काश्मीरच्या सौंदर्याने उत्फुल्ल झालेले फडक्यांचे मन, आणि जपानी संस्कृतीतील आत्मनिर्भर काव्याचा पाध्यांच्या मनावर झालेला परिणाम अशा वेगळिकीने ती ती वर्णने युक्त असली, तरी ‘ झपाटलेपण ’ हा त्यांचा एक सर्वसामान्य विशेष आहे. एखादा अनुभवच मुळातच वेधक आणि क्वचितच वाट्याला यावा अशा प्रकारचा असतो आणि सई परांजपे यांच्यासारख्या हळुवार मनाने तो टिपून ठेविला की, ललितलेखनाचा एक सहजसुंदर आविष्कार म्हणून त्याजकडे बोट दाखवावे लागते. लेखिकेने ‘ नोएल ’ या लेखात साकारलेली मनाची उभीआडवी आंदोलने अतिशय तरल भाववृत्तींना शब्दांकित करतात आणि एका सुंदर ललितलेखाचा जन्म होतो.

‘ केल्याने देशाटन ’ या संग्रहातील प्रवासचित्रे न्याहाळीत असता त्यांतील वैविध्य आणि वैचित्र्य तर जाणवतेच, परंतु पानापानांतून जिवंतपण लाभलेले अनेक प्रसंग मनात घर करून बसल्यासारखे वाटतात. कोणत्याही स्थळाचे वर्णन करीत असताना त्या स्थळाच्या अवतीभवतीचा निसर्ग, त्या काळचे वातावरण, सहजगत्या त्या स्थळी भेटलेल्या व्यक्ती व त्यांच्याशी झालेली संभाषणे यांच्यामध्ये एक अविभाज्य नाते, अतूट दुवा तयार झालेला आढळतो. हर्षामर्षांच्या, शोकविषादाच्या, विरहसंकुलतेच्या, आशा-निराशेच्या आणि अनालकनीय संवेदनांच्या वेगवेगळ्या छटा प्रत्येक स्थळाशी त्या विशिष्ट वेळच्या भाववृत्तीमुळे निगडित आहेत आणि आपण जणू काही त्यांचा साक्षात अनुभव घेत आहोत, असा आपल्याला प्रत्यय येतो. या लेखनामागील तंत्रजडतेच्या अभावामुळे ते ताजे, अनौपचारिक व मुक्त वाटते. या मुक्ततेमुळे कुठे काव्यात्मता तर कुठे भाष्यमयता, कुठे चिकित्सकता तर कुठे विनम्रता, कुठे आत्मप्रदर्शन तर कुठे आत्मविलोपन अशा, इंद्रधनुष्यातील रंगछटांप्रमाणे एकमेकांत मिसळून देखण्या बनलेल्या, भावच्छटा या लेखनात आढळतात. स्वयंकल्पित कथात्व ( fictionality ) नसूनही हा लेखनप्रकार कलात्मक रूप घेत असतो, त्याचे मर्म या अनौपचारिकतेत आहे.

आत्मचरित्रपर लेखनाप्रमाणे प्रवासवृत्तपर लेखन हा एक प्रगल्भ ( Mature) वाङ्मयप्रकार आहे. दोहोंमध्ये स्वानुभूत वासाचे दान असते. आशय आणि अभिव्यक्ती यांचे वेगळे रूप, वेगळा घाट जाणवू लागला की नवा वाङ्मयप्रकार सिद्ध होतो. मराठी प्रवासवृत्तपर लेखनाला असा बाळसेदार वेगळा घाट आता प्राप्त झाला आहे. या घाटाचे सौंदर्य न्याहाळण्याचा आनंद ‘ केल्याने देशाटन ’मध्ये लाभेल अशी आशा आहे.

**स. गं. मालशे**

## अं त रं ग


| | | | |
|---|---|---|---|
| | प्रस्तावना | | पाच |
| १ | झाशीचे बिजन | विष्णुभट गोडसे | १ |
| २ | गेरसप्पा | गोविंद हरी फडके | ९ |
| ३ | हिमालयाच्या वाटेवर | काका कालेलकर | १७ |
| ४ | अबू | अनंत काणेकर | २३ |
| ५ | एक अपूर्व संध्या | न. वि. गाडगीळ | २९ |
| ६ | कश्मीरचे वैभव | ना. सी. फडके | ३६ |
| ७ | कारवारच्या जंगलात | प्र. के. अत्रे | ४२ |
| ८ | वाराणस्यां जननमरणम् | रा. भि. जोशी | ५१ |
| ९ | लंडन : एक अपूर्वाई | पु. ल. देशपांडे | ५८ |
| १० | वेंकटाचल आणि वेंकटेश्वर | श्री. ना. बनहट्टी | ६९ |
| ११ | रायगिरी : एक प्रदक्षिणा | गो. नी. दांडेकर | ७९ |
| १२ | तरंगता दिवस | गंगाधर गाडगीळ | ८८ |
| १३ | नोएल | सई परांजपे | ९६ |
| १४ | सालबर्डीचा रानचेहरा | मधुकर केचे | १०८ |
| १५ | अतामी | प्रभाकर पाध्ये | ११६ |
| १६ | विलीविली | व्यंकटेश माडगूळकर | १२६ |
| | लेखक-परिचय व टीपा | | १३३ |

एक

# झाशीचे बिजन

## विष्णुभट गोडसे

यापमाणे बाईसाहेब मृत्युमुखातून सुटून आपल्या मित्रमंडळीत जाऊन पोचल्या, परंतु त्यांच्या राशीची दैना सरली नाही. दुसरा दिवस उजाडणार तो बिजनचाच होता. याजमुळे झांशीत प्रत्येक मनुष्यास आपण स्मशानभूमीचे काठावर आहो असे वाटत होते. जो तो आपण या संकटातून कसे वाचतो याचा विचार करीत होता. आम्हीही मांडवगणे यांचे घरी आल्यावर मोठ्या उत्कंठेने प्रथम उद्याची तजवीज काय करता असा केशवभटजीस प्रश्न केला, त्या वेळेस मांडवगणे यांनी सांगितले की, तुम्ही किमपीही धास्ती बाळगू नका. आपले समोर वाडा आहे त्याच्या मागे मोठ्या चौसोपी वाड्याची बखळ पडली आहे. वाडा पाडून भिंताडे अर्धी पडी पडली आहेत. सर्व ओसाडीभर आघाडा, गवत वगैरे पर्जन्यकाळाचे उत्पन्न तसेच आहे. तेथे गुरू किंवा मनुष्य जाण्यास वाट नाही. पूर्वी वाड्यात जाण्यास बोळातून रस्ता होता. वाडा ओसाड पडल्यावर दहापंधरा वर्षांनी एका रंगाऱ्याने बोळाचे तोंडावर लहानसे घर बांधले आहे. याजमुळे ती जागा कोणास सापडावयाची नाही, तेथे जाऊन भिंतीतील बंड्यांत लपून बसू. तेव्हा केशवरावास मी विचारले की, बंडा म्हणजे काय? त्यांनी सांगितले की, बुंदेलखंडात पूर्वी चोरांचे भय फार असे, सबब मोठाल्या घराच्या भिंती फार रुंद बांधलेल्या असून त्यांत मोठमोठाले चोरकोनाडे राखलेले असतात. ते कधी कधी एवढे मोठाले असतात की, त्यांत सर्व मनुष्ये बसून भांडीकुंडी, कपड्याचे गठ्ठे वगैरे सामान राहू शकते, चोरांचे भय फार झाले म्हणजे अशी व्यवस्था लावून वर मोकळे टाकण्याची वहिवाट या प्रांतात असे. त्या वाड्यात अशा बंड्यांत आपणास लपून राहण्यास जागा आहे. तेथे काळोख फार आहे. व वारा बिलकुल मिळावयाचा नाही. बाहेर जीव जाईल म्हणून तेथे राहणे आहे. असे ऐकून किंचित् जिवात जीव आला, व ही आमची सुदैवाने सुटका हा हरिपंताच्या उपासनेचा प्रभाव होय, असे मला आता खचित वाटते. असो. रात्रौ काही स्वस्थपणाने संध्या, जेवणखाण आटपले. नंतर माडीवर जाऊन शहरची हवाल पाहू लागलो. सर्व शहर प्रेतभूमीसारखे दिसू लागले. रात्र होती तरी शहरास भयंकर आग लागली असल्याकारणाने चोहोकडे साफ दिसत होते. आप्तजन दुःखाने वेडे होऊन आपल्या स्वजनांच्या प्रेतापाशी गल्लोगल्ली मोठ्या करुणस्वराने रडून आकान्त करीत होते. गरीब लोक अन्नाकरिता ओरडत रडत फिरत होते. जनावरेही दाणा-वैरणीकरिता व पाण्याकरिता ओरडत इकडे तिकडे फिरत होती. हलवाईपुऱ्यात मोठमोठी श्रीमान लोकांची घरे असल्यामुळे आग लागली होती.

तिचा तर अनिवार अनर्थ चालला होता. ज्वाळा गगन चुंबीत जात होत्या. ती आग विझविण्यास कोणीही प्रयत्न करीत नव्हता. त्या विशाळ भयंकर ज्वाळा तिकडे जातील तिकडे जाऊन दुसरीही घरे पेटत होती. परंतु त्यास कोणीही अडथळा केला नाही. असा दुर्धर प्रसंग झांशीवर गुदरलेला पाहून माझे सर्वांगास कंप सुटला, अति भीती उत्पन्न झाली व पोटात आग भडकून गेली, तिला उपमा नाही. जिवाची भीती फार भयंकर आहे. मला झोप येईना. ती रात्र तशीच जागून घालविली. पहाट होताच सर्व मंडळींनी उठून स्नानसंध्यादी करून भोजने आटपली व नेमलेल्या वाड्यात जाण्याकरिता आम्ही चुलतेपुतणे, केशवभट्ट व त्यांचे चिरंजीव दामोदरभट्ट असे चौघे सिद्ध झालो. तो घराशीच बंदुकीचा आवाज ऐकू येऊन जीवच जाण्याचा प्रसंग आला. अजून प्रातःकाळ झाला नाही. सबब तुम्हास मारण्याचा अधिकार नाही असे त्या यम-किंकरांस कोण सांगेल ? त्यांची स्वारी दरवाज्यापाशी दृष्टीस पडताच आता आपण जगत नाही अशी दुर्धर भीती व्यापून गेली. माझ्या सर्व शरीरास कंप व घाम सुटला. तोंड शुष्क होऊन जिव्हा आत ओढून गेली. कंबरेखाली पाय आहेत की नाहीत असे वाटू लागले. दोघे बापलेक घरात पळून कोठे एकीकडे काळोखात जाऊन लपले. आम्ही चुलतेपुतणे मात्र गर्भगळित होऊन ठिकाणच्या ठिकाणी खिळून गेलो. दोन गोरे धावून बंदूक पुढे करून आले. त्या समयी परमेश्वरानेच आम्हांस बुद्धी दिली यात संशय नाही. आम्ही लागलीच पृथ्वीवर साष्टांग नमस्कार घालून हिंदुस्थानी भाषेने बोलू लागलो, " साहेब आम्ही मुंबईजवळील ठाणे जिल्ह्यात राहणारे आहो, आम्ही इकडे यात्रेकरिता आलो आहो, आम्हांस आपण मारू नये, आम्ही इंग्रज सरकारचे रयत आहो, आम्ही पितापुत्र आहो व गरीब भिक्षुक असून या घराचे यजमानाची ओळख पटून येथे काही रुपये मिळतील म्हणून आलो आहो. साहेबांनी आम्हास मारू नये. " असे आम्ही बोलताना त्यांनी आमचे भाषेवरून आम्ही या देशातील राहणारे नव्हत अशी परीक्षा केली, व आम्हापाशी रुपये मागू लागले व चोहोकडे शोधू लागले. आम्ही किल्ल्यातून येताना बरोबर अडीचशे रुपये आणले होते त्यांची परचुंडी करून बिछान्याचे वळकुटीत ठेविली होती. ती वळकुटी गोरे लोकांनी पाडताच आतून रुपयांची परचुंडी खळकन् बाहेर पडली. तेवढे रुपये घेऊन ते यमदूत आमच्या पूर्वसुकृतामुळे व आयुष्याची दोरी बळकट असल्याकारणाने दुसरीकडे चालते झाले. या मृत्युसंकटातून तारल्याबद्दल वैजनाथेश्वराची स्तुती करून आम्ही व मांडवगणे लागलीच ठरलेल्या वाड्यात लपण्या-करिता गेलो, तो ती जागा चोहो बाजूच्या पुरुषांनी व बायकांनी भरली होती. काही बंड्यांत म्हणजे भिंतीतील चोरकोनाड्यात तीन तीन माणसे बसण्यासारखी जागा असून त्यात चार चार माणसे बसली होती. आम्ही बंड्यांत जाऊन बसल्यावर एका घटकेने साफ उजाडून चोहींकडून बंदुकीचे शतावधी आवाज होऊ लागले. दर आवाजास एकेक मनुष्य मेला असेल असे मनात आले म्हणजे अंगावर रोमांच उभे राहत. हरहर ! काय इंग्रजी शिपायांचा दुष्टपणा ! निरपराध दीन लोकांस दुसऱ्यांच्या

पापाबद्दल किती शासन हे ! मारणारे शिपाई लोकांपैकी एकासही त्या गरीब लोकांची दया आली नसेल काय ? याप्रमाणे विचार करीत बंड्यांत अडचणीत बसलो असता, बारा वाजायच्या सुमारास मजला अतिशय तहान लागली. अगोदरच वैशाखाचे दिवस; त्यात जेथे वारा नाही, अशा कोंदट जागेत दाटीत बसलेलो, शिवाय ऐन दोन प्रहरचा वेळ झाला होता; अशा अनेक उष्णतेच्या कारणांनी अगोदरच भीतीने शुष्क झालेल्या कंठास अत्यंत कोरड पडली. ती इतकी पडली की, अंगातील सर्व रक्त शोषून गेले. आता प्राण जातो की काय असे वाटू लागले. आपणास तहान लागेल हे मंडळीस वाटल्यावरून त्यांनी त्याची तजवीज करून ठेवली होती. आपल्या मोहल्यात आवाज होत नाही असे पाहून, बाहेर येऊन पाणी पिण्याकरिता विहिरीच्या रहाटास दोर लावून ठेवला होता, व जवळच एक मडके ठेवले होते, परंतु मला बाहेर जाण्याचा धीर होईना. शेवटी येथे बसून तरी प्राण जाणार; मग तृषा भागवून का जाईना असे वाटून जवळ आसपास कोठे आवाज होत नाही अशी संधी पाहून बंड्यातून बाहेर पडलो. धावत धावत विहिरीवर येऊन मडके फासास लावून झराझर पाणी काढले व मडके तोंडास लावले. घोट, दोन घोट पाणी घशाखाली उतरते न उतरते इतक्यात जवळच्या वाड्यात बंदुकीचा आवाज झालेला कानी पडला. जिवाची आशा मनुष्यास कधीही सुटत नाही. मडके हातातून टाकून धाव ठोकली तो घोटाळून जाऊन आमच्या बंड्याचा रस्ता चुकलो. तेव्हा माझे हातपाय कापू लागले, व सैरावैरा इकडे तिकडे घाबरून धावत सुटलो. इतक्यात एका बंड्याचे तोंड दृष्टीस पडले. त्यात डोके घालून शिरण्यास लागलो तो आत दोघी तरुण बायका दृष्टीस पडल्या. त्यांनीही मोठ्या घाईने आत लवकर या, असे सांगितले. तो बंडा फार लहान असल्यामुळे आत दोघा बायकांसही पुरेशी जागा नव्हती परंतु त्या कोमल अंतःकरणाच्या स्त्रियांनी अडचण सोसून मला आत घेतले. त्यांची तोंडे पश्चिमेस होती. व मी आत शिरून फिरावयास जागा नव्हती. म्हणून माझे तोंड पूर्वेस होते. याप्रमाणे तोंडात तोंड लावून उराशी ऊर लावून आम्ही बसलो. पुढेच जी स्त्री होती तिचे सर्व अंग घामाने भिजलेले होते. त्या वेळेस माझे वय सुमारे ३० वर्षांचे असावे व त्या स्त्रीचे वय १८ वर्षांचे असावे. अशी तरुण स्त्री-पुरुषे एकमेकांशी घट्ट मिठी मारून बसली असताही कामवासना बिलकुल उत्पन्न झाली नाही, हा भयंकर मृत्यु-भीतीचा प्रभाव म्हटला पाहिजे. सहा-सात घटका झाल्यावर जवळ आसपास कोठे आवाज होत नाहीत असे पाहून मी त्या बंड्यांतून बाहेर पडलो; आणि आपल्या बंड्यांत जाऊन बसलो. मला परत आलेला पाहून काकांस परमावधी आनंद झाला. त्यांस मी मारला गेलो असे पक्के वाटून अति शोक उत्पन्न झाला होता. असो. याप्रमाणे परमेश्वराच्या दयेने व हरिपंतांच्या पुण्याईने तो दिवस पार पडला. रात्र होताच आम्ही आपल्या गुहेतून बाहेर पडलो व घरी येऊन बसलो, तो शेजारचे करकरे यांची बायको व सून आमचे येथे येऊन सर्व वृत्त आम्हांस सांगू लागल्या. तो ब्राह्मण बिचारा

६०–६५ वर्षांचा व त्याचा पूर्ण वयस्कर मुलगा असे दोघे मारले गेले होते. तेव्हांपासून सासू व सून आपल्या पतींच्या प्रेतांशी मोठा आकान्त करीत बसल्या होत्या; परंतु रात्र पडताच त्यांस भीती वाटू लागली. तेव्हा आम्हाकडे येऊन आम्हास प्रेतशुद्धी करण्याविषयी विनवू लागल्या. त्या वेळेस जरी सर्वांस भुका लागल्या होत्या तरी लागलीच शेजारपाजारचे सातआठ लोक जमा करून करकरे यांचे घरी गेलो. नंतर तुळशीच्या अंगणात चिता रचून प्रेते दहन केली. लांकडे भरतीची नव्हती, सबब घरातील फळ्या, पाट, पाळणे, बाज वगैरे भरतीस घातली. प्रेतशुद्धी झाल्यावर त्या बायकांस आम्ही आपले घरी घेऊन आलो. झाशीच्या त्या भयंकर प्रसंगात कोणाचे कोणास अशौच नाही. दुसरे दिवशी आदले दिवशीच्या प्रसंगाची आठवण होऊन अपरात्रीच उठून रात्र सरली नाही तो बंड्यांत जाऊन बसलो. त्या दिवशी फार माणसे मेली. गोरे दुरून दृष्टीस पडले म्हणजे जीव बचावण्याकरिता कित्येक लोक गवताचे गंजीत जाऊन लपले; तेथे गोरे येऊन त्यांनी गवताच्या गंजी पेटवून दिल्या म्हणजे ते अग्नीत जळून जात. कित्येकांनी गोरा आला असे पाहून विहिरीत उड्या घातल्या; परंतु गोरे लोकांनी विहिरीवर बसून पाण्यावर डोके दिसू लागताच गोळ्यांचा भडिमार करून त्यांस तेथेच मारले. कित्येक लोक शेतखान्यात लपून बसले होते, त्यांसही शोधून ठार मारले. आमचे शेजारी अग्निहोत्रीबुवाचे घर होते. अग्निहोत्रीबुवा होम देऊन बाहेर येतात तो घरात दोन गोरे व गोरे लोकांचे बंदोबस्ताकरिता चार काळे शिपाई शिरले. गोरे जे गेले ते होमशाळेत समोर गेले. तेथे अग्नीचे कुंडावर टोपल्या, पाट्या उपड्या घातलेल्या होत्या. यामुळे गोरे लोकांस असे वाटले की यात अर्थ आहे. म्हणून लाथेने पाट्या उडवून पाहतात तो राखाडी दृष्टीस पडली. यात पुरलेला अर्थ असेल हे मनात आणून आत हात घातला. तो अग्नीच्या योगाने हात भाजले. मग ते गोरे क्रोधायमान होऊन अग्निहोत्री यास व त्याचे भावास व मुलास बंदुकीच्या गोळ्यांनी ठार मारून काही सोने, रुपे होते ते घेऊन दुसऱ्या घरी गेले. एकंदर अग्निहोत्रीबुवासुद्धा त्याचे घरची अकरा मनुष्ये मारली गेली. सर्व कुटुंबघातच झाला. कित्येक लोक गोरा पाहून पळण्यास लागले. त्यांस रस्त्यातच कडामिनीच्या गोळ्यांनी मारीत असत. भिडे यांचे बागेतील सर्व मनुष्ये दोन दिवस उपाशी होती. तिसरे दिवशी पहाटेस दरवाज्यावर पहारेकरी गोरे होते, त्यांनी बागेत येऊन सर्वांस असे सांगितले की आपापले घरी जाऊन भोजनास सरंजाम आणून येथे जेवणे करा. असे सांगताच सर्व मनुष्यास अत्यानंद झाला. व घरी धावत धावत जाऊन ज्याचा त्याने सरंजाम आणला. व माणसे पुनः बागेत शिरली. त्यात दुसरे लोकही जीव बचावण्याकरिता शिरले व तिसऱ्या दिवसाचे बिजनातून वाचले गेले.

यःप्रमाणे तीन दिवस बिजन करून शहरात जितके सोने, रुपे, हिरे, पाच, मोती, पोवळे सांपडले तितके गोरे लोक घेऊन गेले, त्या वेळेस शहरात कोट्यावधी रुपयांचा अर्थ गोरे शिपायांस सापडला असेल. पुरुषाचे भाग्य फार चमत्कारिक आहे. तिसरे

दिवशी इंग्रजांच लोक शहरचे वाड्यात शिरले आणि तेथे सर्व प्रकारची लूट मांडली. सोने, रुपे, पितळ, तांबे वगैरे सर्व जिन्नस इंग्रज सरकारने लुटून आपले गोटात नेला. त्यांत त्यांनी काही एक अर्थ किंवा वस्त्र किंवा पात्र ठेवले नाही. पोथ्यांची वेष्टणे यांवरसुद्धा त्यांची धाड येऊन पडली. झांशीची पुस्तकशाळा फार मोठी व उत्तम व्यवस्थेची होती. कारण झांशीचा सुभा पेशव्यांपासून ज्या पुरुषानी मिळविला, त्या पुरुषापासून गंगाधरबाबा ऊर्फ बाबासाहेब या शेवटच्या पुरुषापर्यंत झांशीवाले पुस्तकाविषयी फार उद्योगी झाले. चारही वेदांची भाष्ये व सर्व शाखांची सूत्रे भाष्यांसहित व परिशिष्टे भाष्येसुद्धा व स्मृती टीकांसह दरोबस्त पुराणे यांखेरीज ज्योतिषशास्त्राचे ग्रंथ, बहुधा पृथ्वीवरचे सर्व तऱ्हेचे उपयुक्त ग्रंथ तेथे होते. झांशीपासून चारपाचशे कोसांवर ग्रंथ नवा असल्याचे कळताच त्या शहरात झांशीहून लेखक पाठवून ग्रंथ लिहून आणले होते. कारणपरत्वे ग्रंथ लागल्यास काशीक्षेत्री झांशीहून ग्रंथ पाहण्यास नेत असत. सर्व ग्रंथांस वेष्टणे फार मजबुतीची व फळ्या शिसव्याच्या होत्या. त्या प्रसंगात इंग्रज सरकारने पुस्तकांच्या फळ्या व वेष्टणे सोडून घेऊन पुस्तके धडाधड तिसरे मजल्यावरून रस्त्यात टाकून दिली. त्या पोथ्यांची पाने वाऱ्याच्या योगाने रस्तोरस्ती उडून जात होती. तसेच फरासखान्यातील जाजमे, लोड, तक्के, तंबू, पाले वगैरे सर्व गोटांत घेऊन गेले. नगारखान्यात जाऊन सर्व नौबदी, नगारे वगैरे फोडून तांब्याची भांडी घेऊन गेले. याप्रमाणे वाड्याची अगदी दुर्दशा करून टाकली. लक्ष्मीचे देवालयही लुटण्यास सोडले नाही; देवीचे अलंकार, वस्त्रे वगैरे सरंजाम लुटून नेला. मला वाटते की, महालक्ष्मीस आपलाच राग येऊन तिचा सर्व सरंजाम तिला नकोसा झाला होता. उद्यापासून बिजन बंद होणार म्हणून या बिजनाचे काम त्या दिवशी फार जारीने व शिताफीने चालले होते; घरात शिरून कोनाकोपऱ्यात अंधारात लपलेली माणसे शोधून मारीत होते; धर्मशाळाही शोधल्या, देवळाचे गाभारेही शोधून प्रेतांनी भरून काढले. कोष्टीपुऱ्यांत अति प्राणनाश झाला, त्यात बिचाऱ्या काही बायकाही मारल्या गेल्या होत्या.

तिसरा दिवस बिजनाचा सरल्यावर जिवाच्या भीतीचे डोंगराएवढे ओझे डोक्यावरून कमी होऊन आम्हांस फार आनंद झाला व बंड्यांतून निघून घरी येऊन मोकळ्या मनाने बसलो. नंतर स्वस्थपणे स्नान-भोजने केली. तीन दिवसांपर्यंत रात्रौ घरात जे धान्य होते ते शिजवून भोजने करीत असू. शहराची वस्ती असल्यामुळे आठा दिवसांपलीकडे महिन्याचा धान्यसंग्रह केलेला असा गृहस्थ थोडा होता. तिसरे दिवशी लोकांनी सावधपणाने खाण्याकरिता धान्य व मीठ वाड्याचे चौकाचे गटारात दृष्टीस न पडेल असे ठेवले होते. कोणी भूमीत पुरून ठेवले होते. ज्यांच्यापाशी मुळीच धान्य नव्हते ते उपोषणे करून राहत होते. आम्ही मांडवगणे यांजकडे गटारात जोंधळे व बाजरी थोडी ठेवली होती. मांडवगणे गरीब भिक्षुक असल्यामुळे तांदूळ वगैरे धान्ये जुजबी होती ती मुळीच संपली होती. यामुळे जेवणाचे हाल होत असत.

तरी त्याविषयी आम्हांस विशेष दुःख वाटले नाही. परंतु जेव्हा आम्हाजवळची तंबाखू संपली तेव्हा आम्हांस उपोषण पडल्यासारखे होऊन गेले. बिजनाच्या दिवसात तंबाखूची आठवणसुद्धा आली नाही. कधी रात्री घरी येऊन जेवण झाल्यावर थोडीशी खात असू. परंतु जिवावरची भीती संपतांच तंबाखूशिवाय करमेनासे झाले. गांवात तंबाखू कोठे विकत मिळण्याचे तर नाव नको. याप्रमाणे मोठ्या संकटाने ती रात्र घालविल्यावर सकाळचे प्रहरी एक पंचा नेसून स्वस्थपणे काय होते याची मौज पाहण्याकरिता ओटीवर बसलो, तो काळे मंद्राजी लोक शहरात तांबे, पितळ वगैरे धातूंची लूट करण्याकरिता आलेले दृष्टीस पडले. त्या लोकांनी बरोबर मोठमोठाले गळ विहिरीतून भांडी काढण्याकरिता आणले होते. बिचाऱ्या मूर्ख लोकांनी आपली भांडी कुंडी वाचवावी म्हणून विहिरीतून टाकून ठेवली होती. परंतु विहीर उथळ असल्यामुळे मंद्राजी शिपायांनी सर्व भांडी काढून नेली. लोकांचे घरात शिरून जे पात्र सांपडेल ते लुटून नेत असत. आमचे घरी लोक येताच आम्ही त्यांस नम्रतेने सर्व हकीकती विचारल्या. तेव्हा ते सांगू लागले की, तीन दिवस बिजन होऊन गोरे लोकांस सोने-रुपे सांपडले, ते बक्षीस दिले आहे, आता पुढे चार दिवस लूट होईल. या दिवशी कोणाचाही प्राणघात होणार नाही. लुटीचे दिवस जेवढ्या काळ्या पलटणी व हिंदुस्थानचे राजेरजवाड्यांकडून मदतीस पलटणी आल्या आहेत, त्यांस हिशेबाने वाटून दिले आहेत. आजचा दिवस आमचे वाटणीस आला आहे. उद्या सकाळी बारा वाजेपर्यंत हैदराबाद-वाल्यांची वाटणी आहे. असे सांगितल्यावर आम्ही त्यांजजवळ तंबाखू खावयास मागू लागलो. तेव्हा ती त्यांनी आम्हांस खुषीने पुष्कळ दिली. नंतर घरात सापडली ती भांडी घेऊन ते दुसरीकडे चालते झाले. आम्ही जेवण करण्यास भांडी रात्रौ बाहेर भूमीत पुरून पांचचार ठेवली होती, बाकी सर्व त्या लोकांनी नेली. घटके घटकेने दुसरे काळे मंद्राजी येत असत, सबब सायंकाळपर्यंत उपोषणे घडली. रात्रौ सर्व लोक शहराबाहेर गेल्यावर आम्ही स्नाने करून शाळीग्राम, बाण व नर्मदी गणपती घरात राहिले होते,— बाकी उपकर्णी व धातूमूर्ती, देवांची कमळे वगैरे नेली होती— त्या देवांची पूजा केली; माझी मुळीच पार्थिव लिंगपूजा असल्याने काहीच अडचण आली नाही. बेल मात्र पाहिजे होता तो दारचा काढून पूजा केली. नंतर जोंधळे व काही बाजरी ठेवलेली गटारातून काढून दळून अग्नी पेटवून तवा, पितळी नसल्यामुळे गागरासारखे पानगे अग्नीवर भाजले व मीठ मुळीच नव्हते, सबब मिठा-शिवाय तशीच भोजने केली. सायंकाळी दिवे लावण्यास समया नव्हत्या, तेव्हा दिवल्या मातीच्या लावल्या होत्या. काही वेळाने जवळच्या घरची उमेदवार मंडळी पाच-सात असामी आमचे बिऱ्हाडी येऊन मला बरोबर घेऊन शहर पाहण्यास गेली; आम्हास रस्त्यातून ठिकठिकाणी प्रेते आढळू लागली. शहर जळतच 'होते. जे जिवंत राहिले होते ते बहुधा उपाशी असल्यामुळे क्षुधार्त होऊन करुण स्वराने ओरडत होते. हजारो

जनावरे श्वासमात्र शेष होऊन रस्तोरस्ती पडली होती. गलोगल्ली प्रेतांशी बसून लोक रडत होते, आम्ही सुमारे पाव घटका इकडे तिकडे फिरल्यावर आम्हास अति भीती व किळस उत्पन्न झाला, व ताबडतोब परतलो व घरी येऊन स्वस्थ निद्रा केली. दुसरे दिवशी उजाडताच हैद्राबादवाल्यांचे शिपाई शहरातून लूट करण्यास शिरले, ते वस्त्रांची लूट करीत चालले. घरात शिरून जेवढे वस्त्र म्हणजे फाटके धोतर किंवा उंची पीतांबर असो, तेवढे घेत चालले. दोन-तीन वाड्यांचे संधीत हत्ती उभा करून त्याजवर मोठा सलिदा म्हणजे कंठाळीसारखा असतो तो टाकून त्यात चिरगुटे, पांघुरणे, सत्रंज्या, गाद्या, बैठकी, जाजमे वगैरे सर्व भरून नेऊ लागले. याप्रमाणे त्यांनी मोठमोठ्या व्यापाऱ्यांच्या घरी लाखो रुपयांची लूट मिळविली. आम्ही ओटीवर बसून जे लोक भेटतील त्यांजपाशी गोड बोलून तंबाखू खाण्यास मिळवीत असू. तिसरे दिवशी शहरात पलटणीचे लोक शिरले, त्यांनी धान्य लुटण्यास आरंभ केला. त्यांनी बरोबर मोठमोठे बैल आणिले होते. बैल दरवाजापाशी उभा करून लोकांचे घरी जोंधळे, बाजरी, तांदूळ, डाळी वगैरे जी धान्ये सापडली ती भरून नेली. धान्यादिकांनी भरलेली मडकी ओतून घेऊन तेथेच फोडून टाकीत असत. चवथे दिवशी सर्व प्रकारची लूट करण्यास आरंभ केला. ज्यास जे नेण्यासारखे वाटेल, ते तो घेऊन जाई. लोकांचे घरी उपयोगी वस्तू एकही ठेविली नाही; विहिरींचे रहाटही काढून नेले. रहाटांचे दोरखंड नेले. दारच्या केळीवरची केळवंडे, आंब्यावरचे आंबे, झाडांवरील फळे, लांकडी खुर्च्या वगैरे सामान याप्रमाणे सर्व जिनसांची लूट मांडली. त्या दिवशी आम्हापाशी काही एक खाण्यास नव्हते. जुजबी धान्य होते ते सर्व सरून गेले होते. बाजारात कोठे विकत घेऊ म्हटले तर कोठेच मिळण्यासारखे नव्हते. सायंकाळपर्यंत उपोषण पडल्यामुळे व वैशाखमास असल्यामुळे जीव अगदी हलका होऊन गेला. सायंकाळानंतर थंड पाण्याने स्नान करून अतिशय भूक व तहान लागल्यामुळे निरुपायास्तव थंडा फराळ केला. हरहर ! काय हा प्रसंग ! सर्व शहरात हजारो लोक उपाशी होते. लाखो मेले होते. शहर जळत होते. लोक तर अगदी नागवून गेले होते. कोणाच्या घरात भांडे, मडके अगर वस्त्र उरले नव्हते. परमेश्वराच्या घरचा न्याय मोठा चमत्कारिक आहे. ज्या गरीब लोकांनी इंग्रज सरकारचा कोणत्याही प्रकारे अपराध केला नव्हता, त्यांस निरर्थक किती भयंकर शिक्षा ही ! परंतु इंग्रज सरकारास अगर परमेश्वरास बोल काय म्हणून लावावा ? शुक्रनीतीमध्ये शत्रूचे पारिपत्य असेच करावे म्हणून सांगितले आहे. परमेश्वराने तरी काय अन्याय केला आहे ? झांशी लोकांचे पदरी पूर्वदुष्कृत्यच फार मोठे असले पाहिजे. बुंदेलखंडात व्यभिचाराचे पातक पूर्वीपासूनच साचत आले होते. भंगिणीचा इतिहास मागचे भागात वर्णन केलाच आहे. या पातकपर्वताबद्दल लक्ष्मीबाईच्या निमित्ताने सर्व शहरास देहान्त प्रायश्चित्त देऊन ईश्वराने ही भूमी शुद्ध केली असे आम्हास वाटू लागले. याप्रमाणे मनाचे समाधान करून उदयीक काय करावे असा विचार करू लागलो. घरून निघाल्यापासून सुमारे चारपाचशे रुपये ग्वाल्हेर

व झांशी येथे मिळविले; परंतु जवळ काही उरले नव्हते. घरी वृद्ध तीर्थरूप व मातोश्रीस टाकून द्रव्य मिळविण्याकरिता देशांतरी आलो. अनेक संकटे भोगून पैसा मिळविला. परंतु दैव विपरीत असल्यामुळे सर्व द्रव्य नाहीसे होऊन जीव जाण्याचाही प्रसंग आला. त्या वेळेस राजनीतीतील एका आर्येचे आम्हांस स्मरण झाले. " अबला यत्र प्रबला बालो राजा निरक्षरो मंत्री ॥ नहि नहि तत्र धनाशा जीविताशापि दुर्लभा भवति " अशी स्थिती झांशीची अक्षरशः होती. अशा राज्यव्यवस्थेत द्रव्य मिळण्याची आशा तर फार लांबच राहिली, परंतु जीविताची आशासुद्धा धरावयास नको. तेव्हा या दुस्तर संकटातून वाचलो हे आमचे महत पूर्वसुकृतच समजले पाहिजे.

□

दोन

# गेरसप्पा

## गोविंद हरी फडके

ज्यांना केवळ येथेच जावयाचे असेल त्यांनी होनावर बंदरावर उतरून तेथून शेरावती नदीचे खाडीने गेरसप्पापर्यंत गलबताने किंवा होडीत बसून जावे, व तेथून मलीमणी घाटाने वर जावे लागते. गेरसप्पा हे घाटाच्या पायथ्याशी धबधबा पडतो, त्याजवळ मोडके गाव आहे. मलासुद्धा गोकर्णाहून होनावरास यावे लागले. कारण, गेरसप्पाला जाण्याचा हाच मार्ग आहे. मी आलेला मार्ग काही सडकेचा व काही गलबताचा होता. ह्या मार्गातून जात असता इकडील पुष्कळ खेड्यांचा, गावढळ मनुष्यांचा व शहरांचा सहवास झाला. आमच्या इकडील कोळी, कातकरी लोकांप्रमाणे इकडील गांवढळांची एक जात आहे. यांच्या बायकांच्या हातात व पायात कोपरापर्यंत व ढोपरापर्यंत पितळेच्या चपट्या पाटल्यासारख्या बांगड्या अडकविण्याची चाल आहे. ठाणे जिल्ह्यांत डहाणू, उंबरगावाकडे फुदगी लोकांच्या बायका असेच वापरतात. पण त्यापेक्षा यांची कडी जास्त आहे. तसेच यांच्या गळ्यात एकाच रंगाच्या, विशेषतः काळ्या रंगाच्या पोतींचे सर गळाभरून एक ओझे होईल एवढे घालतात ! उष्ण मुलूख, एकीकडे घाम येत असतो, ह्या स्वतः केसांच्या वर्णाइतक्या कभिन्न-काळ्या, गळ्यात पोत काळी, लुगडे काळे, हातापायात पितळेच्या बांगड्या पिवळ्या किंवा स्वच्छ दिसाव्या, पण त्याही कधी न घासल्याने काळ्या झालेल्या असतात. काय या सौंदर्याला म्हणावे ! आणि त्याकरिता डागिन्यांचा काय हा आटोकाट प्रयत्न ! सर्वच मजा आहे ! एकंदर व्यसनाप्रमाणे वाईट संवयीही जास्त सहवासाने मनुष्यास अभिमानास्पद वाटतात हेच खरे, दुसरे काय ?

याच रस्त्यावरून जाताना मला एक त्याच जातीतला भिक्षा मागणारा आंधळा एकटाच सडकेने काठी टेकीत टेकीत जाताना दिसला. तो दोन्ही डोळ्यांनी साफ आंधळा होता, पण डोळस मनुष्याप्रमाणे सडकेच्या एका बाजूने सप्सप् चालला होता. शिवाय त्याला इंग्रजी चांगले बोलता येत होते. त्याचे माझे बरेच भाषण झाले. सडक असली तरी तुला असे बिनधोक कसे चालता येते? समोरून गाडी किंवा जनावर आले तर कसे होते? असे मी त्यास विचारले. तो म्हणाला, 'मी जन्मांध आहे. पण माझे कर्णेंद्रिय फार तीक्ष्ण आहे. समोरून कोण किती अंतरावरून येत आहे, जनावर आहे किंवा मनुष्य आहे, जनावर असल्यास कोणत्या जातीचे आहे व मनुष्य असल्यास तो स्त्री किंवा पुरुष आहे, काय दर्जाचा आहे, हे मला त्याच्या चालीवरून समजते! व त्या धोरणाने मी सडकेवरून चालतो! कधी चुकतेही, पण फारसे चुकत नाही! तुम्ही आपल्या गड्याशी बोलत होता त्या बोलण्यावरून तुम्ही मुंबई प्रांतस्थ असून सुशिक्षित आहा, अर्थात तुम्हांला इंग्रजी येत असलेच पाहिजे असे जाणून मी तुम्हांशी इंग्रजीत बोलू लागलो. मला मराठी येत नाही. कानडी, तेलंगी व इंग्रजी येते. तुमच्या स्वरोच्चारावरून व बोलण्याच्या लकबीवरून मी हे अनुमान केले व ते खरे ठरले. असेच नेहमी माझे होते.' तो आंधळा खरा, पण त्याची धूर्तता वाखाणण्यासारखी होती. याची प्रचीती त्या वाटेने जात असता समोरून कोण येते, मागे काय चालले आहे, असे मधून मधून वारंवार विचारून व निरनिराळे प्रश्न विचारून आली व त्याची समर्पक उत्तरे ऐकून मी अगदी थक्क झालो! तुला इंग्रजी भाषा कशी आली? म्हणून मी त्यास विचारले, तर तो म्हणाला, मला सहवासावरून आली. माझ्या दैवयोगाने मला एक विद्वान कुटुंबाचा सहवास घडला होता. त्यामुळे मला ही भाषा व्यवहारापुरती आली. एकंदरीत या भिन्न भाषेच्या लांबलचक मार्गात मला ह्या आंधळ्याची चांगलीच करमणूक झाली. विद्वानांच्या सहवासाने तो आंधळा विनोदी, रसिक व चांगला मर्मज्ञ झाला होता. कोणाही सुशिक्षिताची त्याच्या संगतीने करमणूकच होईल, इतकेच नव्हे तर त्याचे कौतुकही वाटेल. याच्या संगतीकरिता मी त्याच्या बरोबर जरा सावकाश चाललो होतो तरी माझ्या चालण्याने आमचा प्रवास कधी संपला याचे भानच राहिले नाही. पुढे वाट फिरल्यावर मी त्यास संतोषाने चार आणे बक्षीस दिले, आणि मनात आणिले, आंधळ्याला जगाचा अनुभव कसा येईल? याचा जन्म फुकट आहे. पण परमेश्वरी लीला मनुष्याच्या बुद्धीला अगम्य व अतर्क्य आहे. तो कोठे काय दाखवील याचा नेम नाही. ह्याच्या डोळ्याकडे पाहिले नाही तर याला आंधळा म्हणण्याची कोणाची छाती नाही. तसेच याचे डोळे पाहिले म्हणजे प्रकाश किंवा सूर्य ही वस्तू जगात काय आहे, हे त्याला समजणे शक्य नाही! तरी त्याचा कोणता व्यवहार अडला आहे? इतकेच नव्हे तर त्याची दृष्टी गेल्यामुळे तो इंद्राप्रमाणे सहस्रनेत्रच झाला आहे. त्याचे प्रत्येक इंद्रिय त्वचेसुद्धा नेत्राचे काम करीत आहे! हे प्रत्यक्ष मला त्याच्या दीड तासाच्या अनुभवावरून समजले!

अशा रीतीने आम्ही होनावर बंदरावर पोहोचलो, व तेथे एका खाणावळीत उतरलो. होनावर हे तालुक्याचे नाव आहे. तेथून घाटाखाली गेरसप्पा ह्या ठिकाणी माल व माणसे नेण्याकरिता खाडीतून भरतीच्या वेळी गलवते जातात. त्या दिवशी भरती दहा वाजता होती. जेवून जाण्याचा विचार होता. त्याप्रमाणे खाणावळवाल्यास ताकीद दिली होती. पण कोकणात टाइम कसले? आम्ही जेवून बंदरात आलो, तर अकरा वाजून गेले. अर्थात सर्व गलबते गेली. मग विचार पडला. कारण दुसऱ्या दिवसाशिवाय पुन्हा गलबते नाहीत. परंतु इतक्यात कर्मधर्मसंयोगाने एक श्रीमंत मनुष्य जावयास निघाला. अर्थात त्याने स्पेशल होडी केली. मी निम्मे नोर देण्यास कबूल होतो तरी त्याने तो न घेता केवळ मी सुशिक्षित आहे असे जाणून मेहेरबानीने माझी सोय केली. होडी स्पेशल असल्यामुळे आमची होडी दुसरी गलबते गेरसप्प्याला पोहोचण्यापूर्वी अगोदर गेली. तरी रात्रीचे आठ वाजले. आम्ही आमचे गड्याचे माहितीने धर्मशाळेत न उतरता एका गृहस्थाचे घरी उतरलो होतो. त्या घरची मंडळी सज्जन होती. त्यांच्या मदतीने त्या वेळी घाटातून माल घेऊन जाणाऱ्या गाड्या आल्या होत्या व रात्री दहा वाजता त्यांचा तांडा निघावयाचा होता, त्यात त्यांनी आमची सोय करून दिली. आम्ही रात्री दहा वाजता निघालो तो रात्रभर घाट चालून सकाळी वर जोगचे धर्मशाळेत जाऊन उतरलो. जोग हे एक खेडे आहे. या जोगावरूनच त्याला जोगचा धबधबा असे म्हणतात.

येथून आठ वाजता जेवणखाण उरकून आम्ही धबधबा पाहण्यास निघालो. येथून धबधबा दीड-दोन मैल लांब होता. जसजसे जवळ जवळ जाऊ लागलो तसतसे धबधब्याचे गुरगुरणे व वाफेचे लोट वर जाताना दिसू लागले. जंगल फार होते. शेरावती नदी पूर्व-पश्चिम वाहत होती. तिचे उत्तर बाजूस ब्रिटिशांची हद्द आहे व दक्षिणेकडची बाजू म्हैसूर संस्थानची हद्द आहे. हे जंगल विख्यात व हे स्थान दर्शनीय असल्यामुळे हा धबधबा पाहण्यास सर्व जगातून लोक येतात. सर्व जगात जे प्रख्यात धबधबे आहेत त्यांपैकी हा एक आहे. आल्प्स पर्वतात शिरसोली धबधबा आहे, त्याची उंची २४०० चोवीसशे फूट. दुसरा इभ्नसन् त्याची उंची १२०० बाराशे फूट, तिसरा आरवी याची उंची ११०० अकराशे फूट आहे. हे तिन्ही धबधबे उंच खरे पण त्यात पाणी फार थोडे आहे. अमेरिकेतला नायगारा धबधबा मोठा आहे. पण तो रुंदीमध्ये मोठा आहे. याच्या इतका उंच नाही. नायगाराची उंची फक्त १६४ फूट आहे.

ह्या धबधब्याची शोभा ऋतुमानाप्रमाणे व दिवसाच्या विभागाप्रमाणे म्हणजे सूर्योदयापासून सूर्य अस्तापर्यंत, तसेच चांदिण्या रात्री फार अवर्णनीय दिसते. ही निरानिराळी शोभा केव्हाही नेहमी पाहता यावी म्हणून दोन्ही सरकारांनी आपआपल्या हद्दीत चांगले प्रशस्त व बंदोबस्ताचे रहदारीचे बंगले बांधले आहेत. मोठे जंगल असल्यामुळे हिंस्र पशूंकरिता बंदोबस्त चांगला केला आहे. तेथून धबधब्याची शोभा चांगली दिसते. त्यात ब्रिटिश सरकारच्या बंगल्यापेक्षा म्हैसूर सरकारच्या बंगल्यातून

देखावा विशेष चांगला दिसतो व सोयीही जास्त केल्या आहेत. पावसाळ्यात ह्या धबधब्याला माज येत असल्यामुळे व सर्व पाण्याचा लोट एकच होत असल्यामुळे पाहणारास विशेष मौज दिसत नाही. जिकडे तिकडे धुके दिसते पण त्या वेळी धबधब्याचा भयंकरपणा व गडगडाट, मेघगर्जना, अक्राळविक्राळ स्वरूप व मुसळधार पाऊस, सूर्यदर्शन मुळीच नाही, मेघांच्या गडगडाटांचा व धबधब्याच्या चढाओढीने निघालेला आवाज, सोसाट्याचा वारा, मेघ व धुके यांचा धुमाकूळ, लालीलाल पाणी, वेग भयंकर, यामुळे लांबून होडीतूनसुद्धा नदीपलीकडे जाण्यास फार त्रास पडतो. ह्यामुळे हे ह्याचे रौद्र रूप कोमल व भित्र्या माणसांच्या छातीत धडकी भरण्यासारखे असते, म्हणून ते हा प्रसंग टाळतात. पण सुशिक्षित व धाडसी मनुष्यास हे रौद्र रूप पाहण्याची फार इच्छा होते. तसेच येथील गावढे गावचे लोक मर्दानी बाण्याचे असल्यामुळे त्यांना त्यातच फार मौज वाटून ते ह्या वेळीच तो पाहण्यास मुद्दाम जातात. पण त्यांनासुद्धा ते तसे स्पष्ट चांगले दिसत नाही.

पण पूर निघून गेल्यावर म्हणजे पावसाळा संपून शरदऋतू लागल्यावर या धबधब्याची शोभा विशेष पाहण्यासारखी असते. मी ह्याच वेळी म्हणजे आश्विन अखेर तेथे गेलो होतो. चैत्र-वैशाखात याची शोभा विशेष चांगली दिसते असे म्हणतात. आम्ही तेथे गेलो तो अकरा वाजले होते, परंतु ती वेळ भयंकर जंगलामुळे मला सुप्रभाताप्रमाणे फारच आनंददायी वाटली.

त्या वेळी धबधब्याचे चार भाग झाले होते. येथील साधारण देखावा असा आहे.— दोहों बाजूस दोन सह्याद्रीच्या फाट्याच्या उतरत्या रांगा ऊर्फ दांड आहेत, व मधील खोऱ्यातून ही नदी वाहात आहे. हे डोंगर वनश्रीने अगदी गच्च भरून गेले आहेत व त्यावरच दोन्हींकडे दोन बंगले बांधले आहेत. मधील खोऱ्यांतून शेरावती नदी वरून वाहात आहे. तिचे पात्रात धबधब्याचा आडवा धरणासारखा खडक आला आहे, व तो कडा अधांत्र तुटला आहे. धबधब्याची खोली साडेनऊशे फूट आहे, असे सरकारने प्रसिद्ध केले आहे. हे धरण सह्याद्रीचे अगदी शिखराजवळ आहे. कड्याच्या काठाशी नदीचे पात्र २२३० फूट रुंद आहे.

ह्या चार धबधब्यांपैकी सर्वांत मोठा धोत पडतो त्यास राजा फॉल किंवा मुख्य धबधबा म्हणतात. कारण तो सर्वांत मोठा आहे. हा सुमारे पाच फूट खोल अशा काटकोनचौकोनाकृती गायमुखासारखा आहे. ह्याच्या दक्षिणेस सुमारे ३००—३५० यार्ड अंतरावर एक त्यापेक्षा लहान धबधबा आहे. त्याचे नाव रोअर किंवा रावण, म्हणजे नेहमी ओरडणारा असे आहे. कारण तो एका खाली एक कड्यावरून आदळत आदळत जाऊन मुख्य प्रवाहास जाऊन मिळतो. हा भयंकर गर्जना करीत जातो म्हणून यास रोअर म्हणजे ओरडणारा असे इंग्रजीत नाव मिळाले आहे. या धबधब्याच्या दक्षिण बाजूस असाच सुमारे ७०० फूट अंतरावर एवढाच प्रवाह खाली पडत आहे तो अग्नीच्या म्हणजे दारूच्या बाणाप्रमाणें सूं सूं करीत कमानदार वळण घेऊन पुढे फुटून

त्याचे लहान लहान गोळ्याप्रमाणे असंख्य पाण्याचे गोळे व तुषार होऊन खाली पडतात. त्यावर सूर्यकिरण पडले म्हणजे प्रकाशकिरणांचे नियमाप्रमाणे ते गोळे तांबडे, हिरवे, पिवळे वगैरे सात रंगांचे तारे दिसतात. म्हणून यास रॉकेट म्हणजे बाण असे इंग्रजीत अन्वर्थक नाव मिळाले आहे. ह्याचेपुढे २०० यार्डावर लेडी नावाचा चवथा प्रवाह आहे. हा अगदी शेवटी असल्यामुळे यास मोटा वेग नाही. तरी पण तो ज्या वाटोळ्या दगडाच्या कड्यावरून खाली पडतो त्यामुळे त्याचा प्रवाह विदारून युरोपियन लेडीच्या पाठीमागल्या झग्याप्रमाणे त्याचा विस्तार दिसतो, व तसा भास होतो. यामुळे त्यास लेडी हे योग्य नाव मिळाले आहे. ह्या धबधब्याच्या पडण्यामुळे त्या मागच्या खडकात मोठेमोठे कपारे सुरक्षित राहिले आहेत. ते पोखरून त्यात लक्षावधी पाकोळ्या, पारवे, घिरट्या घालून शेतांतून आणलेले दाणे अशा ह्या अवघड जागी आपल्या पोटाकरिता ठेवितात. पण उद्योगी आणि धाडशी माणसे अशाही अवघड जागी शिंक्याने जाऊन त्या कोठ्या फोडून खंडीच्या खंडी धान्य घरी आणतात ! मधमाश्यांप्रमाणेच या आहेत. यांनी आपल्या लहानशा चोचीने मिळविलेला हा घास मनुष्य हल्ला करून नेतो ह्याबद्दल त्यांना किती तरी वाईट वाटत असेल ! ! हे मनुष्याला समजावे म्हणून ह्याचे उट्टे देव मनुष्यावर अतिवृष्टी, अनावृष्टी, रोगांच्या साथी किंवा भूकंप यांच्या रूपाने काढतो असे वाटते ! ! !

ह्या सर्व धबधब्यांची अपूर्व शोभा ते वरून खाली पडेतोपर्यंत पाहावयाची असते. अशी शोभा पाहण्याचे एक योग्य ठिकाण येथे आहे. पण ते फार धोक्याचे आहे. धबधब्याचे उत्तर बाजूस पण धबधब्याचे पश्चिमेस खाली एक कड्याचे टोक पुढे आले आहे. हा कडा मूळ कड्यापासून सुटला आहे. पण तो धोंडा पाच-सहा टनाचा असून चांगला वसला आहे. पडण्याचा संभव नाही. तरी पण मूळ कड्यापासून सुटला असल्यामुळे त्या अधांत्र कड्यावरून पाहणे जोखिमाचेच आहे. पण सुख हे सुखाने मिळत नाही. ते दुःख भोगून व जीव संकटात घालूनच मिळते. सुख मिळविण्यास श्रम पडतात, अर्थात सुखाचा आरंभ दुःखातून व संकटातूनच होतो. तसेच सुख सरल्यावर दुःख होते. अर्थात सुखाचा शेवट दुःखच आहे. म्हणजे सुख हे पर्वताच्या शिखराप्रमाणे आहे. पर्वताचे शिखर भोवतालच्या प्रदेशापेक्षा उंचच उंच जाते. अर्थात भोवतालचे खंदक खोल असतात आणि हे खंदक जसजसे जास्त खोल, भयाण व गंभीर असतील तसतशी त्या शिखराची शोभा जास्त असते व भोवतालचा अद्वितीय देखावा दृष्टीस पडतो. तसेच पुष्कळ दुःखे व अनावर यातना भोगून जे सुख मिळते त्याची योग्यताही तशीच अप्रतिम व अनिर्वाच्य असते. म्हणून शहाणे दुःखाला किंवा संकटाला कंटाळत नाहीत. जे भितात किंवा कंटाळतात त्यांचा नाश होतो.

मी त्या दगडावर मौज पाहण्याकरिता निघालो तेव्हा आमचा गडी म्हणाला, 'असल्या संकटात कशाला जाता ? आम्ही कडवे लोकसुद्धा असे साहस करीत नाही !' पण तेथे गेल्याशिवाय एकसमयावच्छेदेकरून धबधब्याची खरी शोभा दिसणार नाही.

कारण ते टोक धबधब्याच्या अगदी पुढे आलेले आहे; म्हणून मी जातो म्हटले. मी ऐकत नाही असे पाहून कुलीही मजबरोबर निघाला, पण तो खोलाकडे पाहीना व मलाही पाहू देईना. कारण तो म्हणे घेरी येऊन पडाल, कडा अधांत्र आहे व खोली अपरंपार आहे. मी म्हटले अरे मनुष्य मरायला खोली कितीशी लागते? त्यापेक्षा ती कितीही जास्त असली तरी सारखीच! अशी त्याची समजूत घालून आम्ही गेलो. तेव्हा तो म्हणाला, आता येथे कपडे काढा व उपडे निजा, मान पुढे काढा. असे केले तरी चक्कर येऊन भीतीने मनुष्य पडेल म्हणून तो माझे मागचे पाय गच्च धरून बसला होता. मी मान पुढे काढून कडा हाताने धरून पाहू लागलो तो खरोखरच अपूर्व चमत्कार दृष्टीस पडला!

ह्या पडणाऱ्या पाण्याचे तीन भाग होतात. एक पाण्याचा धोत काही अंतरापर्यंत दिसतो. नंतर दगडावर आपटून त्याचे तुकडे तुकडे होऊन वर्षाव होतो. शेवटी केर-सुणीप्रमाणे लहान लहान तुषार होऊन ते चोहोकडे फुटून फाकतात, आणि शेवटी त्याची वाफ होऊन त्याचे ढग बनून तेच पाणी वर हवेत पुन्हा उडून जाते. आणि ढगाच्या रूपाने विश्रांती घेण्याकरिता पुन्हा पर्वत मस्तकावर बसते किंवा जमिनीचा हा धांगडधिंग्याचा नाद सोडून आकाशात निरनिराळ्या रंगाने व रूपाने विहार करते!! असे खालून वर येणारे ढग व त्याची घनीभवनाची मजा खरोखरच पाहण्यासारखी असते. वर हवा थंड असल्यामुळे सुमारे तीन-चार वाजता पाण्याचे ढग कसकसे बनतात त्यावर सूर्यकिरण पडून त्यांची शोभा कशी दिसते, हा सृष्ट-चमत्कार येथे स्पष्टपणे पाहण्यास मिळतो व अगदी थोडे पाणी नदीला मिळून त्याचा प्रवाह सुरू होतो. पण पावसाळ्यात मोठा पूर येतो तेव्हा त्याच्या आघाताने खालचा काळा खडकसुद्धा फोडून त्यात एकशे तीस फूट खोल खळगा पडला आहे! ह्यापेक्षाही हा मोठा झाला असता पण दरवर्षी आत पुराची माती दगड पडून तो बुजतो. जेव्हा तो जोराने पडतो त्या वेळी उडणाऱ्या तुषारांची उंची फार मोठी असते व त्यांची चित्रविचित्र शोभा दिसते तशा प्रकारचे वर्णन पुढे गोकाकच्या धबधब्याच्या वर्णनात केले आहे म्हणून येथे केले नाही. ह्या पडणाऱ्या पाण्यावर सूर्यकिरण दिवसा बारा वाजल्यापासून तीन वाजेपर्यंत पडतात. त्याच्या आधी, धबधबा पश्चिमाभिमुख असल्यामुळे व दाट जंगल असल्यामुळे सूर्यकिरण त्यावर पडत नाहीत. व तीन वाजल्यानंतर जंगल दाट असल्यामुळे पुन्हा पडत नाहीत. पण ह्या तीन तासांत क्षणोक्षणी जे देखावे दृष्टीस पडतात ते स्मरणातून जाणे शक्य नाही. मी हे वर्णन दहा वर्षांनंतर करीत आहे. परंतु तो चमत्कार आज अगदी माझ्या दृष्टीसमोर दिसत आहे!

ह्या कार्तिकाच्या महिन्यात पाणी अगदी स्वच्छ असते. व त्यावर सूर्यकिरण पडले म्हणजे ते प्रवाह रुपेरी वस्त्राप्रमाणे दिसतात. त्याच्या खालचा भाग पाण्याच्या गोळ्यांचा असतो. त्यावर सूर्यकिरण पडले म्हणजे त्या वस्त्रांच्या दशांना नाना प्रकारच्या रत्नांची म्हणजे हिरे, मोत्ये, इंद्रनील, पाच वगैरे रत्नांची त्याला रंगीत झालर लावली

आहे, असे वाटते. नंतर शेवटी तुषार दृष्टीस पडतात. त्यावर सूर्यकिरण पडले म्हणजे त्या मूळ वस्त्राच्या चित्रविचित्र रंगाच्या दशाच आहेत असे वाटते. नगराजा अशा प्रकारची वस्त्रे पांघरून व डोक्याला हिरवा वनश्रीचा शालू बांधून मोठ्या गर्जनेने आपल्यास हे ऐश्वर्य देणाऱ्या परमेश्वराचे गुणानुवाद गात बसला असता त्याची बहीण सृष्टिदेवी किंवा वनश्री ही हिरवा शालू नेसून सूर्याचा तेजस्वी दिवा हाती घेऊन व त्या दिव्याने त्या वेळी पडणाऱ्या इंद्रधनुष्याच्या हिरेजडित मखरात त्यास बसवून त्याला ओवाळीत आहे व ओवाळणी मागत आहे असा मला ह्या वनश्रीच्या दीपावलीच्या भाऊबिजेचा अपूर्व थाट दृष्टीस पडला ! वनश्री सूर्याचा दिवा खालवर नाचवीत आहे व नवे निरनिराळ्या रंगांचे ढगरूपी नारळ पुन्हा त्याच्या हातात देत आहे व त्यासुद्धा नगराजाच्या हातून चवल्या, पावल्या, रुपये, हिरे, माणके, वगैरे असंख्य नवरत्नांच्या वर्षावाची व नाण्याची चकाकी झडून त्यांच्या मोठ्या मोठ्या आवाजात खळखळाट होऊन ते तिच्या खालच्या डोहाच्या पदरात पडत आहेत. मी आपल्या बहिणीला किती तरी देऊ असे त्यास झाले आहे. तेच द्रव्य म्हणजे पाणी. पृथ्वी आपल्या पृष्ठावर नद्यांच्या व कालव्यांच्या योगाने पसरून त्यापासून रत्नांपेक्षा श्रेष्ठ असे धनधान्य उत्पन्न करून आपल्या मुलांचे म्हणजे प्राणिमात्रांचे ती पोषण करिते. व नद्यांच्या प्रवाहाच्या योगाने गलबताच्या व बोटीच्या सहाय्याने व्यापारवृद्धी करिते ! ! सारांश, दिवाळीचा सण केवळ मनुष्यजातीचाच नसून नवीन धनधान्य– समृद्धीमुळे अखिल सृष्टीचा आहे, असे मला येथे प्रत्यक्ष दृष्टीस पडले. या दिवसांत नवीन धान्ये पिकतात. पाणी अमृताप्रमाणे गोड, स्वच्छ व विपुल असते. हवा समशीतोष्ण असते. यामुळे थंडीपासून व उष्णतेपासून विकार होत नाहीत. अन्नाला चव येते. जन-जनावरांना चाऱ्याची समृद्धी असते. यामुळे खुराकाशिवाय दूधदुभत्याचा सुकाळ असतो. भाजीपालाही पुष्कळ होतो. यामुळे सर्व प्राणिमात्राला सृष्टिनिर्मित अर्थात अकृत्रिम व अनुपमेय सुखाचा आनंद होतो. तसाच आनंद पुढे लग्नकारणाच्या रूपाने मनुष्यकृतीचा दृष्टीस पडतो, पण तो कृत्रिम असल्यामुळे त्यास यासारखी विशेष व सार्वत्रिक शोभा येत नाही.

अशा प्रकारची शोभा पाहात व विचार करीत मी त्या ठिकाणी किती तरी वेळ बसलो होतो. माझी तृप्ती होईचना. शेवटी आमचा कुली म्हणाला ‘ अहो दादा, काय त्यात पाहता ? पाणी पडत आहे दुसरे काय ? तुम्ही कधी पाणी पाहिले नाही काय ? चार वाजले, उठा. आपल्यास जाण्यास रात्र होईल. ’ मी घड्याळात पाहातो तों खरोखरच चार वाजले. हा इतका वेळ कसा गेला हे मुळीच समजले नाही. मी त्यास म्हणालो, ‘ अरे, ज्याच्याकरिता मी एवढे पैसे खर्च करून व त्रास भोगून आलो,ते लक्षपूर्वक पाहू नको तर काय करू ? एकदा येथून गेलो म्हणजे हे दिव्य मला कधी दृष्टीस पडणार आहे काय ? ’ पण तो म्हणाला, ‘ तुमची छातीच जबर. मी इकडे इतके लोक या धबधब्यावर आणले पण ते ह्या दगडावर गेलेसुद्धा नाहीत. मग या खोल दरीकडे पूर्णपणे

पाहणार तरी कोठून ? आणि तुम्ही तर तासांचे तास पाहात बसलात तेव्हा काय तुमची छाती ! तुम्हाला भय कसे वाटत नाही ? ' ह्या टोकापासून हा धबधबा कप्तान न्यूवोल्ट याने पाहिला. त्याने आपला अनुभवही खाली लिहिल्याप्रमाणेच दिला आहे. " या शृंगाच्या अग्रापासून काही अंतरावर उपडा पडून सरपटत सरपटत मी काठाशी गेलो व डोके मात्र पुढे नेले त्या वेळी माझ्या डोळ्यांस जो देखावा दिसला तो मी जन्मभर विसरणार नाही. मी यानंतर व्हेसुवियस, एतना ह्या दोन्ही ज्वालामुखींची सदोदित धुमसत असणारी विस्तीर्ण तोंडे पाहिली. परंतु गिरसप्पाच्या भयंकर भू-गव्हरात मी प्रथम दृष्टी फेकिली त्या वेळी ज्या मनोवृत्ती माझ्या हृदयात एकदम प्रगट झाल्या तशा पुन्हा कोठेही माझ्या अनुभवास आल्या नाहीत. " अर्थात सर्व जगामध्ये हे दृश्य अप्रतिम खरे ! म्हणूनच सर्व जगातील जिज्ञासू मनुष्य नेमका येथे येऊन जातो.

नंतर आम्ही तेथून निघून वर नदीचे पात्र संथ आहे तेथून होडीने पलीकडच्या म्हैसूर सरकारच्या बंगल्यावर गेलो. होडी धबधब्यापासून सुमारे १०० फूट अंतरावरून चालते. पण जर ती प्रवाहात सापडून धबधब्याकडे वाहवली तर काय होईल ? कल्पनाच ती पण तो देखावा पाहून मनात आली एवढेच ! ! दोन्ही बंगले समोरासमोरच आहेत. एका बंगल्यावरून दुसऱ्या बंगल्यापर्यंत जाताना सडक आहे, पण मध्ये ही नदी आहे. दोन्ही बाजूंस झाडी अगदी किर्र आहे. मी गेलो त्या वेळी व्हॉईसरायसाहेब हा धबधबा पाहण्यास पंधरा वीस दिवसांनी यावयाचे होते. यामुळे रस्त्याची सफाई व मरामत, बंगल्याचा व्हाईटवॉश वगैरे चालला होता. यामुळे बंगला संपूर्णपणे पाहता आला. हा बंगला म्हैसूर सरकारने राजकीय पाहुण्यांकरिता केला असल्यामुळे पाश्चात्य धर्तीच्या राजभूषणास योग्य असाच तो नटविला आहे. त्याच्या भोवती युरोपियन पद्धतीचे बाग आहेत व त्यात नामांकित युरोपियनांचे संगमरवरी पुतळे आहेत. सर्व थाटमाट नीटनेटका आहे हे सांगणे नकोच. धबधब्याच्या शोभा निरनिराळ्या ठिकाणाहून निरनिराळ्या दिसतात. अशा सर्व ठिकाणी प्रशस्त अशी बाके ठेविली आहेत. तेथून एक पायवाटही अगदी शिडीसारख्या रस्त्याने थेट खालपर्यंत गेली आहे. वरून खाली पाहिले असता मनुष्य अगदी लहान चारपाच वर्षांच्या मुलाएवढा लहान दिसतो. वरून खाली जाण्यास सुमारे पाऊण तास लागतो. पण वर येण्यास मात्र दोन-तीन तास लागतात. ह्या वाटेने फक्त उन्हाळ्यात जाता येते. पावसाळ्यात जाण्याचा उपाय नाही. मी समोरच्या ज्या धोंड्यावरून धबधबा पाहिला त्यापेक्षा येथे काही विशेष दिसले नाही. तेथूनच खरी व अपूर्व शोभा दिसते. पण ती सर्वांना साध्य नाही; तरी ब्रिटिश बंगल्यापेक्षा या बंगल्यावरून ती जास्त दिसते, हे मात्र खरे. आता रात्री चांदण्यातसुद्धा त्याचे गंभीर स्वरूप दिसते, पण अंधाऱ्या रात्री मात्र फार भयंकर रौद्ररूप प्रगट होते. त्या वेळी काही उद्योगी लोक त्यावर सर्चलाईट सोडतात. किंवा जळत्या पेंढ्या खाली सोडतात. किंवा शोभेच्या दारूचे बाण त्यावर सोडतात. त्यांचा प्रकाश धबधब्यावर पडलेला पाहून मनावर फार चमत्कारिक परिणाम होतो. व आपण

काही विलक्षण जादूचा देखावा पाहात आहो, असा भास होतो. येथे जंगल मोठे असल्यामुळे त्यात भयंकरपणाची भर पडते.

□

तीन

# हिमालयाच्या वाटेवर

## काका कालेलकर

डोक्यात प्रवासाची चित्रे असंख्य भरलेली आहेत, पण या चित्रांच्या खाली किंवा मागे स्थळकाळ लिहून ठेवलेले नाहीत; तेव्हा त्यांचा क्रमबद्ध चित्रसंग्रह ( आल्बम ) तयार होत नाही आणि धास्ती वाटते की, एका ठिकाणचे वर्णन दुसऱ्या ठिकाणाला चिकटवितो की काय? तेव्हा जेवढे स्पष्ट आठवत असेल तेवढ्यालाच चिकटून राहावे हा उपाय आपला बरा. कल्पनेचे रंग वाटेल तसे भरता येतात, पण मूळ रेखाचित्र यथादृष्ट असेल तरच ते खरे प्रवासवर्णन म्हणता येईल.

ही स्थिती अनुभवताना एक नवाच विचार मनात आला, की जो प्रवास आम्ही बरोबर केला आहे, त्याचे वर्णन वाचूनसुद्धा जर त्या वेळची चित्रे दृष्टीपुढे यथार्थपणे उभी राहत नाहीत, तर ज्यांनी हा प्रवास केला नाही, त्यांना कोरड्या शब्दांचे वर्णन देऊन कितीशी कल्पना देता येणार? सारे वर्णनच जर शब्दजाल झाले तर त्यातून मिळणारा आनंद सृष्टीचा आनंद नव्हे, तर शब्दांचाच आनंद होईल आणि शब्दांचा आनंद हा काही शुद्ध किंवा उच्च आनंद म्हणता येणार नाही. एखाद्याला गुदगुल्या करून हसवावे तशीच ही प्रवृत्ती आहे. त्यातून खरी वस्तू कितीशी मिळणार?

पण असे विचार बोलणाऱ्याला आणि ऐकणाऱ्याला दोघांनाही विषण्ण करतात; म्हणून शहाण्या माणसाने असे विचार आपल्याजवळ ठेवावेत. जसे खाजगी दुःख लोकांत जाऊन रडू नये, तशी निर्मोह दशाही जाहीर करू नये. म्हणून हे सर्व येथे सोडून देऊन आपण प्रवासाला निघू.

लक्ष्मणझूल्यापर्यंत आम्ही सुधारलेल्या जगात होतो. झूला ओलांडला, उजव्या बाजूचा स्वर्गाश्रमाकडचा रस्ता टाकला आणि आम्ही वनात प्रवेश केला. तेथून रस्ता खूप वरखाली होऊ लागला. जंगलातील कित्येक जनावरे जशी भीती न बाळगता काही काही वेळेला जवळ येतात, तशी झाडे आणि वेल पुष्कळ जवळ जवळ येऊ लागले, आणि आम्हांलाही वाटले की आपण आता आरण्यक आहो. यानंतर झंपानात बसणारे लोक आजूबाजूच्या दृश्याहून निराळे आणि चमत्कारिक दिसू लागले. झंपान ही एक प्रकारची पालखी असते. ती उचलणारे भोई चौरस आकारात चालत

नाहीत, तर एकामागून एक असे चौघेजण रांगेने चालत असतात; कारण अरुंद रस्त्याच्या अवघड पायवाटेवरून जायचे असेल, तेव्हा दोघेजण शेजारी शेजारी उभेच राहू शकणार नाहीत. एका बाजूला असलेल्या उंच पहाडाशी टक्कर झाली तर चारी भोई, त्यांचे ते झंपान, आणि झंपानात बसलेले जिवंत ओझे सर्वच दुसऱ्या बाजूच्या खोल दरीत पडून स्वर्गाला जायचे !

करंडीत बसणारे लोक इतके बेडौल वाटत नाहीत. पाणी प्यायच्या उभट पेल्याच्या आकाराच्या, जंगली वेताच्या एका मोठ्या करंडीत आपले सामान अर्ध्यापर्यंत भरून यात्रेकरू त्यावर बसतो. पाय बाहेर सोडता यावेत एवढ्यासाठी करंडीच्या वरच्या काठाला काप ठेवलेले असतात; आणि खाली लटकून पाय थकून जाऊ नयेत म्हणून त्या करंडीला एक कामचलाऊ पावटणे बांधलेले असते.एक मजूर अशी करंडी आपल्या पाठीवर खांद्याशी बांधून टाकतो; म्हणजे जाकीट घातल्यावर हात सुटे राहतात. करंडीचा बोजा एकट्या खांद्यानाच उचलावा लागू नये यासाठी तिचा एक पट्टा मजुराच्या डोक्यावरून घेतलेला असतो, आणि मजूर चालत नसेल तेव्हा खांद्याला आणि डोक्याला आराम मिळावा यासाठी T च्या आकाराची—कुबडीच्या आकाराची काठी तो बरोबर बाळगतो. करंडीच्या बुडाला ती कुबडी ठेवून दिली की झाला मजूर बोजातून मोकळा. अशा रीतीने एका मजुराच्या डोक्यावरून एक माणूस जान आणि माल यासह जातो ! त्याचे तोंड मात्र मागच्या बाजूला ! सुरुवातीला हे सर्व रूप हसण्याजोगे, पण पाहून पाहून सवय झाल्यावर या मुलखात हेच योग्य आहे, अशी खात्री पटते. मुक्कामावर मजूर लोक परस्परांत बोलतात तेव्हा आपण किती मणाची ‘ लाश ’ ( प्रेत ) उचलतो आहो, याचा उल्लेख केल्याशिवाय राहात नाहीत. आपल्या मजुराने आपल्याविषयी आपल्या देखत ‘ लाश ’ शब्दाचा उपयोग केला नाही म्हणजे इकडील मर्यादा सांभाळली असा इकडचा कायदा आहे.

यात्रेकरूंच्या भर सीझनच्या सुरुवातीलाच आम्ही निघालो होतो, यामुळे रस्ते विजन असे नव्हतेच. मुंग्यांच्या रांगेप्रमाणे आम्ही लोक होतो. आमच्याबरोबर नगर किंवा वऱ्हाडकडचा एक गृहस्थ झंपानात बसून जात होता. त्याच्याबरोबर आश्रितांचा परिवारही काही कमी नव्हता. मागाहून समजले की, तो दोन बायकांचा धनी आहे, तरीही संतान नाही म्हणून बद्रीनारायणाच्या दर्शनाला जात आहे.

झंपानात बसणाऱ्या लोकांत दोन प्रकारची मुद्रा दिसते. कित्येक स्वतःला चालता येत नाही आणि जिवंत असतानाच माणसाच्या खांद्यावर बसावे लागत आहे, याची लाज तोंडावर ठेवून जातात; तर दुसऱ्या कोटीतले लोक ‘ आम्ही पायी चालायला दरिद्री थोडेच आहोत ? ’ अशा रुबाबात बसून आपले कल्पना-दारिद्र्य प्रकट करतात !

आमचा प्रवासी या दुसऱ्या कोटीतला होता. तो झंपानांत कोंबड्याप्रमाणे छाती काढून बसला होता, आणि उंटाप्रमाणे इकडे तिकडे पाहात होता. त्याची बायको

जलदी जलदीने त्याच्यामागे चालत होती. त्याला ते सहन झाले नाही. बादशहाच्या रुबाबाने त्याने हुकूम सोडला, ‘ पुढे गेलीस तर काय बिघडेल ? चट्टीला पोचून स्वैपाकाला सुरुवात कर. एवढ्यात आम्ही येतो. ’ आजसुद्धा त्या बिचारीचा त्या वेळचा संभ्रम माझ्या डोळ्यासमोर दिसत आहे. आकाराने काहीशी ठेंगणी, भरीव बांध्याची, हिरवी साडी, कपाळावर कुंकू, जुन्या पद्धतीचे मोठे, नाकात मोठी नथ, कुरळे केस थोडेसे उडत आहेत आणि थोडेसे घामाने कपाळावर चिकटले आहेत, अशी ती सती हिमालयाच्या रस्त्यावर, चढण असो की उतार असो, दम टाकीत चालली आहे. घटकेत मागे पहाते, घटकेत आमच्यासमोर आपली फजिती होते की काय, हे तपासते. आणि डोके खाली करून पुन्हा पुढे चालू लागते ! जणू काय हिंदू समाजाची विटंबना प्रायश्चित्त करायला जात असावी ! अरबस्थानातील किंवा मध्य आशियातील जंगली पुरुषांना नारिप्रतिष्ठा काय आहे हे समजत नाही. वादळ होत असेल तेव्हा स्वतः तंबूत बसतात आणि तंबू उडून जाऊ नये म्हणून आपल्या स्त्रियांना तंबूच्या दोऱ्या धरून बाहेर बसावयाला सांगतात ! अशी वर्णने वाचून आपल्याला त्या लोकांची कीव येते. पण आपल्या इकडे जवानमर्द स्वतः आराम भोगीत जेव्हा बायकांकडून वाटेल तशी मेहनत-मजुरी करून घेतात, तेव्हा मात्र आपण ते सर्व मुकाट्याने सहन करतो.

ही बायको त्याची पहिली बायको. तिला मुले झाली नाहीत म्हणून त्याने दुसरे लग्न केले होते. तेव्हा ही बायको नावडती मोलकरीणच की नाही ? तिने जलदीने पुढे जाऊन पोचले पाहिजे, आणि अनोळखी मुलाखत स्वैंपाकासाठी जागा मिळवून चट्टीवाल्याकडून भांडीकुंडी मागून घेऊन स्वैंपाकाची तयारी केली पाहिजे. एक दिवस काय झाले कुणास ठाऊक. चट्टीत आम्ही जेवत होतो, इतक्यात त्या नरपशूचे पित्त खवळले. तो आपल्या बायकोवर संतापला. बिचारीने हात जोडले; पण त्याने तिच्या डोक्यावर तडाखा मारलाच ! ती पडली. मग काय विचारता ? बिचारीच्या पाठीवर त्याने आपल्या पायाची खाज जिरविली ! बरोबरचे आश्रित पानावर बसून हे सारे टकमक पहात होते. मारून मारून तो नंदीबैल थकला की भुकेने व्याकूळ झाला कोणास ठाऊक ? पण तो मात्र पोट भरून जेवला आणि तिच्याकडे बघून म्हणतो, ‘ जेव आता स्वस्थ बसून ! ’ हुंदके देत देत बिचारीने खाल्ले आणि सगळ्यांची उष्टी भांडी उचलून घासायला निघून गेली.

आर्य कुटुंबातील भांडणात बाहेरच्या माणसाने पडू नये म्हणून आम्ही ते सर्व सहन केले. आज मला आमच्या या भ्याडपणाबद्दल तिरस्कार वाटतो; पण त्या वेळीच मनात विचार आला, हाच का आपला आर्यधर्म ? मनूने जेव्हा ‘ यत्र नार्यस्तु पूज्यन्ते ’ लिहिले, तेव्हा याच प्रकारची पूजा तो समजला असेल ? पती हे पत्नीचे दैवत आहे, आणि पत्नी काय पतीची गुलाम आहे— ढोर आहे ? एखाद्या सनातनी शास्त्र्याला विचारले, तर यावरसुद्धा तो शास्त्राधार अवश्य काढून दाखवील ! मनुष्य हा देवांचा पशू आहे असे उपनिषदांत लिहिले आहे. पती हा देव तेव्हा पत्नी त्याचे ढोरच झाली

की नाही ! उपनिषत्कालीन ऋषींनी जर हे तर्कशास्त्र ऐकले, तर आपल्या निर्दोष काव्याचा त्यांना असंख्य वेळा पस्तावा होईल. पतीची सेवा करणे हा पत्नीचा धर्म आहे असा एकांगी धर्म जरी घटकाभर मानला, तरी सेवा आणि तीही अशा प्रकारे घेण्याचा पतीचा हक्क आहे, असे मात्र कुठेही लिहिलेले नाही.

वस्तुस्थिती अशी आहे की, आपला धर्म हा आर्य आदर्श आणि अनार्य वृत्ती यांचे मिश्रण बनून झाला आहे; आणि हीन वृत्तीच्या संस्कृतिज्ञ तार्किकांनी धर्माला शुद्ध राखण्याऐवजी प्रत्येक रिवाजाचा बचाव करण्याचेच कर्तव्य आपल्या माथ्यावर घेतले आहे ! व्याकरणकार ज्याप्रमाणे ‘ छंदसि बहुलम् ’ म्हणून चालवून घेतात, त्याप्रमाणे ज्ञातिभिन्न अशा आपल्या समाजाने ‘ कोणी कोणाच्या कामात ढवळाढवळ करू नये ’, असे ठरविले आहे; आणि यामुळे नामर्द जबरदस्तांचे मात्र फावले आहे. शास्त्री लोकांच्या हे लक्षात येत नाही की, धर्माचे शुद्ध स्वरूप जर कायम राखले नाही तर सगळ्या धर्माची फजिती होते, जीवन विकृत बनते, आणि परधर्मीयांना वाव मिळतो. जेव्हा जेव्हा हिंदुधर्मावर परधर्मीयांनी सरशी केली आहे, तेव्हा तेव्हा त्यांच्या मुळाशी आपल्या लोकांचे रूढीदास्य आणि गाफिलपणाच राहिलेला आहे. विरोध करण्याच्या बाबतीत आपण नेहमी भ्याड. सहन करण्यातील बहादुरी जर आपण विरोध करताना दाखविली तर आपली सारी दुःखे टळतील.

असा विचार करीत आम्ही जेवून उठलो आणि विसावा न घेता पुढे चाललो. एकदोन दिवसांच्या अनुभवाने आम्हांला चट्टीत उशीरा पोचून चालणार नाही, असे दिसून आले होते. ज्याप्रमाणे स्टीमरमध्ये हजीर तो वजीर, जेवढी जागा अडवून ठेवावी तेवढी त्याची, त्याचप्रमाणे या चट्टीच्या बाबतीत असते. चट्टी म्हणजे काय ? यात्रेकरूंच्यासाठी जंगलातल्या दुकानदारांनी बांधलेली कामचलाऊ दुकाने. येथे जमिनीची ओल गेलेली नसावयाची; भिंती उंच असायला पाहिजेत असा येथे कायदा नाही; छपरावर गवत किंवा झाडाची पाने; आणि ही सर्व कामगिरी पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटची नसल्यामुळे पहाडात जशी जागा मिळेल तसा दुकानाचा आकार ! अशा तऱ्हेचे स्थापत्य शहरी डोळ्यांना सुरुवातीला आवडणार नाही कदाचित्; पण जंगलाच्या संपूर्ण शोभेत मिसळून जायला याच्यापेक्षा वेगळी पद्धती नाहीच कामाची.

घरात एका कोपऱ्यात दुकानदार आपला माल व्यवस्थित लावून ठेवतो. माल म्हणजे काय काय असेल ? गव्हाचे पीठ, मीठ, मिरची, तूप, बटाटे आणि दुकान मोठे असेल तर डाळ-तांदूळ. दुकान लहान असो, मोठे असो, त्यात तंबाखू असायचीच. पण ती आपल्या इकडे असते तसली नव्हे. हिमालयात तंबाखू पिकतच नाही; त्यामुळे गुळात तयार केलेली गडाखू सर्वत्र विकली जाते. दुसऱ्या एका पोत्यात स्वयंपाकाची भांडी असतात; यात्रेकरूंची त्यायोगे फार मोठी सोय होते. यात्रेकरूंनी आपापली भांडी डोक्यावर घेऊन यात्रा करावयाची म्हटली, तर माणसापेक्षा भांड्यांचेच पुण्य वाढायचे आणि या पुण्याईच्या भाराखाली यात्रेकरू अकाली स्वर्ग गाठावयाचा.

हिमालयातील शेतकऱ्याच्या स्वयंपाकात अजब स्वावलंबन असते. त्याच्याजवळ बोहोऱ्याच्या टोपीसारखी एक मोठी लोखंडाची तपेली किंवा तसराळे असते. त्यात तो कणिक बांधतो आणि दगडावर ठेवून देतो. मग तीन धोंडयांच्या चुलीत विस्तव पेटवून तिच्यावर त्याच तसराळ्यात रोट्या भाजून घेतो; या साऱ्या रोट्या हातरुमालावर ठेवून पुन्हाः त्याच तसराळ्यात भाजी करून घेतो; तसराळे लोखंडाचे असते त्यामुळे भाजी कसलीही असली तरी ती एकाच रंगाची होते! आता आणखी काय पाहिजे! भाजीरोटी पोटभर खाऊन तसराळे घासले की पाणी प्यायलाही तेच भांडे! जेवून दुपारी जरा वामकुक्षी केली की, तेच तसराळे डोक्यावर ठेवून त्यावर फेट्यासारखे तो काहीतरी बांधतो, म्हणजे आंब्याच्या कोयीसारख्या गारा जरी आकाशातून पडल्या तरी आपले शिर सलामत. इतकी सूचक बुद्धी आणि युक्ती यांच्यात असूनसुद्धा शहरी लोक म्हणतात की, पहाडी लोक म्हणजे जंगली! होय, ते जंगली आहेतच! जंगलात राहातात ते पंगू नसतात; आणि पंगूपणा हा तर सुधारणेचा पाया—नव्हे, शिखरसुद्धा! असंख्य साधनांवाचून ज्याचे काम चालू शकत नाही तो सुधारलेला, आणि कमीत-कमी साधनांनी काम चालविण्याची अक्कल ज्याच्यात आहे तो जंगली, ही व्याख्या खरीच नाही काय?

आम्ही जलदीने चालून सर्वांच्या अगोदर मुक्कामाला पोचून सर्वांत चांगली चट्टी शोधून काढीत असू आणि स्वच्छ चूल जमवून स्वयंपाकाला सुरुवात करीत असू. येथे 'आम्ही' म्हणजे स्वामी. कारण त्यांची चाल घोड्याची चाल; दुसरा नंबर बुवांचा. मी नेहमी सर्वांत शेवटी पोचावयाचा. कारण माझ्या माथी सर्वांपेक्षा जास्त जबाबदारी. रस्त्यात जितकी झाडे दिसतील त्यांना कुशल प्रश्न विचारलेच पाहिजेत. फळ, फूल, पक्षी— जे काही नजरेला भेटेल ते— मला बोलावी. कोणीच नसले तर निदान आकाशातले ढग तर असायचेच. आणि त्या वेळी मला हातात माळ घेऊन जप करण्याचीही सवय होती. तेव्हा जगत् आणि जगदंबा यांच्यामध्ये माझे लक्ष असे काही वाटले जाई की, मी आपला अचूक तिसराच पोचायचा! पोचल्यावर मी उठावयाचा नाही. बसल्या बसल्या सर्व काम करायचे. सामान बांधायचे, सोडायचे, व्यवस्थित लावून ठेवायचे हे सर्व काम माझे. लाकडे ओली असली तर बुवांची चूलही मीच पेटवून द्यायचा. जेवण झाल्यावर भांडीही मीच घासायचा. मी घासलेली भांडी पाहून पहाडी दुकानदार खूप खुष होऊन जात. स्वामींच्या पायात आणि वाणीत असामान्य जोर, तेव्हा संचार आणि शिरकाव सर्वत्र व्हायचा. अशा रीतीने आमचा संघ चालत असे. आम्ही जलद चालण्याचा निश्चय केल्यामुळे त्या दोन गायींच्या बलिवर्दाच्या संगतीतून मात्र आम्ही सुटलो.

आमचा प्रवास जसजसा वाढत चालला, तसतशी आमची भूकही वाढली. एक पातेले भरून डाळ बनवावी आणि ती तिघांनी एकमेकांच्या तोंडाकडे पाहात पाहात खाऊन टाकावी! मग रात्रीच्या दोनचार रोट्या ठेवून सकाळी गुळाबरोबर

खात असू. पाहाता पाहाता आमचे गाल गाजरासारखे लाल दिसायला लागले. वजन बापडे कसचे वाढणार? रोजच्या २०–३० मैल चालीशी वजनाचा मेळ बसायचा नाही. ते आपले वाट पहात बसलेले असावयाचे, की विसावा केव्हा मिळेल आणि मी केव्हा वाढेन! आम्ही जेवढा म्हणून विसावा घेतला, तेवढा अशा रीतीने आम्हांला पुष्कळ फायदेशीर झाला.

□

चार

# अबू

## अनंत काणेकर

सकाळी साडेसातला अबूरोड स्टेशनात गाडी आली. अबूरोड ते माउंट अबू-पर्यंत दीड तासाचा रस्ता आहे. बस कंपनीचे ऑफिस स्टेशनातच आहे. साडे आठला सुटणारी पहिली बस स्टेशनात उभी होती आणि तिच्यात बरीच माणसेही बसलेली होती. या बसची तिकिटे नाहीत, पुरेशी माणसे जमल्यावर बस सुटेल वगैरे नेहमीच्या गोष्टी बस कंपनीच्या माणसाने सांगितल्या. गाडीतून उतरल्याबरोबर बसमध्ये जागा मिळविण्याच्या खटपटीत आम्ही होतो. चहासुद्धा घेतलेला नव्हता. दुसऱ्या बससाठी किती तास रखडावे लागेल कुणाला ठाऊक, या विचाराने आम्ही कावल्यासारखे झालो. पण थोड्या वेळाने 'तुम्ही याच बसने जाऊ शकता' असे सांगून त्याने दोन तिकिटे आम्हांस दिली! मोकळ्या मनाने स्टेशनात चहा घेतला. साडे आठला बस सुटली.

काळ्या कभिन्न खडकांच्या डोंगरांना वळसे घेत बस वर वर जात होती. पाचगणी, महाबळेश्वर किंवा खंडाळा-लोणावळ्याला जातानासुद्धा काही ना काही रम्य वनश्री आजूबाजूला दिसते, पण या अबूच्या रस्त्यावर उघडेबोडके काळे खडक, जळकट खजुरीची झाडे आणि धुळकट झुडपे यांखेरीज काहीच दिसले नाही. आपण हवेच्या ठिकाणी जातो आहोत, असा संशयसुद्धा येईना. लाल माती, हिरवीगार झाडे, काहीच कुठे दिसेना.

दहा वाजता अबूला पोहोचलो. बस स्टँडजवळ हॉटेलांचे दोन-तीन प्रतिनिधी आपापली कार्डे घेऊन आमच्यावर तुटून पडले. कुठल्या तरी हॉटेलात उतरायचे होते आणि अगोदर कुणी सांगितले नसेल तर चांगले हॉटेल प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय समजणार तरी कसे? तेव्हा त्यातल्या त्यात सज्जन दिसणाऱ्या एकाबरोबर आम्ही चालायला लागलो. 'व्हिक्टरी हॉटेल'च्या नावाचे कार्ड त्याने आम्हांला दाखवले

होते; पण हॉटेलच्या आवारात शिरतो तो ‘ गुजराथ हिंदू लॉज ’ या नावाची पाटी दिसली ! आम्हांला नेणारा पंजाब्यासारला दिसणारा सिंधी तरुण सांगतो ‘ व्हिक्टरी हॉटेल ’, नेतो ‘ गुजराथ लॉज ’ कडे, हे काय गौडबंगाल आहे म्हणून विचारता, व्हिक्टरीच्याच मालकाने हेही हॉटेल घेतले आहे, असे त्याने आम्हांला सांगितले. सिंधमधून निर्वासित होऊन आलेल्या एका श्रीमंत शीख गृहस्थाने ही दोन्ही हॉटेले घेतली होती. आम्हांला घेऊन येणारा तरुण या शीखाचा जावई होता. नंतर आम्हांला कळले की, सिंध आणि बलुचिस्तानमध्ये हिंदू-शिखांत सर्रास विवाह होतात.

अबूचा ‘ सीझन ’ अजून सुरू व्हावयाचा होता आणि नवीनच घेतलेल्या हॉटेलचा कायापालट चालू होता.हॉटेलच्या नावाच्या पाट्या अस्ताव्यस्त पडल्या होत्या. काही भागांतले इलेक्ट्रिक फिटिंग नीट केले जात होते. हा सर्व प्रकार पाहून कसेसेच वाटले. परत फिरण्याचा विचार करीत होतो. पण त्याने आम्हांला दाखवलेल्या खोलीच्या खिडकीतून ‘ नखी ’ तळ्याचा रमणीय देखावा दिसत होता. ‘ नखी ’ तळ्याच्या काठी एका टेकडीवर हे हॉटेल होते. तेव्हा सर्व गबाळेपणा माफ करून इथेच राहावयाचे आम्ही ठरविले. ‘ नखी ’ तळे हे अबूतले अत्यंत रमणीय स्थान आहे. राजपुतान्याला दिलेल्या महात्मा गांधींच्या राखेचे विसर्जन याच तळ्यात करण्यात आले होते.

चहा घेतला, स्नान वगैरे आटोपले आणि जेवायला दीडदोन तास अवकाश असल्यामुळे ‘ नखी ’ तळ्यावर फेरी मारण्याकरता बाहेर पडलो. साडे अकरा-बाराचा सुमार झाला होता आणि ऊन कडक पडले होते तरी झाडाखालून चालताना कमालीचा गारवा वाटत होता. अबूची हवा माध्यान्ह झाला तरी थंड आणि उत्साहवर्धक होती. रस्त्यात पाहिलेले मद्राशाच्या गोस्व्यासारखे बोडके खडक आणि शुष्क ताड, खजुरी यांच्यामुळे अबूबद्दल पहिल्याच दर्शनाला आमचे चांगले मत झाले नव्हते. पण आता मोहोर आलेली काही आंब्याची झाडे दिसली. विशेषतः ‘ नखी ’ तळ्याच्या काठीच आजूबाजूची वनश्री आणि भर दुपारी थंडगार वाटणारी अबूची सुंदर हवा पाहून अबूबद्दलचे आमचे मत हळूहळू बदलू लागले. नखी तळ्याच्या काठीच रघुनाथजीचे मंदिर आणि रघुनाथजीची धर्मशाळा आहे. धर्मशाळा कसली, हे एक सुंदर सॅनिटोरियम किंवा आरोग्यमंदिरच आहे म्हणा ना. कोरी करकरीत दुमजली इमारत असून तीन-तीन,चार-चार खोल्यांचे ब्लॉक भांडीकुंडी,खुर्च्या-टेबलांसह अगदी नाममात्र भाड्याने कुटुंबांना देण्यात येतात. एकट्यादुकट्या प्रवाशाकरता एक-दोन दिवसांकरता खोलीही मिळते.

नखी तळ्याच्या काठाकाठाने हिंडत असता दोन मजेदार गोष्टी माझ्या पाहण्यात आल्या. तळ्याच्या मध्यभागी एक मोठा–थोरला काळा खडक दिसत होता. त्यावर पुष्कळसे काळे पक्षी गर्दी करून बसलेले मला दिसले. दुरून ते कावळे असावेत असे मला वाटले पण जवळ गेल्यावर ते काळ्या रंगाचे चिमुकले बगळे असल्याचे

आढळून आले. काळे कुळकुळीत इतके छोटे बगळे पूर्वी मी पाहिलेले नव्हते. या तळ्याच्या काठाशी एके ठिकाणी अशीच अगदी चिमुकली कमळे मला दिसली. पारिजातकाच्या फुलाएवढी छोटी कमळे आणि त्यांची तितकीच छोटी पाने इतस्ततः पाण्यावर पसरली होती. या खडकाळ प्रदेशात देवाला पाणी मिळेना, तेव्हा त्याने आपल्या नखाने हे तळे खोदले, म्हणून त्याला ‘ नखी ’ तळे नाव पडले म्हणतात!

संध्याकाळी अबूच्या वर-खाली जाणाऱ्या नितळ डांबरी रस्त्यावरून फिरताना अबूच्या सौंदर्याची अधिकाधिक खात्री पटू लागली. दाट बांबूची वने, करवंदीच्या जाळ्या, हिरवेगार कडुनिंब, उंच उंच ‘ रॉयल ओक ’ वृक्ष पाहून आनंद झाला. काश्मीरमधल्या चिनारी वृक्षाप्रमाणे दिसणाऱ्या या उंचच उंच ‘ रॉयल ओक ’ झाडांना इथले लोक ‘ बेलगुडिया ’ म्हणतात. अबूच्या पहाडावर दिसणारे अजस्र खडक मात्र खरोखरच आश्चर्यकारक आहेत. नखी तळ्याच्या आसपास एक प्रचंड खडक आहे. त्याला ‘ टोड रॉक ’ म्हणतात. खरोखरच या खडकाला दुरून पाहताना पंधरा-वीस फूट लांब आणि दहा-बारा फूट उंच असा प्रचंड बेडूकच बसला आहे की काय असा भास होतो. इतिहासपूर्वकाळातील अजस्र जनावरांचे जबडे आ वासून पडले आहेत की काय असे काही खडकांना पाहून वाटते. एका खडकाचा आकार, जमिनीवर बसलेला वाघ वर मान करून पाहतो आहे असा दिसला. अबूचा पहाड हा अरवली पर्वताच्या रांगेतला एक पहाड आहे. जगातल्या अत्यंत प्राचीन पर्वतांपैकी अरवली हा एक पर्वत आहे असे भूगोलशास्त्रज्ञ म्हणतात. अरवलीच्या मानाने त्यांच्या मते हिमालय पर्वत अगदीच तरुण! हे खडक फार प्राचीन असल्यामुळे त्यांना हे विचित्र, चमत्कारिक आकार आले की काय, कोण जाणे.

ब्रिटिश अमदानीत अबू येथे राजपुताना संस्थानाचा रेसिडेंट राहात असे. त्याचा प्रशस्त बंगला आणि रेसिडेन्सीची भव्य दगडी इमारत पाहिली. पूर्वी जिथे ‘ युनियन जॅक ’ डोले, तिथे तिरंगी झेंडा फडकत होता. जयपूर, सिरोही, पालनपूर वगैरे संस्थानिकांचे छप्परावर धुरांडी असलेले इंग्लिश पद्धतीचे बंगले विषण्ण दिसले.

चालता चालता वाटेत एका रस्त्यावर ‘ टू सन्सेट पॉइंट ’ अशी पाटी दिसली. माथेरान, महाबळेश्वर येथे पुष्कळ ‘ पॉइंट्स ’ आहेत. अबूत ‘ पॉइंट ’ असा हा एकच आहे; पण सूर्यास्ताच्या वेळी काही अलौकिकच देखावा इथून दिसतो, असे आम्ही ऐकले होते. पावणेसहा वाजले होते. सूर्यास्ताला पाऊण-एक तास होता. ती पाटी पाहून त्या रस्त्याने आम्ही भराभर चालू लागलो. तिथून ‘ सन्सेट पॉइंट ’ किती दूर आहे याची आम्हांला काहीच कल्पना नव्हती. मैल दोन मैल चाललो तरी कुठेच काही दिसेना. निर्जन रस्त्यावरून दलाल आणि मी दोघेच चाललो होतो. रस्त्यावर दुसरे कुणीच दिसत नव्हते. रस्ता चुकला आणि काळोख पडला तर घोटाळाच व्हायचा, म्हणून परत फिरण्याचा विचार करू लागलो. पण मोह आवरेना. आणखी पाच-सहा मिनिटे चाललो. माणसांचे आवाज ऐकू येऊ लागले. धीर आला.

एक वळण घेऊन पुढे गेलो तो प्रचंड दरी डोळ्यासमोर पसरलेली आणि सिमेंटाने काढलेल्या ‘ पॉइंट ’ वरल्या सज्जात पन्नास-साठ गुजराती स्त्री-पुरुष मुलांबाळांसह गप्पागोष्टी करीत शेवचिवडा खात सूर्यास्ताची वाट पाहात बसलेले दिसले. डोळ्यांसमोर सूर्यबिंब दिसत होते. साडेसहा झाले होते. सूर्यास्ताला दहाच मिनिटे होती. पण त्या दहा मिनिटांत यक्ष-किन्नरांची सोनेरी मायानगरी तर दिसली नाही ना, असे वाटले. समोर पसरलेल्या अफाट दरीच्या पलीकडे दूर दूर कुठे तरी अस्पष्ट अशा धुक्यात क्षितिजाची कडा दिसत होती. समुद्रावरला सूर्यास्त मी अनेक वेळा पाहिला आहे. तांबडेलाल झालेले सूर्यबिंब हळूहळू क्षितिजाखाली सरकत मटकन पाण्यात जाते. डोंगरमाथ्यावरला सूर्यास्त वेगळा असतो. सोनेरी सूर्य डोंगरमाथ्यावर येऊन टेकतो, हळूहळू खाली जातो, काही क्षण सोनेरी किरणांचा पिसारा डोंगरमाथ्यावर दिसतो, तोही लुप्त होतो, आकाश तांबडे नारिंगी होत होत काळवंडू लागते. पण अबूच्या ‘ सन्सेट पॉइंट ’ वरून दरीच्या पलीकडल्या त्या क्षितिजावर होणारा हा सूर्यास्त काही अजबच आहे. नारिंगी, तांबडे, सोनेरी रंग आकाशात मुळीच दिसत नाहीत. सूर्य स्वच्छ पांढऱ्या रुपेरी रंगाचा दिसतो. हा चंद्र कशावरून नव्हे, असा प्रश्न कुणी विचारल्यास त्याला उत्तर देता येणार नाही. त्याच्याकडे पाहात राहिले की ही रुपेरी तबकडी गरगर गरगर जागच्या जागी फिरते आहे, असा भास होतो. पाहणारांच्या दृष्टिभ्रमाचा हा प्रकार असेल, पण दिसते ते असे. काही क्षणांनी या रुपेरी तबकडीच्या मागे अनेक काळ्या तबकड्या स्वतःभोवती गरगर फिरताना दिसतात. शेवटचा क्षण. किंचित काळवंडलेल्या क्षितिजाच्या कडेवर सूर्यबिंब येऊन ठेपले आहे. बिंबाची खालची बाजू किंचित तांबूस दिसू लागली. क्षणार्धात ती नारिंगी झाली. आणि सबंध सूर्यबिंब अस्पष्ट होत होत नाहीसे झाले.

सकाळी हॉटेलमध्ये आल्यापासून तिथे वावरणाऱ्या एका चमत्कारिक व्यक्तीकडे आमचे लक्ष विशेष वेधले होते. मळून धाण झालेल्या पायजम्यावर गुडघ्याखाली लोंबणारी, विटून गेलेली काळ्या रंगाची एक गबाळ शेरवाणी घातलेला, तीन-चार दिवसांची दाढी चेहऱ्यावर असलेला माणूस आम्हांला काय हवे नको ते मधून-मधून विचारीत होता. त्याचे नाव गेमानदास. सकाळी आम्ही आलो तेव्हा आमच्यासाठी पाव, अंडी वगैरे आणण्याकरता याला बाजारात पिटाळताना मालकाच्या जावयाला पाहिले होते; तेव्हा तो जावई मॅनेजर आणि हा बाजारमास्तर असावा असे वाटले होते. हा गेमानदास इथेच राहतो, तुम्हांला काय हवे नको ते याला सांगा, असे म्हणून मॅनेजर निघून गेला आणि दिवसभर गेमानदासच सर्व काही पाहात होता. तेव्हा तोच मॅनेजर असावा आणि मालकांचा प्रतिनिधी म्हणून तो जावई देखरेख ठेवीत असावा असे वाटले. बसलेल्या गालफडांचा, खोल गेलेल्या डोळ्यांचा हा केविलवाणा दिसणारा माणूस ‘ यस सर ’ ‘ यस सर ’ म्हणून आमच्याशी अतिशय लीनतेने वागत होता. रात्री जेवण झाल्यावर आम्ही गप्पा करीत बसलो असता ‘ आत येऊ का ? ’

म्हणून विचारून तो आत आला आणि नम्रपणे उभा राहून आमच्याशी बोलू लागला. त्याला बसायला सांगून त्याची हकीगत आम्ही विचारली. हा आहे तरी कोण, हे जाणून घेण्याची आम्हांला उत्सुकता होतीच. त्याच्या चमत्कारिकपणाची मी थट्टाही केली होती. शौचकूपात जातानासुद्धा हा माणूस ती लांब शेरवाणी काढून ठेवीत नाही, याचा अर्थ काय?—मी दलालांना म्हणालो होतो. पण संध्याकाळी त्याने एकदा शेरवाणी काढली, तेव्हा आमच्यासमोर येताना शर्टावर टॉवेल टाकून तो आला होता. फाटका शर्ट दिसू नये म्हणून तो सारा दिवस शेरवाणी घालून राही हे उघड होते. त्याची थट्टा केल्याबद्दल मला वाईट वाटले.

फाळणीनंतर सिंधमधून देशोधडीला लागून इथे आलेल्या निर्वासितांपैकी गेमानदास एक होता. म्हातारे आईबाप, बायको आणि दोन वर्षांची मुलगी मिरा यांच्यासह सिंधमधील लारकाना शहर सोडल्यापासून तो कल्याण कँपमध्ये राहात होता. पंधराच दिवसांपूर्वी त्याचे म्हातारे आईबाप, बायको आणि दोन वर्षांची मुलगी यांच्यासह तो अबू येथे आला. आमच्या बाजूच्याच मधल्या खोलीत ती सर्व राहात होती. हॉटेलचा शीख मालक गेमानदासचा आतेभाऊ. त्याने बोलावले म्हणून कल्याण कँप सोडून गेमानदास इथे आला होता. हॉटेलचा मॅनेजर म्हणून गेमानदासने इथे राहावे, असे त्याच्या आतेभावाचे मत होते.

" क्या कहूँ सांई " आपल्या फाटल्या कपड्याकडे पाहात तो सांगू लागला, " हे कपडे पाहून हा असाच कुणी तरी मवाली आहे असे तुम्हांला वाटले असेल; पण लारकाना येथे स्टँडर्ड ऑइल कंपनीचा मी सेल्समन होतो. तीन-चारशे रुपये मला पगार होता. जमीनजुमला, आमचं स्वतःचं घरदार तिथं होतं. चांगले चांगले सूट मी घालीत होतो. एक कसाबसा बचावून आणलाय मी. उद्या संध्याकाळी पाहिजे तर दाढी वगैरे चांगली करतो आणि तो सूट घालून तुमच्याबरोबर फिरायला येतो... "

त्याचे हे शब्द ऐकून मला हसू आले; पण दयाही आली. आपण ' जंटलमन् ' आहोत हे त्याला आमच्या मनावर ठसवावयाचे होते. आमच्याशी तो कामचलाऊ इंग्रजीत आणि हिंदुस्थानीत बोलत होता. त्याचा ओढलेला चेहरा आणि चिपाड झालेले शरीर पाहून तो पंचेचाळीस-पन्नास वर्षांचा असावा असे कुणाला वाटले असते, पण वय चौतीस असल्याचे त्याने सांगितले. सिंधमधून येताना झालेले हाल आणि कल्याण कँप-मधल्या अपेष्टा यांनी आपली ही दशा झाली असे तो म्हणाला.

" सांई, पाखरालासुद्धा आपलं घरटं सोडवत नाही; मग आमची माणसांची सर्व काही सोडून येताना काय स्थिती झाली असेल, सांई? " त्याने विचारले, " तुमच्या त्या कल्याण कँपमध्ये राहण्यापेक्षा आम्हांला पुन्हा पाकिस्तानात धाडतील तर बरं. मुसलमान एकदम मारून तरी टाकतील ! "

" का बुवा ? " आम्ही म्हटलं.

" नरकवास आहे तो. " तो सांगू लागला. " धड अन्न नाही, धड जागा नाही. धड पाणी नाही. लाखो निर्वासितांचे हाल चालले्त तिथं. शेकडा ऐंशी लोकांच्या अंगाला पायापासून डोक्यापर्यंत खुजली झालीय् ! कँपमधल्या एका सेक्शनचा मी उपाध्यक्ष होतो; पण कुणी दाद घेत नाही. आमच्या सिंधमधल्या आदरातिथ्याची तुम्हांला कल्पना नाही सांई ! रस्त्यावरून जाणारा कुणीही दाराशी आला तरी सिंधी माणूस त्याला चहापाणी, पापड खायला दिल्याशिवाय राहणार नाही. इथे पाणी द्यायला कुणी कबूल नाही सांई ! "

लारकान्यामध्ये गहू, दूध, तूप, लोणी किती मुबलक होते, याचे रसभरित वर्णन करून तो म्हणाला, " सकाळी उठल्याबरोबर बचकाभर लोणी आणि गरम गरम गव्हाची पोळी आम्ही खात होतो ! तुम्ही ' कोकी ' खाल्लीय् का कधी ? "

" कोकी ते काय ? " आम्ही विचारले.

" सकाळच्या न्याहारीसाठी गव्हाच्या पिठाचाच ' कोकी ' नावाचा पदार्थ आम्ही सिंधी लोक करतो. काय मस्त लागतो, सांई ! थांबा, उद्या सकाळी तुमच्यासाठी माझ्या बायकोला करायला सांगतो कोकी ! चहा घेऊ नका सकाळी मी कोकी आणल्याशिवाय—"

" छे, छे, काही नका आमच्यासाठी करू ! " आम्ही म्हणालो. या गरिबाला आमच्यासाठी हा आणखी भुर्दंड कशाला ?— आम्ही विचार केला.

" नाही नाही सांई ! " तो म्हणाला, " पाहाच तुम्ही. वेगळा चार्ज वगैरे काही नाही. हॉटेलचा त्याच्याशी संबंध नाही. माझे मित्र म्हणून मी तुमची सरबराई करणार. सकाळी पाहाच तुम्ही कोकीची लज्जत ! "

" बरं बुवा ! " म्हणून आम्ही स्वस्थ बसलो.

निर्वासितांच्या पुष्कळ गोष्टी त्याने सांगितल्या. " सिंधमधील किंवा जुनागडकाठेवाडमधून आलेले मुसलमान वाईट नव्हते, " तो म्हणाला. " पण पंजाबी बडे सोदे, सांई ! "

कराची, नबाबशहा वगैरे ठिकाणी या पंजाबी मुसलमानांनी, रस्त्यात असो की गाडीत असो, हिंदू दिसला की त्याला भोकसायचा, पैसे काढून घ्यायचे आणि फेकून द्यायचा, असा सपाटा चालविला होता. तो म्हणाला, " जिथे राजासारखे आम्ही राहात होतो तिथे पाकिस्तान झाल्यावर मुसलमानांची पोरंटोरंसुद्धा आमचा पदोपदी अपमान करू लागली ! "

किती सांगू आणि काय सांगू असे गेमानदासला झाले होते. ' कोकी 'ची पुन्हा आठवण करून तो झोपायला गेला.

□

# एक अपूर्व संध्या

न. वि. गाडगीळ

साध्या गोष्टीसुद्धा प्रसंगाने आणि परिस्थितीने असाधारण आणि असामान्य होतात. मानवी जीवनातच हे होते असे नाही, तर सृष्टीमध्येही हे घडत असते. दोन नद्या एकत्र आल्या, संगम झाला, ही अगदी साधी गोष्ट आहे; पण यातच एक असाधारण भावना उत्पन्न होते. मानवी मनात तिचे प्रतिबिंब उतरते. संगम म्हणजे क्षेत्र ही समाजाची धारणा होते. मग तो संगम समोरासमोर झाला की, मनुष्य त्या गोष्टीला अधिक महत्त्व देतो. त्या संगमाचे महत्त्व अधिक मानतो. नद्या अनेक आहेत; पण प्रत्येकीला मनुष्य काही पुण्यसलिला मानीत नाही. वास्तविक प्रत्येक नदी, प्रत्येक नाला यांचे कूळ एकच. आकाशातून पडलेले पाणी समुद्राप्रत जाते, आणि या प्रवासात ज्या प्रमाणात त्या त्या नदीचा व्याप व विस्तार वाढतो, त्या प्रमाणात ती पवित्र मानली जाते. " तीरींच्या पादपांचे " वर्धन करीत जाते, तीरावरल्या भूमिभागाला समृद्ध करीत जाते, काठावर वसलेल्या मानवांच्या जीवनात आनंद पसरीत जाते आणि मग अशा विशाल नदीच्या तीरावरील प्रदेशातून अज्ञात काळात कुणी तप केल्याच्या कथा प्रसृत होतात. पुराणे मग इतिहास बनतात, आणि सामान्य गोष्टीसुद्धा प्रेरक आणि उत्साह देणाऱ्या ठरतात.

वास्तविक सृष्टी हे एक महाकाव्य आहे. या काव्याला अंत नाही. त्यात किती खंड आहेत, हे कुणी सांगू शकत नाही. पर्वत आणि नद्या, लहान-मोठी सरोवरे, सागर आणि महासागर ही सर्व त्या महाकाव्याची पर्वे आहेत, असे म्हटले आहे. पर्वताच्या गुंफात आणि नद्यांच्या संगमांच्या सान्निध्यात मानवाची बुद्धी सर्जनशील होते. अथांग रत्नाकराकडे, विशाल महासागराकडे पाहून तीच गोष्ट अनुभवाला येते. प्राचीन ऋषिमुनींनी आपले धर्मग्रंथ याच वातावरणात निर्माण केलेले आहेत. या व असल्या सृष्टीच्या मनोहर सान्निध्यात काव्य सुचले नाही, असा मनुष्य विरळाच! मधुर संगीताने, सुभाषिताने, आणि ' युवतीनां च लीलया ' ज्याचे चित्त द्रवत नाही, अशा माणसाची यथायोग्य संभावना सुभाषितकारांनी केलेली आहेच! पण या सुभाषितात सृष्टीतील सौंदर्यस्थळांचीही भर घालावयास पाहिजे, असे मला वाटते. अशाच एका सौंदर्यस्थळाच्या सान्निध्यात प्रस्तुत लेखाची प्रेरणा आहे.

पाणी-योजना कमिटीच्या संदर्भात, दक्षिणेतील राज्यांत ताबडतोब काय करता येईल, याची चौकशी करून त्यासंबंधी शिफारसी करण्याचे काम भारत-सरकारने एका समितीवर सोपवलेले होते. त्या समितीचा प्रमुख या नात्याने त्या वेळी मी केरळ

राज्यात गेलो होतो. केरळ प्रदेशाची सौंदर्यविषयक कीर्ती मी लहानपणापासूनच ऐकत होतो. ‘ केरळ-कोकिळ ’ या नावाचे एक मासिक अगदी लहानपणी, म्हणजे सुमारे ५० वर्षांपूर्वी अवलोकनात येत असे, आणि त्यातील लेखक ‘ महाराष्ट्रभाषाचित्रमयूर ’ यांचे लिखाण पण वाचनात येत असे. तरुणपणी राजा रविवर्म्याची चित्रे,– काही अस्सल आणि काही छापील अशी,–पाहण्याचा योग आला होता आणि केरळा-तील हा कलावंत माझ्या आदराचे एक स्थान झाला होता. ज्या भूमीत जे सर्जन होते, ते त्या भूमीतील गुणद्रव्यांचे थोड्याबहुत प्रमाणात प्रतिबिंब असते. परिस्थितीने पुरुष बनतो. म्हणजे त्याचे जीवनदर्शन, त्याचा वर्तनक्रम, ही कमीजास्त प्रमाणात परिस्थितीची निर्मिती असते आणि या दृष्टीने या कलावंतांच्या रचनात्मक स्थितीत– ज्या स्थितीत त्याचे आदर्श आकार घेऊ लागले त्या स्थितीत– केरळातील सृष्टिसौंदर्याने खास मोठा परिणाम केला असला पाहिजे, असे माझे मत होते व आहे.

केरळातील स्त्रीपुरुष स्वच्छ, टापटिपीचे, नीटस आणि देखणे असतात, असे त्यांचे वर्णन महात्माजींनी केलेले आहे. आद्य शंकराचार्य हेही केरळ भूमीचे सुपुत्र. त्यांची जन्मभूमी पहावी, ही फार दिवसांची इच्छा होती. मंत्रिमंडळात असताना कामानिमित्त तिकडे जाण्याची संधी अनेक वेळा आली होती; पण ते घडले नाही. तसेच, कै. वल्लभभाईंनी केरळला भेट दिली होती तेव्हा त्यांनीही आग्रह केला होता; परंतु त्याही वेळेस जाणे घडले नाही. तात्पर्य, लहानपणापासून इच्छा असूनही साठी उलटल्यानंतर ही घटना घडायची हा ईश्वरी संकेतच असला पाहिजे !

त्यामुळे सांगण्यात आलेले काम ताबडतोब स्वीकारून पहिल्या प्रथम केरळ-राज्याला भेट देण्याचे ठरवले. कार्यक्रम निश्चित झाला. पाटबंधाऱ्यासंबंधीच्या ज्या योजना चालू होत्या, त्यांची पाहणी करावयाची, हे मुख्य काम. पण माजी मंत्री आणि विद्यमान समिति-प्रमुख या नात्याने भेट होणार असल्यामुळे, स्वागताचे अनेक समा-रंभही त्या कार्यक्रमात प्रविष्ट करण्यात आले होते. तथापि दैव मला सर्वस्वी अनुकूल होते. मी त्या ठिकाणी पोहोचण्याच्या आधीच ७–८ दिवस विषबाधित अन्नाच्या प्रकारात काही माणसे दगावली ! त्यामुळे बहुतेक समारंभ छाटले गेले, आणि काही २–३ समारंभ घडून आले, त्यांमध्ये कुठेही साखरेचा अगर गव्हाचा पदार्थ नव्हता. काकवीमिश्रित चहा पिण्याचे अपूर्व भाग्य लाभले आणि जेवण म्हणजे यथार्थतया भातुकलीच होती ! पण इच्छा व्यापक होती. इष्ट मर्यादित ठेवणे आवश्यक होते.

ता. १५ मे रोजी अगदी ब्राह्म मुहूर्तावर मुंबईतील सांताक्रूझ विमानतळाहून “ अथ विमानमार्गेण ” निघालो. गेल्या १४ महिन्यांत माझ्याइतका विमानाचा प्रवास विमानहाके सोडून दिल्यास कुणीही केला नसेल ! त्यामुळे या प्रवासाच्या बाबतीत मी इतका निगरगट्ट झालो होतो की, विमान मला लागायच्या ऐवजी मीच विमानाला लागणे अधिक संभवनीय होते ! मला वाटत होते, वैशाख महिना असल्या-मुळे दक्षिण दिशेला जाताना डाव्या बाजूने अखंड प्रवास करणारा सूर्य माझ्यासारख्या

महान व्यक्तीला मुजरा करण्यास येईल आणि त्याच्या प्रकाशात पश्चिम किनाऱ्यावरील कोकण प्रांतातील सृष्टिसौंदर्य, जलदुर्ग पाहत-पाहत मी जाईन. तथापि सूर्याऐवजी सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरून धुके आणि ढग आमच्या मार्गावर जणू सत्याग्रह करताना दिसू लागले ! विमान डाकोटा असल्यामुळे ते फार उंचावर जाऊ शकत नव्हते. नाहीं तर व्हायकौंटप्रमाणे २० हजार फुटांवरून प्रवास केला असता आणि वामनाने पद-दलित केलेल्या पृथ्वीला, वराहाने तुच्छ लेखलेल्या पृथ्वीला मीही तुच्छ लेखले असते. तथापि मला ही संधी मिळायची नव्हती. म्हणूनच की काय,पहिला तासभर प्रवास अत्यंत त्रासदायक झाला. खुर्चीचे पट्टे बांधा आणि सोडा, हीच कवायत करीत बसावे लागले!

सुमारे १॥–१॥। तासांनी परिचित भू-भाग दिसू लागला आणि थोड्याच वेळात बेळगावच्या विमानतळावर उतरलो. सीमेच्या वादात हा भाग परिचित होता. कारण म्हैसूर आणि मुंबई यांतील सीमा म्हणजे हा विमानतळ, अशी सूचना करण्यात आली होती. विमानतळावर उपाहारगृहही नव्हते आणि बसावयास प्रशस्त जागाही नव्हती. तथापी वातावरण प्रसन्न होते आणि आकाशही निरभ्र होते. १५ मिनिटांत पुनः विमान सुरू झाले आणि तासाचे आत मंगलोरच्या घाटमाथ्यावरील विमानतळावर आम्ही उतरलो. हा विमानतळ म्हणजे एक अपूर्व गोष्ट आहे. अन्य विमानतळ सामान्य भूमीवर आहेत. हा मात्र डोंगरपठारावर आहे. या विमानतळावर येण्यापूर्वी गोव्याची भूमी दुरून दिसत होती. गोव्याच्या भूमीवरून जावे अशीही इच्छा होती. पण ते मना आहे, असे पायलटने सांगितले ! त्यामुळे डोकेदुखीचा प्रश्न झालेला गोवा उजव्या बाजूला ठेवून, क्षणभर त्याला उजवी घालून आम्ही मंगलोरला आलो. तेथून कोचीनच्या विमान तळावर येताना सर्वत्र पाण्याचे प्रवाह, नारळाची झाडे आणि त्यांच्या कुशीत लपलेली लहान-लहान कौलारू घरे असा देखावा वरून दिसत होता. वरून पाहताना सर्वत्र पाणीच पाणी दिसत होते. विमानतळ कुठे आहे, हे पाहण्याची उत्सुकता वाटत होती पण तो नीटसा दिसेना. मग मात्र भीती वाटू लागली. या सगळ्या जलप्रवाहाशी पाठशिवणीचा खेळ खेळताना विमान एखादेवेळी पाण्यात तर नाही ना उतरणार? आणि तसे झाले तर काय करायचे याची योजना, योजनाप्रिय हिंदुस्थानचा एक नागरिक या नात्याने मी लागलीच तयार केली. चष्मा आणि घड्याळ यांचे रक्षण केलेच पाहिजे, हा निश्चय झाला; पण पेनविषयी निश्चित मत होईना. कटिवस्त्र ठेवून अंगावरील बाकीचे कपडे सोडावयाचे हाही निर्णय घेताना अडचण पडली नाही ! तथापि असे काही घडायचे नव्हते आणि अगदी अरसिकरीतीने आमचे विमान कोचीन विमानतळावर उतरले. तिथे औपचारिक स्वागत झाले आणि १५ मिनिटांत आम्ही त्रिवेंद्रमच्या विमानात बसलो; १ वाजता मुक्कामावर पोहोचलो. ‘ सरकारी पाहुणा ’, या नात्याने सर्व व्यवस्था होतीच. अर्थात अनुभव चिमणरावापेक्षा निराळा !

“ कन्याकुमारीला भेट द्यायची आहे का ? ” असे त्रिवेंद्रमच्या इंजिनीयरने विचारले आणि मी तत्काळ होकार दिला. नेमलेल्या कामाबाहेर काही तरी केलेच

पाहिजे, हे मंत्र्यांचे धोरण स्वीकारले! त्यामुळे ता. १६ रोजी सकाळी मुख्यमंत्री श्री. नंबुद्रीपाद यांचे स्वागत स्वीकारून आम्ही मोटारने कन्याकुमारीला जायचे ठरविले.

या जवळजवळ १०० मैलांच्या प्रवासात आपण जणू एखाद्या शहरातून जात आहोत असा भास होत होता. एक वस्ती संपली की लागलीच दुसरी सुरू. दुतर्फा घरे. वाक्यात स्वल्पविराम असावा, तशी उपाहारगृहे; अर्धविरामाप्रमाणे शाळागृहे आणि पूर्णविरामाप्रमाणे एखादा कालवा, असे होत होते. एखाद्या महापुरुषाच्या दर्शनार्थ लोकांनी गर्दी करावी, तशी नारळीच्या झाडांनी दुतर्फा गर्दी केलेली होती. एखाद्या नटव्या स्त्रीने गळ्यात जडजड मण्यांची माळ घालावी आणि लोकांना ती दिसावी म्हणून पदर किंचित् बाजूला सारावा, त्याप्रमाणे या वृक्षांची स्थिती झालेली दिसत होती. वृक्षांना नारळच नारळ लागलेले दिसत होते. रस्त्यातील उपहारगृहाजवळ जणू काही तसेच दृश्य दिसत होते. माणसांची टोळकीच्या टोळकी एकत्र येऊन, हातात वर्तमानपत्र घेऊन चर्चा करीत होती. स्त्रीपुरुष स्वच्छ, नीटनेटके आणि व्यक्तिमत्त्व असलेले दिसत होते. सहज चौकशी करता असे समजले की, देवीकोलम मतदारसंघातील मतदानाचा तो दिवस होता. केरळातील ८० टक्के जनता साक्षर आहे. हिंदू, मुसलमान, हरिजन आणि ख्रिश्चन या चार जमातींचा संगम तिथे झालेला आहे. तिथल्या ख्रिश्चन जनतेने दुसऱ्या शतकापासून तो धर्म स्वीकारला; काहींच्या मते तर जीझसच्या मृत्यूनंतर ५–१० वर्षांतच ती ख्रिश्चन झालेली आहे. आजच्या जमान्यातसुद्धा धर्मच तिथे प्रभावीही दिसत होता, आणि अर्थशून्य दिसत होता! जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण आता आर्थिक होऊ लागलेला आहे, असे अनेकांनी मला सांगितले. सकाळी भेटलेल्या वृत्तपत्रप्रतिनिधींनीही तेच सांगितले होते. मोठ्या पुढाऱ्याला भेटणे हे वृत्तपत्रकारांचे काम असते; पण ते आपण होऊन न आल्यास त्यांना बोलावून आणणे हे लोकशाहीतील पुढाऱ्यांचे कर्तव्य असते! त्यामुळे ते मला भेटायला आले नसते, तर मीच त्यांना बोलावले असते, हे निश्चित! त्यांनीच मला या निवडणुकीबद्दलची कल्पना दिली होती. म्हणूनच या शांत आणि सुंदर वातावरणातून प्रवास करीत असताना मी जागजागी गाडी थांबवीत असे आणि चहाचा शोध करून मिळवलेल्या कॉफीत संतोष मानीत, तेथे जमलेल्या मंडळींशी थोडीबहुत चर्चाही करीत असे. निदान ७–८ ठिकाणी असे केले असेल. "व्यक्ती तितक्या प्रकृती" या न्यायाने विविध दृष्टिकोण नजरेस आले; पण एक गोष्ट मात्र निर्विवादपणे आढळून आली ती म्हणजे, विद्यमान मंत्रिमंडळातील सदस्यांच्या वैयक्तिक चारित्र्याबद्दल लोकांना वाटत असलेला नितान्त आदर! तात्पर्य, या प्रवासात सृष्टीचे सौंदर्यनिरीक्षण आणि मानवी संघर्षाचा विचार करीत मी पुढे-पुढे चाललो होतो. योजना अशी होती की, संध्याकाळ होण्यापूर्वी निदान अर्धा तास तरी कन्याकुमारीस पोचायचे, आणि सूर्यास्त झाल्यानंतर तेथून परत निघायचे. कारण मार्गदर्शक इंजिनियरने सांगितले होते की, कन्याकुमारीतली संध्याकाळ म्हणजे एक अलौकिक सृष्टिसौंदर्याचा नमुना असतो.

सुमारे ५ वाजता आम्ही कन्याकुमारीला पोचलो. तिन्ही बाजूंना समुद्र होता. हिंदुस्थानच्या नकाशात दाखविल्याप्रमाणे भूप्रदेश निमुळता होत गेला होता आणि शेवटला बिंदू तर अवघा फर्लांग दोन फर्लांगइतका दिसत होता. मोटार समुद्रापासून १०० यार्डांवर ठेवून आम्ही दक्षिणाभिमुख चाललो होतो. डाव्या बाजूला बंगालचा उपसागर जणू काही भारतभूमीची पूजा करण्यासाठी तरंगरूपी पुष्पांजली वाहत होता. किनाऱ्यापासून २०० यार्डांवर एक लहानसे बेट दिसले. तेथे स्वामी विवेकानंदांनी काही दिवस तप केले होते, अशी आख्यायिका सांगण्यात आली. जिथे जमिनीचा शेवटचा बिंदू होता, त्या ठिकाणी एक लहानसा घाट, आणि त्याच्या अलीकडे कन्याकुमारीचे देऊळ होते. प्राचीन काळी हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत राज्य करणारा भरत नामक एक राजा होता. त्याच्या मुलीचे नाव कुमारी होते. राजाने आपले राज्य मुलांत आणि मुलींत वाटले होते. ( तेव्हा या दृष्टीने विचार करता हिंदू कोडातील मागणी किती यथार्थ आहे, हे सहज ध्यानात येईल ! ) या भागात तिचे राज्य असताना त्याला ‘ कुमारीनाडू ’ म्हणजे कुमारीचे वसतिस्थान असे नामाभिधान प्राप्त झाले. अशीही आख्यायिका सांगतात की, विश्वातील पराशक्ती कुमारीच्या रूपाने येथे तप करीत होती.

आसपास अनेक तीर्थे आहेत. गायत्री, सावित्री, सरस्वती, मण्डन अशी अनेक तीर्थे तिथे आहेत. त्यांतले एक स्थाणू तीर्थही आहे. त्यासंबंधीची आख्यायिका मोठी सुरस आढळली. बाणासुर राक्षसाचा वध करून देशावरले संकट निवारावे, म्हणून एक यज्ञ करण्यात आला होता. या यज्ञातून पराशक्ती कुमारी म्हणून बाहेर आली. तिचा विवाह झाला, तर बाणासुराचा वध होण्यासारखा नव्हता. म्हणून भानगडी करण्याबद्दल प्रसिद्ध असलेल्या नारदमुनींनी एक क्लृप्ती शोधून काढली. “ डोळे नसलेला नारळ, पेरे नसलेला ऊस आणि शिरा नसलेले विड्याचे पान जो आणील, त्याच्याशी तू विवाह कर ! ” असा कानमंत्र त्याने तिला दिला; पण इतके करूनही एका राजपुत्राने ते सारे काही आणले ! त्यामुळे नारदाने आणखी काही युक्त्याप्रयुक्त्या लढवल्या आणि अखेरीस तो राजपुत्र त्या ठिकाणी स्थाणू राहिला. त्याचेच आज तीर्थ झाले आहे. सौंदर्यस्थळांच्या अनुरोधाने आख्यायिका नेहमीच निर्माण होत असतात. त्याचा प्रत्यय इथेही आला !

अशा ठिकाणी बहुतेक यात्रेकरू भक्तिभावाने येतात. आम्ही मात्र भक्तिभावाने आलो नव्हतो. सौंदर्योपासक म्हणून आलो होतो. सत्य, शिव आणि सौंदर्य यांपैकी सौंदर्याची प्रेरणा निदान माझ्या मनात तरी प्रभावी होती. सूर्योदय आणि सूर्यास्त कोणत्याही स्थळी मानवी मनाला सदैव आनंद देतात. पण ह्या स्थळी मनात काही विशेष भाव उत्पन्न होतात. पूर्वेस बंगालच्या समुद्रातून वर येणारा सूर्य बारा तास आपली कामगिरी करून पश्चिम महासागरात विलीन होतो. हे दोन्ही कालबिंदू इथे अत्यंत प्रेक्षणीय असतात. दोन्ही दृश्ये मनोहारी. अपूर्व प्रभात आणि अपूर्व संध्या !

आम्ही पोचेपर्यंत सहस्ररश्मी पश्चिमसागराच्या वर १०–२० हात कललेला होता. असे सांगतात की, चैत्र शुद्ध पौर्णिमेला पूर्व समुद्रातून चंद्राचा उदय आणि पश्चिम समुद्रात सूर्याचा अस्त एकाच वेळी होताना दिसतो. एकाच वेळी अस्त आणि उदय हे सौंदर्य तर खरेच; पण त्याबरोबर ते एक नैतिक सुविचार प्रकट करणारेही आहे. लोकशाही युगामध्ये हा देखावा चैत्र पौर्णिमेला दिसत नसेल, पण निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर एका मंत्रिमंडळाचा अस्त आणि दुसऱ्याचा उदय या स्वरूपात तो दिसून येतो ! जगाच्या रहाटगाडग्यातील रिकामे पोहोरे भरून वर येतात आणि भरलेले रिकामे होतात, हे आपण नेहमीच पाहात असतो.

अशा प्रकारचे विचार डोक्यात चालू होते. तेवढ्यात आमच्या वाटाड्याने सांगितले की, पलीकडचा वाळूचा ढिगारा जलदगतीने ओलांडून गेले पाहिजे; म्हणजे सूर्यास्ताचा देखावा स्पष्टपणे पाहता येईल ! आमच्या समितीतील बहुतेक लोक साठी उलटलेले होते. लालसिंग तगडे खरे; पण हृदयाच्या विकारामुळे तेसुद्धा जलद चालण्यास नाखूष होते. त्यांनी वाळूतच बैठक मारली. म्हैसूरचे नरसिंहैय्या म्हणजे लहानशी मूर्ती; पण सर्वांत तेच जलदगती ठरले आणि त्यांच्या पाठोपाठ हा मर्द मराठा कुठेही न थांबता जात होता ! रेताडातून झपाट्याने पावले उचलीत जाणे मोठे जिकिरीचे असते; पण मानवी मन असेच आहे की, कुणाच्या उत्कर्षापेक्षा अवनती-कडेच त्याचे लक्ष अधिक वेधते ! त्यामुळे सूर्याचा अस्त पाहण्यासाठी आम्ही अधीर झालो होतो. आमच्या पायांना क्षणभर हरणाची गती प्राप्त झाली होती. शंख आणि शिंपले ओलांडीत तुडवीत आम्ही भराभर पुढे जात होतो. समुद्रापासून ५–१० पावलांवर पोचेपर्यंत आम्ही अगदी थकून गेलो होतो.

आकाश निरभ्र होते. सूर्यबिंब लाल झाले होते; पण ती पराक्रमाची लाली वाटत नव्हती. श्रेष्ठ व महान पुरुष आपत्काळीसुद्धा विलक्षण धैर्याने वागतो. त्या वेळी त्याच्या मुखावर जी एक अपूर्व शोभा झळकत असते, तशीच ही शोभा वाटत होती. क्षणभरसुद्धा विसावा न घेता, कसल्याही फळाची आकांक्षा न धरता, जगाची एवढी सेवा करणारा हा कर्मवीर जगातील कृतघ्नतेच्या जाणिवेमुळे जणू काही कष्टी झालेला आहे, असे वाटत होते. जगाचा कोनाकोपरा आपल्या प्रकाशाने उजळणारा, अनंत जीवांना प्रेरणा– नव्हे, जीवनसत्त्वे देणारा प्रवासी एक मुक्काम तयार करून दुसऱ्या मुक्कामाकडे जायला निघाला होता. एखादा वर्तमानपत्राचा बातमीदार बातम्या देण्या-साठी घाईघाईने आपल्या कार्यालयाकडे धावपळ करीत जाताना दिसतो,त्याप्रमाणे जगा-तील सर्व घडामोडींचा साक्षीदार जगाचे इतिवृत्त विश्वनिर्मात्याकडे रुजू करण्यासाठी जात असावा. त्याने काय पाहिले असेल, काय ऐकले असेल, याची संपूर्ण कल्पना कुणालाही येऊ शकत नाही. मनुष्य जे जे काही करीत असतो, त्याचे साक्षीदार सृष्टीतील प्रभावी द्रव्ये असतात. चंद्र, सूर्य आणि ही भूमी या सर्वांना मनुष्य शरीराने जे करतो आणि मनाने जे चिंतितो, ते सारे अवगत असते, असे धर्मशास्त्र सांगते. हे खरे असेल काय

आणि तसे असेल, तर माझ्या मनातले विचार हा सूर्यनारायण खास जाणीत असला पाहिजे.

आणि त्याच क्षणी एकाएकी आठवण झाली. याच स्थळी, अशाच एका सूर्यास्ताच्या वेळी पूज्य विनोबाजींनी जाहीर प्रतिज्ञा केली होती : “ जीविताचा उरलेला प्रत्येक क्षण या भारतभूच्या द्वारे सर्व जगाच्या सेवेसाठी खर्च करीन ! ”

त्या प्रतिज्ञेची आठवण होताच एक निराळेच वातावरण उत्पन्न झाले. ती संध्या मग मामुली संध्या उरली नाही. मनात निराळेच भाव निर्माण होऊ लागले. क्षणभर पार्थिव अस्तित्व विसरून गेलो. क्षणभर निराळ्याच एका सृष्टीत वावरू लागलो. सूर्य कलेकलेने समुद्राच्या पाण्याखाली अदृश्य होत आहे, हे पार्थिव डोळ्यांना दिसत होते; पण मनात निराळाच प्रकाश उमटत होता. कधीही कमी न होणारा, क्षणोक्षणी वाढत जाणारा प्रकाश मनात उमटत होता.

तेवढ्यात कुणी तरी ‘ परतण्याची वेळ झाली ’, असे म्हटले आणि पार्थिव सृष्टीशी तुटलेला संबंध पुनः एकदा जोडला गेला !

बुडत्यास हात द्यावा, ही नेहमीची जनरीत आठवली आणि धावत जाऊन सूर्याला घट्ट पकडावे, बुडण्यापासून वाचवावे, अशी पोरकट कल्पना मनात आली. प्रस्तुत संदर्भात ती पोरकट खचितच नव्हती ! पण मी तसे केले नाही. झालेही नसते, याची जाणीवही तत्काळ झाली; पण हाच भाव जीवनाचा प्रधान हेतू असावा, हेच त्या अपूर्व संध्येतील अध्यात्म बरोबर घेऊन मी परत फिरलो.

□

सहा

# कश्मीरचे वैभव

## ना. सी. फडके

‘ दल ’ सरोवराचे दोन भाग आहेत. त्यांपैकी एकाला ‘ बडा दल ’ म्हणतात व दुसऱ्याला ‘ छोटा दल ’ असं नाव आहे. ही नावं अर्थातच विस्तारदर्शक आहेत. आमचा ‘ शिकारा ’ जेव्हा कालव्यातून बाहेर पडून पाण्याच्या विस्तीर्ण डोहात शिरल्याचं मला दिसलं तेव्हा मी वल्ही मारण्यात गुंतलेल्या आहादूला विचारलं, “ आपण आता ‘ दल ’मध्ये येऊन दाखल झालो, नव्हे ? ” तो म्हणाला, “ हां हुजूर , पण हा ‘ छोटा दल ’ आहे; थोड्या वेळाने आपण बडा दलमध्ये जाऊ. ” मी आजूबाजूस पाहू लागलो तो त्या छोट्या समजल्या जाणाऱ्या सरोवराचाच विस्तार केवढा तरी मला वाटला. जिकडे तिकडे पाणीच पाणी दिसत होतं. दूर अंतरावरच्या

किनाऱ्यावर मोठमोठी झाडं होती. उजव्या बाजूस आणि समोर पर्वतांची बर्फानं आच्छादलेली शिखरं दिसत होती. सूर्यप्रकाशानं आता साऱ्या दिशा चांगल्याच उजळल्या होत्या. सरोवराच्या काळ्याभोर पाण्यात पर्वतांची प्रतिबिंबं स्पष्ट दिसत होती. सरोवरात ठिकठिकाणी वेतांच्या झाडांचे गुच्छच्या गुच्छ अर्धं अंग पाण्यावर काढून उभे राहिलेले होते, त्यांच्या फांद्यांवरची लांबट मऊ हिरव्या रंगाची नवी पालवी वाऱ्यावर सळसळत होती. वेताच्या झाडाला इकडे ‘ वंश ’ म्हणतात. सामान्य लोकांच्या तोंडी ‘ बंस ’ असा अपभ्रंश रूढ आहे. ‘ बांसरी ’ हा शब्द ‘ बंस ’ या शब्दावरूनच तयार झाला असला पाहिजे असं माझ्या मनात आलं.

आता आमचा ‘ शिकारा ’ संथ जलपृष्ठावरून खूपच वेगानं चालत होता. ‘ बडा दल ’मध्ये आम्ही दाखल झाल्यावर भोवतालच्या जलविस्ताराकडे पाहून मी आहादूला प्रश्न केला, ‘ कश्मीरमधलं हे सर्वांत मोठं सरोवर का रे ? ” तो म्हणाला, “ छे ! छे ! हुजूर, आपण सोपूरला जाऊन तेथला ‘ वूलर ’ तलाव बघा. तो तलाव म्हणजे दर्याच वाटेल आपल्याला. ” मी म्हटलं, “ होय का ? मी जाणारच आहे सोपूरला. ” कश्मीरच्या नॅशनल कॉन्फरन्सचं सोपूर येथील अधिवेशन म्हणजे कश्मीरच्या स्वातंत्र्यसंग्रामाचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणावा लागेल. कादंबरी लिहिण्याच्या दृष्टीनं सोपूर हे गाव प्रत्यक्ष जाऊन पाहाणं मला आवश्यक होतं. सोपूर गावाविषयी मी आहादूला काही प्रश्न विचारू लागलो तेव्हा त्यांची उत्तरं देता देता मध्येच त्यानं मला विचारलं, “ हुजूर, आपण कुठून आलात ? ” “ कोल्हापुराहून ” असं सांगितलं तर त्याला कळण्यासारखं नव्हतं म्हणून मी म्हटलं, “ मुंबईहून ”. ते ऐकून तो सांगू लागला, “ पाकिस्तानशी लढाई सुरू झाल्यापासून कश्मीरला पाहुणे येईनासे झाले आहेत. पण पूर्वी मुंबईचे फार लोक इकडे येत असत, आणि तेव्हा आमच्या धंद्याला अशी तेजी होती की रात्रंदिवस आम्हांला फुरसत नसे. वल्हवून वल्हवून खांदे दुखायला लागायचे. पण पैशाचा लोभ माणसाकडून काय करून घेत नाही, हुजूर ? दिवसाकाठी पाच पंचवीस रुपये सहज मिळून जायचे आम्हांला आणि आता एखाद-दुसरादेखील मिळत नाही. फार खराब दिवस आले, हुजूर. पाकिस्तानचे हे युद्ध संपायचं कसं ? पाकिस्तानला तर इंग्रजांची आणि अमेरिकेची मदत आहे म्हणतात, होय हुजूर ? हे खरं आहे ? ” त्याच्याशी आंतरराष्ट्रीय राजकारणाची चर्चा करण्याची माझी फारशी इच्छा नव्हती. त्याच्या बहुश्रुतपणाचं मला फार कौतुक वाटलं. परंतु विषय बदलून मी त्याला विचारलं, “ काय रे आहादू , शेखसाहेबांविषयी तुम्हा लोकांना काय वाटतं ? ” ज्या व्यक्तीविषयी अत्यंत आदर असेल तिच्याविषयी बोलताना दोन्ही कान चिमटीनं पकडण्याची जी विशिष्ट मुसलमानी तऱ्हा आहे तिला अनुसरून आहादूनं दोन्ही कान पकडले आणि म्हटलं, “ शेखसाहेब फार मोठे आणि सच्चे गृहस्थ आहेत. आम्हांला दुसरं काही कळत नाही, पण एवढं कळतं की शेखसाहेब जे सांगतील त्यात आमचा फायदा आहे. ”

आहादूशी गप्पा मारता मारता मी सभोवारच्या रमणीय दृश्याकडे पाहातच होतो. माझ्या लक्षात आलं की बड्या दलचा विस्तार ओलांडून 'शिकारा' आता पुन्हा एखाद्या मोठ्या कालव्याप्रमाणे दिसणाऱ्या प्रवाहातून जात होता. माझी समजूत होती की मी या सफरीवर फारच लवकर निघालो, आणि 'शालिमार' बागेवर पोचे-पर्यंत रविवारची मजा करायला आलेले इतर लोक मला फारसे भेटणार नाहीत. 'छोटा दल' ओलांडीपर्यंत माझी कल्पना खरी ठरलीही होती. परंतु आता पाहतो तो किती तरी शिकारे 'शालिमार' बागेकडे चाललेले दिसू लागले. ते कुठून आणि केव्हा आले ते मला कळलंही नव्हतं. आपल्याला नकळत पक्ष्यांचा थवा गोळा झालेला दिसावा तद्वत शिकारे प्रगट झाल्यासारखं मला वाटलं. शिकाऱ्याप्रमाणंच काही 'हाउस-बोटी'ही बागेकडे चालल्या होत्या. काही नौकांतून कुटुंबवत्सल माणसं आपल्या बायका मुलांना घेऊन निघाली होती. काहींत फक्त पुरुषच होते आणि बायका-मुलांच्या सान्निध्यात ठेवावा लागणारा संकोच ठेवण्याची त्यांना गरज नसल्यामुळे एकीकडे पत्ते खेळता खेळता त्यांच्या गप्पा-गोष्टी, गाणी आणि भांडणं उंच आवाजात चालू होती. कित्येक नावांत फोनोग्राफ लागले होते आणि प्रत्येक नावेत मागच्या आडोशाच्या बाजूस शेगड्या पेटल्या होत्या आणि खाना तयार होत होता. एखाद-दुसऱ्या शिकाऱ्यात नोकर उंच सुरईसारख्या एका भांड्यातून चिनीमातीच्या बसकट पेल्यात चहा ओतून देताना मला आढळत होता. त्या चमत्कारिक भांड्याकडे मी दृष्टी लावल्याचं आहादूच्या लक्षात आलं असावं,कारण त्यानं मला विचारलं,"हुजूर, चहा घेणार काय?" मी त्याला विचारलं, "तू कुठला देणार मला चहा?" तो म्हणाला, "ते का हुजूर, आपल्याजवळ सारी तयारी आहे, पाहा ना." मी पाहिलं तो खरो-खरच शिकाऱ्याच्या मागच्या टोकाला एक मोठी सुरई घेऊन आहादूचा छोटा गोरापान मुलगा निखारे फुलवीत बसला होता. सुरईसारख्या त्या भांड्याला 'समूवार' म्हणतात असं मला आहादूनं सांगितलं. रशियन साहित्यात हा शब्द मी वारंवार वाचला होता त्याची मला आठवण झाली. 'समूवार' म्हणजे पंचधातूचं एक सुरई-सारखं भांडं असतं. आपल्याकडे आंघोळीच्या पाण्याच्या बंबांना ज्याप्रमाणे विस्तव घालण्यासाठी मधोमध पोकळ नळी असते त्याप्रमाणं या समूवारलाही मध्यभागी पोकळ जागा असते. तिच्यात कोळसे घालायचे, पंखा मारून फुलवायचे आणि चहाची पत्ती टाकून पाणी उकळत ठेवायचं. या पाण्यात चवीसाठी मीठ टाकलेलं असतं. साखर वापरीत नाहीत. याला म्हणायचं नमकीन चहा. आहादूच्या मुलानं तयार केलेला हा नमकीन चहा पसरट पेल्यातून घेता घेता मी आहादूला विचारलं, "समूवार हे भांडं कश्मीरमध्ये कसं आलं? याचा विशेष प्रचार तर रशियात आहे?" त्याच्यासारख्या एका साध्या नावाड्याला या प्रश्नाचं उत्तर देता येईल अशी माझी कल्पना नव्हती. परंतु मला वाटतं ज्या ठिकाणी बाहेर गावचे मुशाफर पाहुणे मोठ्या संख्येनं नेहमी येतात तिथले सामान्य लोक मुशाफरांच्या कुतूहलाचं समाधान करण्याची जबाब-

दारी पार पाडून पाडून आपोआप विद्वान होतात. परप्रांतातल्या प्रवासात या गोष्टीचा अनुभव मला वारंवार आलेला आहे. आता आहादूच्या बाबतीतही असाच अनुभव आला. समूवारबद्दलचा माझा प्रश्न त्यानं टाळला नाही. अगदी आपल्या दत्तो वामन पोतदारांचा हजरजबाबीपणा दाखवून त्यानं मला सांगितलं की, फार जुन्या काळी कश्मीरचा अमुक अमुक राजा चीनमध्ये व तेथून पुढे रूस देशात गेला होता त्यानं हे समूवार भांडं आपल्याबरोबर आणलं आणि तसली भांडी इथल्या कारागिरांकडून घडविण्याचा प्रघात पडला.

लवकरच आम्ही शालिमार बागेवर येऊन पोचलो. आहादूनं शिकारा काठाला लावला आणि माझ्याबरोबर तो आणि त्याचा मुलगाही खाली उतरला. बागेपुढच्या पटांगणात घाणेरड्या मिठाईची दुकाने दिसली आणि ताज्या भाज्या, सफरचंदें यांचे मोठमोठे हारे घेऊन बसलेल्या अस्सल कश्मीरी वेशातल्या सुंदर खेडूत बायकाही दिसल्या. पटांगणात जिकडे तिकडे केरकचरा साठलेला होता. एखाद्या मोठ्या गावातल्या पाटलाच्या घराभोवती जशी तटासारखी भिंत असते तशी बागेची भिंत मला वाटली. बागेचं प्रवेशद्वार तर मुळीसुद्धा भव्य वाटलं नाही. “ हत्तिच्या ! हीच का शालीमार ! ” असं स्वतःशी पुटपुटत मी आत शिरलो. परंतु बागेची एकेक मजगी ( मजला ) जसजसा चढून पुढे जाऊ लागलो तसतशी माझ्या उद्‌गाराची शरम वाटू लागली. कारण एक अत्यंत भव्य आणि रमणीय उद्यान मला दिसू लागलं. या उद्यानाची लांबी जवळ जवळ एक-तृतीयांश मैल आहे आणि रुंदी याच्या निम्म्यानं आहे. चिनार झाडांच्या रांगांच्या रांगा उभ्या असून त्यांनी मर्यादित केलेल्या हिरव्यागार तृणांकुरांनी आच्छादलेल्या रेखीव विविधाकृती वाफ्यात अगणित रंगाची फुलझाडं आहेत. ‘ चिनार ’ हे झाड मूळचं प्रशियातलं आहे, व मोगल लोकांनी ते कश्मीरमध्ये आणलं असं म्हणतात. या झाडांचा प्रचंडपणा, त्यांची गर्द छाया, त्यांच्या पानांचा नाजुकपणा आणि तेज या गोष्टींची कल्पना केवळ वर्णनानं येणं शक्य नाही. तुला इतकंच सांगतो की पर्शियन भाषेत सुंदर स्त्रीच्या करपल्लवाला चिनार झाडाच्या पल्लवाची उपमा देतात. असे शतसहस्र कोमल चिनारपल्लव वाऱ्यावर डुलत असलेले त्या विस्तीर्ण बगीच्यात मला दिसले आणि वृक्षलतांच्या आणि सुगंधी फुलांच्या त्या शोभेलाही मागं सारणारी अशी दुसरीही एक शोभा मला दिसली. बागेच्या मधोमध प्रत्येक मजगीत ( म्हणजे मजल्यावर ) एकेक मोठी पुष्करिणी असून चारी मजल्यांवरच्या चारी पुष्करिणी एका पाटानं जोडल्या आहेत आणि या पाटात कारंजांची रांगच्या रांग लागलेली आहे. श्रीनगरच्या उत्तरेस अकरा मैलांवर ‘ हाखान ’ ( हखन ) नावाचा जो मोठा तलाव आहे, त्यातलं पाणी या बागेत आणून खेळविलं आहे. वरच्या पुष्करिणीतून खालच्या पुष्करिणीत अशा प्रकारे पाणी पडत असतं आणि अखेर दल तलावात जात असतं. चौथ्या मजगीवर पासष्ट फूट लांब आणि रुंद असा चबुतरा असून त्यावर दगडी मंडप आहे. मंडपाचे खांब काळ्याभोर संगमरवराचे असून त्यावर सुबक

नक्षीकाम केलेलं आहे. या मंडपात मी येऊन उभा राहिलो आणि प्रवेशद्वाराकडे तोंड करून त्या भव्य उद्यानाचं सौंदर्य बघत राहिलो. माझं मन सव्वातीनशे वर्षं मागं गेलं. ज्या वेळी जहांगीर बादशहानं हे उद्यान तयार करविलं त्या काळात या बागेचं वैभव कशा प्रकारचं असेल, आणि ज्या मंडपात मी या घटकेला उभा आहे त्या मंडपात प्रेमाच्या किती गुजगोष्टी आणि क्वचित् राजकारणाचीही किती खलबतं झाली असतील, आणि या रमणीय पुष्करिणीच्या स्फटिकतुल्य पाण्यात किती लावण्यवती ललनांनी मनसोक्त जल-क्रीडा केली असेल त्याची कल्पनाचित्रं माझ्या नजरेपुढे तरंगू लागली...

"हुजूर, आपल्याला निषात बागेकडे जायला उशीर होतो. इथेच किती वेळ उभे राहणार?"

आहादूचं ते बोलणं ऐकून मी एकदम बेहस्तातून खाली पृथ्वीवर आलो.

'निषात' बागेपाशी माझा 'शिकारा' येऊन पोचला तेव्हा सूर्य अगदी माथ्यावर आला होता. भोवताली नजर टाकली की जिकडे तिकडे छोट्या छोट्या जललहरींचा चमचमाट दिसत होता. वनभोजनाची ही खरी घटका होती म्हणून म्हणा किंवा हे उद्यान लोकांच्या अधिक प्रीतीतलं होतं म्हणून म्हणा, 'शालीमार' पेक्षा या ठिकाणी लोकांची किती तरी अधिक गर्दी उसळलेली दिसली. बागेपुढच्या तलावाच्या काठाशी नौकांची अशी काही झुंबड उडाली होती की तिच्यातून मार्ग काढून 'शिकारा' काठाला लावणं कठीण होतं. पण मी पाहिलं तो आहादूनं नावांच्या किचकट दाटीतून हां हां म्हणता सफाईनं वाट काढली आणि 'शिकारा' किनाऱ्याला लावला. हे पाहून माझ्या मनात आलं, हा सारा सवयीचा खेळ आहे. सायकलीवरून हिंडताना आपण नाही का अशक्य वाटणाऱ्या दाटीतून वाट काढीत? किंवा उत्तर हिंदुस्थानातल्या आग्रा, बनारस अशा शहरांच्या जुन्या भागातल्या अरुंद रस्त्यात रहदारीची एकच 'भीड' लागलेली आपल्याला दिसली की आपल्याला वाटतं हिच्या-तून आपली गाडी जाणार कशी? परंतु गाडीवान ती सहजासहजी आणि वेग कमीही न करता नेतो की नाही? त्याप्रमाणे जलपृष्ठावरील रहदारीची आपल्याला कधी सवय नसते म्हणून नावांची गर्दी आपल्याला एखाद्या अभेद्य चक्रव्यूहासारखी वाटते; परंतु ती ज्यांच्या अंगवळणी पडलेली असते अशा आहादूसारख्या नावाड्यांना त्यात भेगा आणि वाटा चटचट दिसतात व ते आपली नौका सहज लीलेनं पुढं नेतात. 'शिकारा' किनाऱ्याला लागल्यावर मी खाली उतरलो आणि आहादू व त्याचा छोटा मुलगा माझ्याबरोबर निघाले. उद्यानापुढच्या हमरस्त्यावर मोटारींची आणि टांग्यांची एकच थाप लागली होती. मिठाईच्या आणि पुरीभाजीच्या दुकानांची दाटी झाली होती आणि सिगरेट्स व काड्याच्या पेट्या विकणारी छोटी छोटी पोरं इतस्ततः रेंगाळत उंच आवाजात ओरडत होती. सिगरेटचं जे पाकीट कोल्हापूरला सहा आण्यांना मिळायचं ते इथे बारा आणे देऊन मला घ्यावं लागलं. उलट सफरचंदासारखी सुंदर ताजी फळं सहा आणे डझनांनी मिळत होती. पण म्हणून काही सिगारेटस् सोडून

सफरचंद आपण घेत नाही! सिगरेटची तल्लफ भागवायची असेल तर सिगरेटच घ्यायला हवी, नाही का? आहादू मला म्हणाला, " हुजूर, थोडी मिठाई घ्या ना." परंतु दुकानातल्या परातीत मांडून ठेवलेली ती मिठाई माणसांनी खायच्या लायकीची असावी असं काही केल्या मनाला पटेना आणि शिवाय शेखसाहेबांच्या घरून खान्याचा छोटा डबा मला देण्यात आलेला होता. मी आहादूला थोडे पैसे दिले आणि म्हटलं, " तुझ्यासाठी थोडी मिठाई घे."

या बगीच्याचं प्रवेशद्वार शालिमारच्या प्रवेशद्वाराप्रमाणे रस्त्याच्या पातळीवर नाही, उंचावर आहे. चांगल्या दहावीस दगडी पायऱ्या चढून जावं तेव्हा प्रवेशद्वाराची मुख्य कमान लागते. या कमानीतून शेकडो माणसं आत शिरत होती. काही थोडी आपला वनभोजनाचा कार्यक्रम आटोपून बाहेर पडत होती, परंतु आत शिरणाऱ्यांची गर्दी फार होती. हे उद्यान शालिमार इतकंच लांब पण त्याहून अधिक रुंद आहे. शालिमारला चारच मजगी आहेत, पण या बागेला सात आहेत. शेवटची मजगी फारच उंच असून तिच्यामागे अगदी चिकटून पर्वताचे हजारो फूट उंचीचे कडे आहेत. शालिमारमध्ये एकच मंडप आहे, इथे दोन आहेत, एक प्रवेशद्वारापाशी आणि दुसरा अखेरच्या सातव्या मजगीवर. बाकीचा सारा नमुना शालिमारप्रमाणंच आहे. तसेच प्रचंड चिनारवृक्ष, तशाच पुष्पलता, तशीच हिरवळ, तशाच पुष्करिणी आणि तशाच कारंजांच्या रांगाच रांगा! जणू एकाच एंजिनीअरनं दोन्ही बागांची आखणी केली असावी. शालिमारबाग जहांगीर बादशहानं १६१९ मध्ये तयार करवली, आणि निषात नूरजहान राणीचा भाऊ असफशाह यानं नंतर बांधली, आणि हा बगीचा अधिकच नयनमनोहर झालेला पाहून जहांगीर बादशहाला विषाद वाटला, आणि या बागेत येणारं पाणी त्यानं काही दिवस तोडलं होतं असं सांगतात. ही आख्यायिका खरी असो किंवा खोटी असो, एवढं खरं की ही दोन्ही उद्यानं एकाच नमुन्याची असली तरी निशातची सर शालीमारला नाही. म्हणूनच मला वाटतं, वनभोजनाला येणाऱ्या लोकांची खरी प्रचंड गर्दी या उद्यानावर मला दिसत होती. या गर्दीत श्रीमंतांपेक्षाही सामान्य गरीब लोकांची संख्या अधिक होती हे विशेष आहे. बरोबर दोनचार नोकर, खान्याची मोठमोठी भांडी, अशा इतमामानं आलेले श्रीमंत लोक मला दिसत होते, परंतु त्यापेक्षाही अधिक गर्दी सामान्यांची दिसत होती. अंगावर साधे मळके क्वचित् फाटके कपडे, त्यांवर जुनी फाटकी शाल किंवा कश्मीरी घोंगडी लपेटून घेतलेली, अशा वेषात साधे खेडूत किंवा कामकरी लोक आपले मित्र म्हणा किंवा आपली बायकामुलं घेऊन म्हणा आलेले दिसत होते; आणि या मंडळींच्या तोंडावरचा उल्हास आणि हास्य श्रीमंतांइतकंच भासत होतं. क्वचित् खेडूत प्रेमिकांची तरुण जोडीही आढळे, आणि कश्मीरी भाषेत चाललेल्या त्यांच्या गुजगोष्टी मला समजण्यासारख्या नव्हत्या याचं मला वाईट वाटे. उद्यानात जिकडे दृष्टी टाकावी तिकडे माणसांचा गजबजाट दिसत होता. कुणी आस्ते कदम सहल करीत होते, कुणी

कारंजापुढे थबकले होते, कुणी हिरवळीवर धावणाऱ्या अगर पुष्करिणीतलं पाणी एकमेकांवर उडविणाऱ्या किशोरांचा खेळ पाहात होते, कुणी वृक्षांच्या गर्द छायेत तृणांकुरांवर खुशाल झोपले होते, कुणी वनभोजन करीत होते, आणि इकडेतिकडे समूवारवर चहा तयार होत होता. श्रीमंत असो, गरीब असो प्रत्येकाजवळ समूवार असायचाच असा जणू संकेत दिसला. सारं उद्यान आनंदानं आणि समाधानानं बहरून गेलं होतं. पुरुष, स्त्रिया, म्हातारे, मुलं, श्रीमंत, गरीब हे भेद या ठिकाणी घटकाभर नाहीसे झाले होते. सारी माणसं एकाच पातळीवर आली होती. हे रमणीय उद्यान सगळ्यांच्या मालकीचं होतं. या ठिकाणी कोणी किती मजा लुटावी त्याला बंधन नव्हतं.

खरं म्हणजे अशा या सुंदर उद्यानात दहा-पंधरा मित्रांचं टोळकं घेऊन यायला हवं, आणि सबंध दिवस मजेत काढायला हवा. परंतु मी अगदी एकटाच होतो आणि भोवतालचे लोक प्रियजनांशी व मित्रांशी गप्पागोष्टी करीत असलेले पाहून एकटे-पणाची माझी जाणीव मला अधिकच असह्य होत होती. पण त्याला इलाज नव्हता. आणि शिवाय चिनारवृक्षांच्या छायेत हिरवळीवर खुशाल पडून राहण्यात आणि मनाशी विचार करण्यातही मजा होतीच की! कश्मीरमधल्या मुक्कामात पुन्हा एकदा केव्हा तरी या बगीच्यात आलं पाहिजे असा निश्चय करून संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमारास मी तेथून निघालो.

□

सा त

# कारवारच्या जंगलात

## प्र. के. अत्रे

कारवारचे साहित्यसंमेलन शुद्ध साहित्याची चर्चा करावयास मुळीच भरले नव्हते. संयुक्त महाराष्ट्राच्या आघाडीवरची एक मोहीम म्हणूनच ते भरले होते. आणि म्हणून संयुक्त महाराष्ट्राच्या विरुद्ध ज्या ज्या काही कारवाया चाललेल्या आहेत आणि महाराष्ट्राच्या तेजाला नि स्वाभिमानाला दुखवण्याचे जे जे काही उपद्व्याप चाललेले आहेत त्यांना आणि त्यांची तोंडे फोडणे हा या संमेलनाचा महत्त्वाचा उद्देश होता.

संमेलनाची ही राजकीय पार्श्वभूमी मला पहिल्यापासून माहीत होती. आणि म्हणून संयुक्त महाराष्ट्राच्या आघाडीमधला एक शिपाई ह्याच नात्याने मी ह्या साहित्य-संमेलनाला हजर राहावयाचे ठरविले होते. मुंबईतले माझे एक कारवारी मित्र कित्येक महिने आधी मला म्हणाले होते की, “ कारवारला तुम्ही भलत्याच मोसमात जाता आहात. तुम्ही या संमेलनाच्या तारखा बदलून त्या पुढे ढकला ! ” मी त्यांना म्हणालो,

" मे महिना भलताच मोसम कसा? सुट्टीच्या दृष्टीने सर्वांना हीच वेळ सोईस्कर आहे." माझे कारवारी मित्र म्हणाले, " ते खरे. पण या महिन्यात कारवारला विलक्षण उकडते. शिवाय गिरसप्पाचा धबधबा या काळात पाण्याच्या अभावाने अतिशय रोडावतो. डिसेंबर ते फेब्रुवारी ह्याच महिन्यांत गिरसप्पाचे जलसौंदर्य पाहण्यासारखे असते." मी माझ्या मित्रांना हसून म्हणालो, " आम्ही कारवारचे सृष्टिसौंदर्य पाहावयाला जात नसून कारवारच्या मराठी जनतेच्या जीवनात नवीन सौंदर्य निर्माण करावयाला जात आहोत! तेव्हा कारवारात कितीही उष्णता असली किंवा गिरसप्पा धबधब्यात पाण्यांचा कितीही तुटवडा पडलेला असला तरी आम्हांला त्याचे काय?" कारवार पाहण्यापेक्षा कारवार समजून घ्यावयाचा ही माझी मानसिक भूमिका असल्याने बोटीने कारवारला जाण्यापेक्षा मोटरीनेच कारवारला जाण्याचे मी ठरविले. कारण बोटीच्या प्रवासांत पाणी आणि आभाळ ह्यांच्याखेरीज दुसरे काय दिसणार कपाळ? आणि शिवाय तीच ती साहित्यिकांची तोंडे, आणि त्याच त्या गप्पा. त्या तर मला आधी चुकवावयाच्या होत्या. मोटारीने गेले म्हणजे जाता जाता कारवारचे अवाढव्य जंगल पहावयाला मिळेल. ह्या एका गोष्टीचे बोटीच्या प्रवासापेक्षा मला जास्त आकर्षण वाटत होते.

म्हणून संमेलनाच्या आधी दोन दिवस पुण्याहून संध्याकाळच्या सुमारास श्री. आप्पा पेंडसे, प्रा. वसंत बापट नि श्री. शशिकला आळंदकर ह्यांच्यासमवेत मी माझ्या मोटरीतून कारवारला जावयास निघालो. गाडी लहानशी असली तरी मजबूत होती. आणि गाडीत आम्ही फक्त चौघे जण होतो. त्यामुळे बसण्याची कुणालाही अडचण नव्हती. दीड तपाच्या गाडी हाकण्याच्या अनुभवाने कुशल आणि स्थिर झालेल्या माझ्या हातात गाडीचे ' चाक ' होते. त्यामुळे माझ्या सोबत्यांना मुळीच अडचण नव्हती. एखाद्या शिंपेत बसून सागर ओलांडायचा जसा एखाद्याने प्रयत्न करावा, त्याप्रमाणे चार सिलिंडरच्या लहानशा मोटरीतून कारवारचा तीनशे चारशे मैलांचा प्रवास करण्याचा माझा तो प्रयत्न होता. पण असे पराक्रम पूर्वी माझ्या मोटारीने केले असल्याने हा विक्रम पुन्हा ती ह्या वेळी करणार नाही अशी शंकादेखील माझ्या मनाला शिवली नाही. रात्रीच्या अंधारात गप्पागोष्टी करीत हसत खिदळत सातारा आम्ही केव्हा ओलांडला आणि कऱ्हाडला केव्हा येऊन पोहोचलो हे आमच्या लक्षातही आले नाही. कऱ्हाडला उपाहार करून आणि थोडीशी विश्रांती घेऊन आम्ही निघालो. कोल्हापूरला पोहोचेपर्यंत रात्रीचे चांगले दोन वाजून गेले होते. ' राजाराम टॉकीज ' च्या प्रशस्त आणि हवाशीर ग्यालरीत आम्ही आमच्या पथाऱ्या टाकल्या व झोपी गेलो. दुसरे दिवशी सकाळी साडेआठच्या सुमारास आम्ही बेळगावला निघालो. पुण्याहून निघताना गाडीत मी सहा ग्यालन पेट्रोल टाकले होते. त्यांतले दोन सव्वादोन ग्यालन शिल्लकच होते. म्हणजे पुणे ते कोल्हापूरचा एकशे-पंचेचाळीस मैलांचा प्रवास माझ्या गाडीने पावणेचार ग्यालनात केलेला होता. पेट्रोल टाकण्यासाठी कोल्हापूरला

पंपावर आम्ही जो जातो आहोत तो पेट्रोलचा कोल्हापूरला दुष्काळ पडला असल्याचे आम्हांला समजले. कऱ्हाडपर्यंत पेट्रोल मुबलक मिळते. आणि कोल्हापूरला मात्र ते मिळत नाही ह्याचे कारण काय असावे? एका महिन्यापूर्वी मी कोल्हापूरला मोटारने आलो असताना असाच मला अनुभव आला होता. त्यावरून पेट्रोलच्या पुरवठ्याबाबत कोल्हापुरात काही तरी 'गडबड' होत असावी असे माझे निश्चित मत झाले आहे. 'दुपारपर्यंत थांबाल तर एखादे वेळी पेट्रोल मिळण्याचा संभव आहे' असे पंपवाल्याने सांगितले, तेव्हा गाडीत शिल्लक असलेल्या दोन सव्वादोन ग्यालनवर आपण बेळगाव-पर्यंतचा सत्तर एकाहत्तर मैलांचा प्रवास सहज करू शकू अशा विचाराने पेट्रोलसाठी कोल्हापुरात अधिक वेळ न थांबता मी तडक बेळगावच्या रस्त्याने गाडी पिटाळली.

अकराच्या सुमारास आम्ही बेळगावला पोहोचलो. कोल्हापूरच्या पेट्रोल दुष्काळाची झळ बेळगावलादेखील लागली होती. पण बेळगावला प्रत्येक गाडीला निदान दोन दोन गॅलन पेट्रोल तरी मिळत होते. तथापि आमच्या एका मित्राने आम्हांला सहा गॅलन पेट्रोल मिळवून दिल्याने पुढील प्रवासाबाबतची आमची चिंता मिटली. बेळगावात डॉ. केशवराव साठे ह्यांच्याकडेच नेहमीप्रमाणे आम्ही मुक्काम केला. १९२९ साली बेळगावात पहिल्यांदा जे साहित्य-संमेलन भरले त्याचे सूत्रचालक डॉ. केशवराव साठे हेच होते. नाट्याबद्दलचे आणि साहित्याबद्दलचे त्यांचे प्रेम सर्वविश्रुतच आहे. डॉ. साठे यांच्या घरी हापूसच्या आंबरसाचे सुग्रास भोजन अगदी आकंठ करून आम्ही पावणे-तीनच्या सुमारास बेळगाव सोडले. पुण्यापासून कोल्हापूर जेवढे दूर तेवढेच बेळगावहून कारवार दूर आहे. बेळगावहून कारवारला कोणत्या मार्गाने जावयाचे यासंबंधाने माझ्या मनात संदेह होता. माझ्याजवळ मोटारप्रवासाचा जो नकाशा होता त्याच्यात धारवाड अन् हुबळी मार्गाने जावयाचा रस्ता अधिक चांगला दाखविला होता. पण डॉ. केशवराव साठे ह्यांनी आम्हांला अळणापूर-यल्लापूर मार्गाने जावयास सांगितले. त्या मार्गाने गेल्यास वीस-पंचवीस मैल वाचतात. एवढेच नव्हे तर तो रस्ताही अतिशय उत्तम आहे. स्टेट ट्रान्सपोर्टच्या मोटारीही त्याच मार्गाने जातात. हे कळल्यानंतर मग धारवाडकडून जाण्याचा विचार मी सोडूनच दिला.

बेळगाव सोडून आपण खानापूरकडे जाऊ लागलो की वातावरणात एकदम बदल झाल्याचे आपल्या लक्षात येते. दोन्ही बाजूंना हिरव्यागार उंच झाडांच्या रांगा दाटीवाटीने आपल्या सत्कारासाठी उभ्या राहिलेल्या आढळून येतात आणि त्यांचे शीतल आणि टवटवीत पर्णसंभार बघून आपली अंतःकरणे प्रफुल्लित होतात. ह्या झाडांमध्ये लिंब, चिंच, जांभूळ आणि आंबा ह्यांचे प्रमाण अधिक आहे. आंब्याची झाडे तर हिरव्या आणि पाड आलेल्या आम्रफलांनी अगदी भरी भरून गेलेली होती. गळून पडलेल्या आंब्यांचे सडे ठिकठिकाणी पडलेले होते आणि गुराख्यांची पोरे झाडांच्या सावलीत गळाठ्याचे आंबे चोखीत बसलेली मधून मधून दिसत होती. रस्त्या-वरच्या झाडांवर आलेल्या या असंख्य आंब्यांचे पुढे काय होत असावे ह्याचा हिशोब

मनातल्या मनात करीत मी गाडी हाकीत होतो. करवंदीच्या जाळ्याही एकसारख्या दुतर्फा लागून राहिलेल्या होत्या. काही वेळाने बांबूंच्या बेटाचे उपवन लागले. देशावर क्वचित कोठे कळकाची बेटे पाहावयाला मिळतात. पण हे कळक बहुधा पर्णहीन आणि वाळलेल्या पिवळ्या रंगाचे असतात आणि त्यामुळे ती झाडे दरिद्री आणि उडाणटप्पू वाटतात. पण खानापूरच्या रस्त्यावरील बाबूंच्या झाडांची लसलशीत हिरवी कान्ती बघून बुबुळांना असे काही विसावल्यासारखे वाटते की, सांगता सोय नाही. खाली लाल आणि मऊ मातीचा रस्ता आणि बाजूला हिरवीगार वनराजी अशा सुरम्य वातावरणातून झपाट्याने मोटार हाकीत असताना एखाद्या रंगीत चित्रपटाच्या सृष्टीतूनच आपण जणू काही चाललो आहोत असा माझ्या मनाला एकसारखा भास होत होता. अधून-मधून आम्हांला पिवळ्या घोसदार फुलांनी बहरलेली ' लॅबर्नम 'ची झाडेही पाहावयाला मिळाली. एखाददुसरे लाल गुलमोहराचे झाडही मधून मधून डोकावत होते. पण ह्या भागात एकंदर गुलमोहरांची झाडे कमीच. फक्त हल्याळ गावात आम्हाला गुलमोहराची लालभडक राई पाहायला सापडली.

हल्याळला आम्ही साडेचार-पाचच्या सुमारास पोहोचलो. हल्याळच्या परिसरात क्षणभर गाडी उभी करून मराठी रंगभूमी एक वेळ ज्यांनी आपल्या पल्लेदार गायनाने गाजवली त्या कै. दत्तोपंत हल्याळकरांच्या स्मृतीला मनातल्या मनात आम्ही अभिवादन केले. दत्तोपंत हल्याळकर ह्यांचे काम माझ्या लहानपणी मी एकदा का दोनदाच पाहिल्याचे मला आठवते. पण त्यांची भव्य नि देखणी मूर्ती आणि भरदार अन् चढा आवाज अद्यापिही माझ्या स्मरणात आहे. दत्तोपंत हल्याळकर ही कारवारने मराठी रंगभूमीला दिलेली फारच बहुमोल देणगी होती ह्यात काही संशय नाही. केशवराव भोसले आणि दीनानाथ मंगेशकर ह्यांच्या पराक्रमी आणि धडाडीच्या गायन-परंपरेचे जनक दत्तोपंत हल्याळकरच होते असे म्हटले तर ते फारसे चुकीचे होऊ नये. हल्याळहून निघण्यापूर्वी तेथे थंडगार पेय मिळते का ह्याची चौकशी करू लागलो. तेव्हा तेथील सर्व मंडळी उत्तम तऱ्हेने मराठी भाषा बोलत असलेली पाहून थंड पेय न मिळाल्याचे दुःख आम्हांला यत्किंचितही जाणवले नाही. रस्त्यावरच्या मैलाच्या दगडावरील कानडी अक्षरांची नि आकड्यांची कडबोळी वाचून विषण्ण झालेल्या आमच्या मनाला हल्याळचे संपूर्ण मराठी वातावरण बघून अतिशय संतोष झाला व त्या आनंदी मनःस्थितीमध्ये आम्ही हल्याळ सोडून पुढे निघालो.

हल्याळ सोडले आणि आमच्या प्रवासातील अत्यंत रोमहर्षक खंडाला प्रारंभ झाला. ज्या निबिड आणि गगनचुंबी जंगलाबद्दल कारवार प्रसिद्ध आहे त्या जंगलाचा प्रारंभ हल्याळपासून होतो. येथपासून तो सरळ कारवारपर्यंत नव्वद मैल एकसारखे प्रचंड जंगल लागून राहिले आहे. हे जंगल आलटून पालटून सागाचे आणि बांबूचे आहे. कोणते जंगल कोठे संपते आणि कोठून सुरू होते ह्याचा अजमास लागत नाही. ह्याखेरीज नाना जातींचे अनेक उत्तुंग वृक्ष ह्या जंगलात गर्दी करून राहिलेले आहेत

ते निराळेच. बांबूचे जंगल सुरू झाले की मैलचे मैल बांबूच्या बेटांखेरीज दुसरे काहीही आढळत नाही. एवढे बांबूचे बियाणे या ठिकाणी पेरले कुणी आणि त्यांची एवढी अवाढव्य वाढ या ठिकाणी झाली तरी कधी ह्याच्या विचाराने मस्तक अगदी गिरगिरू लागते. ह्या जंगलाचे दुसरे एक वैशिष्ट्य असे की, बारीकसारीक झुडुपांना, वेलींना किंवा वनस्पतींना ह्या ठिकाणी उगवावयाला वाव नसल्याने एवढा प्रचंड वृक्षसमूह तेथे उगवलेला असूनही त्यांची विशेष गुंतागुंत झालेली कुठेही दिसत नाही. वृक्षांची उत्तुंग मस्तके शे-दीडशे फूट वर एकमेकांत गुंतलेली असली तरी त्या मानाने त्यांचा तळचा भाग पुष्कळच विरळ आणि मोकळा दिसतो. सागांचे जंगल सुरू झाले आणि हजारो सरळचे सरळ सोट लष्करी शिपायांच्या पलटणीप्रमाणे ‘ सावधान ’ पवित्र्यात उभे असलेले जिकडे तिकडे दिसू लागले म्हणजे डोळे अगदी भांबावून जातात आणि छातीमध्ये कसल्या तरी भयाचे दडपण पडल्यासारखे वाटते. असे विलक्षण दृश्य इतरत्र क्वचितच कोठे पाहावयाला मिळेल असे मला वाटते. कितीही मैल रस्ता तोडला तरी हे सागांचे जंगल संपता संपत नाही आणि मन भीतीने अधिकच गांगरू लागते. कारवारच्या जंगलात हत्ती आणि वाघ पुष्कळ आहेत आणि मोठमोठे शिकारी ह्या जंगलात त्यांची शिकार करण्यासाठी येतात असे मी पूर्वी ऐकले होते. म्हणून वाटेत जर एखादा वाघ आडवा गेला किंवा हत्ती सामोरा आला तर आपण काय करावयाचे ह्याचा विचार मोटर हाकता हाकता माझ्या अंतर्मनात चालू होता. मोटार थांबवून स्वस्थपणे बसले तर हत्ती आपल्या पायाने आणि सोंडेने मोटारीचा एका क्षणात चुराडा केल्यावाचून सोडणार नाही हे मी ओळखून होतो. बरे, वाघापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी मोटारीतून बाहेर पडून एखाद्या झाडावर चढून बसावे म्हणावे तर ‘ ये, चढ माझ्यावर ’ असे ते सागाचे सरळ सोट जणू काही उपहासपूर्वक आम्हांला आव्हानच देताहेत असा मला भास झाला. सुदैवाने त्या जंगलातून प्रवास करताना आम्हांला एकही हिंस्र प्राणी भेटला नाही किंवा दिसलासुद्धा नाही. पक्ष्यांचीही त्या जंगलातली अनुपस्थिती आम्हांला विशेष जाणवली. एवढ्या मोठ्या जंगलात पक्षी कोठे दिसू नयेत ह्याचे आम्हांला भारी आश्चर्य वाटले. कोठे पाखरांची किलबिल नाही की जनावरांची कुजबूज नाही. वाऱ्याची हालचाल नाही की पानांची सळसळ नाही. असे जंगलात मैलोमैल पसरलेले निःस्तब्ध व अंधुक वातावरण बघून मन पुढे पुढे अतिशय उदास आणि भयभीत होऊ लागते. दहा-दहा पंधरा-पंधरा मैल गेले तरी वाटेत एखादे माणूस किंवा वाहनसुद्धा दृष्टीस पडत नाही. नाही म्हणायला दाढी वाढलेले आणि भगवी वस्त्रे परिधान केलेले चार-दोन भिकारी ‘ साधू ’ मात्र आम्हांला वाटेत भेटले. जंगलाच्या पार्श्वभूमीवर ते आम्हांला एखाद्या पौराणिक चित्रपटातील ऋषींप्रमाणे भासले.

ह्या जंगलाच्या भयानकतेमध्ये भर घालणारी दुसरी गोष्ट म्हणजे दुतर्फा लागून राहिलेली उंच उंच मातीची वारुळे. ही वारुळे दहा-दहा पंधरा-पंधरा फुटांच्या अंतरा-

वर रस्त्याच्या दोन्ही बाजूंना 'उगवलेली' कित्येक मैलचे मैल आढळून येतात. त्यांपैकी पुष्कळ वारुळांची उंची दहा-दहा बारा-बारा फूटसुद्धा असेल. ही वारुळे तळाला रुंद व वर निमूळती असून त्यांना चार-चार पाच-पाच शिखरे असतात. एवढी असंख्य वारुळे ह्या जंगलात का म्हणून आढळून यावीत ह्याचा उगम काही केल्या आम्हाला होईना ! मात्र वारुळांच्या पोटात काय असावे याचा नुसता विचारही करण्याचे धैर्य आमच्यापैकी कोणाला होईना ! एखाद्या वारुळाशी गाडी थांबवून त्यांच्यात डोकावून पाहावे असा क्षणमात्र एकदाच माझ्या मनात विचार आला होता. पण त्याच क्षणी माझ्या पायांपासून डोक्यापर्यंत शहारा चमकून गेला. मी मनात म्हटले, "नको ! हा अतिप्रसंग एखादे वेळी असा अंगलट यायचा की, मोटार असूनही पळता भुई थोडी व्हायची !" जंगलात माणसांची किंवा वाहनांची रहदारी जवळ जवळ नाहीच असे म्हटले तरी चालेल. बैलगाड्या तर ह्या जंगलातून जाणेच अशक्य आहे. पण मोटारगाड्याही दिवसातून चार-दोनपेक्षा अधिक जात असतील असे वाटत नाही. असे असूनही रस्ता मात्र उत्तम स्थितीमध्ये ठेवण्यात आलेला आहे, ह्यात काही शंका नाही. तथापि, भोवतालच्या भेसूर वातावरणामुळे प्रवासाची लांबण पुढे पुढे इतकी कंटाळवाणी वाटू लागली की काही विचारू नका. एके ठिकाणी जंगल कापणाऱ्या दहा-पंधरा लोकांचा तळ पडलेला दिसला. तो पाहून जणू काही आपण माणसातच आलो असे वाटून मनाला अगदी हायसे वाटले. तेथे उजव्या बाजूला एक लहानशी दगडी विहीर दिसली. तिच्यातून एक माणूस पाणी काढीत होता. ते पाहून मी एकदम गाडी थांबविली. आम्हा सगळ्यांनाच तहाना लागल्या होत्या. पण जंगल ओलांडण्याच्या घाईत त्याची कोणालाच आठवण नव्हती. विहीर चांगली पाच-पन्नास फूट खोल होती. पाणी मात्र अतिशय गार आणि चवदार होते. पाणी पिऊन परत गाडीकडे वळतो आहो तोच गाडीच्या मागल्या बाजूस असलेल्या पेट्रोलच्या टाकीला भोक पडलेले असून त्याच्यातून पेट्रोलची धार गळते आहे असे दिसले. ते पाहून आमच्या तोंडचे तर पाणीच पळाले. घाईघाईने सामानातून साबण काढून आम्ही ते भोक कसेबसे बंद केले. तथापि, मागल्या एका चाकात हवा कमी आहे असे आढळून आले. नवीन चाक बसवायचे म्हणजे वेळ लागणार. अन् संध्याकाळ तर हळूहळू जवळ येऊ लागली होती. तेव्हा आधी जंगलातून कसेबसे बाहेर तर पडू या, मग पुढे काय करायचे ते पाहू, अशा विचाराने मी गाडी जरा जोरानेच काढली. पण कसचे काय अन् कसचे काय, अर्ध्या तासाच्या आतच गाडीचे मागले चाक एकदम खाली बसले व गाडी मला थांबवावी लागली.

ह्या ठिकाणी जंगलाचे स्वरूप एवढे रौद्र होते की ते पाहून आमच्या छातीत धस्सच झाले. एक भयंकर वृक्षाचा सोट आमच्या डोक्यावर आडवा आला होता. आणि त्याच्यावर अशी काही चमत्कारिक बांडगुळे उगवली होती की त्याला काय नाव द्यावे हेच आम्हांला कळेना. अंधार वाढू लागला होता. येथे जर का आता फार वेळ

थांबावे लागले तर खात्रीने एखादा वाघ किंवा हत्ती बाहेर आल्यावाचून आणि आमचा चट्टामट्टा केल्यावाचून राहात नाही अशी मनाला धुगधुग वाटू लागली. नवीन चाक बसवायला तशी पाच-दहाच मिनिटे लागली. पण तेवढ्यात आम्ही इतके घामाघूम झालो की काही विचारू नका. तेथून यल्लापुर अवघे सहाच मैल होते. आणि गाडी मी अगदी वेगाने काढली. पण त्या मनःस्थितीत ते सहा मैलांचे अंतर संपता संपेना असे मला वाटले. यल्लापूरला पोहोचलो तेव्हा तिनी सांजा झाल्या होत्या. एका सायकल-वाल्याच्या दुकानातच पंक्चर झालेल्या टायरमध्ये नवीन ट्यूब टाकून हवा भरून घेतली. एवढे होता होता पाऊण तास होऊन गेला. यल्लापूर सोडले तेव्हा चांगलाच अंधार पडला होता. यल्लापूरपासून सहा मैलावर कारवारचा घाट लागतो. घाट सहा-सात मैल लांब आहे. तो संपल्यानंतर पुढे कारवार सत्तेचाळीस-अठ्ठेचाळीस मैल लांब राहते. कारवारचा घाट कसा आहे याची मला कल्पना नव्हती. म्हणून तो घाट दिवसा उजेडी जर ओलांडता आला असता तर बरे झाले असते. एवढ्यासाठी माझी घाई चालली होती. पण मध्यंतरी जवळजवळ तास दीड तास मोटारदुरुस्तीने घेतल्यामुळे अगदी अंधारातच घाटातून जाण्याची पाळी आली.

यल्लापूरपासून पूर्वीपेक्षाही निराळ्या स्वरूपाचे उत्तुंग आणि निबिड जंगल सुरू होते. ह्या जंगलात साग आणि बांबू ही झाडे नसून इतर नाना तऱ्हेचे प्रदीर्घ शाखांचे आणि दाट पर्णांचे वृक्ष लागून राहिले आहेत. जिकडे पाहावे तिकडे उंच डोंगराच्या रांगाच रांगा आणि झाडेच झाडे ! रात्रीच्या अंधारात हा देखावा किती रमणीय आणि किती भयाण वाटत होता याची कल्पनाच केलेली बरी. घाट लागला तेव्हा तर जणू काही आपण झाडांच्या अखंड बोगद्यातूनच जात आहोत असेच वाटू लागले. दिव्यांच्या प्रकाशात समोर दहा-वीस फूट जमिनीच्या पट्ट्याखेरीज भोवतालचे काहीएक मला दिसत नव्हते. किर्र झाडी आणि कुट्ट अंधार ह्यांच्या प्रचंड भिंती जणू काही रस्त्याच्या दोन्ही बाजूंना कुणी बांधल्या होत्या. आमच्या गप्पा, गाणी, बडबड तोंडातल्या तोंडात विरून गेली आणि सारे प्राण डोळ्यांत जमा होऊन समोरचा रस्ता काय तो न्याहाळू लागले. घाटाचा उतार तसा काही मोठा वाटला नाही. पण वळणे मात्र खूप होती. कधी डाव्या बाजूला तर कधी उजव्या बाजूला खोल दऱ्या असाव्यात अशी अस्पष्ट जाणीव मला होत होती. पण तिकडे चुकूनदेखील मी पाहिले नाही. चाक दोन्ही हातांत घट्ट धरून आणि ब्रेकवर स्थिरपणे पाय ठेवून एखाद्या यांत्रिक पुतळ्याप्रमाणे धीरे धीरे मी गाडी हाकीत होतो. घाट संपून सखल भाग कधी सुरू झाला ते कळलेच नाही. कारण येथून पुढे शेवट-पर्यंतचा सर्वच रस्ता डोंगराच्या रांगांतून चढउतारानेच गेलेला आहे. अंधारातून गाडी हाकीत असताना आपण एखाद्या बिकट घाटातूनच गाडी हाकतो आहोत असेच वाटते. एका बाजूला दऱ्या किंवा डोंगरांच्या रांगा ह्या सारख्या असतातच. या बिकट आणि भेसूर प्रवासाची भीषणता घाट संपल्यामुळे कमी होण्याऐवजी आजूबाजूला लागलेल्या लालभडक वणव्यांमुळे अधिकच वाढली. एकामागून एक असे चांगले सात-आठ वणवे

आम्ही मोजले. रात्रीच्या काळ्याकुट्ट अंधारात ह्या वणव्यांचा लाल-पिवळसर भडका इतका देदीप्यमान दिसतो म्हणून सांगू ! त्यांच्या प्रकाशावर डोळे मुळी ठरतच नाहीत. काही वणवे तर डोंगरांच्या शिखरांवर पेटले असल्यामुळे ज्वालामुखीसारखे दिसत होते. डोंगरांच्या, वृक्षांच्या, काळोखाच्या आणि वणव्यांच्या त्या भयानक प्रदेशातून लुकलुक दिव्यांची आमची लहानशी गाडी एखाद्या काजव्याप्रमाणे हळूहळू वळणे घेत क्षीणपणे चाललेली पाहून त्या अंधारात दडलेली पिशाच्चे आणि बागुल मनातल्या मनात हसत असले पाहिजेत, असा सहजच माझ्या मनात विचार आला.

पिशाच्चाची आठवण होताच याच भागात कित्येक वर्षांपूर्वी झालेल्या एका भयंकर अपघाताची आठवण एकदम मला झाली. पुण्यातील एक नामांकित वकील आपल्या जावयाला भेटण्यासाठी ह्याच जंगलातून चालले होते. ते मोटारीच्या मागच्या बाजूस बसले होते. आणि त्यांच्या पाठीमागून सागवानी सोट घेऊन येणारी एक मोठी लॉरी येत होती. काही कारणामुळे त्या वकिलाची मोटार एकदम वाटेत थांबली. पण मागून येणारी लॉरी काही त्याच अंतराने थांबली नाही. त्याचा परिणाम असा झाला की त्या लॉरीतला एक सागवानी सोट सरळ त्या वकिलाच्या डोक्यात घुसला आणि सुईच्या नेढ्याप्रमाणे त्यांच्या मस्तकाला भले मोठे आरपार भोक पडले. जगात पुष्कळांना पुष्कळ तऱ्हेने मृत्यू येत असेल. पण अशा तऱ्हेचा भयंकर मृत्यू क्वचितच कोणाला आलेला असेल. सबंध तोंडाचे नेढे झालेले त्या पुण्याच्या वकिलाचे पिशाच्च कारवारच्या जंगलांतून एखादेवेळी चाचपडत चाचपडत भटकत असण्याचा संभव आहे,अशी एकदम माझ्या मनात कल्पना आली.आणि त्या पिशाच्चाने मला ओळखून जर का वाटेत अडवले अन् हंबरडा फोडून सांगितले की, ‘ अहो, मला परत पुण्याला माझ्या घरी नेऊन सोडाल ना हो ! ’ तर मग माझी काय स्थिती होईल, ह्या विचाराने माझ्या सर्वांगाला दरदरून घाम सुटला आणि मस्तक इतके सुन्न होऊन गेले की मी गाडी हाकतो आहे ह्याचा काही काळ मला विसरच पडला. इतक्यात डाव्या बाजूकडून ‘ घण घण घण ’ असा घंटांचा ध्वनी ऐकू आला. होय, त्या घंटाच होत्या. देवळातल्या घंटा होत्या त्या. त्यांचा तो मंजुळ आवाज ऐकून केवढा धीर आला म्हणता मला ! पिशाच्चाच्या सृष्टीतून एकदम माणसांच्या नव्हे— देवाच्या— सृष्टीत आल्यासारखे मला वाटले. मी त्या देवळापुढे एकदम गाडी उभी केली.

देऊळ कसले ते ? एका लहानशा झोपडीतल्या घरालाच देवळाचे स्वरूप दिलेले होते. मिणमिणत्या दिव्याच्या प्रकाशात एक लहानसा दाढीवाला बैरागी जोराजोराने घंटा वाजवून आजूबाजूच्या काळ्याकभिन्न अवकाशात झोपलेल्या अणुरेणूंना जणू काही हालवून हालवून जागा करीत होता. त्यामुळे भोवतालच्या वातावरणात एक प्रकारचे गंभीर मांगल्य निर्माण झाले होते. निर्मनुष्य आणि निःस्तब्ध अरण्यात देवळाच्या घंटांचे, नगाऱ्यांचे किंवा सनईचे स्वर एकट्या-दुकट्या प्रवाशाच्या अंतःकरणात धीराची नि सामर्थ्याची केवढी उदात्त भावना निर्माण करीत असतात ह्याची त्या वेळी

मला कल्पना आली. तेथून पुढच्या प्रवासात मात्र भीतीची भावना पार नाहीशी झाली. मैलचे मैल आम्ही रस्ता कापीत चाललो होतो. पण माणसांच्या वस्तीच्या निशाण्या आजूबाजूला कुठेच दिसत नव्हत्या, ह्याचे मात्र आम्हांला आश्चर्य वाटत होते. लांबून कुठून तरी एखाद्या झोपडीतून अंधुक प्रकाशाचा एखादा तरी किरण दृष्टीस पडावा ना ? पण तेही नाही. या प्रदेशात मनुष्य नावाचा प्राणी राहात तरी असावा का, अशीच आम्हांला पुढे पुढे शंका येऊ लागली. नाही म्हणावे, तर अधूनमधून एखाद्या रस्त्याची दुरुस्ती किंवा नव्या पुलाची बांधणी चाललेली आम्हांला आढळत होती. त्यावरून, दिवसा केव्हा तरी माणसे या भागात येऊन जात असावीत, अशी कल्पना होत होती.

कारवारपासून सतरा-अठरा मैलांच्या अंतरावर आल्यानंतर डाव्या बाजूला अंकोल्याकडे रस्ता फुटतो आणि उजव्या बाजूला कारवारकडे रस्ता जातो. त्या वळणावर अंधारात एक पोलिस हातात विजेची बत्ती घेऊन उभा होता. त्याने आपल्या बत्तीचा प्रकाश आमच्या गाडीवर टाकला. तेव्हा मी गाडी उभी करून ' काय पाहिजे ? ' असे खड्या आवाजात त्याला विचारले. तेव्हा तो बिचारा भेदरून ' काही नाही ' असे अर्धवट तोंडातल्या तोंडात पुटपुटला. मला त्याचे हसूच आले.

आता कारवार जवळ आले अशा भावनेने मी अधिक वेगाने गाडी हाकू लागलो, अन् कारवारची एखाददुसरी खूण तरी लांबून चमकताना आढळेल म्हणून समोरच्या अंधारात कुठे डोळे ताणून ताणून पाहू लागलो. पण कारवार कसले खट्याळ, ते अंधारात कुठे दडून बसले होते कोणास ठाऊक ! वाटेत कुठे कुठे दोन चार शेतकरी नि त्यांच्या बायका गवताचे जळते पलिते हातात घेऊन न बोलता चाललेले भेटू लागले. एका टेकाडावरून बाजूला खाली समुद्र दिसला व त्याच्या किनाऱ्याजवळ दहावीस दिवे चमकताना आढळले, तेव्हा तेच कारवार असावे अशा समजुतीने आम्हांला केवढा आनंद झाला म्हणता ! पण जरा पुढे जातो तो ह्या काल्पनिक कारवारने एकदम आम्हांला झुकांडी दिली आणि अंधारात कुठे तरी ते गुडुप होऊन गेले. ' कारवार एक मैल ' असे दगडावर वाचले तरी ते आम्हांला दिसेना, तेव्हा मात्र आम्ही आश्चर्यचकित झालो. रात्रीच्या वेळी एखाद्या गावाजवळ आपण आलो म्हणजे सर्वसामान्यपणे आपल्याला ज्या खुणा दिसतात त्यांपैकी एकही खूण कारवारच्या हद्दीत प्रवेश केला तरी आपल्याला दिसत नाही. डोंगराचा उतार लागला. सुंदर डांबरी रस्ता सुरू झाला. आणि बैतखोलच्या द्वारातून आम्ही कारवारात प्रवेश केला.

डाव्या बाजूला लांबलचक समुद्रकिनारा पसरलेला होता. त्यावरून वाहणाऱ्या थंडगार वाऱ्यात सुरूच्या झाडांची दुलई पायांवर ओढून डोंगरपायथ्याशी चिमुकले कारवार हातपाय दुमडून शांतपणे झोपी गेले होते. चहूंकडे अंधार पडलेला होता. चार-दोन दिवे इथे-तिथे लुकलुकत होते, व डाव्या बाजूला समुद्रात असलेल्या देवगडच्या दीपस्तंभाचा प्रकाशझोत लख्कन् अधूनमधून गिरकी मारून कारवारची राखण करीत होता. दीर्घ प्रवासाच्या श्रमाने आणि प्रवासामधील निरनिराळ्या भावनांच्या ओढा-

ताणीमुळे आम्ही अतिशय दमून गेलो होतो. पण सागराच्या आणि डोंगराच्या मांडीवर शांतपणे झोपलेल्या बाळसेदार कारवारचे अंधारामध्ये आम्हांला जे अस्पष्ट अन् अंधुक दर्शन झाले ते पाहून आम्ही आपले श्रम आणि वेदना काही काल तरी विसरून गेलो.

□

आठ

# वाराणस्यां जननमरणम्

## रा. भि. जोशी

वाराणसीत जन्म आणि मरण मिळणे हे फार पुण्यकारक आहे हे सर्वांना माहीत आहे. आता वाराणसीत जन्माला येणे हे काही आपल्या हाती नसते, पण मरणे असते. हे पुण्य लाभावे म्हणून असंख्य वृद्ध स्त्री-पुरुष वाराणसीत येऊन राहतात. कलकत्ता जवळ असल्यामुळे असेल किंवा धर्मश्रद्धा अधिक असल्यामुळे असेल पण वाराणसीतल्या मरणेच्छू वृद्धांत बंगाल्यांची संख्या फार दिसते एवढे खरे. बंगाली टोला या नावाचा एक स्वतंत्र मोहल्लाच वाराणसीत आहे. तशी वाराणसीत महाराष्ट्रीयांची विशेषतः ब्राह्मणांची संख्याही बरीच आहे. पण ते मुमुर्षू किंवा मुमुक्षू म्हणून तिथे जाऊन राहिलेले नाहीत. त्यांतले कोणी अध्ययन-अध्यापन करण्यासाठी राहिलेले आहेत. कोणी व्यापार व्यवसायात आहेत. कोणी आपापल्या यजमानांचे क्षेत्रोपाध्ये आहेत. कोणी अन्नछत्रे, धर्मशाळांचे व्यवस्थापक आहेत. मी वाराणसीला गेलो तो वाराणसीत मला मृत्यू यावा आणि जन्म-मरणाच्या फेऱ्यातून आपण कायमचे सुटावे म्हणून गेलो नव्हतो. आता वाराणसीला गेलो एवढ्यामुळेच मला मोक्ष मिळणार असेल तर गोष्ट वेगळी. मी गेलो होतो ते लक्षावधी लोक शतकानुशतके भक्तिभावाने जिथे जातात ते क्षेत्र आहे कसे, ते पाहावे म्हणून.

शिंद्यांच्या घाटावर मी गंगेत स्नानासाठी उतरलो होतो आणि समोर पाहात होतो. गंगेच्या घाटावर असल्यामुळे साहाजिकच मला पंडितराज जगन्नाथांची आठवण झाली. आणि " इयं सुस्तनी मस्तकन्यस्तकुंभा । लवङ्गी कुरङ्गी दृगङ्गीकरोतु ॥ " ह्या ओळी माझ्या मनात उभ्या राहिल्या. पहिल्या ओळीतल्या कठोर व्यंजनांचा अनुप्रास आणि दुसऱ्या ओळीतल्या अत्यंत मृदू व्यंजनांचा अनुप्रास, त्यामधला विरोध आणि पहिल्या ओळीतल्या शब्दांनी चित्रित झालेली लवङ्गीची आकृती; तसेच त्या दोन ओळींनी शब्दांचा नाद, त्यांचा अर्थ आणि एक चित्र ही तीनही साधणाऱ्या त्या पंडितराजांचे मी मनातल्या मनात कौतुक करीत होतो. त्याच वेळी समोर गंगेच्या पलीकडल्या तीरावर एका अर्धवट जळलेल्या प्रेतावर बसलेले कावळे त्यात चोची

खुपसून मासाचे लचके तोंडीत होते. गंगाष्टकामधल्या "काकैर्निष्कुषितं श्वभिःकवलितं" या वर्णनाचे ते प्रात्यक्षिकच होते. फक्त ते मी माझे "स्वं वपुः" पाहात नव्हतो एवढेच मला समाधान होते.

माझ्या मनातला हा सगळा विचार-कल्पनांचा खेळ मिनिट दोन मिनिटेसुद्धा चालला नसेल, पण तो चालत असताना मी एक पाय खाली टाकला तो गंगा एकदम माझ्या छातीशी आली. मी एकदम घाबरलो. मी लवंगीशी लग्न केले नव्हते. केवळ वाराणसीत गंगेच्या घाटावर होतो म्हणून मला जगन्नाथपंडिताची आणि लवंगीची आठवण झाली होती. पण त्यासाठी गंगेने माझ्या गळ्यापर्यंत येऊन मला प्रायश्चित्त देण्याची गरज नव्हती. माझ्या बरोबरच्या लोकांनी मला झर्रकन वर ओढून घेतले नसते तर गंगेने माझा वेगळ्याच प्रकारे उद्धार केला असता. झाले होते असे की शिंद्यांचा हा घाट खचलेला होता आणि खाली एकदम खड्डा होता. मोक्षाच्या वाटेने न जाता संसाराच्या मार्गाला मी परत आलो ह्याचा मला आनंद वाटला.

वाराणसीला सबंध देशातले सर्व पंथांचे लक्षावधी लोक येत असतात; कारण हे विश्वनाथाचे धाम इतके पवित्र आहे की त्याच्या नुसत्या स्मरणाने माणसाला मोक्ष मिळतो. " काश्याम् मरणान्मुक्तिः " म्हणतात, पण " काश्याः स्मरणान्मुक्तिः " म्हणायला हरकत नाही. इथले मणिकर्णिका कुण्ड हे विष्णुचक्रतीर्थ आहे आणि शेजारी विष्णुपादुका आहेत, त्यामुळे वाराणसी हे क्षेत्र वैष्णवांनाही पूज्य आहे. वाराणसीत एका ब्राह्मणाला एक वर्ष भोजन दिले तर गंगेच्या वाळूत जितके कण आहेत तितकी वर्षे ब्राह्मण-भोजन घातल्याचे पुण्य लाभते. ( ब्राह्मण-भोजनाचाही महिमा असा अगाध आहे. ) राजेरजवाडे, व्यापारी, शेठ-सावकार यांनी चालू केलेली चारशे अन्नछत्रे वाराणसीत आहेत असे म्हणतात. तेव्हा ज्यांनी ती चालू केली त्यांना किती पुण्य प्राप्त झाले असेल याची कल्पना करता येईल.

आपण वाराणसीला काशी म्हणतो. पण काशी हे पूर्वी एका देशाचे किंवा छोट्याशा राष्ट्राचे नाव होते. आणि वाराणसी ही त्या देशाची राजधानी होती. फार प्राचीन काळापासून हे महादेवाचे धाम आणि प्रसिद्ध नगर आहे. अडीच हजार वर्षां-पूर्वी गौतम बुद्धाच्या कालातही हे प्रसिद्ध होते. बहुतेक जातक-कथांचा आरंभ " पूर्वी वाराणसी नगरीत ब्रह्मदत्त नावाचा राजा राज्य करीत असता " किंवा " एकदा वाराणसी नगरीत " ह्या शब्दांनी होतो. आणि बोधिसत्त्वाने अनेकदा वाराणसी नगरीतच जन्म घेतला होता. त्या वेळीही वाराणसी नगरी व्यापारी पेठ होती. आजही आहे. तलम वस्त्रे, सुगंधी तेले, अत्तरे, तांब्या-पितळेची सुंदर भांडी, सोन्या—चांदीचे दागिने ह्यांबद्दल वाराणसीची ख्याती होती तशी आजही आहे. प्राचीन काली वाराणसीत जसे लबाड व्यापारी होते तसे आजही आहेत. अगदी खऱ्या जरीचे म्हणून वाराणसीहून आणलेले शालू आणि पीतांबर काही दिवसांनी काळे पडल्याचा अनुभव अनेकांना आला असेल. प्राचीन काली वाराणसीची ख्याती " वाररामाभिरामा " म्हणजे

" वारांगनामुळे रमणीय " अशी होती. आणि पाच-पाचशे दासी बाळगण्याइतक्या श्रीमंत वेश्या वाराणसीत असत. आज कदाचित इतक्या दासी ठेवणे त्यांना परवडत नसेल. पण श्रीमंत आणि प्रसिद्ध गाणारणी आजही वाराणसीत आहेत, आणि तुमच्या-आमच्यासारख्या सामान्य गिऱ्हाइकांचे समाधान करणाऱ्या आहेत. गंगेवर स्नान आणि विश्वनाथाची पूजा झाली म्हणजे तुमचा उपाध्या किंवा त्याचा मनुष्य " बाईजीका मुजरा सुनना है बाबूजी ? " असे विचारतो म्हणतात.

एकदा मलाच त्याचा प्रत्यय आला. कचौडी गल्लीत मिठाई फार चांगली मिळते आणि चौकमध्ये निरनिराळ्या प्रकारचे मुरंबे, लोणची फार चांगली मिळतात. ठठेरी गल्लीत भांडी चांगली मिळतात. मला मिठाई व मुरंबे घ्यायचे होते आणि जुन्या पद्धतीची काही भांडी घ्यायची होती. मुरंब्यांवरून आठवण झाली. इथे उसाच्या करव्यांचा मुरंबा मिळतो. त्याची खुबी अशी आहे की खातांना त्यांत चोथ्याचा कणसुद्धा लागत नाही. दुपारच्या तीन चारच्या सुमाराची वेळ होती. उपाध्यांचा मनुष्य माझ्याबरोबर होता. वाराणसीच्या त्या अरुंद बोळातून खरेदीसाठी जात असताना कचौडी गल्लीत की ठठोरी गल्लीत तो मनुष्य म्हणाला, " बाबुजी, यहीं बनारसमें बहुत अच्छी गानेवाली रहती हैं । आपकी इच्छा हो हम आपको आज रात ले जाएंगे । "

मी पहिल्यांदा वाराणसीला गेलो ते उन्हाळ्याचे दिवस होते. ऊन्ह रणरणत असते. मनस्वी उकडत असते. दुपारी बाहेर पडण्याची सोय नसते. संध्याकाळीच बाहेर पडता येते. मलमलीचे चिकनचे कुर्ते अंगात घातलेले आणि मनगटावर मोतियाचे गजरे बांधलेले रंगेल बनारसी, चौक आणि गोंदौलियामधून संध्याकाळच्या वेळी रमत गमत हिंडत. " जलपान " करण्यासाठी उपाहारगृहात जमत आणि गुलाब, वाळा, फाल्सा ह्यांच्या सरबतांचे किंवा थंडाईचे बंपर रिकामे करीत. पण मला सगळ्यात पसंत पडली बनारसची लस्सी. उपाहारगृहाचे नोकर उपाहारगृहाबाहेर रस्त्यावर उभे राहून तुम्हांला घरी बोलावल्यासारखे आमंत्रण करतात, " बाबूजी, लस्सी बहुतही बढिया है । आज लस्सी हमारे यहाँ लीजिये । " लाहोर, अमृतसर, दिल्ली ह्या ठिकाणी मी लस्सी घेतली आहे, पण बनारसच्या लस्सीची सर त्यांना नाही. तुमच्यासमोर मलईदार दही घुसळतात, त्यात बेताची साखर आणि थोडेसे गुलाबजल टाकतात. आणि हातभर लांबीचा बंपर भरला की त्यात वरून आणखी बचकभर मलई टाकतात. अंतरात्मा तृप्त होतो.

दुसऱ्यांदा गेलो ते हिवाळ्याचे दिवस होते. जसा उष्म्याचा कडाका तसाच थंडीचा. ह्या दिवसांत लोकांच्या अंगात रुजाम्याची बंडी किंवा लोकरीचे लांब कोट असतात. त्यावर पुन्हा शाल पांघरलेली; कानावर घेऊन. ह्या दिवसांत लस्सीच्याऐवजी गरम दूध आणि जिलेबी ह्यांची उपाहारगृहात विक्री असते. भाजीबाजार पाहण्यासारखा असतो. शेर-दीड शेर वजनाचे एकेक अशी पांढरी शुभ्र वांगी, कवठाएवढाले मोठे

२२१४८

पेरू आणि लिंबाएवढाली मोठी बोरे, विपुल आणि स्वस्त. आम्ही धर्मशाळेत उतरलो होतो. तर रोज पहाटे साखर घातलेले लोण्याचे लाडवाच्या आकाराचे गोळे विकायला यायचे. आणि किंमत सहा पैसे, दोन आणे. अशी खाण्याची चैन दुसऱ्या कुठेही नसेल. मात्र ही दहा-पंधरा वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. आज काय आहे सांगता येत नाही. किंमत वाढली असेल पण अजूनही खुराक चालू असेल असे समजते.

वाराणसीजवळ गंगा उत्तरवाहिनी आहे आणि सगळी वस्ती गंगेच्या पश्चिम तीरावर आहे. सकाळी सात-आठच्या सुमाराला अस्सी घाटावर नाव घेऊन राजघाटा-पर्यंत नदीतून गेले की प्रभाती सूर्यस्नान करून लखलखीत झालेल्या वाराणसीचे प्रसन्न दर्शन घडते. अस्सी घाटापासून राजघाटापर्यंतच्या पाच सहा मैलांच्या विस्तारात लहान-मोठे मिळून जवळ जवळ ऐंशी-पंचाऐंशी घाट एकमेकांना लागून आहेत. गंगेतून पाहिले म्हणजे उंच उंच चढत गेलेल्या पायऱ्या आणि घाटावर मागल्या बाजूला राजे-रजवाड्यांनी, धनाढ्य व्यापाऱ्यांनी, शेठ-सावकारांनी बांधलेल्या हवेल्या, धर्मशाळा आकाशापर्यंत उंच गेल्यासारख्या दिसतात. त्यातच मध्येच लहान-मोठ्या मंदिरांचे कळस तळपत असतात. सकाळची वेळ असल्यामुळे काश्मीरपासून केरळ-पर्यंत आणि गुजरातपासून आसाम—मणिपूरपर्यंत देशाच्या चारी कोपऱ्यांतून आलेले भाविक स्त्री-पुरुष यात्रेकरू घाट उतरत चढत असतात. "हर गंगे", "जय गंगे" म्हणून गंगेत बुड्या मारीत असतात. अंगावरल्या वस्त्रांसहित गंगेत स्नान करीत असलेल्या किंवा स्नान करून वस्त्रे बदलीत असलेल्या स्त्रियांच्या वस्त्रांचे वेगवेगळे रंग आणि प्रकार, नेसण्याच्या वेगवेगळ्या पद्धती, रंग—रूप—अंगलटी ह्यामुळे घाटांना एक चित्रविचित्र शोभा आलेली असते. जिवंतपणा आलेला असतो. आणि ह्या सर्वांतून अल्प प्रमाणात पण सबंध भारतातील हिंदुसमाजाचे दर्शन होते. घाटावर बसून कोणी पोथी वाचीत असलेला दिसतो. कोणी स्तोत्र म्हणत असतो— महिम्न म्हणत असेल— कोणी नाक धरून प्राणायाम करीत असतो. त्यांच्यातूनच वाट काढीत नंगे गोसावी तसेच गायी आणि पोळ जात येत असतात.

पाच-सहा मैलांच्या ह्या विस्ताराच्या जवळजवळ मध्यावर एका मशिदीचे दोन उंच मनोरे डोळ्यांत भरतात. वाराणसीच्या घाटाच्या कोणत्याही फोटोत बहुधा हे मनोरे असतातच. पूर्वी त्याच ठिकाणी असलेले बिंदुमाधवाचे मंदिर उध्वस्त करून त्या जागी औरंगजेबाने बांधलेल्या मशिदीचे दीडशे फूट उंचीचे ते मनोरे आहेत. आता मनोऱ्यांवर चढू देत नाहीत. पण मशिदीच्या गच्चीवर चढून भोवताली पाहिले म्हणजे वाराणसी एखाद्या नकाशासारखी पसरलेली दिसते. एकाला एक लागून असलेल्या घरांची गर्दी, त्यातून गेलेले उभे रस्ते आणि आडवेतिडवे वळणे घेत गेलेले अरुंद बोळ पाहिले म्हणजे शहर किती गच्च गजबजलेले आहे ते दिसते.

बिंदुमाधव मशिदीच्या गच्चीवरून खाली वाहात जाणाऱ्या गंगेच्या प्रवाहाकडे पाहिले तर लांब मैल-दीड मैलावर काशी स्टेशन दिसेल. त्याच्या शेजारीच मसजिद

गंजे शहीदा आहे. तुमच्याबरोबर उपाध्याने दिलेला वाटाड्या हिंदूच असेल. त्याला मशिदीबद्दल विचारले तर तो म्हणेल, “ मला ती मशीद कुठे आहे माहीत नाही. आणि त्या मशिदीत काय पाह्यचंय ? ” माझ्या वाटाड्याने मला तसेच सांगितले. पण मी त्याच्या मागेच लागलो. आणि अखेर एका म्हाताऱ्या मुसलमानाला विचारून बरोबर पत्ता काढला आणि तिथे गेलो. ती मशीद प्रसिद्ध नाही आणि खरोखरच तिच्यात पाहण्यासारखे काही नाही. बाहेरच्या बाजूला कोळशाची, किराणा मालाची सायकल-रिपेअरची दुकाने. मला मुद्दाम ती मशीद पाहायला आलेला पाहून तिथल्या लोकांनाही आश्चर्य वाटले. आत मोठा चौक आहे. चारी बाजूला ओवऱ्या आहेत. पश्चिमेकडच्या ओवरीत मिंबर आणि मेहराब आहे. छपरावर घुमट आहेत मातीची रास केल्यासारखे. त्यांना काही आकार नाही. डौल नाही. आतले दगडी खांब, तुळया वगैरे सर्व साहित्य देव उध्वस्त केलेल्या मंदिराचे वापरलेले. मशीद प्रेक्षणीय नाही, पण मशीद आहे हेच महत्त्वाचे आहे. वाराणसीतली ही मशीद सगळ्यांत जुन्यापैकी आणि ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाची आहे. बाराव्या शतकाच्या शेवटी वाराणशीच्या हिंदू राजाशी मुसलमानांनी केलेल्या लढाईत जे मुसलमान मरण पावले ते “ धर्मासाठी मरण पावल्यामुळे ‘ शहीद ’ झाले ” त्यांच्या गौरवासाठी ही मशीद बांधलेली आहे. ऐबक कुतबुद्दीनने बनारसच्या राजाचा पराभव करून वाराणसीवर कबजा केला, हिंदूंची एक हजार मंदिरे उध्वस्त केली, आणि लूट नेली तिला चौदाशे उंट लागले. तिथपासून साडेतीनशे वर्षे वाराणसीवर मुस्लिम सत्तेचे सावट पडले होते. दोन हजारांहून अधिक वर्षे महादेवाचे पवित्र स्थान आणि हिंदू धर्माचे आणि विद्यांचे केन्द्र असलेल्या ह्या नगरीतली विश्वनाथासकट इतर मंदिरे अनेक वेळा उध्वस्त केली गेली. हिंदूंच्या विद्या-कलांचा लोप झाला. ब्राह्मण तेजोहीन झाले. नंतर सोळाव्या शतकात अकबराच्या कारकीर्दीत परिस्थिती पालटली. हिंदूंवरचा जुलूम कमी झाला. वाराणसीचा चेहरा पुन्हा उजळू लागला. वेदमंत्रांचे घोष पुन्हा ऐकू येऊ लागले. परंतु पूर्वीच्या तीनशे-साडेतीनशे वर्षांत उत्तरेकडल्या ब्राह्मणांत वेदविद्येची परंपरा क्षीण झाली होती. वाराणसीत वेदविद्या पुन्हा बहराला आली ती तैलंगदेशातून आणि महाराष्ट्रातून वाराणसीला गेलेल्या ब्राह्मणांमुळे. शिवाजीचे क्षत्रियत्व मान्य करून वेदमंत्रांनी त्याला राज्याभिषेक करणारा गागाभट्ट हा पैठणहून वाराणसीला जाऊन स्थायिक झालेल्या महाराष्ट्रीय ब्राह्मण घराण्याचा होता.

गागाभट्टाचे पणजोबा नारायणभट्ट ह्यांनी अकबराच्या कारकीर्दीत राजा तोडरमल्लाच्या मदतीने विश्वनाथाचे मंदिर बांधले होते. तेही पूर्वी मुसलमानांनी उध्वस्त केलेल्या विश्वनाथ मंदिराच्या जागी. पण नारायणभट्टांनी बांधलेल्या ह्या मंदिराला पुरती शंभर वर्षेसुद्धा आयुष्य लाभले नाही. बिंदुमाधवाचे मंदिर उध्वस्त करून त्याच्या जागी औरंगजेबाने मशिद बांधली. तसेच नारायणभट्टाने बांधलेले विश्वनाथाचे मंदिर उध्वस्त करून त्याचेच साहित्य वापरून त्याच जागेवर मशीद बांधली. ती सध्याच्या विश्वनाथ-

मंदिराच्या मागल्या बाजूला तिथून जवळच आहे. तिच्या पटांगणाखाली सोळाव्या शतकात नष्ट करण्यात आलेल्या त्याच्या पूर्वीच्या सभामंडपाचा भाग अजून आहे. तिथेही एक कोळशाची वखार आहे. हा सगळा भाग मुसलमानांच्या ताब्यात आहे. यामुळे तो सभामंडप पाहण्यासाठी आत जाण्याचा मी प्रयत्न केला तेव्हा तिथले मुसलमान जराशा नाराजीने आणि संशयाने माझ्याकडे पाहू लागले. औरंगजेबाने मंदिर उध्वस्त केल्यानंतर पुढल्या शंभर वर्षांत वाराणसीत विश्वनाथाला मंदिर नव्हते. ते अठराव्या शतकाच्या अखेरीला अहिल्याबाई होळकर हिने बांधून दिले. आज ज्या मंदिरात आपण विश्वनाथाचे दर्शन घेतो ते तिने बांधलेले आहे.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुगल सत्तेचा ऱ्हास होत चालला आणि उत्तरेत मराठ्यांचे सामर्थ्य वाढत चालले, हिंदूंचा आत्मविश्वास वाढत चालला. आज वाराणसीत जे घाट आणि जी मंदिरे आहेत ती बहुतेक सतराव्या शतकानंतरची आहेत. आणि त्यांतली बरीचशी मराठ्यांनी बांधलेली आहेत.

जिथे जुने बिंदुमाधवांचे मंदिर होते त्याच्याजवळच श्रीमंत औंधकरांनी बिंदुमाधवाचे मंदिर बांधले आहे. ते एखाद्या दिवाणखान्यासारखे आहे. आसपास मराठी लोकांची वस्ती आहे. पुढे थोड्या अंतरावर राघोबादादांचा दत्तकपुत्र अमृतराज ह्यांनी बांधलेले अमृत–विनायकाचे मंदिर आहे. त्यातला गणपती चांगला मोठा संपूर्ण पोवळ्याचा आहे. आणि समोर खरोखरच त्याचे वाहन होऊ शकेल इतका मोठा तपकिरी म्हणजे उंदराच्याच रंगाचा उंदीर आहे. इतका खरोखरीसारखा उंदीर मी तरी दुसरीकडे कुठे पाहिला नाही. आणखी एक विशेष म्हणजे गाभाऱ्याच्या द्वाराजवळच उंदरांची जोडी जुंपलेला छोटासा संगमरवरी रथ आहे. उत्सवाच्या वेळी गणपतीची उत्सवमूर्ती त्यातून मिरवीत नेतात की तो शोभेचाच रथ आहे हे मात्र कळले नाही. जवळच पहिल्या बाजीराव पेशव्याने बांधलेले अन्नपूर्णेचे मंदिर आहे. त्याच्या सभामंडपाची रचना अबू येथील दिलवाड्याच्या मंदिरातल्यासारखी आहे. नागपूरकर भोसल्यांच्या लक्ष्मीनारायण मंदिराचे मेहरपी कमानीचे एक दालन अगदी घाटावर येते. शिंद्यांनीही एक सुंदर मंदिर आणि घाट बांधला होता. पण पाया कच्चा झाल्यामुळे दोन्ही खचली आहेत. कालभैरवाचे मंदिर सरदार विंचूरकरांनी बांधले आहे आणि त्रिलोचनेश्वराचे पुण्याच्या एका सावकारांनी. शिवाय मराठे सरदारांनी बांधलेले घाट, धर्मशाळा, चालू केलेली अन्नछत्रे वगैरे आहेतच. ह्या सर्वांवरून मराठ्यांना शक्य झाल्याबरोबर त्यांनी वाराणसीसाठी काय केले हे दिसून येईल.

विश्वनाथाचे मंदिर हे वाराणसीतले मुख्यच मंदिर, पण ते अगदी गल्ली-बोळात आहे. आणि मनात भरण्यासारखे भव्यही नाही. ते बांधले आहे अहिल्याबाईंनी. त्यावर सोन्याचा कळस चढवला आहे रणजितसिंहाने आणि त्याला नगारखाना दिला आहे वॉरन हेस्टिंग्जने. आपण मंदिराकडे जाऊ लागलो म्हणजे आपल्यामागून येणाऱ्या गायी आपल्याला ढुशा देऊन आपल्यापुढे निघून जातात. आणि मंदिराच्या सभा-

मंडपातही आपल्या अंगाला अंग घाशीत उभ्या राहतात.

आम्ही गेलो तेव्हा संध्याकाळच्या पूजेची वेळ होती. गाभाऱ्यात एका कोपऱ्यात एका खोलगट हौदात लिंग आहे. त्याची पूजा अभिषेक चालला होता. नंतर आरती सुरू झाली. वाटेल तो वाटेल तशी घंटा वाजवीत होता. वाटेल त्या सुरात आणि चालीत आरती म्हणत होता. कोणी कसाही कुठेही उभा होता. संपूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य होते. आपल्या कुठल्याही देवळात असते तसेच सगळे होते.

मंदिरे स्वच्छ असावी, त्याच्या भोवती मोकळी जागा असावी, तिच्यात व्यवस्थित लावलेली बाग असावी, वातावरण प्रसन्न असावे, देवाला वाहिलेल्या पत्री-फुलांनी गाभारा कुबट दर्पानें कोंदाटू नये, अशी मंदिरे बांधण्याला बिर्लांनी सुरुवात केली. असेच एक तुलसी मानसमंदिर दुर्गाकुण्डाच्या बाजूला, हिंदुविश्वविद्यालयाच्या वाटेवर सत्य नारायण सुरेका ह्या श्रीमंत गृहस्थांनी बांधलेले आहे. ते आतून बाहेरून संपूर्ण संगमरवरी आहे. आत चहूंकडच्या भिंतींवर तुलसीदासांचे रामचरित-मानस कोरून काळ्या रंगाने भरले आहे. ते काळ्या शाईने लिहिल्यासारखे दिसते. अर्थात अरबी अक्षरांना वेगवेगळी वळणे देऊन जशी नकशी साधली जाते तसे इथे साधलेले नाही. मधले किंचित मोठे आणि दोन बाजूनी दोन लहान अशी एका ओळीत तीन निमुळती शिखरे असलेले हे मंदिर रेखीव साधे आणि सुंदर आहे. त्याचा नाजुकपणा थोडा स्त्रैण वाटतो. पण भक्तिभावात स्त्रीत्वाचा अंश असतो असे मानले तर ह्या मंदिरात ते उचित म्हणावे लागेल.

हिंदूविश्वविद्यालयाच्या आवारात एक जुन्या शैलीत बांधलेले भव्य काशी-विश्वनाथ-मंदिर आहे. तेही स्वच्छ सुंदर आहे. ह्या नव्या मंदिरांना प्राचीन मंदिरांचे माहात्म्य आणि सोवळे पावित्र्य कदाचित् लाभणार नाही. पण जुन्या मंदिरात न आढळणारी प्रसन्नता इथे निश्चितच आढळेल.

वाराणसीतले जुन्या संस्कृत विद्येचे माहात्म्य आता कमी होत चाललेले आहे. जुन्या विद्वान् घराण्यांचे वंशज मास्तरकी-कारकुनी करू लागले आहेत. पण नव्या संस्था अध्ययन-अध्यापनाची वाराणसीची परंपरा पुढे चालवीत आहेत. राजघाटाच्या बाजूला थिऑसोफिकल सोसायटीच्या शिक्षणसंस्था आहेत. हिंदुविश्वविद्यालय, काशी विद्यापीठ, आणि संस्कृत कॉलेज आहेच. नागरी प्रचारिणी सभा आहे. जुने संस्कृत साहित्य आणि युरोपियन पंडितांचे संस्कृत विद्येसंबंधीचे दुर्मिळ संशोधन ग्रंथ प्रसिद्ध करणारी प्रकाशनगृहे आहेत. वाराणसीचे शैक्षणिक सांस्कृतिक महत्त्व आजही पूर्वी-सारखेच आहे. अजूनही लक्षावधी लोकांचे ते यात्रास्थान आहे. भारतीय भाविकांना वाराणसीला जावेसे वाटते,तसे परदेशीय हिप्पीनाही तिचे आकर्षण आहे. वाराणसी जिवंत आहे. जागती आहे. वाराणसीत जनन-मरण साधले नाही तरी तिचे दर्शन साधणे हेदेखील कमी फलप्रद नाही.

□

# लंडन : एक अपूर्वाई

## पु. ल. देशपांडे

सकाळी उठून फिरायला जाण्याचा निश्चय ही एक माझ्या आयुष्यात वारंवार ठरवून मोडलेली घटना आहे. लंडनची माझी पहिली पहाट फुटली आणि ह्या निश्चयाने पुन्हा एकदा उचल खाल्ली. अचानक पहाटे मला जाग आली. खिडकीबाहेर पाहिले, पाऊस नव्हता. सूर्य उगवला की नाही हे लंडनमध्ये केव्हाच कळत नाही. पण बाहेर उजेड होता. मी माझा पहाटे फिरायला जाण्याचा निश्चय जाहीर केला. बायको कुत्सितपणे हसली. त्या हसण्याला दाद न देता मी तो सूट पुन्हा एकदा चढवला. गळ्याला मफलर गुंडाळला, कारण उन्हाळ्याचे दिवस असले तरी थंडी होतीच. पुण्याला डिसेंबरात असते तशी थंडी होती.

मी उत्तर ध्रुवाचा शोध करायला निघालेल्या प्रवाशाच्या आत्मविश्वासाने ख्राइस्ट चर्च ॲव्हेन्यूमधून किलबर्नच्या रस्त्याला लागलो. सकाळी नऊचा सुमार होता. रस्त्यात संपूर्ण शुकशुकाट होता. दुतर्फा टुमदार इंग्रजी बंगल्यांसमोर रंगीबेरंगी फुलांनी फुललेल्या बागा! मधूनच दुकानांच्या रांगा, पण दुकाने बंद. सुमारे वीस मिनिटे चालल्यावर सायकलवर वर्तमानत्रांचा गठ्ठा घेऊन जाणारी एक मुलगी मला दिसली. तिने दिव्याच्या खांबाला आपली सायकल टेकवली आणि गठ्ठ्याच्या वजनाने ती सायकल खाली आदळून वर्तमानपत्रे इतस्ततः पडली. मी चटकन पुढे जाऊन तिची सायकल उचलली आणि तिने वर्तमानपत्रे गोळा करून पुन्हा गठ्ठा बांधला आणि सायकलवर चढवला.

त्या षोडशवर्षदेशीय गौर युवतीने माझे आभार मानले. एका भारतीयाच्या या परोपकाराच्या भावनेचे दृश्य पहायला तिथे सकाळी नऊ वाजतादेखील कुणीही नव्हते याचे मला मनस्वी दुःख झाले. माझ्या मनात त्या मुलीला बरेच काही विचारावयाचे होते, पण ती युवती सायकलवरून ( टांग टाकून म्हणणार होतो पण 'टांग' हा शब्द त्या तरुणीच्या संदर्भात योग्य नाही. ) शेजारच्या गल्लीत अदृश्य झाली. त्या रम्य पहाटे गठ्ठ्यापलीकडून दिसणाऱ्या त्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहात मी काही क्षण उभा होतो. वाऱ्याने तिचे सोनेरी केस भुरभुरत होते...जाऊ दे, इतकेच पुरे! इतक्या थंडीत अंगात जाड कोट वगैरे न घालता उघड्या पायांनी सायकलीवरून वर्तमानपत्रे टाकण्याचे तिला काम करावे लागते अं! असे मी मनातल्या मनात पुटपुटलो. पुढे मला कळले की, ही कामे विद्यार्थी-विद्यार्थिनी सुट्टीच्या दिवसांत चार पैसे मिळविण्यासाठी आनंदाने करतात. मी त्या निर्जन रस्त्यावरून आणखी पुढे गेलो.

बाजूच्या घरात माणसे राहत असल्याचा कुठेही पुरावा नव्हता. मधूनच एखादी मोटार जायची, तीत माणसे असत. माणसे अजिबात नसलेली मोटार रस्त्यातून जाताना मला तरी आढळली नाही.

काही वेळाने दुरून हॅम्लेटच्या बापाच्या भुतासारखे काही तरी सरकत माझ्याकडे येत आहे असा मला भास झाला. मी ‘ त्रस्त समंधा, शांत रहा ’ वगैरे वाक्ये आठवेपर्यंत ती आकृती समोर येऊन ठेपली. सहा फूट उंच आणि डोक्यावरच्या शिरस्त्राणामुळे आणि लांब डगल्यामुळे अधिकच उंच वाटणारी ती आकृती लंडनच्या सुप्रसिद्ध पोलिसाची होती. लंडनचा पोलिस हा साऱ्या जगाच्या कौतुकाचा विषय आहे. ‘बॉबी’ हा आबालवृद्धांचा मित्र आहे. तो कधी रागवत नाही,चिडत नाही, चिरीमिरी मागत नाही. सदैव मदतीला तयार. फक्त त्याला हसता येत नसावे. त्या रम्य पहाटे मी त्या पोलिसाला पाहिल्यावर मला स्थितप्रज्ञदर्शन झाल्याचा आनंद झाला. अहिंसा-सत्य-अस्तेयांचा तो पुतळा. त्याच्या हातात शस्त्र नाही· समोर गुन्हेगारांची टोळी चाल करून आली तरी तो हात उगारत नाही. चोराला चोरी करतानादेखील त्याच्या भावना न दुखावतील अशा बेताने तो पकडतो. चोर पकडल्याचा त्याला आनंद नाही, निसटल्याचे दुःख नाही. रस्त्यात भलतीकडे गाडी उभी असली तर निमूटपणे आपली वही काढून तो नंबर टिपून घेतो, राग लोभ-क्रोधांच्या पलीकडे गेलेल्या ह्या महात्म्याचे दर्शन मला लंडनच्या पहिल्या प्रभातफेरीच्या वेळी व्हावे ह्याचा मला मनस्वी आनंद झाला. आपल्याकडे पोलिस आडवा आला तर काही ठिकाणी परत घरात येऊन माणसे जरा बसून मग पुन्हा बाहेर पडतात—असे मी ऐकले आहे. लंडनमधला बॉबी हा अलौकिक पुरुष आहे. आपल्याकडे अपघात, चोरी, मारामारी अशा प्रसंगाला पोलिस कधीही स्वतःच्या उपस्थितीने अधिक शोभा आणीत नाहीत, ‘आणि माणसाचा मुडदा पडला ’ की दोन तासांनी बाजूच्या जिवंत गर्दीला दंडुके हाणीत पोलीस पार्टी येते. लंडनमध्ये तर मी ऐकले की चोरीच्या ठिकाणी चोराच्या आधी पोलीस उभा असतो ! चोराला चांगली चोरी करू देतो आणि मग पकडतो. चोर कोर्टात वेळेवर हजर राहतो. जी शिक्षा असेल ती मुकाट्याने भोगतो. तुरुंगात टेलिव्हिजन, रेडिओ वगैरे असल्यामुळे त्याचा वेळ बरा जातो. फक्त रविवारी पाद्री येऊन प्रवचन देतात तेवढा वेळ त्रासात जातो म्हणतात.

लंडनला दुधाच्या बाटल्या कोणीही चोरीत नाही. नाक्यावर वर्तमानपत्रे असतात, पण विकणारा पबमध्ये लागर पीत असतो. गिऱ्हाइके पेटीत पैसे टाकतात, नेमके सुटे पैसे उचलतात आणि जातात. इंग्रजांचा प्रामाणिकपणा अवर्णनीय आहे. अधूनमधून पोलिसांना काम मिळावे म्हणून खून, बँकेचे दरोडे वगैरे दुष्काळी कामे काढण्यात येतात. हल्ली बरेचसे पोलिस फुटबॉल पूल्सची कोडी सोडवतात. माझ्या मुक्कामात चौदा चौदा पोलिसांच्या टोळ्यांना वीस की तीस हजार पौंडाची लॉटरी फुटली होती. अशा या भाग्यवंतांच्या वंशातल्या सुपुत्राची आणि ज्ञानदेवाच्या मराठी-

चिये नगरीतल्या दुसऱ्या सुपुत्राची त्या शुभ पहाटे किलबर्न रोडवर गाठ पडली. रस्त्यात अजूनही माणसे नव्हती. एका अर्थी हे बरे होते. मी आणि बॉबी चार घटका बोलू शकलो असतो. मी समोरून येणाऱ्या त्या सहा फूट उंचीच्या महामानवाला सहास्य वदनाने म्हटले—

" गुड मॉर्निंग ! "

" गुम्माँग " असे काहीसे कुरबुरत तो सरळ तरंगत पुढे निघून गेला. माझे मनाशी रचलेले सर्व संभाषण कोसळले. ' यां चिन्तयामि सततं मयि सा विरक्ता... ' हे एकूण प्रेयसीप्रमाणे पोलिसालाही लागू पडावे ह्याचे नवल करीत मी आल्या वाटेने परतलो. कदाचित त्याची ड्यूटी संपली असेल. कारण ड्यूटीवरचा इंग्रज आणि खाजगीतला इंग्रज यांत फार फरक आहे.

आता रस्ता हळूहळू हालायला लागला होता. येताना ज्या बागेत फक्त फुले होती तिथे मुलेही दिसू लागली. गुटगुटीत सुंदर मुले. आणि अत्यंत दरिद्री पोषाख अंगावर चढवून, हातात खुरपी घेऊन त्यांचे बाप बागेत राबत होते. इतर युरोपीय देशांत आणि इंग्लंडमध्ये हा महत्त्वाचा फरक आहे. रविवार म्हटला की युरोपियन लोक आपल्या मुलाबाळांसह उत्तम पोशाख चढवून चर्चमध्ये जातात. इंग्रज मात्र अगदी गचाळ पोशाख घालून स्वतःच्या बागेत काही खणत नाही तर उकरीत बसतो. बागेत खणणे आणि उकरणे हे कार्य समस्त इंग्लंडभर रविवारी सकाळी चालू असते.

इंग्रज लोक आपल्या रस्त्यांना नावे ठेवण्यात विलक्षण कद्रूपणा करतात. आपल्या देशात त्यामानाने पुढाऱ्यापासून ते पेंढाऱ्यांपर्यंत नावे ठेवायला पुष्कळ मंडळी आहेत. पण खुद्द लंडन शहरात खाइस्ट चर्च अॅव्हेन्यूज निदान डझनभर असतील. आपल्याला हवा असलेला रस्ता एनमध्ये आहे की एन-डब्ल्यूत आहे, एस-मध्ये आहे की एस-ईत आहे ह्या साऱ्या तपशिलाची शेवटपर्यंत खात्री करून घ्यावी लागते. ती झाली की चुकतो म्हटले तरी रस्ता चुकणे शक्य नाही. एरवी मात्र एक जेम्स हे नाव धरले की त्याचा जेम्स स्ट्रीट, जेम्स रोड, जेम्स पार्क, जेम्स स्क्वेअर, जेम्स अॅव्हेन्यू, जेम्स सर्कल, जेम्स क्रेसेंट, जेम्स हिल, जेम्स गार्डन, जेम्स बॅक, जेम्स लेन, जेम्स आर्क, जेम्स कॉर्नर असे अनेक पर्याय होतील, आणि एक पर्याय दुसऱ्या पर्याया-पासून दहा दहा मैल दूर असू शकेल. ' मॅजेस्टिक सिनेमासमोर ' म्हटले, की मुंबईत पत्ता कळतो. पण ' ओडियन सिनेमापुढे ' म्हटले की लंडनला पंचवीस एक ओडियन असतील, त्यातला कुठला हे कळणे अशक्य ! लंडन शहराचा नकाशा असलेले पुस्तक घेऊन आम्ही रस्ता शोधत होतो. ती पुस्तके मात्र अति उपयुक्त. रस्ता तर सापडतोच, पण जवळचे भुयारी स्टेशन, बस-रूट कोणता हेदेखील कळते. पॅरिसमध्ये तर त्यांच्या भुयारी गाड्यांच्या स्टेशनाजवळ कुठले कुठले रस्ते आहेत हेदेखील स्टेशनावर नकाशात दिलेले असते. तिथे अडचण फक्त नावाच्या उच्चाराची. ' इन्व्हॅलिड्स ' असा इंग्रजी उच्चार होऊ शकणाऱ्या शब्दाचा फ्रेंच उच्चार 'आवांलीद' असतो आणि 'इटॉइल'चा

उच्चार ' इतवाल ' होतो हे कळायला बरेच फ्रेंच धक्के खावे लागतात. अर्थात स्वतःला इंग्रजी येत असल्यामुळे लंडनमध्ये रस्ता चुकायची भीती नाही असा दांडगा आत्मविश्वास होता. त्यातून तो जगमित्र बॉबी !

लंडनच्या भुयारी रेल्वेचा पहिला प्रवास मी जन्मात विसरणार नाही. भुयारी रेल्वेला इंग्लिश लोक ट्यूब म्हणतात आणि युरोपात तिला मेट्रो म्हणतात. ह्या ट्यूबने सारे लंडन पोखरले आहे. इतका सुखाचा आणि बिनचूक प्रवास पृथ्वीतलावर अन्यत्र नसेल. जागोजागी पाट्या लावून तुमच्या मनातल्या सगळ्या शंकांचे निरसन केलेले. एका छोट्याशा कार्डावर रंगीबेरंगी ओळींचा सुबक नकाशा. प्रत्येक स्टेशनाचे नाव जवळ जवळ दुसरे स्टेशन लागेपर्यंत बोर्डावर लिहिलेले. त्यामुळे ' शेणोली आली का हो ? ' हा प्रश्न विचारावा लागत नाही. आपल्याकडे स्टेशनांची नावे गुप्त ठेवण्याकडे का प्रवृत्ती आहे देव जाणे ! आणि फलाटाच्या दोन टोकांना नावाच्या पाट्या लिहिण्याची ज्या महाभागाला कल्पना सुचली त्याला तर लक्ष प्रणाम ! एक तर त्या पाट्या फलाटाशी काटकोन करून असतात. त्यामुळे खिडकीबाहेर दीड हात तोंड काढल्याखेरीज वाचता येत नाहीत. आणि उरलेल्या, एवढ्याशा अक्षरात कंदिलांच्या काचांवर लिहिलेल्या. त्यामुळे दहा लोकांना ओरडून विचारून खात्री करावी लागते. लंडनमध्ये या ट्यूबच्या स्टेशनावर डोळे असलेल्या आणि इंग्रजी वाचता येणाऱ्या माणसाला अमुक एका ठिकाणी कसे जायचे हे विचारण्याची गरजच नाही. रस्त्यातदेखील रस्त्याच्या नावा-नंबरचे बोर्ड स्वच्छ अक्षरात लावलेले. मुंबईसारख्या शहरातदेखील रस्त्याच्या नावांच्या पाट्या दुर्मिळ. इतक्या वर्षांत मी ' बापू खोटे स्ट्रीट ' आणि ' सोनापूर लेन ' एवढ्या दोनच पाट्या वाचलेल्या आठवतात. एरवी धोबीतलाव सुरू कुठे होतो आणि संपतो कुठे हे पोस्टमनला कळते कसे हे मला कोडे आहे. घरनंबर तर अजून वाचण्याचा योग यायचा आहे. पोस्टमन बहुधा अंतर्ज्ञानी असावे. एरवी दोनशे पंधरा नंबर आणि गिरगाव रोड या पत्त्यावरचे पत्र दोनशे पंधरा नंबर आणि गिरगाव रोड दोन्ही पाट्या अजिबात अस्तित्वात नसताना त्या पत्त्यावर राहणाऱ्या गृहस्थाला मिळते कसे याचा मला तरी शोध लागायचा आहे. पुण्याला वाड्यावरच्या दर्शनी गणपतीच्या उंदराखाली कुठे तरी कोल्हटके-धूर-काजळी यांच्यात घरनंबर लपलेला असतो. पेठा तर एकमेकींच्या कधी गळ्यात गळा घालून तर कधी पायात पाय टाकून उभ्या आहेत. घराचा एक खण बुधवारात आणि दुसरा शनिवारात असू शकतो. एवढेच नव्हे तर माझ्या एका मित्राची वरची माडी शुक्रवारात आणि माजघर सदाशिव पेठेत आहे असे ऐकतो. खरे खोटे देव जाणे !

किलबर्न स्टेशनातल्या तिकिटाच्या खिडकीतल्या बुवाला मला पिकॅडलीचे तिकीट हवे आहे हे कळायला दोन मिनिटे लागली. सगळ्याच साहेबांना आपल्यासारखे शुद्ध इंग्रजी येत नाही.

" टू पिकॅडली प्लीज. "

" मे ग्यॅा फाऊन. "

" टू टिकेट्स ऑफ दि ट्यूब रेल्वे फॉर पिकॅडली स्टेशन"—मीदेखील चिडलो. त्याने हताशपणाने मान हालवली. शेवटी मी एका कागदावर " दोन पिकॅडली " असे स्वच्छ लिहून दिले. "ओऽऽ! यू मीन फिख्याडली" असे म्हणून त्याने फिख्याडलीची तिकिटे दिली. इंग्रजीचा पहिला दणका इथे बसला आणि आपले शुद्ध तुपातले इंग्रजी इथे उपयोगाचे नाही हे मनातल्या मनात मी ओळखले. साहेबांचे इंग्रजी एकूणच निराळे. आपल्या देशात इतकी वर्षे राहून त्याने खरे इंग्रजी आपल्यापासून, काही खांसाहेब चिजा चोरून ठेवतात तसे, चोरून ठेवलेले दिसते.

पिकॅडली स्टेशनवर आम्ही उतरलो ते चांगलेच पाताळात जाऊन पोचलो होतो. दहा दहा वेळा हातातील आणि भिंतीवरले नकाशे पाहात पाहात आम्ही एका फिरत्या जिन्याच्या पायथ्याशी पोचलो. पिकॅडलीसारख्या स्टेशनाचे हे जिने इतके खोल आहेत की, वरून आपोआप खाली येणाऱ्या माणसांकडे पाहताना मला जरा गरगरल्या-सारखेच झाले. त्या फिरत्या जिन्याच्या शेवटल्या पायरीवर चटकन पाऊल टाकणे आणि टोकाला पोचल्यावर न गडबडता सटक करून जमिनीला पाय टेकणे ह्या क्रियेचा सराव व्हायला दोनतीन दिवस लागतात. पायरीची डावी बाजू नेहमी मोकळी ठेवावी लागते, म्हणजे त्या फिरत्या जिन्यावरूनही झप झप पायऱ्या चढून पळत जाणाऱ्यांची वाट मोकळी होते. पहिल्या दिवशी नेहमीप्रमाणे डावी बाजू रिकामी पडलेली पाहून आम्ही तिथेच उभे राहिलो. एक ते सव्वा मिनिटाचा खोळंबा झाल्यामुळे आमच्या-मागे अडकून राहिलेल्या इंग्रजांच्या चेहऱ्यावरचे भाव पाठीला डोळे नसल्यामुळे दिसले नाहीत. पुढे पुढे हा प्रमाद इतरांच्या हातून घडला की मागल्या माणसाचे चेहरे कसे होतात ते दिसल्यामुळेच पहिल्या दिवशी डझनभर इंग्रजांचे शिव्याशाप आपण नक्की घेतले असतील याची खात्री झाली.

ती भुयारी रेल्वे, फिरते जिने, त्या चिमुकल्या आगगाड्या आणि त्यात बसणारी ती गोरीगोरीपान मंडळी ह्या साऱ्या गोष्टींचा मला तर पुढे पुढे लोभ जडला. माझ्या साऱ्या मुक्कामात मी बसमधून अगदी क्वचितच प्रवास केला असेल. भुयारी रेल्वे-इतके सोयीचे आणि बिनधोक वाहन दुसरे कुठलेही नसेल. जमिनीखालच्या त्या प्रचंड बिळातून ह्या पाताळयंत्री गाड्या दिवसरात्र सरपटत असतात. ही रेल्वे खोदणारे शिल्पी भलतेच चतुर असले पाहिजेत. बेकर स्ट्रीट, ऑक्सफर्ड स्ट्रीट, पिकॅडली ह्यांसारख्या स्टेशनांवर उभे असताना कल्पनाही येत नाही की डोक्यावर शेकडो वाहने चालली आहेत, हजारो पादचारी जाताहेत, सारे लंडन डोक्यावरून उभे आहे! पाहता पाहता माणसे या भुयारी रेल्वेच्या बिळात नाहीशी होतात आणि वरून चालता चालता पटकन एखादा पाण्याचा नळ फुटावा तसा फुटपाथच्या मधूनच माणसांचा फवारा वर उधळला जातो आणि दाही वाटांनी तुरूतुरू चालायला लागतो.

वास्तविक मी गेलो त्या वेळी उन्हाळा संपला नव्हता. परंतु माझ्यासारख्या मुंबईच्या

अत्यंत आल्हाददायक उकाड्यातून विमानातून चोवीस तासांत लंडनला पोचलेल्या माणसाला तो इंग्लिश उन्हाळाही कुडकुड करायला पुरेसा होता. पिकॅडलीच्या भुयारातून बाहेर आलो आणि क्षणभर गडबडून गेलो. संध्याकाळची वेळ होती आणि चार बाजूंना दिव्यांचा झगझगाट होता. रंगीत विजेरी नळ्यांमधून रंगीबेरंगी प्रकाशात अनेक तऱ्हेच्या जाहिराती चमचमत होत्या; आणि गोऱ्या, तांबड्या, काळ्या, पिवळ्या अशा अनेक वर्णांच्या माणसांचे थवे अंगावरून जात होते. लंडनइतके अठरापगड शहर अन्य नसेल. अंगावरून जाणाऱ्या माणसांच्या तोंडून येणारे किती तरी भाषांतल्या वाक्यांचे तुकडे कानांवरून जातात. हिंदी लोक तर अपेक्षेपेक्षा जास्त आढळतात. ‘ पिकॅडली सर्कस ’ हे नाव लहानपणापासून कानावर गेले होते. असंख्य वेळा पुस्तकात डोळ्यांखालूनही गेले होते. पिकॅडली सर्कसचे माझ्या डोळ्यांपुढले चित्र आणि प्रत्यक्षातली पिकॅडली ह्यांत मात्र फार फरक पडला. मुंबईचा काळबादेवी भाग उद्या जर अधिक स्वच्छ झाला, माणसे वाहतुकीचे नियम संभाळून चालू लागली, मुंबईची हवा एकदम थंड झाली आणि त्या भागातल्या रहिवाशांनी पान खाऊन थुंकायचे नाही असे ठरवले तर धोबीतलाव-काळबादेवी भागालाही मुंबईची पिकॅडली म्हणायला हरकत नाही. लंडन शहरातला हा सर्वांत अधिक गजबजलेला भाग.

मात्र लंडन शहरातले गजबजणे आणि मुंबईचे किंवा हिंदुस्थानातल्या इतर मोठ्या शहरांचे गजबजणे ह्यांत जमीन अस्मानाचा फरक आहे. ज्याला खऱ्या अर्थाने गर्दी म्हणतात तशी, काही नाताळासारखे प्रसंग सोडले तर लंडनमध्ये क्वचितच आढळते. सकाळी कचेऱ्या भरताना आणि संध्याकाळी सुटताना काय थोडी गर्दी दिसत असेल तेवढीच. एरवी रस्त्यात शुकशुकाटच ! रस्ते आणि माणसे यांचे प्रमाण अगदीच व्यस्त ! संध्याकाळी सहा-साडेसहाच्या सुमाराला कर्फ्यू ऑर्डर असल्यासारखी शांतता असते. साहेब त्या वेळी संध्याकाळचे भोजन करण्यात गुंग असतो. दुकाने पाच म्हणजे पाचला बंद होतात. खरेदीची वेळ सामान्यतः सकाळी अकरा ते बारा आणि दुपारी दोन ते चार-साडेचार. एकूणच सारे जीवन घड्याळांच्या काट्यांतून जाणारे असल्यामुळे गर्दीच्या आणि शुकशुकाटाच्या वेळादेखील ठरलेल्या असतात. संध्याकाळचे जेवण आटपले की मग साहेब स्वतःची करमणूक करून घ्यायला बाहेर पडतो. त्या वेळी पुन्हा एकदा रस्ते गजबजतात.

परदेशातले रस्ते हीदेखील एक पाहण्यासारखी गोष्ट आहे. लंडन मुन्सिपाल्टीलासुद्धा मुंबई मुन्सिपाल्टीसारखी रस्ते उखडून ठेवायची खोड आहे. मात्र जिथे रस्ते उखडलेले असतात तिथले मजूर काम करताना आढळतात.

जेवायची सुटी झाली की त्या घटकेला हातांतली आयुधे ठेवून भोजनाला सुरुवात करतील. एरवी मात्र रस्ता उकरून तंबाखू चोळीत त्या रस्त्यावर पानांच्या पिचकाऱ्यांचे उद्घाटन करीत बसलेले मजूर आढळत नाहीत. रस्त्याने हिंडणारी माणसेदेखील फुटपाथ सोडून हिंडत नाहीत. मोटारवाले तांबडा दिवा दिसला की थांबतात.

दडपून गाडी हाकण्याकडे प्रवृत्ती कमी. आणि बहुधा रहदारीचे कायदे मोडल्याचे खटले भरले जातात ते इंग्रजेतर लोकांवर ! ह्या मंडळींचे स्वतःच्या देशातल्या प्रत्येक सजीव आणि निर्जीव वस्तूवर विलक्षण प्रेम आहे. ठिकठिकाणी 'आपले शहर सुंदर आहे, ते सुंदर ठेवण्याची शिकस्त करा' अशी विनंती असलेल्या पाट्या आहेत. घाण टाकण्यासाठी पत्र्याचे डबे आहेत आणि लोक त्यांतच घाण टाकतात. वरच्या मजल्यावरून केर टाकणे, पानाची पिचकारी मारणे, आसपास न पाहता थुंकणे, न विझलेल्या विड्यांची थोटके फेकणे वगैरे प्रकार अजिबात आढळत नाहीत. आणि तसा एखादा वीर निघाला तर त्याच्या सत्काराला लंडनचा बॉबी लगेच हजर असतो. हा बॉबी परमेश्वरासारखा सर्वव्यापी आहे. तो आणीबाणीच्या प्रसंगी अगदी आधी वर्दी दिल्यासारखा उपटतो. कोणी पाहात नाही असे समजून तुम्ही लाल दिव्याला न जुमानता रस्ता ओलांडा, पलीकडल्या फुटपाथवर स्वागताला बॉबी हजर ! साधारणतः काळोखात भिंतीला पाठ लावून तो गुपचूप उभा असतो. तुम्ही बावरल्यासारखे दिसलात तर तो तुम्हांला वाट दाखवतो. शिवाय नाक्यानाक्यावर पोलिसांचे टेलिफोन आहेत. तुम्ही नुसता रिसीव्हर उचलला की कुठून तरी आवाज येतो—'तुम्ही अमक्या अमक्या ठिकाणी आहात ! तुम्हांला कुठे जायचे आहे ?' तुम्ही स्थळ सांगितले की लगेच 'अमकीकडून असे जा, इकडे वळा, इथे पहा, तिथून पंचाहत्तर पावले उत्तरेला जा...' अशासारख्या सूचना मिळतात. त्यामुळे आपण चुकायचे ठरवूनही चुकू शकत नाही. इंग्रजांची सारी शिस्त, सारी टापटीप त्यांच्या रस्त्याकडे पाहिले की लक्षात येते.

माझे एक सौंदर्यशास्त्री टीकाकार मित्र लंडनला कुरूप शहर म्हणतात. त्यांची काही सौंदर्याची समीकरणे आहेत. त्या 'अ = ब' आणि 'ब = $ब^२$ + $क^२$' पद्धतीच्या सौंदर्यचिकित्सेत मला गती नाही. परंतु मला मात्र लंडन आवडले. तिथे पावसाची सारखी बुरबुर आहे—तिथे प्रचंड धुके पडते—पिवळे भयानक धुके पडते—इमारती जुन्या आहेत—एकासारख्या एक आहेत—सारे काही मान्य करूनदेखील मला लंडन सुंदर वाटले. ह्या शहरात विलक्षण टापटीप आहे. मजूरवस्तीतून हिंडा नाही तर हुजूरवस्तीतून जा, प्रत्येकाच्या घराला छोटी छोटी बाग आहे. रेल्वेच्या फलाटावरदेखील चिमुकले बगीचे आहेत. वास्तविक फूल ही लंडनमध्ये अत्यंत मौल्यवान वस्तू आहे. एका गुलाबाच्या फुलाला आपल्या हिशेबाने चार चार पाच पाच रुपयेदेखील पडतात. हिवाळ्यात तर किंमती आणखीही वाढतात; परंतु सार्वजनिक बगीच्यातल्या फुलांना मूलदेखील हात लावत नाही. केवळ एक चावटपणा म्हणून मोडतोड करायची प्रवृत्ती मला परदेशात कुठेही आढळली नाही. रस्त्यांतल्या जाहिरातींवरून थुंकून ठेवायचे, दगड मारमारून पोस्टर्स फाडायची, नट्यांचे चेहरे विद्रूप करायचे आणि आपल्या शहराला एक गलिच्छ कळा आणायची — असले प्रकार शोधूनही सापडले नाहीत. शहरभर जाहिराती लागलेल्या असतात. भुयारी रेल्वेतल्या फिरत्या जिन्यांच्या

दुतर्फा तर जाहिरातींच्या सुंदर तसबिरी लटकलेल्या असतात. पण कुठेही काच फुटलेली आढळली नाही किंवा कुठल्याही नटीला टिपू सुलतानासारख्या मिशा काढलेल्या दिसल्या नाहीत. इंग्रजांना ही गंमत अजून कळलेली दिसत नाही!

ह्या युरोपीय शहरांच्या आकाशरेखा मोठ्या सुरेख दिसतात. काही गिरणगावांचे अपवाद सोडले तर बहुतेक शहरांचे दर्शन दुरून फार रम्य असते, आणि आतून स्वच्छ असते. त्याला मुख्य कारण म्हणजे आकाशांत शिरलेली ख्रिस्ती प्रार्थनामंदिरांची शिखरे. ह्या शिखरांमुळे प्रत्येक दृश्याला एक सुंदर टोक येते. पण आकाशाची शोभा मात्र आपल्या देशात! लंडनचे आकाश सदैव ढगाळलेले. सूर्यदर्शनाची पंचाईत. चंद्रदर्शन किंवा चांदणे हे जवळ जवळ नाहीच. सूर्यदेखील सदैव पेन्शनीत गेलेल्या फौजदारासारखा करुण वाटतो. चांदोबा तर बिचारा सदाचाच भागलेला. परंतु ही उणीव हिरवळींनी आणि वृक्षांनी भरून काढली आहे. झाड सहसा तोडायचे नाही असा दंडकच आहे. इंग्रजी घरांचे परसू बहुधा मोठे असते. शिवाय जागोजागी प्रचंड उद्याने! लंडनच्या मध्य वस्तीत हाइड पार्कसारखे केवढे विस्तीर्ण उद्यान आहे. पिकॅडली सर्कसइतकेच मला हाइड पार्कचेही आकर्षण होते. मार्बल आर्चच्या कमानीतून ह्या विस्तीर्ण उद्यानात शिरले की आजूबाजूला एक महाप्रचंड शहर आहे याची जाणीव नष्ट होते. तिथे गगनचुंबी वृक्ष आहेत, फुलझाडे आहेत, छोटी तळी आहेत, नौकाविहाराची सोय आहे—सारे काही आहे. जरा ऊन पडले की हा हाइड पार्क माणसांनी फुलून जातो. आरामखुर्च्या भाड्याने घेऊन माणसे शांतपणे बसलेली असतात. किंवा तोंडावर टाइम्स घेऊन झोपतात. (लंडन टाइम्सचा मुख्य उपयोग तोंड लपविण्यासाठीच होतो. आगगाडीत प्रत्येकजण त्या टाइम्सच्या बुरख्याआड लपलेला असतो.) गोरीगोरीपान लहान लहान गुटगुटीत मुले हिरवळीवर बागडत असतात.

एखाद्या तरुतळी प्रणयी युग्मे गुजगोष्टी करीत प्रणयलीला करीत असतात. सुरुवातीला मला उगीचच ते दृश्य पाहून बिचकल्यासारखे होत होते. परंतु त्या जोडप्यांना भोवतालच्या जगाचा विसर पडलेला असतो. प्रेम करणे ही पाश्चात्य देशांत एक सुंदर गोष्ट मानली जाते. त्यात लपवाछपवीचा मामला नाही. प्रणयी युगुले हा असल्या उद्यानांचा तिथल्या तरुपर्णांइतकाच एक अविभाज्य घटक आहे. मात्र पाश्चात्य जोडपी त्या लीलांमध्ये विरून जातात. खरोखरीच प्रेमाचे ते क्षण ती उत्कटपणाने जगताहेत असे वाटते. आणि ज्या सौंदर्यदृष्टीने आपण एखाद्या अजंठा-वेरूळच्या लेण्यांतल्या पाषाणमूर्तींकडे पाहतो त्याच दृष्टीने याही दृश्यांकडे पाहू लागतो. रम्य आणि भव्य अशा त्या उद्यानातील ही प्रणयदृश्ये म्हणजे जणू सजीव शिल्पे आहेत.

अस्सल भारतीयाप्रमाणे मीदेखील सुरुवातीला ही दृश्ये पाहून नाक मुरडले. पुढे पुढे इंग्लिश घरांमधून अधिकाधिक जाण्याचा मला प्रसंग आला आणि लंडनच्या हवेचाही अनुभव यायला लागला तेव्हा आकाशाच्या या विस्तीर्ण वृक्षाच्या छताखाली दिवसभर पडून राहणे हा काय विलक्षण आनंद आहे याची जाणीव होऊ लागली.

इंग्रजांचे घर ही आता दिवसेंदिवस केवळ व्यावहारिक संस्था होऊ लागली आहे. स्वयंपाकघर हे यांत्रिक पाककेंद्र आहे आणि दिवाणखाना हे छोटे टेलिव्हिजन थिएटर झाले आहे. त्यामुळे घराचे घरपण जवळ जवळ नष्ट होत आले आहे. यांत्रिक सुधारणा आणि तयार अन्न यांमुळे गृहिणींना 'रांधा, वाढा, उष्टी काढा' फारसे करावे लागत नाही. नवरा आणि बायको दोघांनाही नोकरी करणे जवळ जवळ अपरिहार्य आहे. किंबहुना पुरुष आणि स्त्री यांतला नैसर्गिक भेद सोडून अन्य भेद उरलाच नाही म्हटले तरी चालेल. 'इश्श' किंवा 'अय्या' म्हणणारी इंग्रज स्त्री काही दिवसांनी लंडनच्या म्यूझियममध्ये पहावी लागेल. मुलांनादेखील पालकांच्या जबाबदाऱ्या आणि आपले हक्क यांची कायदेशीर जाणीव होऊ लागली आहे. मी लंडनला असताना निष्काळजी-पणाने आपला अंगठा दारात चिमटला म्हणून एका सुपुत्राने आपल्या पित्याविरुद्ध खटला भरून कोर्टातून नुकसान भरपाई मिळवली होती. आणि दुसऱ्या एका खटल्यात मुलाला कुठल्या शाळेत पाठवायचे यावर आई आणि बाप यांच्यात भांडण होऊन प्रकरण कोर्टात गेले होते. 'घर' या संस्थेचा आधार जिव्हाळ्यातून उठून कायद्यावर गेल्यामुळे प्रणयाचा काळ हा 'घर' करण्यापूर्वीचा व्हावा ह्यात आश्चर्य नाही. मला अनेक तरुण आणि तरुणी अशाही भेटल्या, की ज्यांची लग्ने ठरून पाच पाच वर्षे झाली होती; परंतु विशिष्ट तऱ्हेचा फ्लॅट, फ्रीज, टी. व्ही., वॉशिंग मशीन, ठराविक मेकची मोटरगाडी यांची जुळवाजुळव अद्याप होऊ न शकल्यामुळे मंत्राक्षता पडायच्या तशाच राहिल्या होत्या. विवाहोत्तर जीवनापेक्षा विवाहपूर्व जीवनातच अधिक सौख्य असल्यामुळे की काय कोण जाणे, विवाहित जोडप्यांपेक्षा अविवाहित जोडपीच पाश्चात्य देशात फार आढळतात. त्यातून पुन्हा बॉय फ्रेंड आणि गर्ल फ्रेंड हे एक मला अजूनही न उमगलेले कोडे आहे. बी. बी. सी. त माझ्या वर्गातले सहकारी कधी कधी आपल्या गर्ल फ्रेंडचा उल्लेख करीत. मुंबईमध्येही हा शब्दप्रयोग मी आता-आताशा ऐकू लागलो आहे. आमच्या वेळी हे नव्हते. जाऊ द्या. या विषयाच्या फार खोलात शिरण्यात अर्थ नाही.

स्त्रीविषयक आकर्षण हा फार प्राचीन विषय आहे. आपल्या देशात आपण जरा बेतानेच या विषयावर बोलतो. पाश्चात्य देशांतील चिरतरुण राहण्याची स्त्रियांची धडपड पाहिली म्हणजे मात्र कौतुक वाटते. एका बाजूने पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून साऱ्या सामाजिक, आर्थिक, राष्ट्रीय जबाबदाऱ्या उचलणारी नवी स्त्री आढळते, तर दुसऱ्या बाजूने सौंदर्यप्रसाधनाच्या साऱ्या शस्त्रास्त्रांची जुळवाजुळव करण्याची ह्या स्त्रीची ती सनातन धडपड चालू असते. बसमध्ये दोन्ही मजल्यांवरच्या पाशिंजरांना सांभाळण्याचे कार्य करणारी खंबीर स्त्री-कंडक्टर पोलिसाने जरा अधिक वेळ ट्रॅफिक अडवला की आपल्या गणवेषाच्या खिशातून हळूच ओष्ठशलाका काढून ओठांचे धनुष्य नीट ताणून घेते. किंवा रेल्वे स्टेशनची स्टेशनमास्तरीणबाई गाडी निघून गेली की नव्या केशभूषांचे नमुने पाहण्यात गढून जाते. कचेऱ्यांमधून तर स्त्रीराज्यच! इकडून

तिकडे टणाटण उड्या मारात पळणाऱ्या चुणचुणीत सेक्रेटरी पोरी कामाचे ढीग उपशीत असतात आणि तेवढ्यात शनिवार-रविवारी आपल्या प्रियकराबरोबर कुठे जायचे याचे संकेत ठरवीत असतात. एखाद्या विमाकंपनीची मॅनेजर म्हणून काम करणारी बाईदेखील सेल्फ्रिजिससारख्या प्रचंड दुकानात झगे विकत घेताना आपल्या इथल्या एखाद्या द्वारकाकाकूंच्या नजरेने वाण आणि पोत तपाशीत असते. अगदी पुरुषी पोशाख करणाऱ्या बायकादेखील अशी एखादी पोशाखाची किंवा केशरचनेची गंमत करतात, की त्यातून स्त्रीचे ते ईव्हने दिलेले सनातन आव्हान व्यक्त व्हावे.

इंग्रज नवरा होणे ही मात्र एक निराळीच गुलामगिरी आहे. कचेरीतून येऊन 'हुश्य' करीत जॅक्सनसाहेब बसले आहेत आणि जॅक्सनीणकाकूंनी त्यांच्यापुढे पोह्यांची बशी आणून ठेवली आहे, हे दृश्य पाहू जाता आढळणार नाही. घरच्या कामाचा बराचसा भाग यजमानांना उचलावा लागतो. मनुष्यबळ अत्यंत मर्यादित असल्यामुळे घरची बरीचशी कामे साहेबांनाच करावी लागतात. विशेषतः भोजनोत्तर ताटेवाट्या विसळणे हे काम 'ह्यांचे' असते. "जेवल्यावर पान खाऊन 'केसरी' वाचत पडू म्हणतो" हे वाक्य इंग्रज नवऱ्यांच्या बाबतीत संभवत नाही. 'स्वावलंबन' हा शब्द न उच्चारता ही मंडळी स्वावलंबी आहे. 'आलाच आहा तर जेवून जा' हा आग्रह इथे होऊ शकत नाही. प्रत्येक गोष्टीची गृहिणीला पूर्वसूचना द्यावी लागते. कचेरीतून येता येता बंडोपंत चार मित्रांना घरी चहाला घेऊन येऊ शकतात तसला प्रकार इंग्रजांना मानवत नाही. सारे काही आधी व्यवस्थित ठरवून. इंग्रजी जेवण अगदी साधे असते. त्यातून मोठमोठ्या दुकानांतून भोजनविभाग असतात. त्यात निम्मा स्वयंपाक तयार असतो. उकडणे, उकळणे अगर तळणे एवढेच कार्य घरी करायचे. आपल्या-सारख्या चटण्या—कोशिंबिरी—सांप्रदायातल्या मंडळीना ते जेवण जेवणच वाटत नाही. शिवाय दुकानांत मिळणारे 'फ्रोझन फूड' अगर इतर मांसाहारी पदार्थ इतक्या स्वच्छ रीतीने ठेवलेले असतात की बाजारी म्हणून आपण ज्याला समजतो तो बाजारी गलिच्छ-पणा तिथे अजिबात नसतो. त्यातून थंड हवेत माश्या चिलटे हे प्रकार नाहीत. प्रत्येक वस्तू पारदर्शक कागदात गुंडाळून काचेच्या कपाटात ठेवलेली. दुकानदार ती चिमट्याने उचलून देणार. ह्या बाबतीत इंग्रजांचे सोवळे-ओवळे फार कडक आहे. तिथला खाटीक देखील सर्जनसारखा दिसतो.

इंग्लिश हॉटेले तर स्वच्छतेच्या बाबतीत विलक्षण जागरूक असतात. लंडन-मध्ये गरिबांची हॉटेले आहेत, श्रीमंतांची आहेत; परंतु पदार्थ मात्र दोन्ही ठिकाणी सारखेच मिळतात. किमतीत फरक पडतो तो मुख्यतः स्थानमाहात्म्यामुळे! एरवी जे स्टेक पाय सेविलसारख्या महागड्या हॉटेलात तेच लायन्ससारख्या जनताउपाहारगृहात! कमी पैशाची म्हणून गलिच्छ खाद्यवस्तू विकायची हा प्रकार तिथे संभवतच नाही. इंग्रजाला डुक्कर, बैल आणि बटाटा यापलीकडे इतर खाणे फारसे परवडतही नाही. मात्र खाण्याचे शिष्टाचार दांडगे! उकडलेले अर्धे अंडे जरी तो खात असला तरी

त्याला ते विशिष्ट काटे चमचे लागणार. त्यामुळे इंग्रजी खाण्यात खाण्यापेक्षा खाण्याची उपकरणीच अधिक असतात. मात्र एखाद्या इंग्रज कुटुंबात बसून जेवणे हा एक अत्यंत आनंददायक अनुभव आहे. छोटे तीन-चार लोकांचे कुटुंब असायचे. बहुधा आई, बाप आणि एक-दोन मुले हाच संच ! तिथे मग थट्टा करीत, गप्पा मारीत भोजन चालायचे. एखादाच पदार्थ पण आईच्या पाककौशल्याचे कौतुक करीत खायचा.

एरवीचा अबोल इंग्रज जेवताना बोलका होतो आणि बडबड्या फ्रेंच जेवायला बसला की स्वादसमाधीत मूक होतो. इंग्रज गप्पा मारण्यासाठी जेवेल आणि फ्रेंच माणूस जेवायची वेळ झाली की जागतिक युद्धाच्या तहाची बोलणीदेखील थांबवून जेवायला उठेल. इंग्रजाला बटाटा खाण्यापेक्षा आपल्या चिमुकल्या बागेत तो लावण्यात आनंद आहे. मला वाटते, इंग्रज हा हाडाचा शेतकरीच आहे. हार्वे स्ट्रीटमधला मोठ्यांतला मोठा सर्जन असो किंवा ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीतला तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक असो, त्याला चिखलात हात बुचकळून काढल्याखेरीज चैनच पडत नाही. तिथले मला भेटलेले गायक आणि नटदेखील कलेवरील चर्चा संपल्याबरोबर आपल्या बागेतली स्वतःची करामत दाखवायला मला घेऊन गेले. मला वाटते, बरेचसे इंग्रज बाग करायला कारण म्हणून घर घेत असावेत. स्वतःच्या परसातला कोबी किंवा टमाटो पाहूनच त्याला ढेकर येते, आणि म्हणूनच लंडनमध्ये नोकरी करणारे बहुतेक इंग्रज सुटी पडली रे पडली की खेड्यांच्या दिशेने पळतात, आणि मायभूमीच्या मातीत हात खुपसतात. म्हणूनच की काय कोण जाणे, इंग्रजांचे आपल्या मायभूमीवर अतोनात प्रेम आहे. माझी माती आणि माझे आकाश असे आपण अभिमानाने म्हणतो, पण आमचा पांढरपेशा कधी भरल्या डोळ्यांनी आकाश पाहात नाही आणि कधी आपले दोन्ही हात मातीने भरवत नाही. नेहमीचे ढगाळलेले आकाश उजळले की इंग्रज धावत त्याच्या छताखाली येतो आणि मोकळा वेळ मिळाला रे मिळाला की त्या मातीशी खेळत राहतो !

□

दहा

# वेंकटाचल आणि वेंकटेश्वर

## श्री. ना. बनहट्टी

दुसऱ्या दिवशी सकाळच्या एक्स्प्रेसने निघून आम्ही दुपारी रेणीगुंट्याला येऊन तिथे गाडी बदलून तिरुपती पूर्व स्टेशनावर येऊन पोचलो. इथे आम्हांला नायडू नावाच्या एक पोक्त बाई भेटल्या. आम्ही नवखे आहोत आणि भाषा न जाणणारे

आहोत असे पाहून त्यांनी आम्हाला खूप मदत केली. त्यांच्याशी ओळख करून घेऊन त्यांच्यावर छाप पाडण्याचे कर्तृत्व पद्मावतीचे होते. बाईंचे पती निवर्तलेले असून पूर्वी मोठ्या हुद्द्यावर होते. मुलेही सैन्यात व इतरत्र मोठ्या मोठ्या हुद्द्यांवर होती. स्वतः त्या सुशिक्षित आणि इतक्या संपन्न असूनही सुस्वभावी, दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्यात तत्पर होत्या. त्यांनी बसमधून गिरीवर जाण्यात, तिथे मंदिराच्या जवळ कॉटेज मिळवून देण्यात आम्हाला मदत केली. दोघां मिळून संडास बाथरूम स्वतंत्र असलेली तीन खोल्यांची एक बंगली आम्ही घेतली. आम्हीं काही शिधा आणि स्टोव्ह बरोबर नेलेला होता, पण स्वयंपाक वगैरे करण्याच्या खटाटोपात पद्मावती पडली नाही. चहा आणि आंघोळीकरता गरम पाणी एवढ्याचकरिता स्टोव्हचा उपयोग केला. तिचे मुख्य लक्ष देवाकडे होते.

आम्ही पोचलो तेव्हा संध्याकाळ होण्याच्या बेतात होती. उतरण्याची जागा निश्चित करून सामान टाकून नायडूबाईंच्या पुढारीपणाने आम्ही देवदर्शनाकरिता उतरलो. उतरलो म्हणण्याचे कारण भोवतालच्या भूमीपेक्षा देवालय पंधरावीस पायऱ्या इतके खोलात आहे. लगेच आम्ही देवदर्शनाकरता लागलेल्या रांगेमध्ये सामील झालो. मला वाटते सुमारे दीड तासाने आम्हांला देवदर्शन घडले. पैसे देणाऱ्यांना दर्शनाची संधी लवकर मिळते, पण प्रत्येक खेपेस एकदा तरी धर्मदर्शन किंवा मुक्तदर्शन घेतले पाहिजे, असा इथे येणाऱ्या दर्शनेच्छूंचा दंडक आहे. आम्ही तो कटाक्षाने पाळीत होतो. देवाची भक्ती पैशाने होत नाही. पैसा हे तरी आपला भाव व्यक्त करण्याचे एक साधन आहे; ते बरेच कनिष्ठ प्रतीचे आहे. दर्शनाच्या उत्कंठेने ताटकळत उभे राहणे, मधून मधून उठणाऱ्या ‘ वेंकटरमणा गोविंदा ’ अशा गजरात मोकळ्या आवाजाने सामील होणे, यात काही आगळा आनंद आहे. या खेपेला पद्मावतीच्या इच्छेनुसार शंभर रुपये भरून आमंत्रणोत्सव केला. त्याचा लाभ इतकाच की सुलभ रीतीने आणि सावकाशपणे दर्शन घेता आले. नऊ, दहा आणि अकरा आक्टोबर असे तीन दिवस वेंकटेशासन्निध काढून दिनांक बाराला सकाळी गिरीवरून आम्ही खाली उतरलो. या शेषाचलपर्वताच्या पायथ्याशी वरून येणाऱ्या रस्त्याच्या टोकाला पर्वताच्या कड्यावरून अतिसुंदर जलधारा पडत असते. तिच्यापुढे कुंड आहे. त्याचे नाव कपिलतीर्थ. पुष्कळ यात्रेकरू त्या धारेखाली स्नान करतात. त्याप्रमाणे मी केले. लगेच जोराचा पाऊस आला त्यामुळे तिरुपती गावात पोचेपर्यंत पुन्हा भिजून ओलाचिंब झालो. हा गार पाण्याचा मारा आणि त्यावर लागलेला वारा याचा माझ्या प्रकृतीवर परिणाम झाला आणि त्यातून देहाला कायमची व्याधी चिकटली. अर्थात् ही गोष्ट पुढची. त्या वेळेस आम्ही आनंदलहरींवर विहरत होतो.

*

पश्चिम किनाऱ्याला समांतर असा सह्याद्री आपल्याकडे आहे. त्याप्रमाणे पूर्व

समुद्राशी साधारणपणे समांतर अशी एक डोंगरांची रांग आहे. तिच्या उत्तरेकडील टोकावर श्रीशैल मल्लिकार्जुन हे शिवदैवत आहे. मध्यावर अहोबल नारसिंह म्हणून नरसिंहाचे स्थान आहे. आणि दक्षिणेच्या टोकाला सप्त पर्वतरूपी सात फणा असलेला वेंकटाचल आहे. त्याच्यावर श्रीवेंकटेशाचे स्थान आहे. वेंकट हा शब्द मराठीमध्ये फार पूर्वीपासून काव्यात योजिलेला आढळतो. ' जे खळांची वेंकटी सांडो । ' असा ज्ञानेश्वरीच्या अखेरच्या पसायदानात एक पाठ आहे. वेंकटी म्हणजे वाकडेपणा, कुटिलता. वेंकट म्हणजे वाकडे, वाईट; ते नष्ट करणारा जो देव तो वेंकटेश. ही आध्यात्मिक उपपत्ती झाली. शेषाच्या शरीराच्या सात वळणांप्रमाणेच नागमोडी पर्वत तो वेंकटाचल, त्याच्यावर असलेला देव तो वेंकटेश्वर, अशी भौतिक दृष्टीची उपपत्ती देण्यात येते. पर्वताच्या नावावरून या देवाधिदेवाचे नाव पडले असेल किंवा कदाचित याच्या उलट प्रकार झाला असेल.

गिरीच्या व्यंकटेशाचे दर्शन हा एक अविस्मरणीय अनुभव आहे. आपल्या देशात आपल्या धर्माची जी पवित्र आणि रमणीय स्थाने आपल्या अंतःकरणात कोरल्यासारखी अढळ राहतात त्यांत हरिद्वारची हरीची पायरी, वाराणसीची विशाल गंगा यांच्याप्रमाणेच गिरीचे व्यंकटेशाचे मंदिर, याची गणना केली पाहिजे. हे ठिकाण रमणीय, तेथपर्यंत पोचण्याचा मार्ग रमणीय आणि तेथील देवाचे दर्शन अत्यंत रमणीय. एकाच वेळच्या दृष्टिभेटीने ते अंतःकरणात स्थिर होते.

महाराष्ट्रात याला गिरीचा बालाजी म्हणतात. यावरून हे ठिकाण डोंगरावर आहे, हे स्पष्ट होते. डोंगरांच्या सहा रांगा ओलांडल्यानंतर सातव्या रांगेच्या मध्यभागी परातीसारख्या खोलगट जागेत हे मंदिर वसले आहे. परातीसारख्या म्हणण्यापेक्षा सुपासारख्या म्हटल्यास अधिक शोभेल, कारण या स्थानाची पूर्वेकडची बाजू बऱ्याच अंशी मोकळी असून तिकडूनच प्रवेशाचा मार्ग आहे. पश्चिमेला पर्वत खूप उंच गेलेला असून नागाने आपली फणा पसरली आहे अशी कल्पना केल्यास ती श्रीविष्णूच्या पुराणांतरी वर्णिलेल्या शेषशायी स्वरूपाशी साम्य पावणारी आहे हे सहज लक्षात येते.

एकमेकांना लागून असलेल्या डोंगरांच्या या रांगा आणि त्यांना जोडणारे संधिप्रदेश मिळून सर्पाच्या शरीरासारखा नागमोडी आकार स्थूलमानाने तयार होतो म्हणून याला शेषाद्री असेही नाव पडले आहे. अर्थात त्याच्यावर अधिष्ठित असलेला देव शेषाद्रिनिवास या नावाने प्रसिद्ध व्हावा हे साहाजिक होय. या सातही डोंगरांना विशिष्ट नावे आहेत. शेषाद्रि किंवा शेषाचल, वेदाचल, गरुडाचल, वृषभाचल, अंजनाचल, नारायणाचल, आणि वेंकटाचल.

मंदिरापर्यंत जाण्यासाठी या डोंगरांमधून मोटारीचा सुरेख रस्ता केला आहे. घाटातील मार्गाप्रमाणे हा टोकदार वळणावळणाचा रस्ता असल्याकारणाने मोठमोठ्या चाळीस-पन्नास उतारूंच्या बसेस सावधगिरीने न्याव्या लागतात. हे सर्व डोंगर तांबड्या दगडांचे, हिरव्यागार वृक्षराजीने आच्छादित असल्यामुळे वनश्रीची शोभा

प्रेक्षणीय वाटते यात काही शंका नाही.

तिरुपतीपूर्व स्टेशनाला लागून ‘ तिरुपति तिरुमल देवस्थानम् ’ (T. T. D.) ची धर्मशाळा आहे. तेथेच त्यांची कचेरी व बसस्टेशन आहे. तेथून देवस्थान संस्थेच्या बसेस सारख्या चालू असतात. विशिष्ट यात्रांच्या महोत्सवांच्या प्रसंगी यात्रेकरूंचा एवढा प्रचंड ओघ चालू असतो की कितीही बसेस् सोडल्या तरी गर्दी आवरत नाही. १९६२ साली पहिल्या प्रथम आम्ही गेलो तेव्हा या ‘ क्यू ’ मध्ये बसून क्रमानुसार बस पकडून इतरांप्रमाणे प्रवास केला होता. त्या वेळेस सारखी वळणे घेणाऱ्या बसमुळे कलंडून इकडे तिकडे झोके खाणारी आमची शरीरे आणि भांडी आवरता आवरता पुरेवाट झाली होती. दुसऱ्या खेपेस १९६८ साली आम्ही टॅक्सी ऊर्फ भाड्याची मोटार स्वतंत्र रीतीने करून गेलो होतो. तिसऱ्या खेपेस ( १९७० ) तिरुपति ईस्टपर्यंत आगगाडीने न येता रेणिगुंट्याहून थेट मंदिरापर्यंत मोटार टॅक्सी करून गेलो. प्रत्येक खेपेस अधिकाधिक सुखाचा मार्ग आम्ही अवलंबिला. जितके सुख अधिक तितके श्रेय किंवा पुण्य कमी. सबंध डोंगर पायी चढून जाणाऱ्यांचा ध्येयवाद आणि तपोबल अधिक प्रखर यात शंका नाही.

पूर्वी गिरीची यात्रा महाबिकट होती. मोटारी नव्हत्या आणि डांबरी रस्ताही नव्हता. डोंगरी फरशी ठोकलेला खडबडीत पायरस्ता होता. त्या रस्त्याने यात्रेकरूंनी जथ्याजथ्याने चढण चढावयाची. प्राचीन महानुभावी वाङ्मयात अशा यात्रेकरूंच्या जथ्याला ‘ पोहा ’ म्हटले आहे. सध्या देखील हा पायरस्ता आहेच. त्याची आणि मोटार रस्त्याची अनेकवार भेट व परस्पर काटणी होते. मोटार रस्ता १२ मैल लांबीचा तर पायरस्ता ७ मैल आहे. पायथ्यापासून मंदिरापर्यंत चालत जाण्यास ४ तास लागतात असे म्हणतात.

लहानपणी आमच्या नातेवाइकांपैकी कुणीतरी लांबच्या आजी अगर आत्या गिरीची यात्रा करून यायच्या आणि त्या अवघड चढणीचे वर्णन करायच्या. पायांना चिंध्या बांधायच्या, पिंढऱ्या आणि गुडघे यांना फडकी आवळायची. काहीजणींनी पायांना आलेल्या फोडांचे चट्टे दाखवायचे. हे ऐकून व पाहून माझ्या मनाला भीती वाटायची नाही, तर उत्कंठा वाटायची. वाटायचे, आपण कधी असेच ती बिकट वाट चढून त्या अद्‌भुत देवाच्या मंदिरापर्यंत पोचू का ? आमचे वाडवडील प्रवासाच्या बाबतीत अगदी अनुत्सुक असले पाहिजेत. मूळचे कुलदैवत गिरीचा व्यंकटेश असून त्यांनी अगदी जवळच्या मिरजेहून फार तर साठ—सत्तर मैल अंतरावर असलेल्या कल्हळी येथील वेंकटेशाला आपले प्रतिनिधी कुलदैवत केले होते. आमच्या घराण्यात दंतकथा चालत आली ती या तर्काला पुष्टी देणारी :

वृद्धापकाळामुळे गिरीच्या वेंकटेशाला चालत जाववेना म्हणून एक पूर्वज मध्येच थकून बसले. तो किंचित डुलकी लागून त्यात दृष्टान्त झाला, असे सांगितले की, “ मी इथेच तुझ्या सन्निध आहे. जमीन उकरून पहा, मूर्ती मिळेल. तिची स्थापना करून

आराधना कर म्हणजे ती मला ( गिरीच्या वेंकटेशाला ) पोचेल. " त्याप्रमाणे मूर्ती प्राप्त झाली. तिजवर देवालय झाले, तोच कल्हळीचा वेंकटेश. देवतातत्त्वाचा विचार सोडून प्राकृतिक दृष्टीने पाहिल्यास, कोणीकडे गिरी आणि कोणीकडे कल्हळी, असेच म्हणावे लागेल. उपासनेतसुद्धा माणूस सुख आणि सौलभ्य पाहात असतो.

*

पहाटे तीन वाजता ' सुप्रभात् ' म्हणून देवाला जागे करण्याची स्तोत्रे आहेत, ती म्हणण्यास सुरुवात होते. त्यानंतर साडेतीनपासून देवाचे दर्शन आणि निरनिराळ्या उपचारांच्या अर्चना आणि सेवा यांची क्रमबद्ध परंपरा जी सुरू होते ती रात्री साडे-अकरापर्यंत सारखी चालू असते. देवाच्या निरनिराळ्या प्रकारच्या सेवा अथवा उपचार भक्तांना आपल्या खर्चाने करावयाच्या असल्यास तसेही करता येते. निर-निराळ्या प्रकारचे ठरवून दिलेले दर आहेत. त्याप्रमाणे एक रुपयापासून २००० रुपयांपर्यंत निरनिराळ्या प्रकारच्या सेवा करणारे भक्त तेथे निरंतर उपस्थित असतात आणि त्यांच्या सेवा सारख्या चालू असतात.

आम्ही संकल्पिल्याप्रमाणे दोन दिवस आणि तीन रात्री श्रीवेंकटेशासन्निध काढल्या. वेंकटेशाची मूर्ती पुष्पांनी सजवितात त्याला पूलंगी सेवा म्हणतात. देवाला निजविण्याच्या वेळी जी पूजा व आरती करतात तिला आपल्याकडे शेजारती म्हणतात; तेथे एकान्त सेवा हे नाव आहे. चांदीच्या पाळण्यासारखा पलंग, त्यात खुतनीच्या व मखमलीच्या गाद्यागिर्द्या वगैरे. निजविण्यासाठी देवाची शय्यामूर्ती आहे. तिला गाभा-ऱ्यातून वाजत आणून निजवतात. या एकान्तसेवेला रात्री साडेदहाच्या सुमारास प्रारंभ होऊन साडेअकराच्या आतच देव झोपी जातात.

पूलंगी सेवा आणि एकान्त सेवा यांचा सोहळा आम्ही १९७० च्या खेपेमध्ये पाहिला. गुरुवार, रात्री ९ चा सुमार, पाऊस थोडा पडायला लागला होता. अंगावर पांघरुणे आणि छत्र्या घेऊन आम्ही मंदिरात आलो. इतर दर्शनेच्छूंची थोडी दाटी होतीच. देवाच्या मूर्तीवरील डोळे व नाक अर्धेअधिक झाकून टाकणारा गंधलेप या वेळी नव्हता. फक्त कपाळावर रामानुज संप्रदायाचा नाम होता. मूर्तीवरील सुवर्ण-रत्नांचे अलंकार काढलेले असून आपादमस्तक अनेकरंगी फुलांचा साज चढविला होता. त्यात मूर्ती फार मनोहर दिसत होती. दार उघडले आणि पूजा व आरती झाली. नंतर उत्सवमूर्तीची पूजा व शेजारती; ही गाभाऱ्यात चालू असतानाच बाहेर मंडपा-मध्ये पाळणा टांगणे, त्यात गाद्या–गिरद्या घालणे चालू होते. आम्ही त्याच्या जवळच होतो. इकडे पाऊस सारखा वाढत होता. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे वेडावाकडा होऊन अंगावर येत होता. काही वेळाने पटांगण भरले आणि चौथऱ्यावर पाणी येऊ लागले. आम्ही आत आत सरकू लागलो, मागोमाग पाणी चढू लागले. मला हुडहुडी भरली. भालदार चोपदार उपस्थित होते. वाद्याच्या गजरात देव आले, त्यांना निजविण्यात

आले. या वेळी गावयाची पदे ठरलेली आहेत. गायक गाऊ लागले. पण पाऊस इतका जोराचा होता की सर्वांचे अर्धे लक्ष तिकडे होते. गार वाऱ्याबरोबर पावसाचे ओसडे शिरशिरी आणीत होते. आम्ही परत निघालो. पटांगणात पिंढरीएवढे पाणी. बाहेर आणखी जास्त. अखेर संपूर्ण भिजून निथळत असलेले आम्ही निवासस्थानी येऊन पोचलो.

देवदर्शनासाठी लोकांची रीघ वर्षाचे तीनशे पासष्ट दिवस येथे सारखी लागलेलीच असते. रोज सरासरीने पाच हजार लोक वेंकटेशाचे दर्शन घेतात. आणि निरनिराळ्या सेवांच्या रूपाने किंवा गुप्तदानाच्या रूपाने देवाला जे द्रव्य आणि इतर वस्तू अर्पण केल्या जातात त्यांची किंमत मिळून एकंदर देवाला वार्षिक उत्पन्न ४ कोटींच्यावर होते, असे देवस्थान कमिटीने प्रकाशित केलेल्या वृत्तान्तावरून कळते. ख्रिस्त्यांची व इतर सर्व धर्मीयांची मंदिरे धरूनसुद्धा एवढे प्रचंड उत्पन्न असलेले मंदिर जगात दुसरे कोणतेही नाही असे म्हणतात.

काही तरी प्रचीती येत असल्याशिवाय इतकी प्रचंड लोकप्रियता प्राप्त होणे शक्य नाही. श्रद्धा कितीही भोळसट झाली तरी ती लाखो सुशिक्षित आणि अशिक्षित माणसांची शतकानुशतके अखंड चालू राहिलेली जर असेल तर तिला अनुभवाचा काहीतरी बळकट आधार असला पाहिजे. हा अनुभव मानसिक आनंदाचा, साक्षात्काराचा असो किंवा दृश्य फलप्राप्तीचा असो. वेंकटेश ही देवता सात्त्विक गुणसंपन्न, मंगलदायक, ऐश्वर्यप्रद, कामना पूर्ण करणारी आहे, अशी भक्तांची दृढ श्रद्धा आहे. या देवतेच्या मंदिराचा जो अंतर्भाग आहे त्याचे नाव आनंदनिलयम् असे आहे. इथे सर्व काही आनंदमय आहे.

आनंदाचे सर्व पैलू किंवा परिच्छेद इथे दिसून येतात. स्वच्छता हा आनंदाचा महत्त्वाचा पैलू आहे. आनंद मलिनतेचा कधी सहचारी होऊ शकत नाही. स्वच्छतेबद्दल येथे कमालीची दक्षता घेण्यात येते. दर्शनेच्छू माणूस महाद्वारातून आत प्रवेश करतो तो पाय धुऊनच जातो. महाद्वाराच्या तळाशी भोके असलेले नळ लावले असून माणसांचे पाय धुतले जातील अशा बेताने त्यातून निरंतर पाणी उडत असते. पुढे लगेच पायपुसणी टाकलेली. त्यांच्यावर पाय पुसले जातात. मंदिराच्या आतल्या आवारात केरसुणी आणि तिच्या मागून पाण्याचा नळ सारखा फिरत असतो. धूम्रपान, पान खाणे आणि मादक पदार्थ घेणे यांना तर बंदी आहेच. बहिरंगाबरोबर अंतरंगही निर्मळ, प्रसन्न राखावे असे येथे सुचविले जाते आणि ही सूचना यात्रिकांकडून बहुधा कसोशीने पाळली जाते.

सात्त्विक आणि पौष्टिक अन्न हा आनंदाचा दुसरा पैलू. देवाला येथे भोग किंवा नैवेद्य अर्पण केला जातो. ते अन्न शुद्ध रीतीने बनवलेले, अत्यंत सात्त्विक असते. त्यात वनस्पती किंवा गोडे तेल किंवा मिरची यांचा उपयोग करण्यात येत नाही. तिखटपणाकरिता मिरी वापरली जातात. सर्व पदार्थ शुद्ध तुपात बनविलेले असतात. देवाला

दुपारी नैवेद्य अर्पण केला जातो आणि त्या वेळेस जे भक्तजन मंदिरात उपस्थित असतात त्यांना तो प्रसाद वाटला जातो. शिवाय नंतर केव्हाही प्रसादाचे पदार्थ विकत मिळू शकतात. वडे, लाडू इत्यादी पदार्थ पुष्कळ दिवस टिकतात.

आनंदमयतेचे आणखी एक लक्षण असे की, येथे क्लेशकारक व्रते, उपासतापास, तपश्चर्या यांचे महत्त्व नाही. परमेश्वराचे नामस्मरण, दर्शन, अर्चन आणि प्रसादग्रहण हीच येथे येणाऱ्या भक्ताची इतिकर्तव्यता दिसते. क्वचित एखादा लोटांगणे घालीत प्रदक्षिणा करणारा किंवा अशाच क्लेशकारक मार्गांनी उपासना करणारा माणूस आढळतो, नाही असे नाही. अशा व्यक्तींनी काही नवस बोलला असेल किंवा त्यांची ती निष्काम उपासनादेखील असू शकेल. पण येथे अशी क्लेशकारक उपासना करणारे फार थोडे, दहा हजारांत एखादी व्यक्ती असेल नसेल. एकंदरीत भगवद्गीतेच्या १७ व्या अध्यायात सात्त्विक आहार आणि तप यांचे जे वर्णन केले आहे ते येथील परिस्थितीला बरोबर लागू पडते.

मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः ।
भावसंशुद्धिरित्येतत् तपो मानसमुच्यते ॥ १७·१६

" मन प्रसन्न ठेवणे, सौम्यता, मौन म्हणजे मुनीप्रमाणे वृत्ती असणे, आत्मसंयम आणि शुद्ध भावना हे मानस तप होय. " हे जे गीतेत वर्णन केले आहे त्याप्रमाणे या मंदिरामध्ये जाणत्या माणसांची वागणूक असते. येथे गजर होत असतो तो नामस्मरणाचा. ' वेंकटरमणा गोविंदा ' हा घोष सारखा कानावर पडत असतो. बाकी यात्रेकरूंचे बोलणे एकमेकांशी खालच्या आवाजात सौम्यपणाने होत असते.

हे वेंकटेशाचे मंदिर तसे प्रशस्त आहे. पण जमणाऱ्या गर्दीच्या मानाने आटोपशीरच म्हटले पाहिजे. मंदिराला तीन प्राकार किंवा तट आहेत. बाहेरच्या तटाच्या पूर्वाभिमुख महाद्वारावर गोपुर आहे. त्यावर वेंकटेशाच्या चरित्रातल्या काही प्रसंगाच्या आकृती काढल्या आहेत. दक्षिणेतील इतर प्रसिद्ध देवळांच्या मानाने गोपुर लहानसे आहे. महाद्वारातून आत गेल्यावर उजव्या बाजूस विजयनगरचा सम्राट कृष्णदेवराय आणि त्याची राणी व त्याचा प्रधान यांच्या तांब्याच्या मूर्ती आहेत. त्या जवळ जवळ मनुष्याच्या आकारच्या आहेत. थोडेसे पुढे गेले म्हणजे डाव्या बाजूला सम्राट अकबराचा प्रधान राजा तोरडमल आणि त्याची राणी यांचे तांब्याचे पुतळे आहेत. हे सत्ताधीश वेंकटेशाचे भक्त होते. तिथेच मध्यावर ध्वजस्तंभ आहे. तो सोन्याचे पाणी दिलेल्या तांब्याच्या पत्र्याने मढवलेला आहे. त्याच्या अलीकडे तसाच एक बुटका खांब आहे. त्याला ' बलिपीठम् ' असे म्हणतात. तेथे देवाला उद्देशून नारळ फोडतात, वाती लावतात व कापूर जाळतात. ध्वजस्तंभ-मंडपाच्या पुढे गेले म्हणजे मंदिराचा दुसरा तट लागतो. त्याच्या आत समोरच्या म्हणजे पूर्वेच्या बाजूस रुंद मंडप आहे. डावीकडचा भाग लोखंडी गजांनी बंदिस्त केला असून त्यात देवस्थानाचे कार्यालय आहे. रोज होणार असलेल्या निरनिराळ्या सेवांचा कार्यक्रम तिथे कळतो आणि कोणा

यात्रेकरूला विशिष्ट सेवा किंवा पूजा करावयाची असल्यास त्याचे पैसे तेथे घेण्यात येतात व पावती देण्यात येते. पैसे देऊन दर्शन घेणारे जे विशिष्ट भक्त असतात त्यांच्या रांगा या तटाच्या आतून सुरू होतात. या तटाला लागून आतल्या बाजूला रुंद सोपा आहे. आतल्या भिंतीवर साफ गिलावा केला असून त्यावर जलरंगांनी वेंकटेशाच्या चरित्रातील प्रसंगांची सुंदर चित्रे काढली आहेत. ही चित्रे काढविण्याचे काम त्या वेळी चालू होते. पूर्वेकडील मंडप जसा रुंद आहे तसाच पश्चिमेकडेही आहे. देवाची मयूर, अश्व, सिंह, भूपालरथ इत्यादी वाहने नेहमी पश्चिमेकडील ओवरीमध्ये बंदिस्त असतात. यांपैकी काही सुवर्णाने मढविलेली आहेत, आणि काही चांदीची आहेत. भिंतीला लागून असलेल्या ओवऱ्यांच्या आणि मंडपाच्या खाली चारही बाजूंनी मोकळी जागा आहे. हे प्रदक्षिणेचे पटांगण. या पटांगणात डाव्या बाजूला वरून आच्छादन असलेला चौथरा आहे. तिथे मुंजी व लग्ने होतात. इथे त्याकरिता चातुर्मासाचा अटकाव नाही, मुहूर्त पाहावा लागत नाही. प्रदक्षिणेच्या चवथ्या भागात आपण आलो म्हणजे सोन्याने मढविलेले देवाचे जे शिखर आहे त्याच्या वायव्य कोपऱ्यात वेंकटेशाच्या मूळ मूर्तीची बरोबर प्रतिमा अशी सोन्याची लहानशी ( सुमारे एक फूट उंचीची ) मूर्ती बसविलेली आहे. गर्दीमुळे मूळ मूर्तीचे दर्शन होऊ शकले नाही तर या मूर्तीचे दर्शन घेतल्याने वेंकटेशाच्या दर्शनाचे श्रेय मिळते. या पटांगणात बकुलमालिका, आदिनरसिंह यांची छोटी मंदिरे आणि पुढे भिंतीला लागून श्रीरामानुजाचार्यांचे मंदिर आहे. त्यात मागे आचार्यांची लहानशी प्रस्तर-मूर्ती असून पुढच्या बाजूला धातुमूर्ती आहे. त्याच्या पलीकडे एक-दोन दारांमधून प्रसाद विकत देण्याची व्यवस्था आहे. त्यालाच लागून पुढे देवाचे स्वयंपाकघर आहे.

या प्रदक्षिणेच्या पटांगणाच्या आत तिसरा तट असून त्याच्या आत देवाचे मुख्य मंदिर आहे. त्याच्यासमोर लोखंडी जाळीने बंदिस्त असा मंडप आहे, त्याला रंगमंडप किंवा हुंडीमंडप म्हणतात. हुंडी म्हणजे द्रव्य. या मंडपाच्या उत्तर बाजूस कापडाने वेढलेले भले मोठे पंचपात्र ठेवलेले असून त्याची वरची कडा माणसाच्या उंचीपेक्षा फूटभर अधिक उंच असते. देवाला जी वस्तू अर्पण करावयाची असेल ती, नाणे, नोटा, दागिने, भांडी, वस्त्रे, काहीही असो, या हुंडीत गुपचूप टाकून द्यावयाची. असंख्य भक्त या हुंडीमध्ये गुप्तदान करीत असतात. रोज सकाळी दहा वाजता पंचांच्या समोर हुंडी मोकळी करून त्यातील द्रव्ये आणि इतर वस्तू मोजतात आणि देवाचा दरबार भरवून हे सर्व त्याला अर्पण करण्यात येते.

देवाचे शिखर सोन्याचे पाणी दिलेल्या पत्र्यांनी मढविलेले; देवाच्या मुख्य मंदिराचे दरवाजे तसेच पिवळ्या धमक रंगाने चकाकणारे; दाराची चौकटही तशीच. आत गेल्यावर मध्ये खांब असलेले चौकोनी बंदिस्त मध्यगृह आहे. तेथे उजव्या बाजूला तुपाचे दिवे नेहमी तेवत असतात. त्यानंतर देवाच्या गाभाऱ्याची अरुंद वाट आहे. गाभाऱ्यात श्रीवेंकटेशाची मूर्ती विराजमान आहे. मूर्ती चतुर्भुज, काळ्या पाषाणाची,

अति मोहक आहे. साधारण पाच फूट उंचीची असावी. वरच्या दोन हातांत शंखचक्र, खालचा डावा पंजा गुडघ्यावर टेकलेला, आणि उजवा सरळ खाली बोट केलेला. गाभाऱ्याच्या बाहेरच्या सर्व भागात दर्शनेच्छूंच्या रांगेसाठी काठ्या व दोऱ्या बांधून व्यवस्था केलेली असते. उजवीकडच्या रांगेतून येऊन दर्शन घेऊन डावीकडे वळून परत फिरावयाचे आणि बाहेर पडून प्रदक्षिणेच्या वाटेला लागायचे. देवदर्शन घेऊन प्रदक्षिणेच्या वाटेत रामानुजाचार्य आणि इतर देवतांची दर्शने घेऊन, इच्छेनुसार प्रसाद घेऊन आनंदित मनाने मंदिराच्या बाहेर पडलो म्हणजे उत्तरेच्या बाजूला एक बांधून काढलेला तलाव दृष्टीस पडतो; ही स्वामी पुष्करिणी. तिला प्रदक्षिणा करीत आपण जाऊ लागलो म्हणजे वायव्य टोकाला एका मंदिरात आपण जाऊन पोहोचतो. हे वराहस्वामीचे मंदिर. आदिवराहाची छोटी मूर्ती इथे विराजमान आहे. ही इथली मूळ देवता. प्रथम स्वामी पुष्करिणीचे स्नान करून वराहस्वामीचे दर्शन घेऊन मग वेंकटेशाच्या दर्शनाला जायचे, असा शास्त्रोक्त यात्रेचा क्रम आहे. परंतु वेंकटेशाच्या मंदिरातील अमाप गर्दी आणि वराहमंदिरातील पातळाई किंबहुना शुकशुकाट यावरून यात्रेचा शास्त्रोक्त क्रम फार थोडे पाळतात, असे दिसते.

*

मंदिराच्या आवारात रामानुजाचार्यांचे मंदिर आहे ते सकारण आहे. रामानुज हे वेदान्ताच्या विशिष्टाद्वैत मताचे संस्थापक, ब्रह्मसूत्र, उपनिषदे आणि गीता यांच्यावर भाष्य लिहून त्यांनी आपल्या संप्रदायाची प्रतिष्ठापना केली आणि दक्षिणेतील अळवारांच्या विष्णुभक्तीचा प्रसार केला. गिरीच्या वेंकटेशासाठी पूजा आणि स्तोत्रपाठ इत्यादी अर्चना, यांचा विधी त्यांनी घालून दिला, त्याप्रमाणे आजपर्यंत निरंतर क्रम चालत आला आहे.

हा वेंकटाचल पुष्कळ उंच आणि विस्तृत असल्यामुळे, तसेच येथे पाऊस बराच पडत असल्यामुळे, अनेक ठिकाणी कड्यांवरून पाणी पडत असावे किंवा कपारीतून झिरपत असावे हे स्वाभाविक होय. अशी स्थळे तीर्थे मानिलेली असून त्यांना निरनिराळी नावे आहेत. पापविनाशनम्, आकाशगंगा, गोगर्भतीर्थ, रामकृष्णतीर्थ, तुम्बुरुतीर्थ, कुमारधारा तीर्थ इत्यादी. आम्ही टॅक्सी करून सुमारे तीन मैल असलेल्या ‘ पापविनाशनम् ’ला आणि तिथून येताना वाटेतच असलेल्या आकाशगंगेला आणि गोगर्भतीर्थाला जाऊन आलो ( १९७० ). दोन्ही ठिकाणी वरून थोडेसे पाणी पडत होते. त्याच्याखाली मुंडण केलेल्या यात्रेकरू स्त्रिया स्नान करीत होत्या. तीर्थ म्हणून यांचा महिमा भाविकांच्या दृष्टीने आहे. निसर्गसौंदर्याच्या दृष्टीने जोग धबधब्यासारखी दृश्ये पाहिलेल्या आम्हांला वीस-पंचवीस फुटांवरून क्षीण धारांनी पडणाऱ्या या पाण्याचे विशेष काही वाटले नाही. त्यातल्या त्यात पर्वताच्या पायथ्याशी असलेले कपिलातीर्थ पाहण्याजोगे आहे. जराशा पुढे

आलेल्या कड्यावरून उंचावरून बरेचसे पाणी खाली पडत असते व बाजूस कपिलेश्वराचे मंदिर आहे. पहिल्या खेपेला मी इथे स्नान केले होते. या सर्व टापूत शंकराचे हे एक मंदिर आहे. त्याच्या वरच्या बाजूस कपिला गाय दगडात कोरलेली आहे. या मंदिराला रंग दिला असल्यामुळे त्याच्या सौंदर्याचा बेरंग झाला आहे. दगडात कोरलेल्या जुन्या शिल्पकृतींना रंग देण्याचे हे खूळ कोणाच्या डोक्यातून निघाले असेल ते असो. काही वर्षांपूर्वी या आचरटपणाची लागण दक्षिणेत होऊन मदुरेच्या मीनाक्षी मंदिराला तेल्या रंग देण्याचा बूट कोणाच्या तरी डोक्यातून निघाला होता.त्यावर सर्वत्र कडक टीका झाल्यामुळे तो सोडून देण्यात आला. दरम्यानच्या काळात काही भागाला रंग देऊन तो विद्रूप करण्यात आला. ते शल्य कायम होऊन बसले आहे.

प्रांता—प्रांतातून चालीरीती किती निराळ्या असतात! इथे आल्यानंतर बायकामुलांसह सर्वांनी क्षौर करावयाचे असा आंध्र-प्रांतीयांचा प्रघात आहे. लहान मुली, कुमारिका आणि सवाष्ण बायका सगळ्या सफाई गोटा करून उवड्या डोक्याने सगळीकडे हिंडताना दिसतात, तेव्हा आपणाला फार चमत्कारिक वाटते. पुरुष तर शेंडीदेखील न ठेवता साफ हजामत करवितात. इथे 'कल्याणकट्ट' म्हणून देवस्थानाचा केस काढण्याचा मोठा हॉल आहे. देवस्थानने ठरविलेल्या पैशामध्ये हजामत करून देणारे न्हावी तेथे ठेवले आहेत. दारात पैसे भरून पावती घेतली आणि ती न्हाव्याला दिली की संपूर्ण हजामत होते. कल्याणकट्टयात केस काढावयाचे, लगेच स्वामी पुष्करिणीत जाऊन स्नान करावयाचे आणि मग देवदर्शनाला जावयाचे, अशी इथली पद्धत. स्वामी पुष्करिणीवर संकल्प वगैरे सांगणारे उपाध्ये असतात. तेही देवस्थानाने नेमलेले. स्वामी पुष्करिणी मोठे झाले तरी ते कुंडच आहे. हजारो लोकांच्या स्नानाने त्यातले पाणी मलिन होणार. पूर्वी त्या पाण्याला वास मारत असे. पण या खेपेस ( १९७० ) पाहिले तो पाणी स्वच्छ करण्याची योजना अमलात आलेली दिसली. पुष्करिणीमध्ये एक उस्वास बांधलेला असून, त्यातून स्वच्छ केलेले पाणी सारखे पडत होते.

*

वेंकटाचलाच्या पायथ्याशी असलेले तिरुपती हे शहर बरेच मोठे आहे. साधारणपणे बुदबळाच्या पटाप्रमाणे काटकोनात असलेले रस्ते, पक्क्या इमारती आणि बऱ्यापैकी स्वच्छता, यामुळे एक रात्र तिथे घालविणे आम्हाला कष्टाचे वाटले नाही. दुसऱ्या व तिसऱ्या खेपेस हॉटेलात उतरलो असे आठवते. गिरीवरून उतरल्यानंतर तिरुपतीला मुक्काम करावाच लागतो. कारण गोविंदराजाचे आणि पद्मावतीचे दर्शन घेतल्याखेरीज यात्रा पूर्ण होत नाही अशी समजूत आहे. गोविंदराजाचे मंदिर गावात आहे. त्याचे आवार फार विस्तीर्ण आहे आणि गोपुर खूप उंच आहे. गोविंदराजाची मूर्ती आडवी शेषावर पहुडलेली व भव्य आहे.

पर्वतावरील वेंकटेशाच्या मंदिरात सर्व काही आनंदमय आहे, अशी भावना

होते, तर पायथ्याच्या गोविंदराज मंदिरात विशालतेचा साक्षात्कार होतो. मंदिराच्या आवारात श्रीकृष्णाचे, रामानुजाचार्यांचे आणि इतर काही देवतांची लहान मंदिरे आहेत. गोविंदराजाचे मंदिर रामानुचार्यांनी बांधविले आणि तिरुपती गावही त्यांनीच वसविले अशी प्रसिद्धी आहे. तिरुपतीला देवस्थानाच्या धर्मशाळा खूप मोठमोठ्या आहेत. त्यांत सोईस्कर जागा आणि स्वयंपाकाची साधने मिळू शकतात. स्वयंपाक करायचा नसेल त्यांच्यासाठी भोजनालय आहे. पहिल्या खेपेस आम्ही धर्मशाळेत उतरलो होतो. तिरुपतीला रात्रीचा मुक्काम करून दुसरे दिवशी सकाळी सायकल रिक्षा करून पद्मावतीला गेलो. तीन मैल अंतरावर असलेल्या तिरुचानूर खेड्यात पद्मावतीचे मंदिर आहे. मंदिरासमोर विस्तीर्ण बांधीव तलाव आहे. त्याचे नाव पद्मसरोवर. या सरोवरातून कमळावर पद्मावती प्रकट झाली अशी कथा आहे. मंदिराची धाटणी तीच. मात्र गोविंदराज मंदिरातील विशालतेचा व भव्यतेचा भास इथे होत नाही. पद्मावतीची मूर्ती काळ्या पाषाणाची मांडी घातलेली अतिशय दर्शनीय आहे. पत्नी पद्मावतीने देवी पद्मावतीला सौभाग्य वायन केले आणि रक्त चंदनाच्या देवाच्या मूर्ती घेतल्या. तिरुपती गावात परत येऊन गोविंदराजाचे दर्शन घेऊन आम्ही भीमाच्या हॉटेलात जेवायला गेलो. इथे मुंबई पद्धतीचे जेवण मिळते अशी माहिती पद्मावतीने अगोदरच मिळवून ठेवली होती. नागपूराहून निघाल्यापासून जेवणाचे खरेखुरे समाधान इथेच आम्हाला लाभले असे म्हटले तरी चालेल.

□

अकरा

# रायगिरी : एक प्रदक्षिणा

## गो. नी. दांडेकर

शेवटी संध्याकाळी सगळ्यांना टकमकावर घेऊन गेलो. खालचं भयाण रान दाखवलं. विचारलं,

“ या रानातून तुम्ही माझ्यावरोबर धावणार आहात का ? या दरेकपारीतून ? या दुर्गम खिंडीतून ? तुम्हांला सांभाळता सांभाळताच माझा अर्धा दम खलास होईल ! ”

तेव्हा मग तापलेलं वातावरण शांत झालं, अन् गिर्यारोहणमंडळानं आम्हा तिघांनाच मोकळ्या मनानं गडाला प्रदक्षिणा घालायची अनुमती दिली.

पहाट फटफटली. तळातल्या डोंगरामधून प्रकाश वर डोकावू लागला. आम्ही तिघे तयार झालो. मी पेन्शनीत निघू पाहात असलेला, अन् मजबरोबर दोन नव्या

दमाचे चित्ते, अवी अन् विजू. तिघांनीही कमरांना सुरे बांधले. चिऱ्याच्या मजबूत काठ्या उचलल्या. पाण्याकरिता गंगासागरातून भरून घेतलेली एक पाणथैली. तहान-लाडू, भूकलाडू अन् महत्त्वाची वस्तू— माझा कॅमेरा.

झाकारानं झाकलेल्या धर्मशाळेच्या दाराशी सगळं गिर्यारोहण-मंडळ आम्हांला निरोप देण्यासाठी उभं झालं. हत्तीतलाव झपाट्यानं मागं टाकून आम्ही हात हलवीत त्यांच्या अगत्याचा स्वीकार केला, अन् पायऱ्या उतरायला प्रारंभ केला.

फारा दिवसांचा संकल्प आज पुरा होत होता. किती तरी वर्षांपासून मनाशी खूणगाठ बांधून ठेवली होती की, रायगडास प्रदक्षिणा घालायची. हा बेलाग दुर्गराज चहूबाजूंनी न्याहाळायचा. शिवछत्रपतींनी आणि शहाजीराजांनी तो असाच न्याहाळला होता. त्याचं दुर्गमत्व पाहून ते विस्मित झाले होते. जो राजा एका दुर्गावर जन्मला आणि जन्मभर दुर्गांचं राजकारण करीत गेला, ज्यानं सगळं सह्याद्रिमंडळ पायांखाली घातलं, तो हरखून जाऊन म्हणाला होता, “ बहुत बेलाग दुर्ग. तख्तास जागा चखोट. तख्त इये गडीं स्थापावें ! ”

आपणास तर काही तख्त स्थापायचं नाही, ही पक्की गोष्ट ! पण ज्यामुळं राजा शिवछत्रपतींच्या मनी विस्मय दाटला, तो दुर्ग दिशांदिशांतून पाहावा असा बेत गेली कित्येक वर्षं रचीत होतो. रायगडी किती वेळा आलो, त्याची काही मोजदाद नाही. खेड्यात राहणारा जसा सहजगत्या रावळात जाऊन गप्पा हाणीत बसतो, तसा मी सहज रायगडी जाऊन येतो. त्या खेडुताच्या मनी रावळात शिरताना काही थोडा असतो दैवताविषयींचा आदर. काही थोडं रिकामपणही· त्याला देवळाकडे लोटीत असतं. रिकामपण कोण जाणे, पण रायगिरीविषयी अंतरी असलेला आदरमिश्रित विस्मय मात्र मला दर वेळी रायगडी घेऊन गेलेला आहे. अमुकच एके वेळी किंवा अमुकच एका ऋतूत रायगडास जावं असं बंधन नाही. पावसाळा, उन्हाळा हिवाळा— सर्व ऋतूंत राय-गडची वारी घडली आहे. काही ठिकाणं अशी, की कितीही वेळा पाहिली तरी त्यांचं नवीनपण मळत नाही. त्यांच्याविषयीचं कुतूहल शमत नाही. रायगडचं तसं आहे. (इतक्या वेळा रायगडावर जाऊनदेखील अजून त्याचं नवेपण कोरं करकरीत आहे.) ज्या सुवासानं त्याच्याभोवती वेढा दिला आहे, तो लवलेश उणावत नाही.

मनी असं नाना परीचं उन्मळत होतं, अन् आम्ही लांबलांब ढांगा टाकीत किल्ल्यातल्या पायऱ्या उतरून महादरवाजा गाठलादेखील. पलीकडला उतार म्हणजे ब्याण्णव पायऱ्या. त्या पार करून आम्ही अळूच्या रुखांखालून अन् उंबरांखालून वाट पार करू लागलो.

सूर्योदय व्हायला अजून वेळ आहे. काही पाखरं सूर्योदयापूर्वी अर्धा-पाऊण तासापासून बोलायला लागतात. ही पाखरं कधी दिसली नाहीत फारशी. पण स्वर मात्र अतिशय मोहक आहे. तारशहनाई वाजावी तसं वाटतं. आसही चांगली भरपूर आहे. तोटकी नाही. असा वेधक सरगम्, की काही पुसू नये ! थक्क होऊन

ऐकत राहावं. ही पाखरं सह्याद्रिमंडळाच्या अंतर्भागात चहूकडे आढळतात. सपाटीवर मात्र ऐकू येत नाहीत.

या पाखरांचं नित्य परिचयाचं वेधक संगीत ऐकतच कड्याखालची वाट संपवून वाळसुऱ्याची खिंड ओलांडली. लिंबा धनगर आमच्यासाठी दूध घेऊन गड चढत होता. तो भेटला. त्यानं रामराम घालून बजावलं, की वाट अवघड आहे, एकटे जायचं साहस करू नका. वाडीत रंगू कोतवाल तुमची वाट पाहात थांबला आहे. त्याला घेऊन पुढं व्हा ! अन् मग तो मागं वळून त्या पाऊण मैलावरल्या वाडीत असलेल्या रंगूला हाका घालीत राहिला. खूबलढा बुरूज मागं टाकला, अन् आम्हीदेखील रंगूला हाका ठोकायचा सपाटा चालवला. काही प्रयोजन होतं असं नव्हे. खरं बोलायचं तर आम्हांला बरोबर कुणी नको होता. त्या अनोळखी प्रदेशातलं हे कवतिकाचं साहस आपलं आपणच करावं असं वाटत होतं. पण उघड्या रानात हाका घालायचाही एक मोह असतो. आम्ही तो आवरू शकलो नाही, अन् परिणामी रंगू गळ्यात पडला !

एकाक्ष रंगू ! त्यामुळंच की काय, तीस वर्षं वय होऊनदेखील बायको न मिळालेला. चहूबाजूंनी उणा राहिलेला. पायीची बेडी तर खरीच, पण समाधान एवढंच की, या राहाळातला एक माणूस आपल्याबरोबर आहे.

रंगू भाकरी आणायला घरी गेला, तोवर वाडीचा परिसर न्याहाळू लागलो. वाडी हे रायगडाच्या जीवनकथेतील महत्त्वाचं पात्र. गडासंबंधीच्या अनेक घटना इथं घडलेल्या. ही गडाची पेठ. वर अडीचशे इंच पाऊस, अन् तुफान वादळ. हिरव्या पानावळीवरसुद्धा बुरशी यायची, मग मीठगूळ कसा साठवता येणार ? तेव्हा अशा पावसाळ्यात खराब होणाऱ्या मालाचा साठा वाडीतल्या पेठेत असायचा. शिवाय वाडी हे एक जबरं नाकं. मोक्याचा पहिला पाहारा वाडीत असायचा. तेव्हा त्या पाहाऱ्याच्या अनुसंधानानं आणखी काही अधिकारी वाडीत राहू लागले. त्यांच्या चिरेबंदी वाड्यांचे चौथरे इथंच. १८१८ मध्ये इंग्रजांनी रायगड धुळीस मिळवला, तेव्हा त्यांचा कॅम्प इथंच होता. मेजर हॉलशी किल्लेदाराची गाठभेट इथंच झाली. तहावर सह्या इथंच झाल्या. वाडीचं स्मशान महत्त्वाचं. काही नामवंतांचे अंत्यसंस्कार इथंच झालेले. संभाजीराजांच्या तारुण्यातील सैल वर्तनाची एक कथा— त्या सती गोदावरीची समाधि इथंच. रंगूला वेळ होता, तोवर धावत जाऊन वाड्याचे चौथरे न्याहाळून आलो. स्मशानात गोदावरीच्या समाधीजवळ क्षणभर उभा राहिलो. मनात म्हटलं, स्त्रीचरित्र अगम्य, हे खरं. गोदावरीनं शिवछत्रपतीजवळ आळी घेतली की, मला दाहसंस्कार व्हावा, तो संभाजीच्या हातानं !

रंगू आला, तोवर पावणेसात झाले. मग मात्र क्षणाची उसंत न खाता तडातडा निघालो. रंगू बैजवार बेत आखू लागला. वाळणकोंडीला जायचं. तिथल्या डोहातले मासे बघायचे. दुपारी मोठ्या वाटेनं वाघोली गाठायची. संध्याकाळी वाडीला परतायचं. कड मोडल्यावर थंड वेळी गड चढायचा.

मी म्हटलं, की मासे खूप बघितले आहेत. गडाची प्रदक्षिणा ही मुख्य गोष्ट, तेव्हा खाली सपाटीवर उतरायचं नाही. गडाचा उभा कडा सोडायचा नाही. तो उजव्या हाताला ठेवून गडाभोवती हिंडायचं. गडाचा घेरा तपासायचा. रंगू हिरमुसून बोलला, की तिकडे सगळं भयाभया रान ! वाट अशी कुठंच नाही. तुमच्यासारख्या ‘ साहेब ’लोकांना मी त्या आडवाटेला नेणार नाही. मनात हसून म्हणालो, मी साहेब काय रे ? तू चल ! आडरानाची रे काय बिशाद !

टकमकाला वळसा घालीत चिंचोळ्या पठारावरनं निघालो. टकमकाचं भयाणपण वरून नेटकं लक्षात येत नाही. ते कळतं खालून. वर निरखता डोईवरची टोपी पडावी, असा उंचावा. कडा नीट उभा आहे. वरून खडा टाकला, तर तो थेट दोन हजार फूट खाली अगदी रेषेत येऊन पडायचा. उंचावरून खाली पाहिलं तर अनेकांचे डोळे फिरतात म्हणे. इथं उलट आहे. पुढं अंतराळात घुसलेलं कड्याचं टोक न्याहाळता न्याहाळता चक्कर यायला लागते. टकमक नाव अगदी यथार्थ आहे.

(मजल कापीत होतो, अन् टकमक चहू अंगांनी पाहून थक्क होत होतो) अवघं महाराष्ट्रमंडळ पाहता असा उत्तुंग टोकदार कडा दुसऱ्या कुण्याच किल्ल्याला नाही. याचं प्रत्येक दर्शन मनाला मोह घालणारं. छायाचित्रं घेऊ तरी किती ?

कुण्या धनगराचा वाडा दिसला. साडेसात काही झाले नसतील. पण ऊन्ह कळकळा तापू लागलं होतं. तहान पेटत होती. दाराशी उभे राहिलो. आम्हांला पाहून पोरं आत पळाली. घरधनीण बाहेर आली. पाणी मागितलं. पोरांना प्रश्न विचारीत होतो. दुरावा कमी करायला धडपडत होतो. पण नजर वारंवार वळत होती धनगरणीच्या सौम्य, गंभीर, घाऱ्या, बदामी डोळ्यांकडे. कसे ते डोळे ! धनगराच्या अंगणात इतके देखणे डोळे कसे जन्मले ?

काही तरी विचारायचं म्हणून बाईला विचारलं, ‘ वाघरू येतं का कधी ? ’ अगदी सहजपणं उत्तर आलं, हे मघाशीच तर येऊन गेलं ! भय, कंप, हादरा— कशाकशाचा लवलेश पत्ता नव्हता.

ते डोळे पुन्हा एकदा पाहून ठेवले, अन् निघालो. वाळणकोंडीची वाट डाव्या हाताला सोडून दिली. भरगच्च डोंगरी रान. चिलाटीनं दाटलेलं. त्यामध्ये ढोरांनी पावल्या पाडलेल्या. रंगूला विचारण्यात अर्थ नव्हता. तेव्हा मग अदमासानं एक ढोरपावटी धरली, अन् गडाची उभी भिंत न्याहाळीत चाललो, तो वाघाच्या पावलाचे ठसे ! होय. अगदी ताजे आहेत. धनगरीण खोटं बोलली नाही. कसं आश्चर्य ! ठसे दोन प्रकारचे आहेत. एक आहे चांगला मुठीहून डगळ. दुसरा लहान आहे. दोन्ही अगदी एकावर एक उमटले आहेत. अर्थ स्पष्ट आहे. जनावर वाघीण आहे. बरोबर छावा आहे. याच वाटेनं पहाटे पहाटे गेली आहे. जेमतेम तासभर झाला असेल नसेल. रान अधिक दाट होत चाललं आहे. गुंतावळ वाढत चालली आहे. पण गड उजव्या हाताला ठेवायचा असेल, तर हीच वाट, दुसरी गती नाही. ठसे दिसताच अवी अन्

विजू हरिखले आहेत. वारंवार सुरे पाजळू लागले आहेत. पण पिल्लासह असलेल्या वाघिणीशी गाठ पडली तर वीतवीत सुरे काही कामी यायचे नाहीत. मी त्यांना बडबडू दिलं, अन् रंगूच्या कुरकुरीकडे अजिबात लक्ष न देता आडवा निघालो. झाडोऱ्यातून अन् काटावळीतून कपडे फाडून घेत पाचपन्नास पावलं पुढं सरलो तो लागलं वणवलेलं रान. ते ओलांडलं अन् ध्यानी आलं, की वाटेवरच एक चौथरा आहे. बहुत जुना. हा कशाचा बरं असावा, असा काही एक हिशेब मनाशी बांधता लक्षात शिरलं, की शिवकालामध्ये गडाभवताली जी मेटं होती, त्यातल्या एकाचा हा पाया! क्षणभर तिथं थांबलो. चहू अंगांनी तो चौथरा न्याहाळला. तो इतिहासकाळातलाच आहे याची खात्री करून घेतली.

रंगू कुठं हरवला कोण जाणे! आता या बंबाळ्या रानात तो गबाळ्या माणूस हरवणं म्हणजे केवढी पीडा! हाका फोडू लागलो, तंवर शेजारच्या घळीतल्या रातांबीच्या झाडावरून तो बोलला,

" काय नाय वो! वांयच कोकमी काढतांय्! "

हेही बरं झालं. त्यानं काढलेल्या कोकमी चुपीत वाट शोधू लागलो. ती कशी ती सापडेना झाली. सापडणार तरी कशी? या वाघोलीच्या खिंडीवाटे कधी क्वचित् सटीसहामाशी कुणी एखादा धनगर चढला उतरला, तर. एरवी कोणी तिकडे ढुंकायचा-सुद्धा नाही. शेवटी उजव्या हातीचा गड न सोडता त्या गच्च रानातून तसाच घुसारा केला, अन् कपड्यांच्या अक्षरशः चिंध्या करीत खिंडीच्या माथ्यावर जाऊन पोचलो. वर निरखून पाहिलं, भवानी टोक हजारभर फूट उंचीवर लख्ख दिसत होतं.

थोडे विसावण्यासाठी एका झाडाखाली लवंडलो. तसं निघालो तेव्हापासूनच जाणवत होतं, की आज दोन्ही गुडघ्यांचं काही खरं नाही. त्यांच्या वाट्या गेली कित्येक वर्षे निखळतात. एकदा त्या निखळल्या, की मग ' शंखान् दध्मुः पृथक् पृथक्! '

विसावून उठलो, तो मघाचं जाणवणं प्रत्ययाला आलं. तसे आमचे अशुभ होरे होता होईतो कधी चुकत नाहीत. दोन्ही गुडघे अगदी निरुपयोगी झालेले! उठून उभंही राहता येईना!

विजू आणि अवि म्हणू लागले, की " तुम्हांला खांद्यावर उचलून चालतो. कमीत कमी आम्ही दोघे एक पुढं एक मागं तरी होतो. तुम्ही आमच्या आधारानं चला. "

कळ तशीच सोशीत उभा राहिलो, अन् जिथून उतरायचं होतं, ती वाट पाहिली. हरे हरे! मुलुखाचं झाडीमंडळ सगळी कंटकावली घेऊन आमचं दास्य करायला उपस्थित होतं. आणि वाट? वाट नव्हतीच ती. तो होता केवळ एक घसारा. पाऊल घातलं, की चांगलं पुरुषभर खाली पोचायचं.

शेवटी निग्रहानं त्या दोघांचं म्हणणं झिडकारलं आणि अक्षरशः त्या घसा-

ऱ्याच्या माथ्यावर बसून शरीर लोटून दिलं. काय होईल ते होईल. काय झालं? वाटेत झुडपं होती, त्यांना पाय थटवून वेग कमी करण्याच्या धांदलीत दोन्ही गुडघ्यांच्या वाट्या पुनः जाग्यावर बसल्या !

खाली पोचलो आणि गड उजव्या हाताला ठेवीत रानातून थोडे मोकळवणात आलो, तो तळातल्या शेतात दिसली काही राबणारी माणसं. एका चौंढ्याच्या कडेला झाडाखाली बसून ती न्याहारी करीत होती. शेतातलं काम त्यांनी नुकतं संपवलं होतं, अन् स्वस्थ मनानं अन्नब्रह्माचं ग्रहण करीत होती. काय आश्चर्य ! आम्हाला पाहिलं, अन् ती बावरून सगळं पोटाशी घेऊन गडचीप बसून राहिली ! कारण काही ध्यानी येईना ! अन् एकदम वीज चमकून जावी, तसं झालं. आमच्या वेषाकडं पाहिलं. सगळा उलगडाच झाला. फाटून चिंध्या झालेली वस्त्रं, विस्कटलेले केस, कंबरेला सुरे ! कुण्या दरवडेखोरांच्या टोळीसारखे आम्ही दिसत होतो !

मोकळ्या मनानं हसत सामोरा झालो. रामराम घातला. काय करायला निघालो आहोत, ते सांगितलं. प्रदक्षिणा हा शब्द काही त्यांना कळेना. शेवटी त्यांना म्हटलं, की तुम्ही तुळशीभंवती फेऱ्या घालतां. गड हे आमचं वृंदावन. तेव्हा त्याच्या भंवती फेरी घालतो आहोत. मग तुकाराम शेडगे, सीताराम, अशी काही नावं सांगितली— त्यांच्या ओळखीची. शेवटी माझं नाव घेतलं. काय आश्चर्य! त्यांनी गडावरचा वारकरी म्हणून तुकारामाकडून माझं नाव ऐकलं होतं, मात्र कधी गाठभेट घडली नव्हती. "सोऽयं देवदत्तः" अशी खूण पटताच त्यांच्या आतिथ्याचे दरवाजे मोकळे होऊ लागले. आम्ही पाणी मागितलं. त्यांनी पाणी आणायला गडी पिटाळला. खाली टेकून गडाकडे दृष्टी टाकली.

गड्या रे ! तू केवढा प्रचंड आहेस ! कसा बेलाग आहेस ! पण कुणी बापडा तुझं दुर्गमत्व न्याहाळीत नाही. कुणी तुझ्या या उत्तुंग भिंती आदरानं पाहात नाही. तू कसा चहूबाजूंनी बेलाग, ते कुणी ध्यानी घेत नाही. बरोबर आहे त्यांचं. जर त्यांना तुला चहू अंगांनी न्याहाळल्याविनाच अन्नपाणी मिळतंय् तर त्यांनी हा सूळ उपटून खांद्यावर घ्यावा तरी कशासाठी? ज्याला तुझं कुतूहल होतं, ज्याच्या मनी तुझ्याविषयी आदर होता, त्या शिवछत्रपतीनं तुला चहूअंगांनी खेव दिलं. तू तेवढ्यानंच तृप्त झाला आहेस ! आता इतरांविषयी तू उदासीन आहेस. ते आपापल्या मुलाबाळां- मध्ये सुखी असोत. शांतिरस्तु तुष्टिरस्तु पुष्टिरस्तु !

"प्या ! पाणी प्या !"

घटाघटा पाणी प्यायलो. त्या वाघोलीकरांच्या ध्यानी आमच्या कृत्याचं महत्त्व आता कुठं येऊ लागलं होतं. मग त्यांनी घोंगडी टाकली. धावत जाऊन एकानं पळसाची पानं आणली. मी रायगडचा वारकरी हे त्यांना माहीत झालं होतं, तेव्हा मग आदराचं प्रमाण वाढलं. आमच्याबरोबरचं अन्नब्रह्म त्यांनी अन् आम्ही मिळून संपवलं. शेवटी जाणकार गदगदून म्हणाला,

"तुमी येनार ह्ये आदुगर म्हाईत पायजे होतं!"

"म्हणजे काय झालं असतं?"

"नाय वो! गरिबाघरची भातभाजी तुमच्यासाठी आनली असती!"

चला! आम्ही जे करीत आहोत, त्याचं महत्त्व जाणणारा कुणी एक तरी समानधर्मा आढळला. आम्ही उठत असता उसासून तो म्हणाला,

"आमी पर गडावर जातो. पर आपला ग्येला, महाराजांच्या समादीचा दर्शोन क्येला, का मागारा वल्ला! हा तुमच्यासारका आक्रीत चहू अंगांनी बगना आपुन कंदी क्येला नाय हो! खोटा काई सांगायचा नाय!"

बारा वाजू पाहात होते. त्यांना वाट विचारता त्यांनी पुन्हा एक खिंड दाखवली. म्हणाले, ज्या गचपणांतून तुम्ही आले आहात, ते लक्षात घेता ही वाट सांगायची काही गरज नाही. नीट असे गडाच्या कडेकडेनं रानातून निघा म्हणजे झालं.

त्याचं म्हणणं खरं होतं. ते बंबाळ रान आता परिचयाचं झालं होतं. जाळ्यांची अन् दरडींची आता मातब्बरी वाटत नव्हती. गडावरल्या पाण्याच्या धबधब्याचे पाणढाळ ओलांडीत निघालो. रान गर्द हे खरं पण त्याचा उपयोगही होता. सावली होती, अन् करवंदी काळ्यानिळ्या फळांनी नुसत्या गच्च झाल्या होत्या. चालता चालता हाती येतील ती करवंदं तोडावीत. गडावरील एकेक खूण पाहून पक्की करावी अन् धोंडे पार करीत वाट कापावी.

डावीकडे पोटल्याचा डोंगर मख्खपणं उभा होता. एखाद्या निसंगासारखा. त्याच्याच माथ्यावर १८१८ मध्ये इंग्रजी तोफा चढल्या. त्याच तोफांमधून उडालेल्या कुलपी गोळ्यांनी गडाच्या टोकाशी असलेली दारूची कोठी फुटली. गडावर आठ दिवस झालेलं अग्निकांड घडायला हाच डोंगर कारण! पण त्याचा तरी काय अपराध! माणसाच्या मनातून वस्तूचं मोल उतरलं, तो तर सह्याद्रीच्या सारीपाटातली एक सोंगटी!

पायाखालचं रान नित्यपर्णी होतं. पडझडीमुळं तळाशी इतका पाचोळा साठल होता की पाय पडताच कच्च कच्च वाजायचं. या उन्हाळ्या दिवसात पाचोळ्याखाली गारव्यासाठी जनावरं पडलेली असायची. पण ती असोत की नसोत, त्यांच्या उपस्थितीची दखल घ्यायचं काही कारण नाही. त्यांच्या कुलगोत्राची चौकशी करायचं त्याहूनही कारण नाही. कसंही करून आम्हांला वाघोलीची खिंड गाठलीच पाहिजे. कारण पाणी ही एक जीवनातील नितान्त गरज आहे हे पुनः तीव्रतेनं जाणवूं लागलं आहे. रंगूनं खिंडीपलीकडे गेल्यावर पाणी द्यायचं भरघोस आश्वासन दिलं आहे. तो तर म्हणाला आहे की पाणी पाणी काय करता? पलीकडे चला, तुम्हांला अंघोळ घालतो!

वाघदरवाजा लख्ख दिसू लागला होता. त्याच्या पलीकडल्या टोकावरच्या दारूच्या कोठाराचंही अनुमान करता येत होतं. चोरदरवाजाच्या अलीकडे झाडावळ

दिसत होती, ती कुशावर्त तलावाभोवतालची. तिथल्याच एका वळीत असलेल्या निरगुडीच्या दाटीतून वाट काढीत मी मुलांना वाघदरवाज्यावर नेलं होतं. चोरदरवाज्यातून कड्यावर उतरून एका पाणलोटाच्या खळग्यात आम्ही येऊन बसलो होतो. तोही इथून स्वच्छ दिसत होता.

मधेच एक सावलीची जागा अशी अप्रतिम होती, की सांगता पुरवत नाही. तिथं केवळ पाणी असतं, तर आम्ही दिवसभर मुक्कामसुद्धा केला असता. अवि म्हणाला की, दुपारची अंगतपंगत करायला नामांकित जागा आहे. विजूनं त्याला ढोशीत विचारलं, ' पाणी कुठून रे आणशील ? सगळ्या पोरीबाळींना इथं आणलं तर पखालभर पाणी लागेल ! ' अवि गंभीरपणं म्हणाला. ' नाहीतरी तुझा दुसरा उपयोग काय आहे ? तुझ्या पाठीवर आणू ! '

असे थोडे श्रमांतून बाहेर पडलो, अन् पुनः झाडोऱ्यातून वाट शोधीत चढावरून घसरत, एकमेकांना सावरीत वाघोलीच्या खिंडीत पोचलो मात्र, तो असा बहारदार वाऱ्याचा झोत आला म्हणून सांगू ! केवढा विस्मय ! सगळं रान कळाकळा तापत होतं. चोंढ्यामधून भाजवणं घातली होती, त्यांचे धुपकारे वर उठत होते. पण या खिंडीतल्या उत्तुंग झाडांच्या शीतळ सावलीत मात्र फ्रिजमध्ये असावं, तसं थंडगार होतं. वर न्याहाळून पाहिलं. कसलं झाड होतं कोण जाणे, रंगूला नाव विचारलं. त्यानं काही तरी ठोकून दिलं. समाधान झालं नाही. पिंपळ, वड, पिंपर्णी, नांदुर्की ही सगळी एका कुळातली झाडं. हे झाड त्या कुळातलं असलं पाहिजे.

आम्ही पाय पसरून उघड्या भुईवर पहुडलो होतो. गार वारा वाहात होता. आता वाट शेताडीतून धावत होती, ती आम्हाला लख्ख दिसत होती. उजवीकडे होता पहाटपासून सतत आमची साथ करणारा रायदुर्ग. एखाद्या निष्ठावंत मित्रासारखा. एकदम उठलो, अन् निर्णय दिला,

" मित्रहो ! सायंकाळ करायची काही गरज नाही. वाडीजवळ आणखी पाऊण तासात पोचू— अंदाजे साडेबारा वाजता. लगेच गड चढायचा. तयार ? "

अवी उभा राहून सलाम ठोकीत म्हणाला,

" भांडभर पाणी पाजीत असाल तर गड चढून लगेच उतरायची तयारी आहे आपली. "

" तू रे बाबा, विजू ? "

" एवरेस्ट ! पाणी प्यायल्यावर मग एवरेस्ट चढायला काय हरकत आहे ? "

निघालो— रंगूच्या मागं. आता जलदाता तो होता. थंडगार पाणी पाजायची त्यानं इतकी आश्वासनं दिली होती, की रंगूसारखा थोर पुरुष या जगतीतलावर दुसरा नाही, अशी अवी—विजूची खात्री पटून पुढल्या मंत्रिमंडळात त्याच्यासाठी कुठली जागा राखून ठेवावी, यावरच रायगडच्या पायथ्याशी त्या दोघात द्वंद्वयुद्ध होणार की काय, अशी मला धास्ती वाटू लागली. म्हणून याविषयी निर्णय घ्यायला आपण

समिती नेमू, असं त्यांना आश्वासन देऊन शांत केलं, आणि तडातडा ढांगा टाकीत चालू लागलो.

हिरकणी समोर दिसत होतं. त्या टोकाच्या तळाशी खडकात पाखरं बसण्यापुरती जागा आहे, तिथं घारी विसावतात. त्यांची शीट पडून पडून एक पांढरा पट्टा ओढला गेला आहे. रंगू कुठं तरी हात दाखवून ते हिरकणी, अशी पैज लावू लागला. आम्ही त्या पांढऱ्या पट्ट्यावर नजर रोखून त्याचा निषेध करू लागलो. आमच्या नागरी शब्दांच्या माऱ्यापुढं त्यानं हार मानली. शेवटी एका झाडाखाली उभा राहून म्हणालो,

" अशी कुंथून कबुली नको. कुठलं हिरकणी सांग बघू ? "

" त्ये काय ! पांढरा पट्टा दिसतो त्ये ! "

" मग आम्ही काय म्हणत होतो ? "

" तो मना काय ठावा ? "

" डोंबल तुझं ! कुठं तरी हात दाखवीत होतास. निराकाराकडे संकेत केल्यासारखा ! असू दे, आता पाणी पाज म्हणजे झालं ! "

रंगूनं आपलं अभिवचन खरं केलं. एका कुंभ्याच्या झाडाखाली बसलो, तो रंगू अन् अवि थंडगार पाण्याचा तांब्या घेऊन आले. तोंडावर पाण्याचे दोन हबके दिले. घोट घेताच असं जाणवलं की, थेट आतपर्यंत पाणी पोचलं आहे. तापलेलं यंत्र त्यानं थंडगार केलं आहे. एका मिनिटासाठी तिथंच भुईवर लवंडलो अन् पुनः थोरल्या भावासारखा पाठीशी उभा असलेला रायगड दिसला.

गड्या, आता तुझा-आमचा परिचय पक्का झाला. तुला चहू अंगांनी निरखलं. लवगं अन् कपारी ओलांडीत असता तुझ्यावरचं लक्ष कधीच ढळू दिलं नाही. (एकदा कधीकाळी शिवाजीराजानं तुला निरखलं होतं. आज आम्हीही तुला पाहिलं.) राजाच्या दृष्टीचं थोरपण काही आम्हाजवळ नाही. पण म्हणून खंत करायचंही काही कारण नाही. अशी अंत करू लागलो, तर ज्या आकाशातून चन्द्र पृथ्वीप्रदक्षिणा करतो, त्यात उडणं चिलटांना अन् मरकुटांना बंद करावं लागेल. कमीत कमी इतकं तर आम्ही छातीवर हात ठेवून सांगू शकतो, की गेल्या शेपन्नास वर्षांत क्वचितच कुणी केलं ते आम्ही केलं आहे. रायगडाला चहू बाजूंनी दिठीभेट घडली आहे.

अंगी बारा रेड्यांचं बळ दाटलं होतं. उणेपुरे वीस मैल चालून झाले होते. पण त्या चालीचा थकवा जाणवत नव्हता. पुनः पाचाडच्या खिंडीत उभे राहिलो. पहाटेस तिथून वाडी पाहिली होती. उमलणाऱ्या फुलासारखी ताजी टवटवीत. आता साडेबारा वाजता ती पुन्हा पाहिली. एखाद्या कर्तव्यकठोर घनगरणीसारखी. दरदरा पेटत असलेल्या उन्हात छपराखालच्या जिवांवर सावली धरून असलेली.

रंगूला निरोप दिला, अन् उन्हाच्या झळांशी झुंजत गड चढून गेलो. धर्मशाळेत कुणीही नव्हतं. सगळी मनोऱ्यातल्या गारव्यात दुपारचा विसावा घेत होती.

गंगासागरावर उभं राहून हळी ठोकली, वॉरक्रायसारखी. ऐकताच पोर धडपडत उठली, अन् किंचाळली,

" आप्पा, तुम्ही परतलात ? इतक्या लवकर ? "

अन् मग तळ्याच्या पाळीवर बसून राजा गोपीचंदासारखी अंघोळ करीत असता न दिसलेल्या वाघाच्या लांबीउंचीविषयी थापा मारल्या. आदरमिश्रित कुतूहलानं पोरांनी त्या ऐकून घेतल्या. आपले बदामी डोळे— सकाळच्या धनगरणीसारखे— आम्हावर रोखीत वीणानं विचारलं,

" अय्या ! खरंच आप्पा ? वाघ पाहिला तुम्ही ? "

होय रे बाळा ! रायगड हा सह्याद्रीच्या घळीत दबा धरून बसलेला एक वाघच आहे.

□

बारा

# तरंगता दिवस

## गंगाधर गाडगीळ

चोहो बाजूला निळा अटलांटिक पसरला आहे. त्याचे पाणी इतके निळे आहे —इतके निळे आहे. ते निळेपण शीतल द्रवासारखे माझ्या सर्वांगातून वाहते आहे. माझ्या शरीरातला कणन्‌कण नवस्नात पक्ष्यासारखा पंख फडफडावून अंग हलकेहलके, मोकळेमोकळे करतो आहे. त्या निळ्या अंजनात बुडवलेले बोट कोणी तरी हळुवारपणे पुन्हा पुन्हा माझ्या पापण्यांवर आतून फिरवते आहे.

डेकच्या कठड्याला रेलून मी उभा आहे. निळ्या मनाने निळेपणातून निळे-पणाकडे पाहतो आहे.

हवा कशी ताजीताजी, भुरभुरीत वाटते आहे. ऊन पांढऱ्याशुभ्र लाहीसारखे फुलले आहे.

पाण्यावर उमटणाऱ्या दोन बगळ्यांच्या रांगा क्षितिजाकडे भरारा चालल्या आहेत. उन्हात लोळणारी एकेक लाट मध्येच पोटाला गोडशी ढुशी मारते आहे.

अगदी शांत असलेल्या वातावरणात प्रसन्नता पाखरांच्या थव्यासारखी किल-बिलते आहे.

माझ्यामागे डेकवर माणसे उघड्या अंगांनी लोळत आहेत. एक तरुण आपल्या शेजारी पडलेल्या तरुणीचा हात हातात घेऊन त्यावरच्या रेषा जरा निरखतो आणि हळूच दाबून सोडून देतो. डोळे न उघडताच ती स्मित करते. ते स्मित तिच्या

चेहऱ्यावर तसेच रेंगाळत राहते. एक पोर पडल्या पडल्या हनुवटी छातीत खुपसून आपल्या बेबीकडे पाहते आणि मग उपडे वळून डेकवर गाल टेकते, त्याचे डोळे मिटतात.

एक गरगरीत वाटोळा पोरगा कुठून तरी लगबगीने येतो आणि आपल्या मित्रांना ढोसकीत म्हणतो,

"Hey! Come along! Let us play a game of cards."

त्याचे मित्र त्याला नुसते हातवारे करूनच हुसकावण्याचा प्रयत्न करतात; आणि तो जास्त गडबड करू लागतो, तेव्हा त्याची तंगडी ओढून त्याला आपल्या शेजारी पाडतात. तो उठण्याचा जरासा प्रयत्न करतो आणि मग तसाच पडून राहतो. हातातल्या पत्त्यांशी चाळा करीत राहतो.

एक मुलगी पोहण्याच्या हौदात धपदिशी उडी मारते आणि जरा हात मारल्यावर सारा प्रयत्न सोडून देते. डोळे मिटून स्तब्धपणे पाण्यावर तरंगत राहते. हौदातले पाणी पुन्हा नितळ होते.

"Attention, Attention please..." दुरून कुठून तरी बोटीवरच्या लाउडस्पीकरचा आवाज येतो; आणि मग पुढचे शब्द धड ऐकूच येत नाहीत.

निग्रो लोकांचे एक टोळके डेकवर येऊन उन्हात कोंडाळे करून बसते. उन्हात त्यांचा काळा रंग छानपैकी खुलतो. मग त्यांतला एक गिटार वाजवू लागतो. दुसरा खोल खरदार आवाजात गाणे म्हणू लागतो. ताल मंद झोके घेत राहतो. आवाजाच्या कंपाने वातावरण संथ वर्तुळे उमटत राहतात. तासन्‌तास हा माणूस गात राहतो. गिटार वाजत राहतो. बिअरची बाटली मधूनच कोंडाळ्यात फिरते.

किती तरी वेळ मी तंद्रीत उभा राहतो. कानशिलांना छानशी ऊब आली आहे. समुद्रात रुपेरी नाण्यांची अविरत वृष्टी होते आहे. अगदी सावकाश, रंध्रारंध्रांत साखळून राहिलेल्या प्रसन्न शांततेला जराही धक्का लागणार नाही अशा बेताने मी पाऊल टाकतो. सावकाश येरझारा घालत राहतो.

दुपारच्या जेवणाचा जडपणा सावरत मी कष्टाने जिना चढून येतो; आणि अलगद डेकचेअरच्या गादीवर अंग झोकून देतो. सुस्तीच्या धुक्यातून अहेतुपूर्वक भोवताली पाहात राहतो. खरे म्हणजे माझे फारसे कोठेच लक्ष नाही. अन्नाने आलेला मिष्ट जडपणा अंगभर हुळहुळतो आहे आणि त्याची शहाळ्यातल्या मलईसारखी चव चाखण्यास मी मश्गूल आहे.

शेजारच्या खुर्चीवर एक ढेरपोट्या अमेरिकन म्हातारा चिरूट ओढीत बसला आहे. बसल्याबसल्या जवळच्या खुर्चीवरच्या पोरीची थट्टामस्करी करतो आहे— फाजीलपणाकडे झुकणारी. ह्या म्हाताऱ्याला आपण केव्हाही चुटकीसारखा दूर सारू

शकू हे त्या पोरीला माहीत आहे; आणि म्हणूनच निर्धास्तपणे ती त्या मस्करीत सामील होते आहे. त्या म्हाताऱ्याला थोडेसे उत्तेजन देते आहे. ह्या साऱ्या प्रकाराचा बेचवपणा च्युइंगगमसारखा तोंडात घोळवते आहे. जरा वेळाने तरुणांचे एक टोळके येते आणि म्हाताऱ्याच्या अंगावर निष्काळजीपणे एक हास्य भिरकावून ती त्या टोळक्याबरोबर अदृश्य होते.

म्हातारा मख्खपणे चिरुटाच्या जाड धुराची चव तोंडात घोळवीत जागच्या जागी बसून राहतो. हे सगळे तात्पुरते आहे हे त्याला माहीत नसते असे थोडेच आहे?

पण ह्या फिक्या, वांझोट्या अनुभवांनादेखील एक ओषट चव असते. गोड अपेक्षेचा माफक ताण मनावर पडला की रक्त जरा तापते. चुलीमागच्या मांजरासारख्या स्मृती सुखाने गुरगुरू लागतात. तेवढेच पुरे असते.

त्याने सोडलेल्या चिरुटाच्या जाड धुराचा दर्प माझ्या नाकात शिरतो. मला अस्वस्थ करतो. खरे म्हणजे मला त्या वेळी सिगरेट ओढायची नसते. अंगात हुळहुळणाऱ्या मिष्ट जडपणाची शुद्ध चव मला तेव्हा चाखायची असते. त्यामुळे मी क्षणभर असा निर्धार करतो की तेथून उठून जायचे; पण निर्धार करण्यातच माझे बळ संपून जाते. मी साऱ्या वृत्ती सैल सोडतो आणि खिशातली सिगरेट काढून शिलगावतो. तिची मातट कोरडी चव तोंडात घोळू लागते. एकीकडे माझ्या अंगात सुख झिणझिणू लागते. एकीकडे स्वतःची चीड येते.

शेजारच्या खुर्चीवर तो म्हातारा तसाच मख्खपणे चिरुटाची चव चाखत बसलेला असतो.

पलीकडे एका टेबलाजवळ दोन जर्मन बसले आहेत. अगदी गंभीरपणे, विचारमग्न चेहऱ्यांनी. कोणाला वाटेल की अत्यंत महत्त्वाच्या कामकाजाविषयी त्यांचे बोलणे चालले असावे; पण खरे म्हणजे त्यांच्या हातांत पत्ते असतात आणि टेबलावर नाण्यांचा एक लहानसा ढीग असतो. तासन्‌तास गंभीरपणे त्यांचा डाव चाललेला असतो.

मी सिगरेट टाकून देतो आणि उगीचच तोंड हालवून त्यांच्या त्या सुखाची चव चाखण्याचा प्रयत्न करतो.

मला वाटते की त्या दोघांच्या मनांत मोठाली ऑफिसे असावी आणि त्यांत त्यांनी अनुभवलेल्या प्रत्येक क्षणाची यंत्रांनी तपासणी होऊन त्यांची योग्य त्या फायलीत रवानगी होत असावी. ह्या मानसिक टापटिपीचा शुष्क आनंद क्षणभर माझ्या जिभेवर उतरतो. निदान मला तसा भास होतो आणि मग माझ्या शरीरावर आलेल्या सुखदायक सुस्तीत मी पुन्हा बुडी मारतो.

तेवढ्यात एक म्हातारी मिशनरी बाई लगबगीने येताना मला दिसते. माझ्या खुर्चीसमोर थांबून 'Are you from Madras?' असा प्रश्न ती मला विचारणार, हे मला माहीत आहे. कारण थोड्या वेळापूर्वी हा प्रश्न तिने माझ्या बायकोला विचार-

लेला असतो. अपेक्षेप्रमाणे ती माझ्या खुर्चीसमोर उभी राहते आणि उत्सुकतेने निथळणाऱ्या चेहऱ्याने मला तो प्रश्न विचारते. मग माझ्या उत्तराकडे फारसे लक्ष न देता ती आपल्या मिशनच्या मद्रासमधल्या कामकाजाची पाल्हाळिक हकीगत मला सांगते. आपले दंतहीन तोंड हलवीत हलवीत पुढे निघून जाते.

तिच्या त्या विचित्र सुखाची चव मी तोंडात घोळवण्याचा प्रयत्न करतो; आणि मग ते बुळबुळीत सुख पचकन थुंकून टाकतो.

माझ्या समोरून अमेरिकन पोरे सारखी आइस्क्रीमचे कोन चघळत इकडून तिकडे जात आहेत. त्यांचे चेहरे माझ्या डोळ्यांसमोर नाचत आहेत. तोंडाच्या दर आकारात, दर हालचालीत एक वेगळी चव आहे.

आणि पलीकडे एक बाई आवळलेल्या तोंडाने आपल्या आयुष्यातला सगळा बेचवपणा लांब टोकदार सुयांवर विणत बसली आहे.

मी एक जांभई देतो; आणि खुर्चीखाली ठेवलेले पुस्तक उचलून हातात घेतो. वुडहाउसची एक जाडजूड कादंबरी. जाडजूड अन् हलकी. कुरकुरीत वेफर्सच्या भल्या मोठ्या पुडक्यासारखी.

आतापर्यंत वेफर्सची अशी तीन भलीमोठी पुडकी मी फस्त केली आहेत. हे चौथे. छे ! नको ! आता नको ! आणि सिगरेट ? सिगरेटही नको. ते हजारो झुरके. दर झुरक्यात पकडलेले ते सुख. पकडता पकडता निसटलेले, आणि मग ते पुन्हा पकडण्याकरिता मारलेला आणखी एक झुरका.

नको ! सिगरेट आता मला नको आहे. मला आता कुठचीच कसलीच चव नको आहे. मी दमलो नाही. कंटाळलो नाही. तृप्त झालो आहे.

पेंगणाऱ्या नजरेने मी कठड्यापलीकडे हेलावणाऱ्या पाण्याकडे पाहू लागतो. बोट कलली की पाणी वर येते. इतके वर येते—इतके वर की त्यात मी बुडून जातो. निळे निळे पाणी. आपल्या निळेपणाचीच सुस्ती त्याच्यावर चढली आहे. उघड्या डोळ्यांनी रुपेरी स्वप्ने पाहात ते स्वतःच्या निळेपणात लोळत पडले आहे.

मी साऱ्या वृत्ती आणखीनच सैल सोडतो. माझी नजर निळेपणाने काठोकाठ भरते; आणि त्या निळेपणावर मी सावकाश, अगदी अलगद माझ्या पापण्या टेकतो.

धब् असा आवाज होतो आणि मी दचकून जागा होतो. माझ्या खुर्चीला अडखळून पडलेली एक चारपाच वर्षांची पोरगी उठून उभी राहताना मला दिसते. उभी राहिल्यावर ती माझ्याकडे पाहून ‘ ही ही ’ करून हसते. मग ती मला सांगू लागते,

“ You know what ! I am looking for 'mum. But I can't find her. ”

त्या बडबडण्याच्या ओघात मी कुठे तरी वाहत जाऊ लागतो. पुन्हा डोळे मिटल्यावर मला जेव्हा गुंगी येते, तेव्हा चिंध्यांची एक भली मोठी बाहुली हातं वर

करून किंचाळत धावताना मला दिसते. तिच्या मागून एक चिंध्यांची छोटी बाहुली आपल्याला न पेलणारा चिंध्यांचा सोटा घेऊन धावत असते; आणि ह्या दोघींच्या मागून एक तिसरी बाहुली हातवारे करीत, वेड्यावाकड्या उड्या मारीत, ओरडत धावताना मला दिसते. ह्या तिसऱ्या बाहुलीच्या आरड्याओरड्याचे मला हसू येते. चिंध्यांच्या बाहुल्यांची मारामारी ती काय अन्...

पण तेवढ्यात माझ्या ध्यानात येते की ती तिसरी बाहुली म्हणजे मीच आहे.

संध्याकाळ झाली आहे. बोटीच्या नाळीवर फडकता वारा अंगावर घेत मी उभा आहे. वाऱ्याने माझ्या डोळ्यांत पाणी तरारले आहे; आणि त्या पाण्यात सूर्यकिरण सोनेरी चिन्हांनी कसलेसे गीत लिहीत आहेत. गीताच्या तालावर नाळ झुलते आहे— झुलते आहे. आकाश डोलते आहे.

त्या गाण्याचा अर्थ पाण्यावर लिहिलेला आहे. वाऱ्यात भरलेला आहे. माझ्या रक्तात तो मोहोरतो आहे. पांढऱ्या नाळीवर आरूढ होऊन, पांढरा फेस उधळत, मी क्षितिजाचा भेद करायला चाललो आहे. वाऱ्याचा प्रचंड फडकता ध्वज खांद्यावर घेऊन भरारा चाललो आहे.

लाल सूर्यबिंब कोणी चिमटीत धरून अलगद खाली सोडावे तसे क्षितिजाखाली जात आहे— गेले आहे. ढगांच्या किनाऱ्यावर प्रकाशाला ओहोटी लागली आहे. अंतराळात काळोख भुरभुरतो आहे. वारा आपल्याशीच काही तरी बडबडतो आहे. म्लानता क्षितिजावर गाल टेकून झोपली आहे.

माझ्या मागे काचेला चिकटलेले दहा-पंधरा चेहेरे सूर्यास्त पाहत आहेत. तसे ते चेहेरे साधे आणि निरुपद्रवी आहेत; पण मला त्यांची भीती वाटते.

वर ब्रिजवर दोन अधिकारी यंत्रचलित माणसांसारखे निर्विकार चेहऱ्यांनी समोर पाहत आहेत. काळोखाच्या आणि म्लानतेच्या आरपार पाहत आहेत. त्यांचीदेखील भीती वाटते.

आकाशात उलटा टांगलेला भुरका संधिप्रकाश चीत्कारतो आहे— फडफडतो आहे; आणि माझा जीव गुदमरतो आहे. कमरेभोवती हात घालून नाळीवर आलेले ते जोडपे तसेच मनमुराद खिदळते आहे. साऱ्या वातावरणाने नाकावर बोट ठेवून ' श् श् ' केले, तरी डेकवरच्या मोकळ्या जागेत मुले तशीच दंगा करीत आहेत. फक्त माझा जीव गुदमरतो आहे.

काळीभोर मखमली रात्र फुलली आहे. सरपटणाऱ्या संधिप्रकाशाच्या शरीरातून हे झगमगते फुलपाखरू बाहेर पडले आहे. प्रसन्नतेचा गुलाबपाण्यासारखा सर्वत्र शिडकावा

झाला आहे.

पांढऱ्याशुभ्र प्रकाशात पांढराशुभ्र फेस विरघळतो आहे; आणि हे फेसाचे तळपते ताटवे पाण्यात सोडत दिव्यांनी नटलीथटलेली बोट झगमगत्या तोऱ्यात पुढे चालली आहे.

डायनिंग रूम, लाउंज, बार ही सगळी ठिकाणे माणसांनी फुलली आहेत. टवटवीत चेहऱ्यांच्या माणसांनी फुलली आहेत. हास्यविनोद बहरला आहे. संभाषणाची झिमझिम सारखी चालू आहे.

अन्नाचे सजवलेले ढिगारे घेऊन वेटर धावताहेत. बारटेंडर लांब चमच्याने कॉकटेल्स मिसळतो आहे. चपळाईने, उसंत न घेता मद्यात मद्य मिसळतो आहे. आपल्या चपळ हालचालींचाच त्याला कैफ चढल्यासारखा झाला आहे. ऑर्केस्ट्रातली वाद्ये प्रकाशात तळपताहेत; आणि त्यांतून निघालेले नाचरे सूर नृत्यभूमीवर उतरत आहेत.

अन्नाचा कैफ, मद्याचा कैफ, नृत्याचा कैफ, कैफाचा झगमगाट. झगमगाटाचा कैफ.

बाहेरचे वातावरण थंडीने शहारते आहे. काळोखाचा आणखी एक प्याला रिता करून अधिकच तर्रर होते आहे. आकाशाचा विस्तार सारखा वाढतो आहे— सारखा वाढतो आहे; आणि वर मान करून पाहत राहिले की आकाशातले सगळे तारे खळकन् तुटून अंगावर कोसळत आहेत.

" Isn 't the night beautiful ? " एक तरुण आर्ततेने विचारतो.

" Oh ! It it lovely ! " त्याची मैत्रीण छापील रुकार देते आणि त्याचा टाय सारखा करते.

तो तिच्याकडे आश्चर्याने पाहतो. मग त्याच्या डोळ्यांतल्या आश्चर्याचे कौतुक होते. तो तिला विचारतो, " Shall we dance ? " आणि तिच्या कमरेभोवती हात घालतो. कमरेनेच ती रुकार देते. डेकवरच्या अंधारात ती नाचू लागतात. संगीताचे पुसलेले स्वर बाहेर झिरपत असतात आणि त्या स्वरांच्या तालावर त्यांची शरीरे अंधारात झुलत राहतात.

लाउंजमध्ये प्रकाश झगमगतो आहे. लांब चमचा कॉकटेल्स मिसळत नाचतो आहे. नृत्यभूमीवर नाचणारे पाय स्वरात गती मिसळत आहेत आणि ऑर्केस्ट्रातले एकाक्ष बँड तारवटलेले स्वर उमटवत, तारवटलेल्या डोळ्यांनी ह्या साऱ्या दृश्यांकडे पाहत आहेत.

तो मख्ख म्हातारा एका टेबलाजवळ एका प्रौढ जर्मन बाईचा हात हातात धरून बसला आहे. त्या दोघांच्या समोर मद्याचे प्याले आहेत. भरल्या अंगाची जर्मन बाई उत्तेजित झाली आहे. आपले मोडकेतोडके दात दाखवीत मोडकेतोडके इंग्रजी बोलते आहे. तिचा सोनेरी दात चमत्कारिक उत्तेजकपणे चमकतो आहे.

" आपण आणखी मद्य घ्यायचे का ? " तो म्हातारा विचारतो.

ती " नको " म्हणते.

म्हातारा पुन्हा आग्रह करतो.

ती मूर्ख हास्य करते.

तो म्हातारा मद्याचे प्याले भरून आणतो; आणि तिचा हात कुरवाळीत तिच्या चमकणाऱ्या सोनेरी दाताकडे पाहत राहतो. त्याचे गाल एव्हाना गुलाबी झालेले असतात. डोळ्यांत थोडेसे धुके जमा झालेले असते; पण त्याची नजर तशीच मख्ख आणि स्थिर असते.

त्या म्हाताऱ्याला दुपारी झुकाटणी देणारी पोरगी आपल्या चौघां मित्रांच्या टोळक्यात बसली आहे. तिच्याकरिता त्यांची चाललेली चढाओढ, कोकाकोला पीत थंड नजरेने पाहते आहे. पोलादाच्या पाजळलेल्या पात्यासारखा तो थंडपणा !

एका कोपऱ्यातून हा-हा-हा, हा-हा-हा असा बटबटीत हसण्याचा आवाज पुन्हा पुन्हा येतो आहे; आणि त्यामुळे वातावरणात विक्षेप येतो आहे, की त्याचे नैसर्गिक स्वरूप खुलते आहे हे सांगणे कठीण आहे.

आपले गरम कपडे आणि नवरे घेऊन खुर्च्या अडवून बसलेल्या म्हाताऱ्या नापसंतीने पुन्हा पुन्हा त्या कोपऱ्यात पाहत आहेत; पण त्यांच्या निषेधाला न जुमानता तो बटबटीत हास्याचा आवाज पुन्हा पुन्हा साऱ्या वातावरणाला तडा देत आहे.

एका कोपऱ्यात एक सालस, गरीब चेहऱ्याचा मनुष्य पाठीत वाकून बसला आहे. तळहातावर हनुवटी आधारून तो जगाकडे पाहतो आहे. त्याच्या चेहऱ्यावर दयाळूपणाचा भाव आहे. जणू त्याला सगळे समजले आहे आणि त्याने सर्वांना क्षमा केली आहे. स्वतःलादेखील त्याने क्षमा केली आहे. इतक्या सुंदरपणे त्याच्या चेहऱ्यावर हा भाव व्यक्त झाला आहे ! मी त्याच्याकडे पाहतच राहतो. काहीशा आदराने पाहत राहतो.

आणि एवढ्यात तो खुळचट हास्य करतो. खुर्ची मागे ढकलून उभा राहत एकदम मोठ्याने हसतो. त्याच्या हास्याने साऱ्या वातावरणाला तडा जातो. त्या तड्यातून पाहिले की सगळेच दुहेरी दिसते. माणसाच्या चेहऱ्याचा वरचा भाग कणवेने भारलेला दिसतो; आणि खालचा ! खालचा हावरेपणामुळे सुजल्यासारखा दिसतो. जमीन तिरकी होते. एका माणसाचे शीर दुसऱ्या माणसाच्या धडाला चिकटल्यासारखे दिसते. हास्य फाटते आणि अर्ध्या हास्याचे रड्ड होते. साऱ्या गोष्टी चमत्कारिकपणे एकमेकात मिसळून जातात. नव्हे, अनैसर्गिकपणे वेगळ्या केलेल्या सगळ्या गोष्टी नैसर्गिकपण एकमेकांत मिसळून जातात.

मी सर्रकन खुर्ची सरकावतो आणि त्या अपारदर्शक प्रकाशाने भरलेल्या वातावरणातून बाहेरच्या पारदर्शक काळोखात येतो.

बाहेर सारे शांत असते. काळेभोर पाणी. काळाभोर गारठा. काळोखाच्या पाळण्यात घालून रात्र मला मंद झोके देते. आकाशातला तेजोमय उत्सव पाहत मी मंद झोके घेत राहतो.

मी मूकपणे विचारतो, " कसला हा उत्सव ? कसला ? "

आकाशातली चंद्रकोर मंदपणे हसते आणि मग सगळे प्रश्न मिटतात.

काळोखाच्या अंजनाने थंडावलेल्या वृत्तींनी मी जिना उतरतो. हळूहळू केबिनकडे जाऊ लागतो.

चालताचालता जिन्याच्या पायरीवर ठेवलेली बिअरची बाटली लाथाडली जाते आणि खळ्ळकन् फुटते.

कुठे तरी कोपऱ्यात ग्रामोफोन लावून दोनतीन जोडपी नाचत असतात. प्रकाशाच्या झोतात ती मला पेपरवेटमध्ये गोठलेल्या आकृत्यांसारखी दिसतात.

आणि खाली, अगदी माझ्या केबिनच्या दाराशी, एक तेरा-चौदा वर्षांची मुलगी पांढरा गणवेश घातलेल्या स्टुवर्डच्या अगदी तोंडाजवळ तोंड आणून आतुरतेने काही तरी बोलत असते. इतक्या आतुरतेने की तिच्या कंठावरच्या निळ्या शिरा उठून दिसतात. मला पाहून तिची नजर घाबरटपणे फडफडते. पांढरा गणवेश घातलेला स्टुवर्ड परीटघडीच्या आदबशीरपणे मला म्हणतो,

" Good night Sir."

मी म्हणतो, "Good night." आणि केबिनचा दरवाजा लावून घेतो.

त्या पोरसवदा मुलीची मला कणव येते. तिला काय हवे आहे ?

त्या झगमगाटाच्या झोतात अडकलेल्या त्या सर्वांनाच काय हवे आहे ? आणि माझे काही तरी हरवले आहे असे मला सारखे का वाटते आहे ? मला माहीत नाही. मनातला हा पारा चिमटीत पकडायचा खेळ आता मला खेळायचा नाही.

अंधाराच्या पाळण्यात घालून रात्र मला झोके देत आहे; आणि चंद्रकोरीच्या मंद हास्यात मी विरघळून जातो आहे.

□

तेरा

# नोएल

## सई परांजपे

आभाळात दोन-चार गिरक्या मारल्यावर एअर फ्रान्सच्या विमानाने आपले नाक किंचित खाली वळवले. अलगदपणे झेपावत ते उतरू लागले. चाकं जमिनीला

टेकली, आत एक हलकासा गोडसा धक्का बसला. रनवेवरून विमान काही अंतर घरंगळत गेलं, आणि थांबलं. निपचित उभं राहिलं. आता खुर्चीचा पट्टा सोडायला हरकत नव्हती. पण त्या पट्ट्याचं बकल सोडायचं कसं? प्रत्येक विमानाच्या पट्ट्याची पाहावं, तर वेगळीच तऱ्हा. या दोन्ही पट्ट्यांच्या लोखंडी तुकड्यांचे दाते तर एकमेकांत असे काही गुंफले होते, की पाहूनच मती गुंग व्हावी. पट्ट्याशी मी बराच वेळ खटपट केली. चक्क डोळ्याच्या कोपऱ्यातून शेजारच्या अमेरिकन प्रवाश्याकडे पाहिलं. परीक्षेच्या पेपरात कॉपी करताना चोरून पाहातात, तसं. अच्छाऽ ती खिट्टी वर उचलायची तर. खुर्चीच्या बंदिवासातून सुटका झाली.

रोम! रोमा म्हणतात म्हणे इटालियन भाषेत. इथे मला विमान बदलायचं होतं. पुढे जिनीव्हाला जायचं होतं. तिथे नाताळची सुटी घालवायची होती. वडिलांकडे. आजीकडे. पण पुढचं पुढं. जिनीव्हाचं विमान निघायला पाच तास अवधी होता. तोपर्यंत रोमच्या विमानतळावर वेळ काढायचा होता.

सुटीची घंटा झाल्यावर शाळकरी पोरांची जशी धांदल उडते, तशी धांदल विमानातल्या उतारूंची उडाली. वेगवेगळ्या भाषांवाटे मंडळींचा उत्साह ऊतू जाऊ लागला.

"ओ ला ला. केल व्हॉय्याज! ओ, स्वी फॅत्तिगे."— हे फ्रेंच.

"ओके गर्ल्स. ऑफ वी गेट हिय्यऽऽ"— भाषा इंग्रजी. शिक्का अंकल सॅमचा,

"आलफिन ड्येगामोस-"—स्पॅनिश? कुणास ठाऊक.

दारात निरोप द्यायला हवाई सुंदरी उभी होती. बत्तीस दात. मोजून घ्यावेत. मला वाटलं, की आपल्या स्मिताइतक्याच कृत्रिम आवाजात ती आता म्हणणार, "माझ्या सुंदर आणि चमकदार स्मिताचं रहस्य! मी नेहमी कॉलगेट डेंटल क्रीम वापरते."

पण प्रत्यक्षांत ती म्हणाली, "ओरोव्हाऽमादाम" आणि लगेच पाठोपाठ, खुलाशादाखल, "गुडबाऽय." कुणी गोविंद घ्या, कुणी गोपाळ घ्या. मीही नाटकी हसून तिचा निरोप घेतला आणि आपली काश्मिरी करंडी सावरीत डुगडुगत्या जिन्यावरून उतरून खाली आले.

केवढी ती विमानतळाची इमारत! अफाटालाच काचेच्या चार भिंतींमध्ये बंदिस्त केलं होतं जणू. त्या लांबच लांब, चकचकीत, सुंदर इमारतीत मला एकदम पोरकं पोरकं वाटू लागलं. सामानावरच्या चिठ्ठ्या तपासणं, पासपोर्ट पाहणं, या तांत्रिक गोष्टी हां हां म्हणता पार पडल्या. आता करायची होती ती फक्त प्रतीक्षा. लांबच लांब बोळ. अंतरा-अंतरावर शोभिवंत 'व्यापारी' दुकानं. वेगवेगळ्या हवाई कंपन्यांचे काउंटर्स. स्मार्ट युनिफॉर्म्समधला सेवकवर्ग, सगळ्यांचा थाट असा काही परीटघडीचा, की अधिकारी कोण आणि शिपाई कोण, हे कळणं कठीण. संगमरवरी गुळगुळीत

फरशी. जपून चाललं पाहिजे. नाही तर पाय घसरून पडायला व्हायचं. उगीच रोमच्या विमानतळावर शोभा नको !

एका बाकावर मी बसले. समोरच्या ठेंगण्या सुबक टेबलावर माझी करंडी ठेवली. हेतू हा की कायम ती आपल्या नजरेसमोर राहावी. हिंदुस्थानातली सवय सहजासहजी जाते थोडीच ? भिंतीमधून मी चक्क बाहेर पाहिले. काचेच्याच भिंती साऱ्या. बाहेर मोकळ्या विमानतळावर विमानं एकमेकांना खो देत होती. जमिनीशी कळे न कळे एवढा कोन करून निघत होती, किंवा उतरत होती. काचेच्या प्रचंड तावदानातून पाहाताना वाटलं, की एक मोठा अक्वेरियम आपण पाहात आहोत. इकडून तिकडे सुरकांड्या मारताहेत प्रचंड देवमासे. पाच तासांनी असाच एक देव-मासा लाकडदंड्याच्या गंपूनानांप्रमाणे मला पोटात घेईल आणि सरळ जिनीव्हाला जाईल.

जिनीव्हा ! जिनीव्हाच्या विमानतळावर मला असं वाट पाहात बसावं लागणार नाही. एक अनोळखी इसम मला न्यायला येईल आणि मी त्याला "पपा" म्हणून हाक मारीन. ज्या क्षणाची मी जन्मभर वाट पाहिली, तो क्षण आता अगदी 'टेकला' होता. पाच तासांच्या अंतरावर उभा होता. पाच तास. दुसऱ्या आणि तिसऱ्या घंटेच्या मधला, न संपणारा काळ. पण पडदा वर जाणार होता. विमान जिनीव्हाला उतरणार होतं...

रंगीबेरंगी पोशाखांतले रंगीबेरंगी रंगाचे प्रवासी त्या लांब पॅसेजमधून इकडून तिकडे वाहात जात होते. किती लांडे झगे घातले होते बायकांनी. फॅशनच्या लहरीनुसार यांच्या स्कर्ट्सची पातळी चढते किंवा उतरते. (बहुधा वरवर चढतच जाते. परतीची भाषा नसतेच.) आमच्याकडे पाहा. आम्ही परंपरेचे पुजारी. वर्षानुवर्षे साडीची किनार भारतीय स्त्रीच्या घोट्याभोवती घोटाळते आहे. ती संगत काही सुटत नाही.

निळे डगले घातलेल्या, हातात (चेटकिणींचे असतात तसे) लांब झाडू घेतलेल्या इटालियन झाडूवाल्या, आधीच आरशासारख्या स्वच्छ असलेल्या फरशा पुन्हा पुन्हा पुसत होत्या. हातात झाडू होते, म्हणून झाडूवाल्या म्हणायचे. प्रत्येकीने दुकानात जाऊन केस सेट केले होते. व्यवस्थित मेकअप् केला होता. आणि प्रत्येकीच्या निळ्या युनिफॉर्मची हद्द गुडघ्याच्यावर चार बोटं संपत होती. अधूनमधून, विरुद्ध टोकांनी झाडू मारीत येणाऱ्या दोघींची गाठ पडे. धावऱ्या मुंग्यांसारखी. मग झाडूची काठी उभी टेकून, त्याच्यावर आपले वजन पेलीत त्या गप्पा मारू लागत. कुठेतरी, कुणीतरी कागदाचा कपटा टाकला, की कळ दाबल्याप्रमाणे त्यांच्या गप्पा थांबत. दोघींपैकी एकजण घारीच्या वेगाने तो कपटा टिपायला रवाना होई.

चोवीस तासांपूर्वी सोडलेलं पालम आठवलं. अरेरे ! कागदाच्या कपट्यांची आणि सिगरेटच्या थोटकांची रांगोळी काढलेली जमीन. चुरगळलेल्या वेषातले मरगळलेले कामगार. एका व्यक्तीला आणायला किंवा पोचवायला आलेले पन्नास

सोयरे. त्यांच्या हातात झेंडूच्या माळा. पंजाबी बायका. त्यांच्या टिकल्या लावलेल्या किंवा जरीकाम केलेल्या जॉर्जेटच्या साड्या. जांभळी लिपस्टिक. त्याच लिपस्टिकचं कुंकू. गोंड्याच्या सप्लिमेंटचे अंबाडे. लहान मुलांच्या उत्साहाने हवाई जहाज पाहायला आलेली एकादी पंजाबी म्हातारी. पांढरी सैल सलवार, पांढरा सैल सदरा, पांढऱ्या केसांची पाठीवर बोटभर वेणी ( तिलाही काळ्या गोंड्याचं सप्लिमेंट आहेच. ) ओघळलेल्या कानाच्या पाकळ्यांत अट्टाहासाने ओवलेली जड सोन्याची फुलं.

पालम सोडून पुन्हा मी रोमच्या विमानतळावर आले. पॅसेजमध्ये अंतरा-अंतरावर प्रतिटेलिव्हिजन सेट्स टांगलेले होते. प्रवाशांच्या सोईसाठी. विमानांच्या उड्डाणाची माहिती सांगण्यासाठी दर पाच मिनिटांनी निवेदिका स्क्रीनवर येई. फ्लाइट नंबर अमुकतमूक, फलाण्या ठिकाणी जायला, इतके वाजता निघेल, ही रुक्ष माहिती ती मोठे छान हसून सांगे. फ्रेंच, इंग्रजी आणि इटालियन भाषांत आलटून-पालटून. प्रत्येक भाषा सारख्याच सफाईने ती बोलत होती. तिची मायभाषा यांपैकी कुठली असेल ? बिरबलला विचारलं पाहिजे !

" हे बघ. मलाही तीन भाषा येतात, " मी तिला सांगितलं, " मराठी, हिंदी आणि इंग्रजी, बोल. "

ती मुलगी आपलं नाक उडवून हसली आणि म्हणाली,

" मी सुंदर आहे... "

कबूल ! बोलणंच खुंटलं.

तीन भाषा. पण पपांशी बोलायला यांपैकी कुठलीच उपयोगी पडणार नव्हती. त्यांना येते रशियन, फ्रेंच आणि स्पॅनिश. आहे की नाही गंमत ? मग जवळजवळ तीस वर्षांची दरी कशी भरून काढायची ? पण कुणास ठाऊक, भाषा न समजणं हे कदाचित पथ्यावरच पडायचं. नाही बोलावंसं वाटलं, किंवा समजा, काही सुचलंच नाही बोलायला, तर खांदे उडवून, " मी तरी काय करणार ? भाषेपायी नाइलाज आहे, " असं म्हणता येईल... खरंच, असंच मी करीन. मला नाही काही बोलायचं. किंबहुना मला भेटायचंच नाही. स्वप्न एकदा खरं झालं, की माझ्या हातात काय उरलं ? आं ? किती वर्षं मी हे स्वप्न उराशी बाळगलं. हळुवारपणे जतन केलं. ते आता, पाच तासांच्या पलीकडे जो एक क्षण दबा धरून बसला होता, त्याच्या असं चट म्हणता हवाली करू ? चल परत. पालमला जाऊ...

म्हणणं सोपं आहे ! आता नाही पाऊल मागे घेता येणार. फ्लाइट नंबर २२३ निघाली, की आपली काश्मिरी करंडी उचलून निमूट तू विमानात जाऊन बसशील. असं एकदा निघालं की परतता येतं का ?

का बरं ? आपल्या गल्लीतले जोशीकाका विसरलीस ?... जोशीकाका हे एक हुशार पण विक्षिप्त गृहस्थ. तरुणपणी उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला जायला निघाले. बोटीत बसले. बोट इंग्लंडच्या किनाऱ्याला लागली. अचानक त्यांची काय लहर

फिरली कुणास ठाऊक? 'परकीय भूमीवर पाऊल ठेवायचं नाही' असं त्यांच्या मनाने घेतलं. झालं. जोशीकाका नाही तर नाही खाली उतरले. त्याच बोटीने, सच्चा देशभक्ताप्रमाणे मायदेशी परतले. जोशीकाका हे नाव खोटं आहे. पण गोष्ट सोळा आणे खरी आहे.

आता पाच तासांवर तुझी जिऑमेट्रीची परीक्षा आहे. आणि तुला एकही थिअरम आठवत नाही. मग काय लिहिशील पेपरात?... बोल!

पाहू. लिहीन काहीतरी. आयत्या वेळी सुचेल काहीतरी. नाहीतर कोरा पेपर देईन...

टेलिव्हिजनवर पुन्हा ती मुलगी आली. माना वेळावून काहीबाही सांगू लागली. आजूबाजूची गर्दीदेखील पुन्हा फोकसमध्ये आली. पाहाव्याशा वाटणाऱ्या बायका. खावीशी वाटणारी मुलं.

इतकी सगळी मंडळी कुठे निघाली असतील? कोणत्या देशाहून कोणत्या देशाला? कशासाठी? फरकोटमधली उंच ब्लॉंड. तिची गोष्ट आहे ठाऊक? पैशा-साठी तिने एका जर्मन लक्षाधिशाशी लग्न केलं. एका मोठ्या चीज कंपनीचा मालक. अर्थातच तिचं त्याच्यावर प्रेम कधीच नव्हतं. त्याचा आधीच्या लग्नाचा तरुण मुलगा होता. तो काही कामधंदा करीत नसे. जुगारात बापाचा पैसा घालवी. त्याला बापाच्या बायकोचा शोध लागला. वयाने आपल्याहून लहान असलेला हा सोबती तिलाही पसंत पडला. दोघांचं जमलं, पण जर्मनीत भेटणं धोक्याचं होतं. दोघांनी पंधरा दिवसा-साठी न्यूयॉर्कला जायचं ठरवलं. पैसा लक्षाधिशाचा. मुलगाही त्याचाच. बायकोही त्याचीच...चल, काहीतरी सांगतेस. असा काहीसा सिनेमा मी पाहिला आहे... राहिलं! नाही खरं वाटत तर जाऊन विचार तिला. त्यानंतर तो लहानखोरा टक्कल पडलेला माणूस? दिसतो साधा, पण एक खून करून तो पळून चालला आहे. जन्मभर त्याला आपल्या अपंग आईची सेवा करावी लागली. चाकांच्या खुर्चीत बसल्याबसल्या ती त्याला कळसूत्री बाहुलीप्रमाणे नाचवी. त्याच्या हालचाली आखून देई. त्याला दुसरं आयुष्य ठाऊक नव्हतं. आईची सेवा करता करता तरुण व्हायच्या आतच तो म्हातारा झाला.

एके दिवशी अती झालं. त्याचं मन बंड करून उठलं. शांत चित्ताने त्याने आईच्या खुनाचा बेत रचला. तिने त्याचं आयुष्य नेमून दिलं होतं. त्याने तिचं मरण आखलं. फिटंफाट. औषधाच्या कॅप्सूल्समध्ये विषाची पावडर. आपल्याच हाताने तिने मरण ओढवून घेतलं. खेळ संपला. कुणालाच संशय आला नाही. रीतसर म्हातारीला पुरलं. पण हाती आलेल्या आयुष्याचं काय करावं, हे त्याला आता कळत नव्हतं. तो पळून चालला होता. कुठे, ते त्याचं त्यालाच ठाऊक नव्हतं.

आणि मी? मी कुठे निघाले होते? रोमच्या स्प्रिंगबोर्डवरून मी अज्ञातात उडी घेणार होते. लवकरच एका प्रश्नचिन्हाचं रूपांतर उद्गारचिन्हात होणार होतं.

या प्रश्नचिन्हाने माझा जन्मभर पाठलाग केला होता. आपल्यात काही तरी वेगळं आहे, हे सत्य बाकी इतर काही कळू लागायच्या आत मला ठाम कळून चुकलं होतं. समाजाने आपली जबाबदारी बजावली होती. "ए मुली, तुझे वडील कोठे असतात ग ?" या वाक्याने मला बेजार केलं होतं. एक चेहरा आठवतो. पोक्त बाई. पुढे आलेली बुबुळं. पुढे आलेले दात. दातांमध्ये मोठ्या फटी. दातांवरून जीभ फिरवून ती म्हणाली होती, " ए सांग की. सांग ना. चॉकलेट देईन. " मी मोठी झाले, आणि लोक मला असे सरळ विचारीनातसे झाले. पण प्रश्नचिन्ह कायमच राहिलं. ओठावरून नाहीसं होऊन ते सहस्र डोळ्यांमधून मला भेडसावू लागलं....

खरंच, रोमच्या विमानतळावर उतरताच कसं मोकळं मोकळं वाटलं होतं. इथे मला नाव-गाव नव्हतंच मुळी. पालमच्या काउंटरवर इतर सामानाबरोबर माझं व्यक्तित्वदेखील मी देऊन नव्हतं का टाकलं ? ते परत जिनिव्हाला मला मिळणार होतं. इथे मी होते ' क्ष '. अंकगणितामधल्यासारखी. या सुंदर चकचकीत काचेच्या बेटावर मी पाच तास सुखरूप होते.

विमानाच्या शिडीच्या पायथ्याशी बस उभी होती. छोटीशी, खेळातली वाटावी अशी. विमानातून प्रवासी भुळूभुळू खाली उतरले आणि त्या पिटुकल्या बसमध्ये जाऊन बसले. मीही. कुणीतरी बसला चावी दिली असणार, कारण बस सुरू झाली. दिल्ली-पासून ते आता जिनिव्हापर्यंत संभाळत आणलेली काश्मिरी करंडी गुडघ्यावर घेऊन मी बसले आणि जिवाचे कान करून एंजिनचा आवाज ऐकू लागले. मला माझ्या हृदयातली धडधड ऐकायची नव्हती. आज जवळ जवळ तीस वर्षांनंतर मला पपा भेटणार होते.

पाचच मिनिटांच्या अंतरावर बस थांबली. सगळे रूटीनबरहुकूम बाहेर पडले. मी बसूनच राहिले. मी रूटीनबरहुकूम नव्हतेच मुळी. शेवटी ड्रायव्हर मागे वळून हसला आणि म्हणाला, " आता उतरायला हरकत नाही मादाम. "

मादामला आता दुसरं गत्यंतरच नव्हतं. प्लॅस्टसीनच्या माझ्या पायांना रेटा देऊन मी उठले. हातातल्या करंडीचा केवढा आधार वाटला ! ' ऑल द बेस्ट ', मी करंडीला उद्देशून म्हटलं. कल्पना अशी की करंडी उलटून मला तेच म्हणेल.

विमानतळाच्या गच्चीवर खूप गर्दी जमली होती. मी वर पाहिलं, आणि मला पपा दिसले. एवढ्या गर्दीत मला नेमके तेच कसे दिसले, आणि हेच ते, असं मी कसं ओळखलं हे मला ठाऊक नाही. पण असं घडतं. घडलं. पपांनी मला पाहून हात उंच केला, आणि मग ते नाहीसे झाले. मीही कस्टम्सच्या कुंपणात शिरले. या काउंटर-वरून त्या काउंटरपाशी पासपोर्ट, दाखले, मेडिकल सर्टिफिकेट आणि इतर कागद दाखवीत फिरले. ' आता जीभ पाहू ' असं कुणी म्हटलं नाही नशीब.

फिरकीच्या फाटकाबाहेर पपा वाट पाहात उभे होते. मी बाहेर पडताच त्यांनी मला माझ्या करंडीसकट छातीशी कवटाळलं. जवळजवळ तीस वर्षं वाट पाहिलेला हा क्षण ! कल्पनेत मी तो कित्येकदा रंगवला होता. निरनिराळ्या रंगांनी. तो प्रसंग पाहताना किती वेळा रमून गेले होते. प्रत्यक्षात तो घडवून आणायचा, असं मी स्वतःला वचन दिलं होतं. कळू लागल्यापासून. आज इतक्या वर्षांनंतर मी वचनमुक्त होत होते.

तो क्षण येऊन ठेपला होता.

तो क्षण मी अनुभवलाच नाही.

बोल, या क्षणी तुझ्या काय भावना आहेत ?...

नीट लक्ष दे...हीच ती वेळ...ॲलर्ट आहेस ना ? कसं वाटतं आहे तुला ?...तुझी एक्झॅक्टली काय प्रतिक्रिया होते आहे ?... आता तुला खूप आनंद वाटायला पाहिजे...ही अपूर्वाई आहे...प्रत्येक भावना लक्षात ठेव...पुढे तुला नातवंडांना सांगायला लागेल...तुझ्या आयुष्यातला हा ऐतिहासिक क्षण आहे... चहूबाजूंनी स्टीरियोफोनिक आवाज— माझेच— माझ्यावर आदळले. ते ऐकता ऐकता क्षण निघून गेला.

पपांनी दोन्ही हात माझ्या खांद्यावर ठेवले आणि ते म्हणाले, "माझेच डोळे." आणखीही खूप काही काही ते बोलले. पण अजून मला तितकं फ्रेंच येत नव्हतं. त्यांना खूप आनंद झाला आहे, हे मात्र मला कळलं. तितकंसं फ्रेंच येत नसूनही.

मला वाटलं होतं त्यापेक्षा पपा वयस्क दिसले. त्याला कारण असं की पपांना आजपर्यंत मी कधी डोळ्याने पाहिलं नाही. मदतीला फोटो असत. फोटोतले पपाच मी पाही. डोक्याने विचार करून, मधली सरलेली वर्षं त्या फोटोमधल्या पपांना बहाल करता आली असती. पण तसं मी केलं नाही खरं. सुचलंच नाही कधी. फोटोमधल्याच पपांना मी चालतंबोलतं केलं. हिशोब मांडायच्या भानगडीत पडले नाही. तर म्हणून कल्पनेपेक्षा पपा एकदम वयस्क वाटले. अजूनही ते देखणे होते. सहा फूट उंची. तोंडावर मिरपूड उडवल्यासारखे वांग, धारेचं निमुळतं नाक, गडद निळे डोळे... जांभळेच.

पपांनी आपल्या मोटारीत सामान चढवलं. आत बसताच त्यांनी खिशातली छोटी डिक्शनरी काढली. इंग्रजी-फ्रेंच. या छोट्या डिक्शनरीच्या जिवावर तीस वर्षांचं अंतर भरून काढायचं होतं.

" आधी बाबुच्काकडे जाऊ. " पपा म्हणाले.

बाबुच्का ? बाबुच्का म्हणजे रशियनमधे आजी. " आम्ही तिला मामुच्का म्हणतो "... मामुच्का म्हणजे आई असणार !

आजीकडे माझा धाकटा काका जेराल्ड, त्याची स्विस बायको आंद्रे आणि माझी आत्या रने, एवढी मंडळी थांबली होती. पपांनी सगळ्यांना विमानतळावर

यायला बंदी केली होती. आयुष्यातल्या एका आत्यंतिक खाजगी प्रसंगाला त्यांना कौटुंबिक सोहळ्याचं स्वरूप द्यायचं नव्हतं. त्यामुळे काका आणि कंपनी जरा नाराज झाली होती. आजी रुसली होती.

ऱ्हयू द ला .प्रेयरीवर पहिल्याच इमारतीपाशी आम्ही थांबलो. “ ती बघ बाबुच्का. ” पपांनी वर बोट दाखवलं. इमारतीच्या खिडक्याखिडक्यांगणिक लोखंडी जाळीचे सुंदर सुबक सज्जे होते. एका सज्जात एक म्हातारी उभी होती. चारी बाजूंनी उघड्या असलेल्या अत्यंत जुन्या पद्धतीच्या लिफ्टमध्ये आम्ही शिरलो. लिफ्ट रे रे करीत वर चढू लागले. सातव्या मजल्यापाशी आमचा प्रवास थांबला. दारात माझी आजी उभी होती. इतकी अप्रतिम म्हातारी मी यापूर्वी पाहिली नव्हती. साबणाच्या दाट फेसासारखे केस. गुलाबी गाल. तेच निळे निळे डोळे; आणि चेहऱ्यावर खूपशा सुरकुत्या. प्रत्येक सुरकुती सुंदर ! माझे मुके घेऊन आजी रशियनमध्ये काही तरी म्हणाली. मला लगेच भाषांतर सांगण्यात आलं, “ आता मला मरायला हरकत नाही ! ” सगळ्या आज्या सारख्याच एकूण !

आंद्रे, जेराल्ड आणि रने आळीपाळीने पुढे आले. योग्य असं काही बोलून प्रत्येकाने आनंद व्यक्त केला. आम्ही सगळेच मग आत गेलो.

कुणीतरी कांडी फिरवावी, तसं अचानक हे कुटुंब माझ्यासमोर निर्माण झालं होतं. वडील, आत्या, आजी, काका, आणि काकू, सख्खे नातलग. आणि किती परके. इतके दिवस ही मंडळी कुठे दडून होती ? आज का अशी शापमुक्त झाली ? की मी झाले ? काही असलं, तरी या परीकथेची नायिका मी होते, एवढं नक्की. तेवढंच बरं वाटलं.

बाबुच्काची धांदल उडाली होती. तिने भराभर तीनचार जाड ॲल्बम आणले. भिंती, फायरप्लेसवरचा मॅटलपीस, टेबलं यावरही ठिकठिकाणी फोटो होतेच. बाबुच्का गतकाळात राहात होती. बोथी चोखत असलेले तान्हे पपा, रशियन राज्य-क्रांतीच्या वेळी झारच्या बाजूने लढत असताना समरी कामी आलेले माझे आजोबा-युनिफॉर्ममध्ये; चर्चबाहेरच उभी असलेली, नुकतंच लग्न लावून आलेली आई आणि पपा— आईच्या हातात ग्लॅडिओलाजचा भरगच्च गुच्छ; नाटकातल्या निरनिराळ्या भूमिकांमधली तरुण आजी; वेठ मारून एकत्र उभे केलेले लहानपणचे जेराल्ड, रने आणि पपा; आणि बोथीवाल्या पोझमध्येच तान्ही मी. आजीने असे कितीतरी क्षण साठवून ठेवले होते.

ती मला ॲल्बम दाखवू लागली. खूपसं बोलू लागली. बाकीचे सगळे अवघडून संकोचून भोवताली उभे होते. मी फोटो पाहाण्याऐवजी आजीला पाहात होते. फोटों-मधे मला शून्य रस होता. इतके दिवस फोटोच नव्हते का ?

बाबुच्काने दुसऱ्या ॲल्बमला हात लावताच पपांनी तिच्या खांद्यावर हात ठेवला आणि हळुवारपणे ते म्हणाले, “ आता पुरे. अजून खूप दिवस आहे ती...

शिवाय आता आम्हाला निघायला हवं."

"खरंच की." आजीने ॲल्बम उचलले.

"सांगितलंस ?" तिने माझ्याकडे पाहात विचारलं.

"अजून नाही." पपा म्हणाले.

खाली मोटारीत बसल्यावर पपा म्हणाले, "चल आता आपल्या घरी जायचं."

आपलं घर. पपांचं घर. म्हणजेच माझं घर. माहेर. उंबरठ्यावरचं माप उलटून सासरी गेल्याला चार वर्षं लोटून गेली होती, पण अद्याप सातासमुद्रापलीकडचं हे माहेर मी पाहिलं नव्हतं.

घरी जायचं म्हणाले खरे, पण पपांनी गाडी सुरू केली नाही. स्टीयरिंग व्हील-वर हात ठेवून ते तसेच बसून राहिले. मला वाटलं, ते सोप्या फ्रेंचमध्ये, किंवा कदाचित इंग्रजीतदेखील, काही वाक्यं जुळवताहेत. मी पपांच्या तोंडाकडे पाहात राहिले. एकदम पपा म्हणाले, "तुला एक छोटी बहीण आहे."

"बहीण ?"

"हो. एक छोटी बहीण, आणि एक सावत्र आई."

पपांनी गाडी सुरू केली. बाहेर बर्फ पडू लागलं होतं.

पपांचं घर दिव्होन–ले–बँ या लहानग्या गावी होतं. फ्रान्समध्ये. जिनीव्हा-पासून अंतर अवघं आठनऊ किलोमीटर, पण देश दुसरा. त्यामुळे स्वित्झर्लंडहून फ्रान्समध्ये शिरताना दोन जकात नाक्यांना तोंड द्यावं लागे. एक स्विस. एक फ्रेंच. स्विस जकातनाक्यापाशी आमची मोटार थांबली.

चकचकीत बटनांचा गडद निळा युनिफॉर्म घातलेला एक रुबाबदार अधिकारी पुढे आला.

"काही आहे ?" त्याने विचारलं.

"काही नाही." पपा म्हणाले. मग गमतीने पुढे म्हणाले, "माझी मुलगी. आताच हिंदुस्थानातून आली आहे."

अधिकारी यावर म्हणाला, "मग तिलाच जप्त करतो !" यावर पपा आणि तो मोठ्याने हसले !

पन्नास पावलांवर फ्रेंच जकातनाकं होतं तिथल्याही अधिकाऱ्याने अडवलं. त्याच्याही युनिफॉर्मला चकचकीत बटणं होती, त्याने विनोद मात्र केला नाही.

आम्हाला दार उघडलं, ते जाकलीनने. देखणी, उंच बाई. तिचा मुका घ्यायला मला टाचा उंच कराव्या लागल्या. पपांनी आमची रीतसर ओळख करून द्यायच्या आतच आमची ओळख पटली. काही ओळखी होतात, काही पटतात. आपल्या आईच्या स्कर्टआडून मारीना डोकावली. आठ वर्षांची माझी सावत्र बहीण. इतकी गोजिरवाणी. की, वाटलं हिला खाऊनच टाकावी. निदान आपली म्हणून करंडीत

टाकावी. कुणाला अवघड वाटायला तिने मुळी उसंतच दिली नाही. तोंडाने अखंड बडबड करीत तिने आपलं चिमुकलं भांडार माझ्यासमोर खुलं केलं. पुस्तकं, चित्रांच्या वह्या, शाळेची शाबासकीपत्रकं, बक्षिसं, खेळणी आणि बाहुल्या. कितीतरी बाहुल्या. सगळ्यांना मरीनाने सोफ्यावर शिस्तीत उभं केलं. गंभीरपणे सगळ्यांची नावं मला सांगितली. इतक्या नव्या ओळखी ! इतकी नवी नाती !

मी अगदी पंचांग पाहून गेल्यासारखी पोचले होते. नोएल, म्हणजेच फ्रेंचांचा नाताळ, अगदी हाकेच्या अंतरावर होता. अपूर्वाईचा सण. त्यातून आमचा पुनर्भेट सोहळा. दुधात मध. पपांचं घर रोमारोमातून बहरत होतं. कागदाच्या झिरमिळ्या, दिव्यांचे काजवे, लुकलुक टिकल्या, मेणबत्त्या, सोन्याचा मुलामा चढवलेल्या सूचिपर्णी (शाळेतल्या भूगोलातल्या) झाडांच्या फांद्या— घरात नोएलचा टेक्निकलर्ड ट्रेलर चालू होता.

भोवताली रिबिनी आणि कागदांचा ढीग जमवून मरीना प्रेझेंट्स गुंडाळीत बसली होती. पपांना आणलेला नेकटाय एका पट्ट्यापट्ट्यांच्या कागदात गुंडाळता गुंडाळता तिने विचारलं,

"तू अगदी नेमकी नोएलला कशी ग आलीस ?"

"आले खरी."

"सँटा क्लॉझच्या बर्फाच्या गाडीतून आलीस ?"

"छे ! आमच्या देशात बर्फाच्या गाड्या नसतातच."

"मग काय असतात ?"

"सूर्याचे रथ !"

पपांनी दिवाणखान्यातल्या कोपऱ्यात क्रिसमस ट्रीचं आरोहण केलं. झाड नव्या नवरीसारखं सजलं होतं. आता फुंकर मारावी एवढा नोएल जवळ येऊन ठेपला. प्रेझेंट्स बांधून तयार होती. पपा गाडी घेऊन जिनीव्हाला गेले. येताना गाडीभरून सामान घेऊन आले. काव्हियार, बदक, ऑलिव्हस्, अननस, व्होद्का, शँपेन आणि असं बरंच काही काही.

क्रिसमस ईव्हसाठी सकाळीच स्वयंपाकाला सुरुवात झाली. एक चमचा फ्रेंच स्वयंपाकाला दोन चमचे रशियन स्वयंपाक, असं प्रमाण होतं. सणासुदीला पपा स्वयंपाक करीत. त्यांनी स्वयंपाकघराचा ताबा घेतला. त्यांच्या हाताखाली जाकलीन आणि मारीना कामं करीत होती. माझी भूमिका मला धड उमगली नव्हती. मी प्रेक्षागृहात होते की रंगमंचावर? पाहुणी होते की घरची?

मोसुंबीच्या रसात बदक खदखदत होतं. जळलेल्या साखरेचा खमंग वास दरवळला होता. त्याला शह म्हणून मी चंदनाची एक उदबत्ती पेटवली.

अखेर संध्याकाळ उजाडली. घराघरातून नोएल जाहीर झाला. हा सण, किंवा खरे म्हणजे नोएल आधीची महत्त्वाची संध्याकाळ, आपापल्या घरात गुड्डूप साजरी

८।९१३६७५
22982



करायची. शेजारीपाजारी, सगेसोयरे, यांचा लोळ नाही. झाडाच्या एकेका सूचिपर्णा-गणिक एक एक भेट टांगली होती. वेळ होताच क्रिसमस ट्रीचा स्ट्रिपटीझ सुरू झाला. ज्याची भेट त्याच्या हातात पडली. कागदाची रंगीत टरफलं जमिनीवर विखुरली. आनंदोद्गार आणि आश्चर्योद्गारांनी वातावरण भरून गेलं. टेबलावर एक विविध वस्तूंचं लहानगं प्रदर्शन भरलं. पर्फ्यूमची बाटली, घड्याळ, काश्मिरी शाल, कॅमेरा, हस्तिदंती मूर्ती, रेशमी रुमाल, रेकॉर्ड्स्, पुस्तकं...

पपांच्या बागेत, दिवाणखान्याच्या खिडकीखालून दोन पावलांच्या अंतराने, एक लहानगा ओढा वाहात जातो. हा ओढा बहुधा थेट एखाद्या परीकथेमधून पपांच्या बागेत वाहात आला असावा. बाहेर नाक गारठून टाकणारी थंडी होती. पपांनी शँपेनच्या बाटलीच्या गळ्यांत दोरी बांधली आणि दोरी खिडकीला बांधून बाटली गार होण्यासाठी ओढ्यांत सोडली. मग जेवण सुरू झालं,

ग्रेपफ्रूटच्या छकलात मेयोनेजमधले झिंगे. कॅस्पियन समुद्रातून आलेले काव्हियार. बाबुच्काने स्वतः घरी केलेली व्होद्का ... टेबल उतू चाललं होतं. बंद दाराखिड-क्यांच्या फटींमधून दूर कुठेतरी गायली जाणारी प्रार्थनागीतं आत शिरली होती. आम्ही बोलत होतो, हसत होतो, वातावरणात हळूहळू विरघळत होतो. कोपऱ्यामधलं क्रिस्मसचं झाड आपला पिसारा फुलवून, कृतार्थ उभं होतं.

मध्येच मला हॅन्स क्रिश्चन अँडरसनची काडेपेट्या विकणारी पोर आठवली. क्रिसमसची अशीच सायंकाळ. बर्फ पडत होतं. मुलीच्या पोटात अन्न नव्हतं. पायात त्राण नव्हतं. एका मोठ्या घराच्या भिंतीच्या आडोशाला ती बसली. पाय पोटाशी घेऊनही ऊब येईना. एकच काडेपेटी शिल्लक होती. ऊब येण्यासाठी मुलीने काड्या जाळायला सुरुवात केली. एकेका पेटल्या काडीच्या आधाराने ती जगत होती. खरं म्हणजे मरत होती. काडी पेटवली म्हणजे समोरची भिंत वितळे आणि घराच्या आतलं नाताळ दृश्य दिसे. असेच दिवे. अशीच मेजवानी. असाच हशा ...

मला स्वतःचा राग आला. माझी स्वतःची इतकी अद्भुत गोष्ट खरोखरीची घडत असताना मी अँडरसनचं बोट असं का गच्च पकडून ठेवलं होतं?

पुढे ती मुलगी थंडीत काकडून मरते. काड्या कुठवर पुरे पडणार? गोष्ट शोकांत मात्र नव्हती. कारण मुलगी स्वर्गात जाते. तिथे तिच्या लाडक्या आजीची तिची पुन्हा भेट होते.

आजी...आजोबा...

मी अँडरसनचं बोट का धरून ठेवलं होतं ते एकदम लख्ख झालं. मला माझ्या आजोबांची आठवण काढायला निमित्त हवं होतं. आप्पा नुकतेच मेले होते. मला वाटतं, माझ्या आयुष्यातलं ते पहिलं खरं मोठं दुःख. आप्पांनी मला लहानपणापासून वाढवलं. ते मला वडिलांच्या जागी होते. आजोबांच्या जागी तर होतेच. त्यांनी मला जे जे दिलं, ते दुप्पट दिलं. ते गेले तेव्हा दुप्पट पोकळी मागे ठेवून गेले. फ्रान्सला

निघताना, मी स्वतःला खूप सावरलं समजावलं होतं. मरण कुणाला टळलं आहे? शोक केल्याने का गेलं माणूस परत येतं? काहीही त्रास न होता ते गेले यातच समाधान. आपण मनात कुढणं, कष्टी होणं वेडगळपणाचं आहे. वगैरे वगैरे. पण कितीही ठरवलं असलं, तरी आठवण कुठल्या ना कुठल्या मार्गाने भडभडून येई.

जाकलीनने वाफाळणारं बदक टेबलावर आणलं. त्याचे वाटे करायला म्हणून पपांनी तीक्ष्ण करवतकाठी सुरी उचलली. पण मोसुंबीच्या रसात बदक असं काही बहारीचं शिजलं होतं, की सुरीच्या टोकाचा स्पर्श होताच ते बशीत ढासळलं.

"व्होद्का अशी काय चाखत माखत पितेस?" पपा हसून मला म्हणाले. "एका घोटात ग्लास रिकामा झाला पाहिजे! कानशिलं लाल झाली पाहिजेत."

वडिलांची आज्ञा शिरसावंद्य, एका घुटक्यात मी ग्लासमधली जहाल व्होद्का संपवली. जाकलीनने ग्लास पुन्हा भरला.

वातावरण— किंवा मीच अतिशय सेंटिमेंटल झाले होते. मला वाटलं, आता मी वितळून माझा एक भला थोरला चकचकीत अश्रू होणार! पपा माझ्या अगदी समोर बसले होते. प्रत्यक्ष पपा! राहून राहून मला नवलाई वाटत होती. इतक्या वर्षांचं माझं स्वप्नं आज जागं झालं होतं. पपा कसे नेमके भेटले होते. पोकळी होतीच. एक उणे एक शून्य! शून्य अधिक एक; एक! खरंच गणित इतकं सोपं होतं का?

फार पूर्वी वाचलेलं एक दुष्ट नाटक आठवलं. 'माकडाचा पंजा.' एक परदेशी एका वादळी रात्री आसऱ्यासाठी एका अनोळखी घरात शिरतो. या घरात आई-बाप आणि एक कमावता मुलगा, गरिबीत पण सुखात राहात असतात. परदेशस्थाकडे एक माकडाचा पंजा असतो. तो पंजा हातात धरून इच्छा केली की ती म्हणे पुरी होते. आईबाप तो पंजा विकत घेतात. परदेशी वादळी रात्रीत पुन्हा नाहीसा होतो. मुलगाही कारखान्यात रात्रपाळीला निघून जातो. फार वेळ आईबापांना स्वस्थ बसवत नाही. पंजा हातात धरून बाप इच्छा करतो— हजार पौंड आम्हांला तत्काळ मिळू देत. बापाचा तो हिडीस वाळका पंजा वळवळवतो. काही क्षणातच फोन खणाणतो. एक रूक्ष अनोळखी आवाज सांगतो, 'तुमचा मुलगा यंत्रात सापडून ठार झाला आहे. कंपनीला खेद आहे. नुकसानभरपाई म्हणून एक हजार पौंड आपल्याला देण्याचा निर्णय कंपनीने घेतला आहे." पुढे आणखी अशाच घटना. इच्छा पुरी होत राहते. पण अत्यंत विपरीत, विकृत पद्धतीने.

तर माझे पपा मला भेटले. माकडाचा पंजा वळवळला.

बाराचे ठोके वाजले. "जॉय्यज नोअेल!" मेरी क्रिसमस. सगळ्यांनी उठून सगळ्यांचे मुके घेतले. पपांनी ओढ्यामधून आपली शँपेनची बाटली परत आणली. बाटलीचं बूच 'जॉयज नोएल' असं म्हणून उंच उडालं. लिंबोणी रंगाची फसफसणारी शँपेन जाकलीनने ग्लासाग्लासातून ओतली. लहानलहान टिंबं वर उसळली.

समोरचं सारं दृश्य— पपा, मारीना, जाकलीन, मेणबत्त्या, क्रिसमस ट्री—

डीफोकस झालं. सारवल्यासारखं झालं. मला पुन्हा आठवण झाली. या खेपेला ती डोळ्यांत साठली, आणि अखेर गालांवरून खाली ओघळली.

"मे से नॉर्मोल. तू ताफे नॉर्मोल" साहजिक आहे, अगदी साहजिक आहे असं म्हणत पपा उठले. माझ्या खारट गालाचा त्यांनी मुका घेतला.

त्यांना वाटलं, आनंदाश्रू.

□

चवदा

# सालबर्डीचा रानचेहरा

## मधुकर केचे

हसणंखिदळणं दिवाळीआधी होऊन जायचं. त्या आधीपासून धूळ खात पडलेली अभ्यासाची पुस्तकं मग डोळे वटारू लागत. मनाविरुद्ध अभ्यास करताना आधीचा सारा मोकळेपणा आठवणी-आठवणींनी आम्हांला खुणावायचा. अभ्यासात गढलेल्या टेबलावरच झरोका होता. त्यातून निळा सातपुडा हाका मारी. दुरून येणारे ते त्याचे शब्द नीटसे कळत नसत. अभ्यासाचं एकेक अक्षर त्या पर्वतराजाच्या सादेचं खांडोळं करी. श्रावण खरंच किती दूर गेलेला ! आणि पुन्हा यायलाही किती उशीर ! आता कुठं भगवान सूर्यनारायणाचं पौषातलं तोंडधुणं चाललेलं आहे. यानंतर जमीन वसंतणार, नंतर ग्रीष्मानं तापणार, नंतर नंतर – मग कुठं श्रावण ! आमचं सारं वर्ष असं श्रावणाच्या जिव्हाळ्यानं आसुसून जायचं. मनातल्या डोळाभर श्रावण ल्यालेला हिरवा सातपुडा ऐसपैस पसरलेला असायचा. सागबनाची ती केवढी थोरली पानं ! एकाच पानावर दोघांनी बसा आणि त्यावरच जेवण वाढा. आता ती पानं चिंचेच्या टिकल्याप्रमाणे रोडावली असतील. आरुणीची, काटबोरांची, आजनाची, कशाकशाची म्हणून तिथं वाण नाही. गवतच नव्हे थोरले भडे दगडदेखील हिरवळलेले. श्रावणातला एखादा सोमवार साधून आमचे हेडमास्तर सांगत.

"चला, भुईकुंडाला जाऊ."

आम्ही एकदम सुखावू. सातपुड्यातले भुईकुंड म्हणजे अमृतठाव. शिवाय तिथंच गुलाब पेठेची वावरं आहेत. आमच्यासोबत बंदूक घेऊन तोही मग यायचा. उत्तम आरुण्या घोडदेवाच्या आसपास आहेत हा शेवराव अंधारेचा शोध; पण आरुणीच्या चवीपेक्षा त्या गावाजवळ घरच्या मंडळींची भेटच त्याला गोड लागत असे. खरं म्हणजे घोडदेव काय अन् भुईकुंड काय दोन्ही सातपुड्याचीच स्थळं. अंतोऱ्याची वर्धा कुठल्याही गावी भेटली तरी सारखीच माया लावणार. संपूर्ण सातपुड्यावर प्रेम

करताना त्यातही एखाद्या ठिकाणावर उगीच जास्त आपुलकी दाखवणाऱ्या या लोकांचं म्हणणं आपल्याला काही पसंत नसे. त्यातच दुसरा एखादा अण्णासाहेबांना सुचवी, " सर, त्यापरीस ढोलमञ्चाला जाऊ या."

अण्णासाहेबांचं कुठे जायचं ते ठरलेलं असे. गेल्या वर्षी जिथं गेलं त्याच्या वेगळं जायचं. त्यात मग सूचना नाही नि उपसूचना नाही. दरसाल नवी ठिकाणं दाखवून सातपुडा पूर्ण करण्याचीच त्यांची ईर्षा ! आम्ही याच क्रमानं सारी स्थळं पालथी घातली.

मग बोर्डिंगचे मामालोक ( स्वयंपाकी ), भाकरू गोंड, झाडून सारी मुलं आणि अशा सणासुदीलाच घालण्याची स्काउटी पँट घालून कानफाडे सर त्या सातपुड्याच्या कोणत्यातरी अंगाकडे निघत. चिखलात लपलेले काटे आणि आभाळातून तऱ्हतऱ्हेच्या चालींनी झरणारं पाणी यांच्यामुळे पडली तर सुखातच भर पडे. संपूर्ण दिवस, दोन दिवस आमच्या खात्यात एक चिखलानं भरलेलं, ओलंगच्च, आखडलेलं आंबलेलं सुख जमा होई, पडसं, आलाच तर ताप, डोकंदुखी इत्यादी येत. पण सहलीचा सोहळा अपूर्व असे. कोणी रस्त्यात भेटणाऱ्या असंख्य गढूळ ओढ्यांची जंगली नावं ध्यानात ठेवलेली असत, कोणी त्यातली चुकून घडलेली आंघोळ. त्या रानात श्रावणाचा एकंदर दिमाख असा की नाल्यांना नदी म्हणावं लागे. एखादं ओहोळाचं पिल्लू एरव्ही गांडुळासारखं किरटं दिसणार; पण श्रावणात बेऱ्याला वाघाचा जोर. नळ, दमयंती, माडू या नद्यांतून तर पुराचा चहा नुसता डरकाळ्या फोडीत वाहायचा. त्यात भरीला सातपुड्याच्या विशाल पहाडीची चढण. सारी नवती नुसती न्हाऊन निघायची. या त्या झाडाजवळ थांबून आम्ही एकमेकांना दिलासा द्यायचे, " अरे या बोरीला पुसामध्ये अशी बोरं लागतात म्हणतोस— "

" हो त्याच्या स्वप्नात आले होते खंडीभर. "

" ...म्या तेच्यांतलेच खाल्ले टोपलंभर. "

" आपुन येऊ ना लेका त्या वख्तीं. "

आणि तेवढ्यात पुढे गेलेल्या अण्णासाहेबांनी एखादी म्हशीसारखं वेटोळं घातलेली धामण किंवा असली डोमा नाग ठोकल्याची आरोळी उठे. त्या वेळी त्या महान पर्वणीत नुसते हजर असणाऱ्यांवर वर्षभर स्तुतीची बोरं पिकत. साऱ्या रानाला जीव फुटल्यासारखा वाटे. सारा हिरवेपणा बोलका वाटे. आमचा वाटे.

आता अभ्यासाच्या वेळी त्याच जुन्या शब्दांनी सातपुडा खिडकीतून साद घाली. परीक्षा ऐन दाराशी यायची चैत्राच्या दरम्यान. पण तिच्याशी झुंजायचं तर तयारीही अशी आतापासून करावी लागे. तेव्हा गोंडस कुत्र्याला नाइलाजानं अंगाच्या दूर सारावं तसं आम्ही श्रावणसहलीला मनातून काढून टाको.

आणि अशा त्या सुन्न वेळी एकदम कानावर पडे, ' पोहा आला. ' पाठोपाठ ' डम् डम् डम् डम् 'चे आवाज आणि कपाळाला मळवट, खांद्यावर त्रिशूळ आणि

मधोमध आभाळभिड्या डोलकाठीचा महादेव यांची फेरी येई. त्यातल्या भक्तांना गावातलेही स्त्रीपुरुष साथ देत. "हर भोला हर हर महादेव." मुक्त झालेल्या शंकरांच्या नंदीला संसारपाशांनी जखडलेल्या बैलांनी आपल्या गोठ्यातून दिलेला हुंकारच ! त्यात मग काही लोक गडबडीनं बोचकं व बाण खांद्यावर घेऊन जोराचा 'हर भोला' करीत त्या 'पोह्या'त मिसळत. त्या नव्या भक्ताचा भला मोठा सत्कार होई. त्यालाच जणू ऐकवण्यासाठी डफ सपाटून वाजू लागे. गोठ्यातच अडकलेली माणसं त्या मुक्त बैलाचे पाय धरीत. टिळा लावीत. हार घालीत. मधूनच कोणी त्या सत्कारसोहळ्याला वाचा फोडी.

"महादेवाच्या रस्त्यानं
घोटा घोटा पाणी
नंदी लागला पोहणी ऽऽ

बोला हर भोला हर हर माहादेव ऽऽ" घराघरातून आरत्या, पूजा, प्रसाद व क्वचित नवे यात्रेकरू घेत पोहा निघून जाई.

पंढरीला जात्या वेळच्या दिंडीपेक्षा हे दृश्य फारच निराळे असे. पंढरीस कोणीही जावं. म्हातारीकोतारी, चिलीपाली, गळलीगुंगी सर्वांचा राजा विठू. पण शंकर देवाचं घर चढणं अशा आलतूफालतूचं काम नोहे. ऐरेगैरे नत्थू खैरे अशी मंडळी तर डमडमडमाटच्या डफातील बोलांनीच हादरून जायची. ती चढण, ते खाण्यापिण्याचे वाखे ज्यांना जमतील त्यांनीच त्या भक्तगणात दाखल व्हावं. न पेक्षा सारजा बदरीनसारखं करावं. म्हणजे असं की, तशा बाया पोहा आला म्हणजे त्यातल्या एखाद्याच्या पाया पडतात. गंध लावतात. चंचीतून नाहीतर पिशवीतून एक सतरा घड्याची एक रुपयाची नोट काढून त्याच्या हातावर ठेवतात. तेही नसलं तर निदान पाच आणे पाच पैसे. मोठ्या भावनेनं मग त्या विनवतात,

"बाबू, माझ्या बापा, माझ्या शंकरदेवा, ह्या पैशांचे फुलं घे जो. माझ्या नावानं थ्या कैलासपतीले वाहजो."

काहींच्या नावानं नुसतास नमस्कार शंकरापर्यंत पोहोचवावा लागतो. तानी बोपचीनला 'मोठं दुख' झालं त्याचा निरोप ती शंकराकडे दरसाल पाठवते. पोहे-वाले तिचा निरोप विसरत असावे ही तिची जोरदार शंका आहे. अंगाला काही म्हटल्या काही उतार पडू नये म्हणजे काय ?

तर असा हा पोहा निघून जाई. पण गाव चेतून उठे. महादेवाच्या नावानं आरत्या भजनं सुरू होत. अवधूती भजन हा तर भलताच भडांग्या प्रकार. मामुली वाद्य तिथं वाजतच नाही. झकनक झकनक भडांग ! भडांग ! ! वा ! वा ! कोणीही उठावं आणि म्हणावं,

"माहादेव भुयारांत राहे
गंगा जटांतून वाहे"

अन् पुन्हा धडांग धडांग सुरू. एकेका शब्दाचा आवाज पहाडासारखा ! त्यात मग कुठला आमचा अभ्यास अन् कसलं काय ? हे ओसरावं न ओसरावं न तर पुन्हा दुसरा पोहा. हा अंतोऱ्याचा.

अंतोऱ्याची मंडळी अशी पहिल्या पोह्यासारखी मुंगळ्या चालीची नाही. " चालले आपले तुरु तुरु ! धुत् लेकांनो, असं सबदीनमें अढाई कोस चालणाऱ्यांनी आमच्या आधी निघू नये तर कसं करावं ? चांगलं सालभर आधी निघा म्हणावं तेव्हा पोहोचाल एकदाचे. " या मंडळीचं चालणं दिवसाला बारा कोस. डोंगरदेखील बारा कोसांच्याच रट्ट्या चालीनं चढतात. आणि मागच्या पोहेवाल्यासारखे हे लोक लहान्या महादेवाला म्हणजे सालबर्डीला नाहीत जाणार. त्यांचा आहे मोठा महादेव. तिकडे अमरकंटकातला.

एकमेकांवर ताण करणारे हे पोहे वाजतगाजत मोर्शीच्या रस्त्यानं जाऊ लागत. त्यांच्या शंकरभक्तीपेक्षा सातपुड्याच्या श्रावणी आठवणींनीच माझं ऊर भरून येई. श्रावणातली शोभा एकांताचं सुख देई. ही शिवरातीची पहाडी जत्रेनं गजबजलेली असे. पहाडावरची सारी झाडं अंग झाडू लागत. पिवळा सोनेरी पाचोळा गोल गोल उडे. अकाली पावसाची एखादी झिम्मड. एखादे पाव्हणपणाला आलेले व यात्रेकरूंच्या राहुट्या उडवून गंमत करणारं वादळ आणि झडत्या पानातून उघड्या पडलेल्या रानफळांच्या पिकलेल्या हाका– सारं सारं आमच्या डोळाभर होई. शिवाय यात्रेच्या निमित्तानं तिथं उतरलेलं शहरी वैभव तर स्वर्गच जणू . अभ्यास की सालबर्डी? परीक्षा की जत्रा ? त्याचं उत्तर मग कानफाडे सर देत,

" तुमच्यापैकी ज्याला चाचणी परीक्षेत बरे मार्क पडतील त्यांना मी सालबर्डीस नेईन. जत्रा दाखवीन. "

तसे वीस पंचवीस भाग्यवान, त्यांच्या मागं रडतपडत लागलेले आणखी पंधरा वीस, हेडमास्तरांची नजर चुकवणारे पन्नासेक आणि...खरं म्हणजे सारीच शाळा मग एका शिवसकाळी फराळाचे डबे व स्काऊटचे दिमाखदार पोशाख घेऊन खोलवाटेनं निघत. अमरावतीकडची शहरी मंडळी मोटारीच्या रस्त्यानं मेंगवाडीकडून जाई. त्या खचोखच भरून जाणाऱ्यांपेक्षा आम्ही पायवाले मोठे सुखात राहू. मोटार यात्रेकडे निघाली की नेहमीसारखी वरुडजरुडकडे ते क्षणात ओळखू येई. केव्हाही लहर लागून त्या मोटारीतून ' हर भोला ' होई.

आम्ही अर्थातच ' हर भोल्या 'च्या वाटेला जात नसू. एकतर ती गाणी पाठ नव्हती. शिवाय रानाइतकाच यात्रेचाही पगडा मनावर असे. यात्रा म्हणजे शहराचा थाट. तिथं असं भगत होऊन फिरण्यापेक्षा थोडंसं फॅशनेबल माणसाच्या रंगानं विहार करणं आम्हांला आवडे. फार फार तर सहलीत म्हणायच्या त्या कॉंग्रेसच्या गाण्यांची फैर झडे.

" या गरिबांनो या झेंडा हाती घ्या " आणि मग

" मोटार जांभळी भरधाव धावली बसून बाहुली जाये हो. "

( पुढचे काही न आठवले तर दुसरे काही ). जमलेच तर चालता चालता भेंड्या होत. बालवीरांची शोधक बुद्धी वाढावी म्हणून एखाद्या झुडपाआड हेड-मास्तरांनी खाऊचे पुडे ठेवलेले असत. ते शोधणं हाही एक खेळ असे. श्रावणातला चिखल या वेळी सोबतीला नसे. त्या जागी सुपीक जमिनीच्या काळ्या वड्या व त्यावर खारामुळे आलेली खोबरेदार मलई दिसे. त्यावर खाण्याच्या उपमा चढवण्याइतकी भूक लागली म्हणजे सालबर्डी जवळ आलेली असे. तिचे रंगीत आवाज, लाऊडस्पीकरांचा गोंधळ, यात्रेकरूंचा ( महादेवी ऽऽ जातो गा । शंकर राया ऽ इत्यादीसह ) गोंगाट हे खूप दुरून जाणवे.

यात्रा जवळत चालली की तिथं पोचणाऱ्या खेडेगाववाल्यांच्या छकड्या बंड्यांनी धूळ गगनात मावेनाशी व्हायची. आम्ही मुकाट्याने पायवाटेनं निघो. छकड्यांच्या बैलांइतकीच धुरकऱ्यातही यात्रेची नशा चढायची. अगदी जुवापासून लोक छकड्यात भरत. तशाही स्थितीत शर्यती खेळायचे. भरधाव गाड्या न्यायचे.

सालबर्डी हे गाव फारच टिचुकलं. बऱ्यापैकी खेडंदेखील त्याला म्हणता येऊ नये. जवळदूरच्या नातेवाल्यांनी घराघराच्या ओसरीपासून तो अंगणापर्यंतचा ताबा घेतलेला असे. तरीही शंभरपट लोकसंख्या उघड्या मैदानात अस्थायी राहुट्या किंवा पालं ठोकायची. शेतीकामासाठी हवा असलेला बांबू याच यात्रेत विकत घेण्याचं शेतकऱ्याचं धोरण यासाठी की तो याच जंगलातला ताजा व स्वस्त मिळे. शिवाय छकड्यातला तडव त्यावर उभारला की राहण्यास पाल तयार. दुकानदार चापांच्या मांडवात राहात आणि ऑफिसरांसाठी कापडांचे तंबू. आमचे हेडमास्तर तिथं फिरणाऱ्या एखाद्या पोलिसाला बोलावून सांगत,

" एस्. डी. ओ. साहेबांना जाऊन सांगा की शिवाजी शाळेचे पोरं आले आहेत. "

" साहेब, हम अमरावती जिलेके नही, बैतुलके है। " म्हणजे बैतुलच्या पोलिसावर अमरावतीच्या व्यवस्थेची जबाबदारी नाही ! सालबर्डी वऱ्हाड व सी. पी. च्या मेंढावर; त्यामुळे पोलिसांनी आपापल्या जबाबदाऱ्या एकमेकांवर ढकलण्याचा निश्चय केलेला दिसे. फार तर एखादा दुरून बोट दाखवी,

" ओ जो बडा तंबू दिखता है ना, वहाँ शिवाजीके लडके रहेंगे ! "

' शिवाजीके लडके ' स्काऊट म्हणून साऱ्या यात्रेच्याच ओळखीचे असत. पोलिसांपेक्षाही आमचा यात्रेकरूंना उपयोग होई. त्यामुळे सिनेमा, सर्कस, जलसा कुठेही व्यवस्थेच्या मिषाने आम्हाला जाता येई. अण्णासाहेबांजवळ बालवीरांचा पोशाख मागण्याची चढाओढ लागे. अंगापिंडानं भरदार असलेल्या थोराड मुलांचीच अर्थात वर्णी लागे, हे सांगणं नकोच. आम्ही त्या स्काऊटसच्या पोशाखात पोलिसांच्या

पिल्लांसारखे दिसू.

भरल्या यात्रेपासून महादेवाचं भुयार मैलोंशी दूर. तिथं चढत चढत जाणे हे म्हाताऱ्या बायांना व तान्ही मुलं कडेवर घेऊन जाणाऱ्या बायामाणसांना दुर्गम वाटे. पण तेच जास्त जात. अधूनमधून पाणथळं ठेवून त्यांना पाणी पाजणं, म्हाताऱ्यांना मदत करणं हे सारं आम्ही दिवसभर केलं म्हणजे यात्रेकरूंनी दिलेल्या प्रसादाची मिठाई खात खात पुन्हा तंबूत हजर. मग यात्रेत फिरायला मोकळे.

यात्रा म्हणजे शहर. आणि हे शहर इतर कुठल्याही शहरासारखं. पण हे समीकरण सालबर्डीत खरं वाटत नसे. रंगीत खेळणी, मनवेधू तऱ्हेनं ताटांत रचलेली चवलावू मिठाई, जाहिराती करणारे व सिनेमा गाणारे कर्णे यांच्या कचाट्यातून सुटलो की इतर शहरी तोंडावळ्याच्या यात्रेचे वातावरण एकदम खलास व्हायचे. बिब्याच्या फुलांची आरास, बोरकुट इत्यादींची खास सालबर्डीची यात्रा मग दिसायला लागे. बिब्याची फुलं ही झाडीच्या सुपारीच्या आकाराची. तेवढीच तजेलदार काळी! चवीला उग्र गोड. त्यांचे ढीगच्या ढीग ओळीने मांडलेले असत. व्यापारी पेशाचा स्पर्श न झालेले भिल्ल कोरकू हे त्या रानयात्रेतील दुकानदार. तिथं भाव सांगणं, गिऱ्हाइकाला फसवणं हा प्रकारच नसे. तुम्ही विचारा,

“ बिब्याचे फुलें काय भाव ? ”

“ तीन आणे पायली. ”

“ दहा ( जुने ) पैसे देतं ? ”

“ नाही एखादा आना कमी द्या. पण इतका कमी भाव नाही घेणार. ”

अशी मजा. जोडीला बोरकूट. त्याचंही असंच. गिऱ्हाइकांचं घेणं चिमूटभर. खाणं पसाभर.नमुना पाहण्यासाठी म्हणून बोरकूट खावं.अन् मग तोंड आंबून जाईस्तो बक्के मारीत सुटावं. यालाही त्या जंगली दुकानदाराची ना नाही. त्याच्याच पलीकडे कवड्या, गुंजा, शिंपल्या, औषधी मुळ्या आणि तऱ्हतऱ्हेच्या रानकंदांची दुकानं. आणखी जरा दूर बांबूच्या खास सातपुड्याच्या म्हणून नावाजलेल्या भाजीव नक्षीदार काठ्या तो बाजार विशेषतः ताकदवाल्या लोकांचा. जराजराशा कारणाने त्या लाठीबाजारात दंगा ठरलेला. दुकानदाराने मांडलेल्याच काठ्यातून काही उचलून इतरही लोक त्या दंग्यात सामील होत. निदान दुरून तो दंगा व काठ्या घुमवणाऱ्यांचे ते चक्रीवार पाहताना आम्हांला खूप मजा वाटे, मग कुठून तरी पोलिसांची जंगी तुकडी येऊन मारामारी करणाऱ्या उभय पक्षांवर निःपक्षपातीपणे आपल्या सरकारी लाठ्या चालवून तो दंगा आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करीत. हा कायदेशीर उपाय न मानवलेला एखादा तीक्ष्ण बुद्धीचा माणूस मग त्या मारामारीत आवाज ठोकी,

“ महात्मा गांधी की जय. देश के लिये हम लाठी खायेंगे, डरेंगे नहीं. ”

या व्यापारी देवघेवीतून उद्भवलेल्या मामुली दंग्याशी महात्मा गांधींचा संबंध कधी व कसा आला ते त्या इंग्रजांच्या पोलिसांना कळतच नसे. यात्रेच्या दुसऱ्या

टोकाची त्या ' गांधीजयामुळे ' दिशाभूल होऊन प्रत्येकजण सत्याग्रहीच्या ईर्ष्येने तेथे धावून येई. पोलिसांनी दंग्याचे मूळ कारण सांगितले तर कोणासही पटत नसे.

यात्रा ही अशी चार-सहा दिवस चालायची. दरदिवशी फुगत जायची. रात्री रंगे. सकाळी भाविक होई. सूर्य उगवण्याच्या आधीपासून तिथल्या मोकळ्या थंडीने रातभर झोप न लागलेले भाविक उठत. नदीवर लांब लांब जाऊन स्नानं करीत. तिथेच शेण्या, काटक्या गोळा करून व नदीच्या पात्रातले तीन गोटे मांडून त्यावर चहाचा लोटा चढवीत. तोवर समोरच्या घनदाट पहाडी हिरवळीतून सूर्याची भगवी किरणं डोकावत. मग भाविकांचं मन उतू जाई. शंकराच्या नावाचा जयजयकार रानात सामावेनासा होऊन जाई.

सूर्य वटारून तापायला लागला म्हणजे हौसे गवसे नवसे मंडळीच्या डोळ्यांतली झोप पळून जाई. मग घाईघाईनं नदीकडे पळत तेही भगत मंडळींच्या कार्यक्रमात सामील होत. अर्थात त्याही वेळी रात्री रंगलेल्या जळगाववालीच्या गाण्याची एखादी लकेर त्यांच्या सर्वांगावरून पिसं फिरवी. दोन दिवस शहर जगायला आलेली खेडूत मंडळी मोठ्या हौसेनं जिवाची मुंबई करीत मग दिवसभर फिरत. अर्थात त्यांच्यात त्या मुंबईइतकीच शंकरभक्तीची लालसाही तीव्र असे. त्यामुळे कपाळभर चंदन आणि बुक्का लावून फिरणारा भाविक खेडूत मध्येच दोन पैशांचे ( रंगीनवाला, मलईवाला सस्ते में दिया ) एक आईसफ्रुट खाताना पाहून आम्हाला मोठीच गंमत वाटे. सर्वांगी मळके व घाणेरडे कपडे पेहेरलेला व धोतराच्या गाठी बांधलेला एखादा तरणा खेडूत नुकताच घेतलेला सव्वा रुपयाचा सँडोचा बनियन चक्क सदऱ्याच्या वरून घालून फिरताना दिसे. त्याचे वैभव कमी म्हणून हिणवणारा त्याला कोणीही दिसत नसे. त्या तशा वातावरणाचा आमच्यावरही परिणाम होऊन जाई. मग आमच्या वयाला, हेडमास्तरांच्या उपदेशाला न साजेसे आम्ही वागो. वाजणारे फुगे लहान लेकरांसारखे फुगवो. मूंगपट्टी, पेंडखजूर, बत्तासे, पेरकंड हे खाजे भर गर्दीत खावो.

या लोकगर्दीच्या कचाट्यातून उभा सातपुडा एकादशीच्या दुसऱ्या दिवशी मोकळा होई. उणेपुरे साताठ दिवस त्याच्यावर विजेच्या दिव्यांनी, रंगीबेरंगी पोशाखांनी व शहरी सजावटीने अक्षरशः आक्रमण केलेले असे. ही सालबर्डीची गोष्ट. बहिरमला तर सातपुडा पुरता एक महिना शहरी बनतो. तिकडचे लोकच मोठे हौशी. देवानं त्यांना त्या हौसेसाठी दोन दाणे दोन पैसे दिलेलेही आहेत. त्यामुळे तिथं एवढं चालून जातं. सालबर्डी मात्र आठ दिवसांवर जास्त शहरत नाही. या पहाडाची त्या आठ दिवसांत खूपच फार कुचंबणा होते. श्रावणात येणाऱ्या मंडळीप्रमाणे कोणीही त्याच्या रानदेखाव्याकडे लक्ष देत नाहीत. अधलंमधलं कौतुक होतं. पण ते तरी किती ? कधी कुठे एखादा माणून कुतूहलानं हत्तीडोह पाहून येतो. खरं म्हणजे हत्तीडोह हे सालबर्डीचं खरं वैभव. डोह आहे डोहासारखाच. थोडासा इतरांहून वडील. एक-दोन मगरीही त्याच्या काचेरी नितळ पाण्यातून स्पष्ट दिसतात. त्या डोहाचं अन् मगरीचं

एवढं हे नाही— महत्त्व आहे त्यातल्या गोष्टींचं. निसर्गानं त्या भल्या भव्य कातळांना हत्तींच्या आकृत्या दिल्या आहेत. मांडी घालून बसलेला, उभा राहिलेला, सोंड उंचावलेला अशा किती तरी हत्तींच्या आकारात ते मोठमोठाले दगड उभे आहेत. एकेक दगड जिवंत हत्तीच्या तिप्पट. माणसाला साधलं नसतं ते इथं असं निसर्गानं साधलं. वाऱ्यापाण्यानं घडवलं. तसंच त्या गरम पाण्याच्या झऱ्याचंही ! इथं पाहाल तर पाणी कसं मडक्यातल्या सारखं गार आणि दोन पावलं पुढं झालं तर नुसतं उकळणारं गरम, म्हणजे पाताळातल्या कोणी तर खालून पेटती लाकडं लावली नाहीत ना ?

तेच कौतुक घोडपागेचं. पहाडात एक भला मोठा कोनाडा आहे. कोणी खणला कुणास ठाऊक. माणसाचं काही ते काम नव्हेच. माणसं अशा वेळी निसर्गालाही-श्रेय देत नाहीत. ती मग राघवापांडवांचा स्पर्श त्याला लावतात. गरम पाण्याचा झरा म्हणे सीताकी नहाणी. आणि घोडपागेत होते पांडवांचे घोडे. तिथला कुबट वास सुधमुध घोड्याच्या लिदीसारखा येतो.

यात्रा एकादशीनंतर ओसरली म्हणजे आम्ही परत निघो. तिथलं रान त्या वेळी सुटकेचे निःश्वास सोडी ते आम्हांला मग मोशीपर्यंत जाणवे. चाराठ दिवसांनी तिथल्या वनजनांकडून आम्हांला वार्ता कळत—

" यात्रा सरली त्याच्या दुसऱ्या दिवशी यात्रेमुळे पळून गेलेले चारही वाघ पुन्हा भुयारात वसतीला आले. गर्दीला भिऊन लपलेला साप व त्याची आठ-दहा पिलं पुन्हा हत्तीडोहाच्या आश्रयाला दिसली. "

वार्षिक परीक्षेचा अभ्यास करताना या बातम्या ऐकण्यात मजा वाटे. वाघ परत आले. सापही आले. हरणं, बदकं आली असतील. त्यांना घरगुती वातावरण लाभलं असेल. जणू काही यात्रेकरूंविषयी नाखुषी दाखवण्यास गळून पडलेली सागाची पानं पुन्हा कोंभू लागली असतील आणि पुढच्या श्रावणापर्यंत पुन्हा सालबर्डी खऱ्या पहाडी चेहऱ्याची होईल आणि मग पुन्हा आपण जाऊ— हे विचार मग पुस्तकांच्या छापील जोखडातून निसटत. खिडकीतून दिसणारा, दूरवर फाट्याफाट्यांनी पाय पसरून बसणारा सांबरशिंगासारखा सातपुडा मी पुन्हा पुन्हा पाहो.

□

पंधरा

# अतामी

## प्रभाकर पाध्ये

अतामी हे मधुचंद्राचे अभिजात ठिकाण आहे. निसर्गानेच अतामीची तशी योजना केलेली आहे. आपल्याकडून तिला काही कमी पडू नये अशी त्याने शक्य तितकी काळजी घेतली आहे. जपानचा रिव्हिएरा म्हणून प्रसिद्ध असलेल्या भागातील एका नितान्तसुंदर खोऱ्यात अतामी वसलेली आहे. तीन बाजूंना तीन तऱ्हांनी पसरलेल्या डोंगरांनी तिला कुशीत घेऊन कुरवाळली आहे, आणि चौथ्या बाजूला समुद्र तिच्या पायाशी येऊन चूर झाला आहे, या डोंगरावरील वनश्रीकडे टक लावून अतामी पाहते तेव्हा तिचे डोळे हिरव्या स्वप्नांनी मुग्ध होतात आणि ती समुद्राच्या निळ्या विस्तारावर दृष्टी फेकते तेव्हा तिची नजर विस्फारते. एकीकडे डोंगरावरील आकाशरेषेबरोबर ती आंदोलित होते तर दुसरीकडे क्षितिजावरील जहाजांबरोबर ती स्थिरावते. समुद्र आणि डोंगर यांच्याबरोबर नजरबंदीचे खेळ खेळत असतानाच मधल्या ओढ्यांच्या काठांनी ती आपला व्यवहार मांडते आणि मग या व्यवहाराने थकलेले शरीर उष्ण झऱ्यांच्या हौदात आरामाने झोकून देते. उन्हाळी झरे हे अतामीचे वैभव आहे. बारा महिने तेरा काळ या वैभवाच्या विलासात ती दंग असते—त्याच्या दरवळलेल्या उन्मादक गंधात मस्त असते.

अतामी हे एकट्याने भेट देण्याचे ठिकाण नाही. जोडप्याने भेट देण्याचे ठिकाण आहे. या जोडप्याच्या बंधनाची गाठ स्वर्गात बांधलेली असली पाहिजे अगर सालंकृत कन्यादानाची चिन्हे धारण करून त्याने आपल्या परिसरात पाऊल टाकले पाहिजे, अशी अतामीची मुळीच अट नाही. एक पुरुष आणि एक स्त्री एवढी निसर्गनियमाची किमान अट त्याने पाळली की पुरे. अधिक चांभारचौकशा करण्याची गरज नाही. हा पुरुष आणि ही स्त्री परस्परांवर अनुरक्त असली की ती खूष— आणि शनिवार-रविवारची सुट्टी घालविण्यासाठी आलेल्या जोडप्यांच्या पहिल्या नजरेतच हे अनुरक्तीचे पाणी खेळत असलेले दिसते, असा तिचा अनुभव असतो. म्हणून आगगाडीच्या स्टेशनात ही जोडपी उतरल्याबरोबरच ‘ मधुचंद्राच्या यात्रेकरूंचे स्वागत असो ! ’अशी घोषणा ती करते. या घोषणाचा आवाज हा अतामीचा खास आवाज आहे, आणि जपानी गेटांचा ‘ खटक्–खटक् ’ ‘ खटक् खटक् ’ आवाज अगर रात्रीचा आगीच्या बंबवाल्यांचा ‘ टाप्–टाप् ’ ‘ टाप्–टाप् ’ हा आवाज, या अभिजात आवाजांइतकाच या घोषणेच्या आवाजाचा तिला अभिमान आहे. या आवाजात तिचे सारे अगत्य, सारा उत्साह भरलेला आहे. अतामीत येणारे मधुचंद्राचे यात्रेकरू या आवाजावर

आंदोलित होऊनच येतात,—कारण ते जमिनीवरून चालत नाहीत, हवेतून चालतात !

अतामी पाच दिवस आळसावते, पण या दोन दिवसांत तिच्या अंगामध्ये वारे शिरते ! शुक्रवारपासूनच तिची झोप उडू लागते, पण शनिवारी ती चांगली नाचू लागलेली असते. या दोन दिवसांत ती किमोनोवरील नक्षीच्या नजरेने पाहते, उन्हाळी झऱ्याबरोबर खेळते, साकेच्या पेल्याबरोबर झुकते, सामीसेनच्या स्वराबरोबर गाते, पंख्याच्या प्रतीकात्मक पवित्र्याबरोबर पदक्षेप करते— एकंदरीत यौवनाच्या उन्मादाने बेहोष होते. अतामीच्या आठवड्यातले हे दोन दिवस म्हणजे स्वतःला झोकून देण्याचे दिवस होत !

अतामीचा संसार म्हणजे अतामीच्या हॉटेलांचा संसार. पाच दिवस यथास्थित ताणून देऊन सहाव्या दिवशी ती तुमच्या स्वागतासाठी सज्ज होतात. त्यासाठी आपल्या साऱ्या चैतन्याला जाग आणतात. त्यांचा माणूस स्टेशनवरच तुमचे स्वागत करतो. तेथून तो तुम्हांला हॉटेलमध्ये घेऊन जातो. हॉटेलच्या दर्शनानेच तुम्ही खूष होऊन जाता. जपानी कलात्मकतेचे प्रमाणशीर सिंचन त्याच्या प्रवेशद्वारावर झालेले असते, आणि त्याच्या नावात जपानी काव्य ओतलेले असते. येथे समुद्राचा खारा वारा तुमचे अंग फुलवील अगर अलबुखारच्या फुलांचा सुगंध तुमचे अंतःकरण उमलवील अशी या नावात ग्वाही असते. हॉटेलात आल्याबरोबर तेथील गोड परिचारिका तुमचे स्वागत करते— म्हणजे तोंडभर हास्य फुलविते, नेत्रांच्या मासोळ्या नाचविते, कमरेत लवून नमस्कार करते आणि लगेच नुमच्या बुटांचे बंद सोडू लागते. मग पायात घालण्यासाठी सपाता पुढे करते आणि तुम्हांला तुमच्या खोलीत घेऊन जाते. खोलीच्या नुसत्या दर्शनाने तुमचे भान हरपते. दरवाजासमोरच स्टँडचा पडदा असतो, त्याच्यावरचे किरमिजी रंगातले बगळ्याचे जपानी चित्र पाहून तुमची नजर स्तब्ध होते— पण क्षणभरच; कारण इतर अनेक गोष्टी तिला आपल्याकडे खेचीत असतात. तोकोनोमात टांगलेल्या चित्रातले फोडलेल्या डाळिंबाचे दाणे आणि सतरा छेदांच्या छोट्या काव्याची जपानी चित्राक्षरे यांची संगती तुमची नजर क्षणभर अगदी बांधून टाकते. तोकोनोमातल्या फुलदाणीत आज सूर्यफुलांची योजना आहे ( जपानी चिडाच्या अगर मोरपंखाच्या डहाळीची नाही ) ही बहुधा परकीय पाहुण्यांच्या आवडीची खास कदर. वर छताच्या प्रत्येक खणात चित्रकलेचे खास नमुने आहेत. एकात कावळ्याची योजना आढळते— आणि जन्मात प्रथमच कावळा सुंदर वाटतो ! पण या साऱ्या चित्रचातुरीपेक्षा तोकोनोमाचा लाकडी खांबच तुमचे लक्ष खेचून घेतो. जंगलातल्या झाडाचा हा सलग अवयव तसाच, त्याच्या साऱ्या नैसर्गिक वळणांसह, येथे आणून बसविलेला असतो. त्याच्यावरची साल काढून टाकण्यापलीकडे शस्त्राचे अधिक काही संस्कार त्याच्यावर झालेले नसतात. पण त्याच्या दाणेदार रेषांच्या अंगावर पॉलिशचे हात असे काही फिरलेले असतात की त्याच्या तकतकीत दर्शनाने तुम्हांला वेड लागते आणि त्याला जाऊन आलिंगन देण्याचा तुम्हांला मोह होतो. पण ती मुलगी तेथे असल्यामुळे

तुम्ही तसे काही करीत नाही, फक्त एकवार त्याच्यावर हळुवार हात फिरविता आणि मग नजर इकडेतिकडे फिरते. तुम्ही चकित होता. खोलीत फर्निचर काहीच नसते. एका कोपऱ्यात फक्त एक कपडे ठेवण्याचा स्टँड आणि भिंतीसरशी एक बैठा आरसा. पण त्या खोलीचे रिकामे रूपच तुमच्यावर अंमल गाजवू लागलेले असते. कारण तुमच्या पायांना रेशमाचा स्पर्श करणारी आणि डोळ्यांत तकतकीतपणा ओतणारी जमिनीवरची ततामी ( चटई ) तुम्हांला ओढ लावीत असते. इतक्यात ती मुलगी सज्जातल्या सरकत्या खिडक्यांचे पडदे सरकवते आणि तुमचे लक्ष सज्जातल्या सोफा-खुर्च्यांकडे आणि खिडक्यांतून दिसणाऱ्या समुद्राच्या विस्ताराकडे जाते आणि तुम्ही नकळतच जाऊन सोफ्यावर अंग झोकून देता आणि टक लावून बाहेर पाहू लागता.

तुम्ही स्नान करून परत येता तो जेवण तयार असते. परिचारिका एक छोटेसे चौरंगासारखे टेबल आणून ठेवते, त्याच्याभोवती गिरद्या मांडते आणि टेबलावर जेवणाचे पेले आणून ठेवते. जपानी जेवण तुम्हांला आवडो न आवडो, त्याच्या नुसत्या दर्शनाने तुमचे पोट भरते— निदान दृष्टी निवते. कारण जपानी जेवण जितके स्वादिष्ट असते त्याहून अधिक रंगदार असते. लाल, शेंदरी, केशरी रंगांचे पदार्थ जिभेपेक्षा डोळ्यांनाच अधिक भुरळ घालतात. जपानी कारागिरांची शेकडो वर्षे कमावलेली कलादृष्टी त्यात ओतलेली असते. या दृष्टीचे सारे रंगदार संस्कार त्यांच्यावर झालेले असतात. एकेक बशी आणि एकेक पेला म्हणजे कलेचा कोमल नमुना असतो. वैशिष्ट्य-पूर्ण नमुना. कारण प्रत्येक हॉटेल स्वतःसाठी खास वैशिष्ट्याच्या पेले-बशा तयार करून घेत असते. म्हणून हॉटेलचे अन्न जितके रंगदार तितकेच त्याच्या पेले-बशाही रंगदार; आणि रंगदार अन्न आणि रंगदार बशा यांची रंगीत स्पर्धा तुम्ही क्षणभर नुसती पाहतच राहता !

जेवण झाल्यावर अर्थात तुम्ही बाहेर भटकायला जाता. अतामीच्या शोभेचा आस्वाद जोडप्याने घेतला पाहिजे. अतामीच्या सुशोभित रस्त्यांत जोडप्याने हिंडले पाहिजे. अतामीचे वातावरणच तसे आहे.

हा रस्ता पहा ! रस्त्याच्या काठच्या या दीपमाळा पाहा. येथे दिव्याच्या खांबावर एकुलता एक दिवा असहायपणे जळत नाही. येथे खांबाखांबाला दिव्यांचे तोरणच आहे. अगदी सप्तरंगी तोरण ! आणि ही दुकानापुढची कागदी कंदिलांची रांग पाहा. एकेक कंदील म्हणजे रंगीत प्रकाशाचा ठेवाच ! एकेका कंदिलात एकेक कविताच तेवत आहे. एकेका कंदिलावरची आकृती म्हणजे अचानक जाग आलेली कलाकृतीच ! या दिव्यांच्या तोरणांनी आणि कंदिलांनी अतामीच्या रस्त्यावर प्रकाशाचा उत्सव मांडला आहे ! या उत्सवात जोडप्याने हिंडा— तुमच्या अंतरंगातली अनुरक्ती विजेच्या दिव्यातील केसरासारखी प्रज्वलेल.

कोणत्याही दुकानात शिरा. तुम्हा दोघांना पाहताक्षणीच तेथल्या मुलीच्या डोळ्यांत खुणेचे पाणी लकाकेल आणि तुम्हांला हव्या असलेल्या वस्तूला एकदम एक

खास अर्थ प्राप्त होईल.

चालता चालता तुम्ही पाचिकोच्या दुकानात शिरता ! पाचिकोच्या यंत्रात कथलाच्या गोळ्या उडवून नशिबाची परीक्षा पाहण्याचा हा खेळ तुम्हां दोघांनाही फार आवडतो. थोडा वेळ तुम्ही या यंत्राची कळ आळीपाळीने दाबून एकमेकांच्या नशिबाची एकमेकांवर मात करण्याचा प्रयत्न करता. पण लवकरच तुम्हांला त्याचा कंटाळा येतो. मग तुम्ही दुसऱ्या अशाच एका जुगारी खेळाच्या दुकानात शिरता आणि तेथली बुचाची बंदूक घेऊन तेथे वर्तुळाकार फिरणाऱ्या स्टॅण्डवरची वस्तू स्थानभ्रष्ट करून ती जिंकण्याचा खेळ खेळता. पण ही सोपी वाटणारी गंमत बरीच कठीण असते. लाकडाची बुचे सोन्याच्या भावाने विकत घेण्याचा हा बुडित खेळ लवकरच तुम्हांला कंटाळा आणतो. कारण जुगारी करमणुकीत आज तुमचे मन रमत नाही. तुम्ही स्वतःच एका जबरदस्त जुगारात अडकलेले असता ना ! या नाजुक जुगाराचे धागे अंतरंगात गुंतत-गुरफटत असतात त्याचीच तुम्हांला अधिक गंमत वाटते. तुमचे अवघे अंतरंग रांधून टाकणारी ही गंमत बाजारी जुगारात बुडवून टाकण्याची कल्पना तुम्हांला सहन होत नाही, नि पाचिंको-बिचिंकोच्या भानगडीपासून तुम्ही दूर जाता.

—आणि तुम्हांला आढळून येते की, तुम्ही आता अतामीच्या एका विलग, विश्रब्ध विभागात आला आहात, —आणि या येथे हारीने उभ्या असलेल्या गल्ल्यांपैकी एकीत तुम्ही उभे आहात ! या गल्ल्या म्हणजे आसावलेल्या अंतःकरणाची विश्रांति-स्थाने ! अगदी शांततुष्ट स्थाने ! येथे गडबड नाही, गर्दी नाही, झगझगाट नाही. येथला उजेड अंधुक आहे, वातावरण निभ्रान्त आहे, आणि दर्शन आश्वासक आहे. येथे तुम्ही एकमेकांना अगदी बिलगून चालता. आता एकाच्या शरीरातील सळसळीची गती दुसऱ्याच्या सळसळीत मिळून गेली आहे, आणि एकाच्या भावनांचे स्पंदन दुसऱ्याच्या स्पंदनात विलीन झाले आहे. आता तुम्ही एका पावलाने चालता, एका नजरेने पाहता. चालता चालता एका पेयगृहापुढे तुमचे पाऊल थबकते. पेयगृहाच्या आवारातल्या अझेलिआच्या झुडपाने तुमची दृष्टी वेधते. इवलाले पक्षी होऊन त्याच्या गूढ विस्तारात गडप व्हावे असे तुम्हांला वाटते. तुम्ही एकदम अंतर्मुख बनता व क्षणभराने एकमेकांकडे मुग्ध दृष्टीने पाहता— मग तुमची तुम्हांलाच गंमत वाटते आणि थोडे मजेदार हसून तुम्ही पुढे जाता. जरा वेळाने तुम्ही एका कॉफीगृहात शिरता. तेथे टेबलावर टेलिफोन असतो. तो पाहून तुमच्या डोक्यात एक मिस्किल कल्पना येते नि तुम्ही वेगवेगळ्या टेबलांपाशी बसून एकमेकांच्या कानांत करावयाच्या गोष्टी टेलिफोन मधून करू लागता; पण ते अर्थात जमत नाही आणि ही बालिश गंमत तुम्ही आटोपता आणि बाहेर येता. जरा वेळाने एका पेयगृहाची किमोनोकन्या तुमच्याकडे अपेक्षेने पाहते, पण लगेच तुमच्या नजरेवर तरळणारी स्वप्ने ओळखते आणि तुम्हांला बीअर-पानासाठी निमंत्रण करण्याऐवजी नुसते चोरटे हसते. तुम्ही पुढे जाता नि समुद्राच्या धक्क्यापाशी थांबता. धक्क्यावर आदळणाऱ्या लाटांच्या तुषारांनी तुमचे शरीर शहारते

पण सागराच्या दर्शनाने हाललेले तुमचे मन एकदम तुमच्या वेगवेगळ्या घरी जाते. आता या क्षणी आपण असे एकमेकांपासून दूर जावे याचा तुम्हांला धक्काच बसतो आणि तुम्ही एकदम भानावर येऊन म्हणता, ' चला– '

तुम्ही पुनः त्या गजबजलेल्या रस्त्यावर येता, पण लगेच रस्त्यापलीकडे होता. आता तुम्ही ओढ्याकाठच्या वाटेवर आहात. तेथे एक झाड असते. झाडाखाली काळोख असतो. काळोखात एक अलिप्तता असते. त्या अलिप्ततेची आता तुम्हांला ओढ असते. त्या ओढीने तुम्ही झाडाखाली जाता. तेथून खालच्या गजबजलेल्या रस्त्यावरचे उधाण तुम्हांला दिसत असते. त्याचे रंग तुमच्या आता ओळखीचे झालेले आहेत. तेथल्या पावलांची लय तुम्हांला आता माहीत झालेली आहे. तेथल्या नजरेचे खेळ तुमच्या आता परिचयाचे आहेत. येथून दुरून ते पाहण्यात आता एक निराळीच गंमत आहे. त्यात असून नसल्याची गंमत ! तिचा आस्वाद घेत तुम्ही उभे राहता. तो आस्वाद घेता घेताच तुमच्या परस्पर आकर्षणाला अंतर्यामीच्या ओळखीचे स्वरूप येत आहेसे तुम्हांला वाटते नि तुम्ही म्हणता, ' चला जाऊ या आता परत.' पण परत यायचे पुन्हा म्हणजे त्या भर रस्त्यावर यायचे. पण या रस्त्याकडे थोडे तिऱ्हाईतपणाने पाहण्यास तुम्ही आता शिकला आहात. आता त्याच्या निर्भर उत्सवाने तुम्ही वाहून जात नाही. पोहता पोहता लाटेशी खेळावे, लाटेवर डुलावे तसे खेळत-डुलत तुम्ही चालता. क्षणात तुम्ही त्या उन्मनस्क जीवनाच्या प्रवाहाशी एकरूप होता तर क्षणात तुम्ही तुमचे स्वतंत्र विश्व निर्माण करता. हे तुमचे विश्व म्हणजे अतामीच्या रस्त्यातल्या आनंदोत्सवाचा एक तुकडाच– कधी तो अलग होतो तर कधी तो इतर तुकड्यांशी मिळून जातो, असा हा मीलनाचा आणि अलगपणाचा गोड लपंडाव खेळत तुम्ही हॉटेलात परत येता.

खोलीत येता पण दिवा लावीत नाही. सरळ जाता आणि सज्जातल्या सोफ्यावर जाऊन पडता. तिकडून समुद्राचा ओला खारा वारा येतो, त्याने तुमचे शरीर शहारते. आता तुमची नजर खोलीवर फिरते. खोलीतल्या किरमिजी काळोखात मघाची दृश्ये आता एक नवेच सौंदर्य धारण करून आहेत. दारासमोरच्या पडद्यावरचा किरमिजी बगळा आता या काळोखात पार लोपून गेला आहे, पण त्याची स्मृती मात्र नजरेसमोर नाचत आहे. तोकोनोमातली ती दोन सूर्यफुले आता एकमेकात मिळून गेली आहेत. तोकोनोमाच्या त्या रांगड्या खांबावरच्या रेषा आता दिसत नाहीत. पण त्याच्या वक्र वळणाला आता काव्याची लहर प्राप्त झाली आहे. खोलीतले सारे वातावरण आता असे लहरले आहे. वस्तू-वस्तूंतले भेद आता निमाले आहेत. या साऱ्यांची एक सलग आकृती जाणवू लागली आहे. दिवसाच्या उजेडात प्रत्येक वस्तूच्या स्वतंत्र सौंदर्यामुळे जी एकता लोपली होती ती आता आकारली आहे. या एकतेत विरून जाण्याचे विचार आता जोरावतात– आणि लक्ष अंथरुणाकडे जाते. अंथरुणाची ऊब अंतः-करणात शिरू लागते. इतक्यात समुद्राचा गार वारा येतो. अंग शहारते. जडावलेली

दृष्टी पुनः एकदा टवटवते आणि बाहेर जाते. बाहेर आता निराळेच दृश्य असते : चमचमणाऱ्या हिऱ्यामाणकांचे दृश्य. अतामी शहराचे मघाचे झगझगलेले रूप आता या हिऱ्यामाणकांच्या विखुरलेल्या विस्तारात येऊन बसले आहे. लाल, निळ्या, हिरव्या, पिवळ्या हिऱ्यामाणकांच्या चमचमीने हे रूप आता रंगले आहे. एखादे माणिक मध्येच प्रकाशते, मध्येच मंदावते. मध्येच एखाद्या गहिऱ्या रंगाची रेखा इकडून तिकडे आकृती कोरीत जाते— आणि गप्प होते. पलीकडे डोंगरावर एकच एक लाल तारा एकटाच प्रकाशत असतो— आपल्या उच्च स्थानाच्या दिमाखाने प्रकाशत असतो. मघाशी अतामीत जीवनोत्सव उसळला होता ना, त्याचीच आकाशात उडालेली ही प्रकाशपुष्पे ! तुमची नजर त्यांच्यावर खिळते, क्षणभर ती अगदी निर्बोध बनते. पण मग लगेच तिला एक चाळा लागतो. यांपैकी कोणत्या पुष्पाचा अतामीच्या कोणत्या भागाशी संबंध असतो ते ती शोधू लागते. इतक्यात पावसाची सर येते. एक झिरझिरीत पडदा पसरतो. त्याच्याआड काही माणके मालवतात, काही अंधुक बनतात, आणि जी अद्याप प्रकाशतात ती अधांतरी लोंबतात. त्यांचा अतामीशी असलेला संबंध तुटतो— आणि या तुटातुटीच्या जाणिवेनेच अतामीच्या त्या जीवनोत्सवाची आठवण अंगावर पसरते. पसरते पण पकडत नाही— कारण त्यातले स्खलित, विश्रब्ध विश्व तुम्ही अनुभवलेले असते. त्याची मोहिनी वाढलेली असते. लवकरच त्याच्यात तुम्ही विलीन होता.

अतामी मी अशी जोडप्याने पाहिली नाही. अतामीचा अस्सल अनुभव मला नाही. आम्ही अतामीला दोघे जण आलो होतो, पण जोडप्याने आलो नव्हतो. जपानमधले एक स्वैर सुखाचे स्थळ दाखविण्यासाठी म्हणून पासीनने मला आणले होते. म्हणून अतामीत आम्ही आखडलेल्या वृत्तीने हिंडलो. बुद्धी आणि वृत्ती ताब्यात ठेवून हिंडलो. अर्थात् अतामी आम्हांला निराळी दिसली. अतामीचा दीपोत्सव आम्ही पाहिला, पण त्याने आमची मने धुंद झाली नाहीत. आम्ही दुकानात शिरलो, पण तेथल्या मुलीच्या नजरेत ती ओळख आम्हांला दिसली नाही. त्या अंधुक उजेडाच्या गल्ल्यांत आम्ही शिरलो, पण कबुतरे बनून तेथल्या एखाद्या वळचणीत शिरावे असे आम्हांला वाटले नाही. त्या ओढ्याकाठच्या झाडाखालीही गेलो, पण तेथे ते विश्रब्ध विश्व गवसले नाही. उलट आम्हांला निराळीच दृश्ये दिसली. अमेरिकन नाविकांचा एक ताफा आम्ही पाहिला, पण त्याच्या हालचालीतला आवेग फासेपारध्याच्या आवेगासारखा वाटला. एका हॉटेलच्या प्रवेशद्वारातून युकाता परिधान केलेल्या पुरुषांचा एक थवा गेटाला खडखडावीत बाहेर पडताना पाहिला — यांतला एकही जोडप्याने आलेला नव्हता, पण अतामीची रंगत लुटण्याची ईर्षा प्रत्येकाच्या नजरेत दिसत होती. आणि मग आम्हांला अशाच एका हॉटेलातून निघणारा मुलींचा ताफा दिसला !

तरुण मुलींचा ताफा. टोकिओतली दुकाने आणि ऑफिसे हास्याने फुलवून टाकणाऱ्या मुलींचा ताफा ! युद्धोत्तर जपानात मुक्त झालेल्या या मुली ! नव्या स्वातंत्र्याचा साक्षात्कार घडविणाऱ्या या मुली ! या येथे कशाला आल्या ? त्या नुसताच हवापालट करणार ! काळ, काम आणि वेग यांचा अपव्यय – केवळ अपव्यय !

अतामीच्या अंतरंगात डोकावून पाहण्याची इच्छा आम्हांला होत होतीच, पण त्यात गुरफटून जाण्याची आमची तयारी नव्हती. अनुभवाची ओढ होती, पण अनुभवाच्या डोहात बुडी मारण्याची हिंमत नव्हती. तळ्याच्याच काठाकाठाने हिंडावे, हळूच पाण्यात पाय बुडवावा आणि लगेच तो काढून घ्यावा, तसे आमचे चालले होते. आम्ही एका पेयगृहात गेलो. पेयगृहाच्या मालकिणीनेच ( ममासाननेच ) आमचे स्वागत केले. ती आमच्या टेबलाशी येऊन बसली, गप्पा मारू लागली, चेष्टाविनोद करू लागली. तिने तिशी ओलांडली होती, पण विशीचे पाणी झळाळत होते. आम्ही उठलो, बिले देऊ लागलो तेव्हा 'नको नको' म्हणू लागली. प्रथमच भेटलेल्या भारतीयांकडून बिल घेऊ काय, असे विचारू लागली. अखेर तिने बिल घेतलेच, पण पुनः येऊन तिचे पाहुणे म्हणून प्याले पाहिजे असे बजावले. पण आम्हीच उलट तिला दुसऱ्या दिवशी दुपारी चहापानाचे निमंत्रण दिले. ती आली, तास-दीड तास बसली, गप्पा झाल्या, फराळ झाला– नि एकदम फोन आला म्हणून निघून गेली ! आम्हांला दिलेले बिअर-पानाचे निमंत्रण कोठच्या कोठे उडून गेले !

संध्याकाळी आम्ही समुद्रकाठाने फिरत होतो. समोर एक कुटुंब चालले होते. बाप, आई, सात-आठ वर्षांचा मुलगा आणि सतरा-अठरा वर्षांची मुलगी. आम्ही बोलत होतो, रमत होतो, स्वतःशीच चुस्त होतो. इतक्यात पासीन म्हणाला, 'समोर पाहा.' पाहिले तो ती मुलगी मागे वळवळून आमच्याकडे पाहात होती. एकदा तिची माझी नजरानजर झाली तेव्हा हळूच हसली– अगदी ओळख असल्यासारखी हसली. मी गोंधळलो, गडबडलो, आणि आमचा रस्ता बदलला म्हणून बचावलो ! पण अतामीचे जग एवढेसे. आम्ही एका दुकानात उभे होतो तो ते कुटुंब तेथे आले. तिने पुनः पाहिले, ती पुनः हसली. मी म्हटले, 'हलो !' ती म्हणाली, 'हलो !' मी विचारले, 'तुला इंग्रजी येते ?' ती म्हणाली, 'होय, आम्हांला शाळेत इंग्रजी शिकवितात.' मग तिने विचारले, 'आपण भारतीय आहात ?' मी म्हटले, 'हो.' ती म्हणाली, 'मी रवीन्द्रनाथ टागोर वाचला आहे.' मी म्हटले, 'अस्सं ! छान !' ती म्हणाली, 'तुम्ही आमच्या घरी याल ?' मी म्हटले, 'तुझं घर मला कसे सापडणार ?– तूच येऊन आम्हांला घेऊन जा.' पण ती काही आली नाही; तिने पत्ता सांगितला होता, तो आम्ही लक्षात ठेवला नाही.

नंतर आम्ही त्या ओढ्याच्या काठाने हिंडत होतो. एक छोटे, दोन-अडीच वर्षांचे, मूल रडत होते. त्याची आई त्याला उगी करण्याचा प्रयत्न करीत होती. पण त्याचे भोकांड काही मिटेना. माझ्या मनात एकदम एक कल्पना तरळली. मी खिशातून

जिनतानची बाटली काढली. त्यातली एक गोळी घेतली. त्या मुलाच्या उघडया तोंडात टाकली. ते मूल एकदम थबकले. त्याचे रडे एकदम थांबले. क्षणभर त्याचा चेहरा चमत्कारिक झाला. डोळ्यांतून अश्रू वाहतच होते, पण तोंडून हसू फुटतेसे वाटले. त्याची आई माझ्याकडे समाधानाने, कृतज्ञतेने पाहू लागली. मी तिच्या डोळ्यांतले भाव न्याहाळू लागलो, पण ती काही बोलू शकत नव्हती. मीही काही बोलू शकत नव्हतो. क्षणभर आम्ही एकमेकांकडे नुसते पाहातच राहिलो. (अतामीच्या जीवनाची झुळुक अंगावरून जात आहेसे वाटले !) पण पासीन तिच्याशी बोलला आणि ती आपल्या कर-करीत खोबऱ्यासारख्या आवाजात हसली. तिचे मूल मजकडे पाहात राहिले— आणि मी त्याच्या तोंडात जिनतानच्या दोन गोळ्या टाकल्या. त्याबरोबर ते हसले, खुदकन हसले. इतक्यात आणखी तीन-चार मुले तिथे गोळा झाली. माझ्याभोवती मुलांचा एक गराडाच पडला. मी जिनतानची बाटली काढली, उघडी केली आणि एकेकाच्या तोंडात गोळ्या टाकत सुटलो ! त्याबरोबर ती मुले हसू लागली, नाचू लागली, उडू लागली. पलीकडे अतामीच्या त्या रस्त्यात सुखास्वादाचा भर आला होता, आणि इकडे मी वात्सल्यरसात डुंबून गेलो होतो. माझी मलाच गंमत वाटली. अतामीला आलो— आणि अतामीच्या प्रवाहात एक वेगळाच हात मारू लागलो !

जरा वेळाने आम्ही पुस्तकांच्या दुकानात शिरलो. तेथे एक वृद्ध प्रोफेसर भेटला. पासीन त्याच्याशी जपानीमध्ये बोलू लागला आणि मी फक्त त्याच्या कपाळा-वरच्या सुरकुत्यांकडे आणि चष्म्याच्या जाड भिंगांपलीकडे चमकणाऱ्या डोळ्यांकडे पाहत राहिलो. पासीनने सांगितले की, प्रोफेसरमजकूर अतामीच्या स्वैराचारी जीवनाचा अभ्यास करीत आहेत; अतामीच्या बेताल जीवनाने त्यांच्या जिवाचा संताप झालेला आहे; आणि त्याची त्यांना लाज आलेली आहे. अतामीच्या चैनीवर त्यांचा आक्षेप नाही. कोणत्याच जपान्याचा नाही. अतामीची चैन फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. पण अतामीच्या चैनीला आज जे भरड स्वरूप आले आहे, बाजारी स्वरूप आले त्याने ते बेजार झाले आहेत. अतामीच्या स्वैराचारात पूर्वी जपानी संस्कृतीचा मोठा सुंदर आविष्कार होता, अतामीची हॉटेले म्हणजे अतिथिगृहे होती, आता ती नफेबाजीची आगरे बनली आहेत आणि टोकियोचे अनेक तरुण त्यांच्या कर्जात खितपत आहेत. अतामीच्या स्वैराचारात पूर्वी नृत्यसंगीताला महत्त्वाचे स्थान होते, आता तो नुसता विषयोपभोग बनला आहे.

प्रोफेसर-मजकुरांच्या आवाजात आवेग आला होता. युद्धोत्तर कालात जपान-मध्ये जो बदल झाला होता तो त्यांना सहन होत नव्हता— पण त्यांच्या संतापात सत्य होते, तथ्य होते !

आम्ही हॉटेलवर परत आलो तेव्हा प्रोफेसर-मजकुरांच्या मनोव्यथेचा अंमल आमच्यावर अद्याप होता. मी खिडकीतून बाहेर नजर टाकली. अतामीच्या अंतराळात हिऱ्यामाणकांची माया पसरलेली होतीच, पण काल तिने माझ्या नजरेसमोर सौंदर्याची

इंद्रफुले फुलविली होती तशी ती आता फुलवू शकत नव्हती.

सकाळी उठलो, बाहेर नजर टाकली नि चकित झालो. अतामीचा आता पार कायापालट झाला होता. कालचे ते यक्षनगरीचे रूप कोठच्या कोठे उडाले होते. चैतन्याची ती इंद्रफुले कोमेजली होती. अतामी आता आळशी, फिकट, रुक्ष दिसत होती. विटके रंग आणि सुतकी कळा यांचाच पसारा पसरला होता. रस्ते ओके, उघडे, वाळीत टाकल्यासारखे होते. दुकानांवरच्या निऑनलाइटचे सांगाडे आता विकट दिसत होते. आणि खुटखुटू घरांची करपट छपरे आता डोळ्यांना खुपत होती. समोरच्या डोंगरावरची कसल्याशा धर्मपंथाची अवाढव्य इमारत एखाद्या तुरुंगासारखी भासत होती. मला आत अगदी उदास उदास वाटले. इतक्यात समुद्रावर सूर मारीत निघालेल्या एका मोटार लॉंचची कर्कश किंचाळी कानांत शिरली आणि आतले धागे तटातट तोडीत कोठे तरी निघून गेली.

तास-दीडतासानी आम्ही परत यायला निघालो. आमच्याप्रमाणे अनेक निघाले. रस्त्यात मोटारींची गर्दी माजली, आणि तिच्यात आमची मोटार अडकली. अतामीच्या वाटेत भररस्त्यावर एक चिडाचे झाड चमत्कारिक पसरले आहे, तेथेच अडलो. ते झाड म्हणजे एक रूप होते— खरे म्हणजे विद्रूप! बुंधा वठलेला, खोड निबरट आणि विस्तार सुकटलेला. बुंध्याचे खोड म्हणजे एखाद्या 'मॉडर्निस्ट' शिल्पकाराच्या प्रतिभेचा संतप्त उद्रेक! आणि त्याचा विस्तार अतामीकडे बघून जणू विकट हास्य करीत होता. तरी अतामीच्या लोकांना त्या झाडाचे कोण कौतुक! त्यांनी त्याला एक सुंदर पार बांधला होता. त्याच्यावर एक स्मृतिशिला उभारली होती. होती आपली शिळी, शेवाळलेली. पण स्मृतिशिला! जपानमध्ये वाङ्मयसेवकांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अशा शिला उभारतात हे मला माहीत होते. हैकू काव्याचा प्रणेता मात्सुओ बाशो याच्या एकट्याच्या नावाने अशा दोन हजार शिला आहेत. अशा शिला उभारण्यासाठी एखाद्या सौंदर्यस्थळाची निवड करतात हेही मला माहीत होते. अतामी सुंदर खरीच, पण चिडाचे हे ध्यान म्हणजे काय सौंदर्यस्थळ? मला काही समजेना! मी पासीनला विचारले, "ही कोणत्या वाङ्मयसेवकाची स्मृती?"

"वाङ्मयसेवकाची नाही, वाङ्मयाला स्फूर्ती देणाऱ्या एका घटनेची." पासीन उत्तरला.

"घटनेची?"

"ती एक मोठी कथा आहे. सत्यकथा! अलीकडच्या काळातलीच. पन्नास-साठ वर्षांपूर्वीची. या अतामी गावात ओमिया नावाची एक सुंदर मुलगी होती. उच्च कुळात जन्मलेली. तिचे हारामा कानिची नावाच्या एका मुलावर प्रेम बसले. मुलगा अतिशय सालस, सुस्वभावी, पण अत्यंत दरिद्री. स्वतःचे शिक्षण पुरे करण्याइतकाही पैसा त्याजपाशी नव्हता. त्याच्याशी लग्न करण्याची आशा धरणे म्हणजे मृगजळात मधुचंद्राची मौज लुटण्याची आशा धरण्यासारखे होते. इतक्यात ओमियाला एका

श्रीमंत कुटुंबांतून मागणी आली. आपल्या श्रीमंतीचा आपल्या प्रियकराच्या शिक्षणासाठी उपयोग करता येईल या कल्पनेने तिने या मागणीस होकार दिला आणि कानिचीला हे कळविण्यासाठी या झाडाखाली तिने त्याची भेट घेतली. कानिचीने ते ऐकले आणि रागाने तो वेडापिसा झाला. श्रीमंतीच्या लोभाने तिने आपल्या प्रेमाचा हा विश्वासघात केला, असे नाही नाही ते आरोप त्याने केले. त्यांचे भयंकर भांडण झाले आणि त्यांनी एकमेकांचा कायमचा निरोप घेतला. कानिचीच्या अंतःकरणात आता पैशाविषयी द्वेषाचा डोंब निर्माण झाला. पैशावर, संपत्तीवर सूड घेण्याचा निश्चय त्याने केला. त्याची सूडाची कल्पना मोठी अजब होती. तो पैशाच्या मागे लागला, सावकार झाला, आणि कुळांना त्याने छळछळ छळले. "

" जपानमध्ये या घटनेवर अनेक कथा, कादंबऱ्या, कविता झाल्या आहेत, " पासीन पुढे सांगू लागला, " एका कादंबरीचे नाव ' प्रेमाचा सैतान ' असे आहे. "

प्रेमाचा सैतान !

आज अतामीची आठवण झाली की मला ते अतामीच्या वाहतुकीला वाकुल्या दाखविणारे चिडाचे झाड आठवते आणि त्याच्या पारावरच्या स्मृतिशिलेवर ' प्रेमाचा सैतान ' ही अक्षरे दिसू लागतात !

□

सोळा

# विलीविली

## व्यंकटेश माडगूळकर

मध्य ऑस्ट्रेलियातल्या वैराण भागात असलेल्या लॉंगरिच गावी, एक मोठे शीपस्टेशन बघायला गेलो, तेव्हा विलीविली मला भेटला. या स्टेशनच्या मालकीचे जे प्रचंड रान होते, त्यात वीस-वीस मैलांच्या अंतरावर खोदलेल्या एका बोअरवर तो राखणदार होता.

आपल्या दोन बायका, पोरेबाळे, आणि बरीच कुत्री सांभाळून तो तात्पुरत्या झोपडीत राहात होता. चार मेंढकी भुईत रोवून आणि आडव्या वाशांवर डहाळे-फांद्या अंथरून त्याने झोपडी उभारलेली होती. माणदेशातले शेतकरी रानात घोंडखोप उभी करतात तिची आठवण मला विलीविलीची झोपडी बघून आली. एक मागली बाजू सोडली, तर झोपडी तिन्ही अंगांनी उघडीच होती.

विलीविली काळा ऑस्ट्रेलियन होता. खाली भूमी आणि वर आभाळ असेच राहायची त्याला सवय होती. माकडाप्रमाणे त्याच्या जातीचे लोकही घर बांधायला

कधी उत्सुक नसतात. दगडाच्या आडोशाला किंवा झाडाखाली राहावे आणि शिकारीपाठोपाठ दुनियाभर भटकावे, ह्यात त्यांना खरा आनंद असतो.

विलीविलीचा शब्दशः अर्थ — आपल्याकडे कधी रानात अचानक उठते तशी वावटळ. मध्य ऑस्ट्रेलियाच्या वैराण रणरणत्या वाळवंटावरून वारा वाहाता वाहाता एकदम गिरगिरणारी वावटळ उठते, ठोकलेल्या तंबूंची रांगच्या रांग उधळून टाकते, आणि धुरोळा, पालापाचोळा, हे, ते वेऊन तांबड्या धुळीचा खांबच्या खांब आभाळात उभा चढतो; पाचोळा आणि धुरोळा हजार-बाराशे फुटांपर्यंत उंच उडवतो. या प्रकरणाला क्वीन्सलॅण्डच्या प्रदेशात ' विलीविली ' म्हणतात.

हे असले नाव शोभेल असा विलीविली काही आक्राळविक्राळ दिसत नव्हता. आपला उगीच भाबडा, येडाबागडा दिसत होता. आपल्याकडचे कातकरी, वारली दिसतात, तसा.

मी आयुष्यात पहिल्यांदाच इतक्या दूरवरच्या, परक्या देशात आलो होतो. दोन-अडीच महिने मेलबोर्न, सिडनीसारख्या शहरांत होतो तोवर फारसा बदल वाटला नाही; पण लॅंगरिचला आल्यावर सगळे उदासवाणे, खिन्न वाटले.

लांबच लांब क्षितिजापर्यंत पोचलेली सपाट राने, विटक्या हिरव्या रंगाचे खुरटे गवत, कधी न बघितलेली पाखरे, जनावरे, झुडपे, वठलेली, काळी पडलेली, तुटकी मोडकी झाडे जागोजाग उभी. सर्वत्र भयाण शांतता, सतत डोक्यावर उंच फिरणाऱ्या घारी... आणि टळटळणारा सूर्य.

विलीविलीच्या शेडपलीकडे एकच एक प्रचंड बाओबाव वृक्ष होता. अगडबंब बुंध्याचा आणि गाठाळ फांद्यांचा. त्याच्याखाली जाऊन आम्ही सावलीला बसलो. सिगरेटी पेटवल्या.

मला सारखी माडगूळची आठवण येत होती. पाणी दिलेल्या खपलीचा गार वास आठवत होता. संध्याकाळी कानावर येणारी निंबाच्या डहाळ्यांची सळसळ, गुरांचे हंबरणे, चिमण्यांचा सांजगोंधळ ऐकू येत होता.

दिवाळी आठवत होती...

माडगूळला आता घरात तळणे चालली असतील— रात्री सगळे काम आटपल्यावर आई आणि आक्का करंज्या, अनारसे तळायला बसत.

बाहेर आभाळ चांदण्यांनी खचलेले. काळाकुट्ट अंधार...

चव बघायला आई केव्हा बोलवतीय्, याची वाट बघत मी पासोडीत जागा...

डोळ्यात झोप उतरलेली.

सोप्यात कंदिलाच्या उजेडात दादा, अप्पा, अंगाला चिलमीचा वास येणारे डांबरी रंगाचे तुकाराम पाटील, फक्त ओठांच्या दोन्ही कडेला थोड्या थोड्या मिशा

असलेले ' च्याआयची घडघड ' असे वारंवार म्हणणारे, थुलथुलीत अंगाचे विनूतात्या, सौगव्यांचा पट मांडून बसलेले. आता पहाटे थंडी सुटली, आंघोळीसाठी बोलावणी आली म्हणजे हे सगळे दादांचे मित्र आपापल्या घरी आंघोळीला जाणार... तोपर्यंत ह्यांचा हा खेळ चालणार... कवड्या सारख्या खुळखुळत राहणार...चिलीम सारखी फिरत राहणार...

कुठे तरी कुकबरा पक्षी ' हा हा ' करून मोठ्यांदा हसला. विलीविली मला म्हणाला, " हा भाग दुष्काळी आहे. एका एकरात वर्षभर फक्त दोन मेंढरं जगतात."

" आमच्या मुलखातसुद्धा पाऊस फार कमी पडतो. पण दोन मेंढरांना एक एकर देण्याइतकी जमीनच नसते. मग, माणसं, मेंढरं जगायला दुसऱ्या मुलखात जातात. "

विलीविली गंभीर चेहऱ्याने ऐकत होता. तो म्हणाला,

" आणि आमच्याकडे डिंगो आहेत. ते मेंढरं मारतात. डिंगोंना मारणारा माणसाशिवाय दुसरा प्राणी नाही. एक डिंगो मारला की, पंधरा शिलिंग बक्षिस मिळतं."

आमच्याकडेही लांडगे होते. लांडग्याचे एक शेपूट चावडीवर दाखवले, की रुपया मिळे. ही हकीकत बाळासाहेब पंत औंध संस्थानचे राजे होते तेव्हाची. मेटकरवाडीतल्या एका धनगरानं अलीकडं लांडगा मारला आणि बक्षिस मिळेल म्हणून तालुक्याला बैलगाडीत घालून दाखवायला नेला, तर त्याला म्हणे वन्यपशुपक्षीसंरक्षण कायद्यानुसार ताकीद मिळाली. बक्षीस-बिक्षीस काही नाही.

पण ही हकीकत विलीविलीला सांगून समजलीही नसती.

तो मला समजावून सांगत होता—

" डिंगो कुठून आले माहीत आहे का? आशियातनं. हजारो वर्षांमागं आशियापासनं हा भाग वेगळा झाला. मग काही वर्षांनी आमच्यासारखी काही काळी माणसं तराफ्यावरनं आली. त्यांच्याबरोबर ही कुत्री आली...

" फार हुषार जात. वाटेल ते केलं तरी सापळ्यात सापडत नाही. विषारी आमीष टाकलं तर त्याला तोंड लावत नाही. डिंगोचं खाद्य म्हणजे रानातले पक्षी, जनावरं. पुढं गोरे लोक आले. त्यांनी बरोबर मेंढरं आणली. डिंगोंना मेंढरं मारायला सोपी वाटतात. गोऱ्या माणसांना आवडत नाहीत डिंगो. म्हणून एका डिंगोचं मुंडकं दाखवलं, की पंधरा शिलिंग..."

" आणि विली, तू कांगारूच्या शिकारीला जातोस? मी गेलो परवा रात्री, पण काही मिळालं नाही. मला पॉइंट-टू-टूनं मारायची सवय नाही. रात्री मला शॉटगन् हवी होती. "

विली ह्यावर रुंद हसला.

मला वाटले, त्याला बहुतेक म्हणायचे होते, " अरे ऑस्ट्रेलियातल्या काळ्या माणसाला तू शिकार करतोस का म्हणून काय विचारतोस ? आम्ही शिकारी म्हणूनच जन्माला येतो. ह्या तांबड्या मातीतून एखादा सरडा जाऊ दे, आम्ही तुला त्याचा माग बरोबर काढून दाखवू... "

मग तो जागचा उठला आणि कुले झाडत म्हणाला, " चल, तुला गंमत दाखवतो. "

फार वेळ चालावे लागले नाही. वाळून खड झालेल्या एका झऱ्यापाशी विलीने मला आणले होते. त्या जागेचा रागरंग बघूनच माझ्या लक्षात आले, की हे वाळून गेलेले पाण्याचे डबके आहे.

मग विलीने अणकुचीदार लाकडाने बराच खोल डवरा काढला. हा ह्या उकिरातून आता काय काढतोय, पाणी काढून दाखवतो काय, म्हणून मी बघत होतो. पण वर निघालेली सगळी माती कोरडीच होती. शेवटी काखहात खड्डा झाल्यावर, भुईवर आडवे पसरून विलीने हात आत घातला, चाचपलं आणि मातीने भरलेले, वाळून खड झालेले बेडूक बाहेर काढले. रुंद हसून तो म्हणाला,

" हे अजून जितं आहे."

मला खरे वाटले नाही.

पुन्हा आम्ही विलीच्या झोपडीकडे आलो. पाण्याची बादली घेऊन त्याने ती वाळलेली बेडकी आत टाकली. मी बघत होतो. काही मिनिटांतच त्या वाळल्या बेडकीचा टरटरीत चेंडू झाला, आणि डोळे काढून आम्हाकडे बघू लागला. मी थक्क होऊन बघत राहिलो.

विली म्हणाला—

" दुष्काळ पडायच्या आधी ही बेडकं पोटात पाणी भरून घेतात आणि जमिनीखाली गप्प बसून राहतात. पुन्हा पाणी पडेपर्यंत ह्या पाण्यावर जगतात. आम्हांला हे ठाऊक असतं. प्रवासात पाणी मिळेनासं झालं की आम्ही लोक ही बेडकं शोधतो. चार बेडकं पिळली की तहान भागते ... "

मी डोळे मोठे करून म्हणालो—

" हो ? "

" हो. एवढंच काय, तुला आता दाखवायला जवळपास नाही, पण मध पोटात साठविणाऱ्या मुंग्या असतात. त्यांची वारुळं आम्हांला ठाऊक असतात. वाळवंटात भटकताना भूक लागली, की आम्ही ह्या मुंग्या एक एक तोंडात टाकतो आणि मध खातो."

मला गोंदणीचे लालचुटूक माणकासारखे घोस आठवले. मधल्या सुट्टीत शाळेतून सटकायचे आणि ओढ्याकाठच्या गोंदणीच्या झाडावर चढून गोंदण्या खायच्या. चिकट तोंडांनी आणि चिकट हातांनी शाळेत येऊन गुपचूप खर्डे गिरवायचे.

झोपडीतून एक लांबोडके चोपलेले कुत्रे आळसावल्या अंगाने आले आणि विलीशेजारी येऊन दोन पायांवर बसले. मी त्याच्या दिशेने हात उचलताच विली म्हणाला,

" हा संभाळ. तो भरवशाचा नाही."

त्याने कुत्र्याला वाळली काटकी फेकून मारली, तेव्हा टण्कन् उठून ते झोपडीकडे गेले आणि तिथल्या सावलीत पसरले. काही वेळाने एक नागडेउघडे पोर झोपडीतून रांगत आले आणि त्याच्याशी खेळू लागले.

झोपडीकडून कण्हण्याचा आवाज आला.

माझा प्रश्नार्थक चेहरा बघून विली म्हणाला, " काही विशेष नाही."

मी विचारले, " तुझं हे स्टेशन केवढं मोठं आहे ? "

" फार मोठं. सत्तर हजार गुरं आणि पंधराशे घोडी आहेत. "

" तुम्ही कितीजण देखभाल करता ? "

" पंचवीसएक गोरे लोक आणि आम्ही काळे शंभरभर. "

" किती वर्षं झाली इथं नोकरी करून ? "

" सात महिने. मनात येईल तेव्हा रामराम ठोकायचा आणि शिकार करत भटकायचं. पुन्हा कुठं तरी काम मिळतंच. "

अंगात फराक घातलेली, डोक्यावर केसाचे टोपले असलेली बाई झोपडीकडून आली. हसत हसत तिनं बिअरची डबडी आणि भाजलेल्या मांसाचे तुकडे ब्रेडमध्ये घालून आणून दिले. ती विलीच्या कानात काही तरी कुजबुजली आणि येमू जावा तशी तुरगत झोपडीकडे गेली. माझ्याकडे बघून विली म्हणाला, " मला पोरगा झाला. मघापासनं मी बातमीचीच वाट बघत होतो. "

रंगीबेरंगी पोपटांचा एक मोठा थवा कलकलाट करत आमच्या डोक्यावरून गेला.

" कॉंग्रॅच्युलेशन्स विली ! "

बिअरचे डबडे उंचावून मी तोंडाला लावले. पाण्यात टाकून ठेवलेली बिअर गार नव्हतीच.

" मुलगा ! नाव काय ठेवशील ? "

" तू सांग. चांगलं नाव दे माझ्या पोरग्यासाठी."

माझ्या डोक्यात मधून मधून दिवाळी येतच होती. थंड सकाळी अंगणात बसून आई शेणाचे पाच पांडव करते आहे. अंगाला लावलेल्या कामिनिया तेलाचा, उटण्याचा वास येतो आहे. मी दोन पायांवर बसून बघतोय. हातात करंजी आहे.

सर्वात भीम लठ्ठ.

" कोण ग आई हा ? एवढा मोठा ? "

" अरे हा भीम. शूर होता ना सगळ्या भावांत ! "

" विली, त्याचं नाव ठेव भीम— भीमू..."

विलीनं तोंड वेडंवाकडं करत नाव दोन-चार वेळा म्हणून घेतलं.

" छान, बरोबर. भीमू— बी एच आय एम यू—"

" भिमू ? "

" येस."

" ॲन्ड हू वॉज दॅट ब्लोक ? नेव्हर हर्ड ऑफ हिम ! "

" तू कसा ऐकणार त्याचं नाव ? हजारों वर्षांमागं तो होऊन गेला...साता-समुद्रांपलीकडे... ही वॉज व्हेरी बिग—" मी छाती फुगवून खांदे मागे केले.

विलीचे डोळे लकाकले.

" तो योद्धा होता का ? "

" फर्स्ट क्लास. झाडं उपटून तो शत्रूला झोडपायचा. "

" आणि शिकार करायचा ? "

मला फक्त भीमानं केलेली बकासुराची शिकार आठवत होती, आणि हिडिंबेची.

" येस, ही वॉज अ ग्रेट हंटर टू. "

" टेल मी द टेल. "

बापरे, सगळे महाभारत आणि तेही इंग्रजीतून विलीला सांगावयाचे म्हणजे पंचाईतच.

मग मी बकासुराची गोष्ट रंगवून रंगवून सांगितली. गाडाभर अन्न, दोन रेडे, एक ब्राह्मणपुत्र असं जबरदस्त जेवण घेणारा बकासुर. त्याला भीमानं कसा लोळवला, हैराण झालेले लोक कसे आनंदून—

विलीला नाव भलतेच आवडले.

कमरेच्या पट्ट्यातून आपला शिकारी चाकू काढून माझ्या हातात देत तो म्हणाला, " ह्या झाडाच्या बुंध्यावर माझ्या पोराचं नाव खोद. "

नाव खोदता खोदता मी घामाघूम झालो.

असल्या गरम हवेत, कांगारू धोंड्याच्या आडोशाला गप्प बसून राहतात ती उगीच नाही. हालचालीने, श्रमाने शक्तिपात होतो.

सुतार उत्तमसा पाळणा नाही. नाव ठेवायला आत्या नाही. ' कुणी गोपाळ घ्या कुणी गोविंद घ्या ' असे म्हणत गोपा नाचवणाऱ्या सवाष्णी नाहीत. कुणी बाळाच्या कानात कुर्र करून नाव सांगितलं नाही. पण विलीच्या पोराचे नामकरण झाले.

राक्षसी झाडाच्या बुंध्यावर मी ते कोरले आणि चेहेऱ्याभोवती फिरणाऱ्या

माश्या टाळीने मारत विलीने ते बघितले. बास्. एवढाच नाव ठेवण्याचा समारंभ. बिअरच्या डबड्यातले शेवटचे थेंब जिभेवर टाकून आम्ही डबड्याचे फूटबॉल हवेत उडवले.

लॅंगरिचच्या लहानशा रेडिओस्टेशनवर काम करणारा बिल, मला विलीच्या स्वाधीन करून दीडशे मैलांवर कुणाचे रेकॉर्डिंग करायला गेला होता, तो जीप उडवत आला. कपड्यांवरचा धुरोळा झाडत खाली उतरला. म्हणाला, " हॉप् इन्, मेट ! लेट अस गो. "

मी, विलीला पुत्र झाल्याची शुभवार्ता त्याला सांगितली. कोरलेले नावही दाखवले. ह्या काळ्या माणसाला पोर झाले ह्याचे काही कौतुक त्याला नसावे.

एक हात वर करून मी विलीचा निरोप घेतला. त्याची-माझी गाठ आता ह्या जन्मात पुन्हा पडायची नव्हती. धुरोळ्याने भरलेल्या रस्त्याने जीप गचके घेत होती. बिल विचारत होता —" डिड यू एन्जॉय विलीज कंपनी, व्हेंकी ? "

ह्या गोष्टीला आता पंधरा वर्षे उलटून गेली आहेत. तुमच्यापैकी कुणी कधी ऑस्ट्रेलियाला जाल, तेव्हा लॅंगरिचला जाच. तडक रेडिओस्टेशनवर जा. कुणी तरी किथ फ्रॅंकलिन किंवा बॉब लोगन किंवा ग्रॅहम व्हाईट, तिथला रूरल ऑफिसर असणारच. त्याला विनंती करा की, " गड्या, काहीही कर, पण मला व्हिक्टोरिया डाऊन्स ह्या कॅटल स्टेशनला घेऊन चल. " बहुतेक तो नाही म्हणणार नाही. रूरल ऑफिसर हा फार उमदा माणूस असतो.

सगळे स्टेशन फिरून झाले, ढेरपोट्या स्टेशन बॉसचा पाहुणचार घेतला की, बारा नंबरच्या बोअर विहिरीवर चक्कर टाका. तो प्रचंड बाओबाब वृक्ष तिथे अजून असणारच. तिथे मी कोरलेले नाव तुम्हाला दिसेल.

भिमू आता पंधरा वर्षांचा झाला असेल. त्याच, किंवा इतर कुठल्या तरी शीपस्टेशनवर तो आता स्टॉकमन होऊन सारखा घोड्यावर असेल. तो तुम्हाला दिसेल न दिसेल. पण विली बहुतेक भेटेल. तो आता थकला असेल.

त्याला आठवण द्या आणि माझा सलाम सांगा. म्हणावे, त्या वेळेला सांगायचे राहून गेले, पण आणखीन एक भिमू नावाचा प्रचंड मोठा माणूस आमच्याकडे होऊन गेला.

साहजिकच विली म्हणेल.

" टेल मी द टेल. "

मग झाडाखाली बसून त्याला सगळी कहाणी सांगा.

□

# लेखकपरिचय व टीपा

• •

## १. झाशीचे बिजन

**विष्णुभट बाळकृष्णपंत गोडसे** : वरसईकर (१८२७–१९०१) विष्णुभट गोडसे यांचे वडील बाळकृष्णपंत हे सरदार विंचूरकरांच्या पदरी कारकून होते. पेशवाई खालसा झाल्यानंतर ब्रह्मावर्तास जाण्यास जमले नाही म्हणून ठाण्याजवळील वरसई येथे आपल्या गावी येऊन राहिले. त्यांना विष्णु, हरि व धोंडू असे तीन मुलगे होते. वरसईस दारिद्र्यावस्थेत दिवस कंठीत असता थोरल्या मुलाने (विष्णुभटांनी) आपल्या चुलत्यांच्या सल्ल्याने ब्रह्मकर्म शिकून घेतले. १८५७ च्या सुमारास मथुरेस बाईजाबाई शिंदे सर्वतोमुखी यज्ञ करणार आहेत, ही वार्ता ऐकून त्यानिमित्ताने उत्तरेकडे जाऊन काही द्रव्य गाठी मारावे, या हेतूने ते आपले चुलते 'रामभट' यांच्यासह ३० मार्च १८५७ रोजी उत्तरेकडे निघाले. १ जुलैला महूच्या छावणीत बंड उठले, त्या दिवशी लेखक तेथे होता. उज्जैन, धार, पुनः उज्जैन व मग ग्वाल्हेर या प्रकारे त्यांच्या प्रवासाचा पहिला हप्ता संपला व ग्वाल्हेरीस चातुर्मास संपवून नोव्हेंबर महिन्यात ते झाशी येथे गेले. झाशीच्या राणीने त्यांची विद्वत्ता पाहून त्यांना आश्रय दिला व तेथे उभयता चुलत्या-पुतण्यांनी चार-पाच महिने मोठ्या आनंदात काढले. परंतु मार्चच्या शेवटच्या आठवड्यात इंग्रज सैन्य झाशीवर चालून आले. झाशी शहर काबीज करून इंग्रजांनी जी भयंकर कत्तल केली त्याचे चक्षुर्वैसत्यं वर्णन उताऱ्यात लेखकाने मोठ्या प्रत्ययकारीपणाने केले आहे. झाशी पडल्यानंतर इंग्रजांची फळी फोडून झाशीची राणी तेथून सटकली, त्याच सुमारास याही मंडळींनी काल्पीचा रस्ता धरला.

काल्पीनंतर ग्वाल्हेर, मध्य हिंदुस्थानातून कधी बंडवाल्याबरोबर, तर कधी बंडाच्या वावड्या ऐकून चुलत्या-पुतण्यांची खूपच पळापळ झाली; आणि मिळविलेला सर्व पैसा घालवून फक्त तीर्थयात्रेचे पुण्य आणि गंगेची कावड बरोबर घेऊन ते वरसईस येऊन राहिले, आणि तेथेच अतिशय निरिच्छ वृत्तीने त्यांनी उर्वरित आयुष्य काढले. परतल्यानंतर २३-२४ वर्षांनी त्यांनी प्रवासवृत्त लिहिले. मूळ प्रवासवृत्तामध्ये काही परिष्करण करून कै. चिंतामणराव वैद्य यांनी 'माझा प्रवास' या नावाने हे प्रवासवृत्त १९०७ साली प्रसिद्ध केले आहे.

**बाईसाहेब** : (झाशीची राणी– जन्म १९।११।१८३५, मृत्यू १८ जून १८५८.) दुसरे चिमाजीअप्पा पेशवे यांचे कारभारी मोरोपंत तांबे यांची मुलगी. नाव मनुताई. मनूच्या वयाच्या चवथ्या वर्षी तिच्या आईच्या निधनामुळे काशी सोडून हे

घराणे ब्रह्मावर्त येथे गेले. तेथे दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या सान्निध्यात तिचे सर्व— शालेय व लष्करी— शिक्षण झाले. १८४२ मध्ये झाशीचे राजे गंगाधरराव यांच्याशी विवाह. १८५१ मध्ये पुत्रप्राप्ती. परंतु मुलगा तीन महिन्यांचा असतानाच वारला. पतीच्या दीर्घ आजारपणामुळे त्याच्या हयातीतच एक मुलगा दत्तक घेऊन त्याचे नाव 'दामोदरराव' ठेविले.

१८५३ मध्ये गंगाधररावांचे निधन झाले व इंग्रजांनी तिचा दत्तक मुलगा नाकारून तिचे संस्थान खालसा केले. ५७ सालच्या बंडामुळे तिला परत राज्यकारभार आपल्या हाती घ्यावा लागला. ती बंडवाल्यांना सामील आहे, या कल्पनेने सर ह्यू रोज हा इंग्रज सेनापती तिच्यावर सैन्यानिशी चालून आला. काल्पीहून १५००० सैन्यानिशी तात्या टोपेही तिच्या मदतीस धावून आला. परंतु फंदफितुरी व इंग्रजांची आधुनिक शस्त्रास्त्रे यांमुळे राणीचा पराभव होऊन किल्ला पडला. राणीने या वेळी धाडसाने दत्तकपुत्रास पाठीशी बांधून मोठ्या वेगाने इंग्रजी सैन्याची फळी फोडून आपला घोडा बाहेर काढला व ती काल्पीस पोचली.

पुढे काल्पीही पडल्यानंतर ती ग्वाल्हेरास गेली. तेथेच इंग्रज सैन्याशी मोठ्या जिद्दीने व पराक्रमाने लढताना तिला क्षात्रमरण प्राप्त झाले. आपल्या पराक्रमाने तिने भारताच्या इतिहासात आपले नाव अजरामर करून ठेविले आहे.

**बिजन** — कत्तल. **फरासखाना** — डेरे, कनाथी, बिछायती ठेवण्याची जागा. **पाले** — लहान राहुट्या. **पार्थिवलिंग** — नित्यपूजेसाठी केलेले मातीचे शिवलिंग. **सलिदा** — उंटावर लादावयाची ओझ्याची पिशवी. **केशवभट मांडवगणे** — गोडसे-भटजी झाशीत ज्यांच्याकडे बिऱ्हाडास होते ते विद्वान गृहस्थ. **हरिपंत** — विष्णुभटजींचे वडील बंधू. **शुक्रनीति** — राजाची इतिकर्तव्यता, भूमिमापन, नगर्यादिप्रतिष्ठान, व्यूह-प्रकल्पन, यंत्रलक्षण इत्यादी विविध माहितीने भरलेला संस्कृत ग्रंथ. फार प्राचीन नसावा. **भंगिणींचा इतिहास** — 'माझा प्रवास' दु. आ. पृ. ५१ पाहा. **अबला यत्र प्रबला** — झाशीची राणी अबला यत्र प्रबला या वचनांशाची साक्ष, तिचा दत्तक मुलगा लहानच होता व दिवाण लक्ष्मणराव निरक्षर असताही दिवाण बनले होते. 'नहि नहि तत्र धनाशा जीवित आशापि दुर्लभाभवति' हा सुभाषिताचा दुसरा चरण आहे. 'लुटीमुळे धनाशा संपलीच. आपण जगलो हेच ईश्वराचे उपकार' [माझा प्रवास, दु. आ., पृ. २९–२०]

□

## २. गेरसप्पा

**गोविंद हरी फडके :** हे नेरळचे गृहस्थ. प्रवासाचे मोठे शोकीन. 'माझी तीर्थयात्रा' या नावाने एकंदर चार भागांत त्यांची प्रवासवर्णने १९२३ ते १९२८ या कालखंडात प्रसिद्ध झाली आहेत. चार भागांची मिळून ११८२ पृष्ठे आहेत. या

चारी भागांनी हिमालयापासून रामेश्वरपर्यंत आणि द्वारकेपासून जगन्नाथपुरीपर्यंतची साऱ्या भारताची यात्रा व्यापिलेली आहे. या साऱ्या प्रवासवर्णनामध्ये केवळ धार्मिक दृष्टी नसून बुद्धिवादी धारणेमुळे चांगलाच डोळसपणा आला आहे. आपले ग्रंथ 'आबालवृद्ध स्त्री-पुरुषांचे मनोरंजन करून त्यांस ज्ञानदायक झालेले आहेत' असे ग्रंथाच्या दर्शनी मुखपृष्ठावर कृतकृत्यतेने छापले आहे, आणि त्यांचा आत्मविश्वास व्यर्थ नाही, याची प्रचीती आजही वाचकांना आल्याशिवाय राहत नाही. चौथ्या भागात महाराष्ट्रातील तीर्थयात्रांचे व सौंदर्यस्थळांचे वर्णन आहे. जुन्या मुंबई राज्यात कारवार येत असल्याने 'गेरसप्पा' महाराष्ट्रात येणे अपरिहार्य होते, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

## ३. हिमालयाच्या वाटेवर

**काका कालेलकर** ( दत्तात्रय बाळकृष्ण कालेलकर ) [ जन्म १८८५ ] म. गांधींचे निष्ठावंत अनुयायी व सहकारी. गुजराती आणि मराठीतले नामवंत लेखक. लोकमाता, भक्तिकुसुमे, लाटांचे तांडव, हिमालयातील प्रवास, स्मरणयात्रा इ. पुस्तके. १९१२ साली काकासाहेबांनी स्वामी आनंद आणि अनंतबुवा मरढेकर यांच्यासह चाळीस दिवसांत हिमालयाचा प्रवास केला. पुढे त्याच्या आठवणी त्यांनी गुजरातीत पुस्तकरूपाने प्रसिद्ध केल्या. त्या पुस्तकाच्या गुजरातीत पाच आवृत्त्या खपल्या. नंतर सध्या सर्वोदयकार्यात रत असणारे श्री. भाऊ धर्माधिकारी यांनी 'हिमालयातील प्रवास' या नावाने त्याचा उत्कृष्ट मराठी अनुवाद केला. प्रस्तुत उताऱ्याचा त्या पुस्तकातील मथळा 'नवे नवे अनुभव' असा आहे. काकासाहेब प्रस्तावनेत म्हणतात, "विषयांतर हा तर या ग्रंथाचा जणू काय विशेषच आहे. मी नम्रपणे एवढेच म्हणेन की मी प्रवासाला निघालो म्हणजे केवळ पायांनी आणि डोळ्यांनी प्रवास करीत नसतो. चालणाऱ्याचे पाय चालतात; वेदात म्हटले आहे की त्यांचे भाग्यही चालते; आणि माझा अनुभव असा आहे की चालणाऱ्याचे डोकेही भरधाव चालू लागते— मात्र पायांप्रमाणे एकाच दिशेने चालण्याचे बंधन त्याला नसते."

**यत्र नार्यस्तु पूज्यन्ते** : यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः । यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ॥ ( मनु. ३·५६ ) ( भावार्थ : ज्या कुळात स्त्रियांची पूजा होते त्या कुळांना देवता प्रसन्न होतात. जिथे ती होत नाही, तेथील क्रिया विफल होतात. )

**'मनुष्य हा देवांचा पशू आहे'** : आत्मा ह्येषां स भवति अथ योऽन्यां देवतामुपास्तेऽन्योऽसावन्योऽहमस्मीति न स वेद यथा पशुरेवं स देवानाम् । (बृहदारण्यकोपनिषत् १-४-१० ) ( भावार्थ : जो ब्रह्माहून इतर देवतेची 'ती देवता वेगळी, मी वेगळा' या भावनेने उपासना करतो, तो तत्त्व जाणत नाही. जसा पशु, तसा तोसुद्धा देवांना उपभोग्य होय. )

**छंदसि बहुलम्** : ( अष्टाध्यायी ५-२-१२ ) अभिजात संस्कृत ग्रंथांतील शब्दप्रक्रियेहून वेदांतील शब्दप्रक्रिया निराळी आहे. यासंबंधी स्पष्टीकरण करताना हे सूत्र येते. 'छंदांत सूट' अशी टीप अनुवादकांनी दिली आहे.

## ४. अबू

**अनंत आत्माराम काणेकर** ( जन्म १९०४ ) कवी, लघुनिबंधकार आणि मराठी प्रवासवृत्तांच्या क्षेत्रात लालित्याचे युग निर्माण करणारे प्रवासवर्णनकार म्हणून काणेकर प्रसिद्ध आहेत. चौफेर जिज्ञासा, माणसांमध्ये रममाण होण्याची व्यापक दृष्टी आणि जिज्ञासेपोटी अवलोकिलेल्या विश्वाची खेळकरपणाने आपल्या प्रवासवृत्तांतून मांडणी हे त्यांच्या लेखणीचे विशेष होत. 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे', 'आमची माती आमचे आकाश', 'निळे डोंगर, तांबडी माती' ही त्यांची लक्षणीय प्रवासवर्णने. प्रसिद्ध चित्रकार दीनानाथ दलाल यांच्यासह त्यांनी केलेल्या पश्चिम भारताच्या प्रवासवर्णनातील एक उतारा येथे उद्धृत केला आहे.

## ५. एक अपूर्व संध्या

**नरहर विष्णु ऊर्फ काकासाहेब गाडगीळ** :( १८९६-१९६६ ) गेल्या पिढीतील महाराष्ट्राचे ज्येष्ठ राजकीय कार्यकर्ते. गांधीयुगात महाराष्ट्रात काँग्रेसच्या ध्येयधोरणाचा पुरस्कार करून बहुजनसमाजात लोकजागृती करण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. मध्यवर्ती कायदेमंडळाचे व काँग्रेस कार्यकारिणीचे सभासद, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर केंद्रीय शासनाचे मान्यवर मंत्री, पंजाबचे राज्यपाल इ. अनेक नात्यांनी त्यांचे राजकीय कार्य विख्यात आहे. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, वक्तृत्वशास्त्र, सभाशास्त्र इ. विषयांवर सुरुवातीस पुस्तके लिहिली. आयुष्याच्या उत्तरकाळात त्यांनी लिहिलेल्या काही ललित लेखांनी व प्रवासवर्णनांनी मराठी वाङ्मयात मोलाची भर घातली आहे. जीवनानुभवांची चौफेर मांडणी, प्रवासाची मनमुराद आवड, काहीसा रोचक मिष्किलपणा इ. वैशिष्ट्ये त्यांच्या लेखनात आढळतात.

हा लेख ' पाव आणि मिसळ ' या त्यांच्या संग्रहातून घेतला आहे.

**युवतीनां च लीलया**– सुभाषितेन गीतेन युवतीनां च लीलया । यस्य न द्रवते चित्तं स वै मुक्तोऽथवा पशुः । [ सुभाषित, गायन, आणि तरुणींचे विलास यांनी ज्याचे चित्त हेलावून येत नाही, तो मुक्त तरी होय, किंवा पशू तरी. ] **महाराष्ट्रभाषाचित्रमयूर**– ही पदवी शृंगेरी पीठाकडून कोचीन येथे ' केरळकोकिळ ' हे मासिक चालविणारे संपादक कृष्णाजी नारायण आठल्ये ( १८५२-१९२७ ) यांना मिळाली होती. मराठीतील एक अव्वल दर्जाचे संपादक व चित्रकार म्हणून त्यांची ख्याती होती. बडोदे दरबारासाठी चित्रे काढण्याचे काम त्यांना दिलेले होते. **राजा रविवर्मा**– ( १८४७-१९०६ ) त्रावणकोरच्या राजघराण्यातील एक नाणावलेले चित्रकार. त्यांची लक्ष्मी, सरस्वती, शकुंतला-जन्म, जटायुवध, कृष्णशिष्टाई, इत्यादी चित्रे अजूनही ठिकठिकाणी दिसतात. **ब्राह्म मुहूर्त** – रात्रीचा शेवटचा प्रहर. **चिमणराव**– कै. चिंतामण विनायक जोशी यांच्या विनोद-लेखनातील एक महत्त्वाचे सुंदर व्यक्तिचित्र. ' सरकारी पाहुणे ' म्हणून चिमणरावांना आलेले अनुभव चिं. वि.

जोशी यांनी ' चिमणरावांचे चऱ्हाट ' या पुस्तकात वर्णिलेले आहेत.

## ६. कश्मीरचे वैभव

**नारायण सीताराम फडके** : ( १८९४ ) कादंबरीकार, लघुनिबंधकार, समीक्षक अशा मराठीतील अनेक वाङ्मयप्रकारांवर फडक्यांचा फार मोठा ठसा आहे, तो त्यांच्या सहजसुंदर, प्रसन्न, डौलदार आणि रेखीव अशा भाषाशैलीमुळे. त्यांची ही भाषाशैली प्रवासवर्णनासारख्या लेखनप्रकारात अत्यंत उपयुक्त, परंतु इतर लेखनाच्या तुलनेने त्यांचे प्रवासवर्णनात्मक लेखन अल्पच आहे. त्यांच्या पत्नी सौ. कमलाबाई यांना त्यांनी आपल्या प्रवासानिमित्त लिहिलेली वर्णनात्मक लेखरूपी पत्रे ' कमलपत्रे ' या संग्रहात संग्रहित करण्यात आली आहेत. त्यातलाच कश्मीरविषयक हा उतारा आहे.

**शेखसाहेब**– शेख अब्दुल्ला हे कश्मीरचे नेते. सध्याचे मुख्यमंत्री. **शिकारा**– नाव. बेहस्त ( फारशी– बिहिस्त् ) = स्वर्ग.

## ७. कारवारच्या जंगलात

**प्रल्हाद केशव अत्रे** : ( १८९८–१९७० ) मराठी साहित्यिकांमध्ये अमाप लोकप्रियता मिळविणारे साहित्यिक. जीवनामध्ये येणारा कोणताही अनुभव अत्र्यांच्या लेखणीतून बाहेर पडतो, तेव्हा त्याला कमालीची रोचकता प्राप्त होते. अव्वल दर्जाचे शिक्षक, उत्कृष्ट वक्ते, विडंबनकार, कवी, नाटककार, वृत्तपत्रकार, राजकीय पुढारी इत्यादी अनेक नात्यांनी त्यांचे जीवन समृद्ध झाले आहे. ते ज्या ज्या व्यवसायात गेले, त्या त्या ठिकाणी त्यांनी आत्मविश्वासाने यशःश्री आपल्याकडे खेचून आणली आहे. प्रासादिक परंतु ढंगदार, सहजसाधी परंतु आवेशयुक्त व जीवनातील विसंगतीचा कधी खेळकरपणाने तर कधी अत्यंत गंभीरपणाने वेध घेणारी भाषा हा त्यांच्या साऱ्या लेखनाचा प्राण.

१९५१ साली कै. अ. का. प्रियोळकर यांच्या अध्यक्षतेखाली कारवारला भरलेल्या मराठी साहित्यसंमेलनास स्वतःच्या मोटारीने जाताना स्वतः चक्रधर (ड्रायव्हर) होऊन केलेल्या प्रवासातील एक विलक्षण अनुभव या ठिकाणी साकार झाला आहे.

**दत्तोपंत हल्याळकर** (दत्तात्रय वैकुंठ देशपांडे, हल्याळकर १८७५-१९१६) मराठी रंगभूमीवरील एक नामांकित अभिनेते. गोवा संगीत मंडळी, करवीरनिवासिनी नाटक मंडळी, श्रीमहालक्ष्मी प्रासादिक मंडळी इ. नाटकमंडळ्यांचे प्रमुख अभिनेते. संगीत नट म्हणून असाधारण लोकप्रियता.

## ८. वाराणस्यां जननमरणम्

**रामचंद्र भिकाजी जोशी** ( १९०३ ) प्रवासवृत्तकार, कथालेखक, साहित्य-समीक्षक आणि उर्दू कथाकादंबऱ्यांचे अनुवादक म्हणून रा. भि. जोशी प्रसिद्ध आहेत. एखाद्या प्रसिद्ध तीर्थक्षेत्राच्या संस्कृतिसंपन्न शहराच्या उत्कट ओढीने ते त्या स्थळास

भेट देतात आणि मोठ्या साक्षेपी वृत्तीने आपल्या प्रवासाचे चित्र रेखाटतात. घटना-प्रसंगांच्या व वास्तुस्थळांच्या तपशिलाइतकेच लेखकाच्या व्यक्तिमत्त्वातील भावगर्भ जाणिवांचे मोठे सुखद दर्शन त्यांच्या प्रवासवर्णनातून साकार होऊ लागते. त्यामुळे त्यांचे प्रत्येक प्रवासचित्र एक ललितसुंदर कलाकृती बनते. 'वाटचाल' आणि 'मजल-दरमजल' ही त्यांची दोन प्रवासवर्णनपर पुस्तके प्रसिद्ध आहेत.

'रसिक' वार्षिकाच्या १९७४ च्या अंकातून प्रस्तुत लेख घेतला आहे.

**वाराणसी**– काशी. सात मोक्षदायक पुऱ्यांमधले एक महत्त्वाचे क्षेत्र. एक ज्योतिर्लिंगस्थान. अशी व वरुणा या दोन नद्यांच्या संगमावर वसले असल्यामुळे वाराणसी. **पंडितराज जगन्नाथ** ( १५९०–१६६५ ) संस्कृत महापंडित व रससिद्ध कवी व साहित्यशास्त्रकार. हा कौंडिण्यगोत्री देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण होता. इ. स. १६२५ च्या सुमारास त्याने मोगल दरबारात पदार्पण केले. शहाजहान बादशहाच्या दरबारी आश्रयास असताना त्याच्या अंतःपुरातील लवंगी नावाच्या यावनीवर त्याचे मन जडले. तिच्याबद्दल जगन्नाथाने लिहिलेले दोन श्लोक प्रसिद्ध आहेत. **इयं सुस्तनी** ...हा त्यांतला एक श्लोकार्ध होय. जगन्नाथ शहाजहान बादशहास म्हणतो— "ती डोक्यावर घागर घेऊन जाणारी पुष्ट स्तनांची हरिणाक्षी ही लवंगी माझा अंगीकार करो, मला मिळो ( एवढीच इच्छा आहे ). **मिंबर** ( अरबी )– मशिदीत इमाम बसून ज्या ठिकाणावरून नमाज पढवितो ती जागा. **मेहराब** ( अरबी )– दरवाजावरील अर्धमंडलाकार बनविलेला भाग. **ऐबक कुतुबुद्दीन**–दिल्लीचा पहिला मुसलमान सुलतान. गुलाम घराण्याचा संस्थापक. मीरत, दिल्ली, बनारस, बीना, ग्वाल्हेर वगैरे ठिकाणे काबीज करून शहाबुद्दीन घोरीच्या मृत्यूनंतर इ. स. १२०६ला दिल्लीचा बादशहा झाला. **गागाभट्ट**– घराणे मूळचे महाराष्ट्रातील पैठणच्या देशस्थ ब्राह्मणाचे. पूर्वज नंतर काशीस स्थायिक झाले. त्यांच्या घरांत अनेक विद्वान पंडित निपजले. गागाभट्टाचे मूळचे नाव विश्वेश्वरभट्ट. गागा हे त्याचे लाडके नाव. तेच रूढ झाले. १६७४ साली त्याने वैदिक पद्धतीने शिवाजीचा राज्याभिषेक केला. **काकै-र्निष्कुषित**– अर्थ कावळ्याने कुरतडलेले व कुत्र्यांनी ओरबाडलेले.

## ९. लेंडन : एक अपूर्वाई

**पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे**– ( १९१९ ) मराठीतील अग्रेसर विनोदी लेखक, नाटककार, पट्टीचे वक्ते, अभिनेते, दिग्दर्शक, संगीतकार इ. अनेक वैशिष्ट्यांमुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वास एक बहुश्रुत असे लोभस आगळेपण प्राप्त झाले आहे. पाश्चात्य व पौरस्त्य देशांतून प्रवास करण्याची संधी प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील संपन्नतेचा अनेक अंगांनी त्यांच्या प्रवासवर्णनात्मक लेखनातून आविष्कार झालेला आढळतो. अपूर्वाई, पूर्वरंग, जावे त्यांच्या देशा, वंगचित्रे ही त्यांच्या प्रवासवर्णनांची प्रसिद्ध पुस्तके. प्रस्तुत उतारा त्यांच्या 'अपूर्वाई' या पुस्तकातून घेतला आहे.

**यां चिन्तयामि**– भर्तृहरीच्या नीतिशतकातील ( ३–२ ) एका श्लोकाचा पूर्व-

चरण. या श्लोकासंबंधी अशी एक आख्यायिका आहे की, भर्तृहरीच्या गुरूने प्रसाद म्हणून त्याला एक फळ दिले. ते त्याने मोठ्या प्रेमाने आपल्या प्रियेला दिले. तिने ते आपल्या एका प्रियकराला दिले. त्याने ते घेऊन आपल्या आणखी एका प्रियेला दिले. तिचे भर्तृहरीवर प्रेम होते म्हणून तिने ते कौतुकाने भर्तृहरीला आणून दिले. प्रेमाच्या राज्यातील या वंचनेने राजा विटून गेला व त्याला वैराग्य आले.

**अर्थ**– जिचे मी सतत चिंतन करतो ती मात्र माझ्या बाबतीत अगदीच थंड ( विरक्त ) आहे. संपूर्ण श्लोक असा आहे :

या चिन्तयामि सततं मयि सा विरक्ता । साप्यन्यमिच्छति जनं जनोऽस्यसक्तः ।।
अस्मत्कृतेच परितुष्यति काचिदन्या । धिक तां च तं च मदनं च इमां च मां च ।।

( मी जिचा रात्रंदिवस ध्यास घेतला ती माझ्या बाबतीत अगदीच थंड असून तिचे आणखी कुणावर तरी प्रेम आहे. तिच्या प्रियकरांचे तिच्याकडे पूर्ण दुर्लक्ष असून तो तिसरीवरच लट्टू झाला आहे. इकडे माझ्यासाठी झुरणारी आणखी एक निराळीच स्त्री आहे. धिक्कार असो तिला, त्याला, मदनाला, हिला आणि मला स्वतःलाही ! )

## १०. वेंकटाचल आणि वेंकटेश्वर

**श्रीनिवास नारायण बनहट्टी** ( १९०१–१९७५ ) मराठीचे व्यासंगी व नामवंत प्राध्यापक. प्राचीन मराठी वाङ्मय, मराठी नाट्यवाङ्मय, चिपळूणकर–टिळक–आगरकर इत्यादिकांचे निबंधवाङ्मय यांचे दर्दी अभ्यासक व मर्मग्राही समीक्षक. जिज्ञासू चिकित्सकता व समतोल विचारदर्शन ही त्यांच्या लेखणीची वैशिष्ट्ये. " श्रद्धायुक्त मनाने तीर्थयात्रा करणे व जमेल तितके प्राचीन शिल्पकलेच्या सौंदर्याचे निरीक्षण करणे, महापुरुषांच्या स्मारकस्थानांचे दर्शन घेऊन मनोमलाचे क्षालन करण्याचा यत्न करणे " या उद्देशांनी त्यांनी आपली पत्नी सौ. पद्मावती यांच्यासह भारतातील अनेक तीर्थक्षेत्रे व इतर प्रेक्षणीय स्थळे यांची यात्रा १९६२, १९६८, १९६९, १९७० व १९७१ या साली केली. ' जोडयात्रा खंड १ व २ ' या पुस्तकांतून ही प्रवासवर्णने संकलित करण्यात आली आहेत. पहिल्या खंडातील तिरुपतीच्या प्रवासयात्रेचे वर्णन या ठिकाणी उद्धृत करण्यात आले आहे.

**जे खळांची वेंकटी सांडो**– जें खळांची **वांकुडै** मोडे, **वेंकटै** मोडे, **वंकटै** मोडे, **व्यंकटी** मोडे असे अनेक पाठभेद आहेत.

## ११. रायगिरी : एक प्रदक्षिणा

**गोपाल नीलकंठ दांडेकर**–[ १९१६ ] मराठी वाङ्मयाच्या कथा, कादंबरी, आत्मचरित्र, कविता, नाटक, संतवाङ्मय इ. अनेक प्रकारांमध्ये गो. नी. दांडेकरांच्या सर्वसंचारी प्रतिभेने विहार केला आहे, परंतु वृत्तीने त्यांची गणना एका नादी अशा परिभ्रामकांमध्ये करावी लागेल, त्यांच्या आत्मचरित्राचे नाव जरी ' स्मरणगाथा ' असे असले, तरी त्याचे स्वरूप ' भ्रमणगाथे 'चेच आहे.

महाराष्ट्रातल्या दुर्गम पर्वतांच्या माथ्यावर महाराष्ट्राच्या मध्ययुगीन इतिहासाचे पोवाडे गाणाऱ्या किल्ल्यांच्या निरनिराळ्या ऋतूंतील दर्शनाने पुनः पुनः पुलकित होऊन वारकऱ्यांच्या धारणेने त्यांच्या वाऱ्या करीत राहणे हा त्यांच्या मनाचा स्थायीभाव आहे. किल्ले पाहणे आणि त्यांच्यावरल्या चांदण्यांनी भरल्या रात्री स्वच्छंदाने भोगणे हे त्यांचे खरेखुरे व्यसन आहे. या व्यसनातून त्यांनी केलेल्या दुर्गभ्रमणातील काही चित्रणांचा ' दुर्गदर्शन ' नावाचा संग्रह सिद्ध झाला. त्यातीलच हा उतारा. " उमद्या मनाचे, उमद्या शरीरांचे. तेवीस तरुण आणि एक मुलगी, वय वर्षे पंधरा. सगळे जवान नाना अडथळे ओलांडून आलेले. " अशा तरुणांचे नेतृत्व करीत दहा दुर्ग दहा दिवसांत पुरे केले आणि एके दिवशी अशाच काही तरुणांच्या बरोबरीने त्यांनी रायदुर्ग म्हणजे रायगडाला प्रदक्षिणा घातली. त्याची ही नाट्यपूर्ण हकीकत. शेवटी निर्देशिलेली ' वीणा ' ही त्यांची एकुलती एक कन्या.

**बेलाग** = दुर्गम, अभेद्य. **तख्त** = सिंहासन. **चखोट** = उत्तम. **वाडी** = रायगडाच्या अगदी पायथ्याशी असलेले रायगडाच्या परिसरातील एक महत्त्वाचे ठिकाण. वाडी ते रायगड हे अंतर चार मैलांचे असून तेथून रायगडची उंची २२५० फूट आहे. वाडी समुद्रसपाटीपासून ६०० फूट उंचावर आहे. रायगडावर जाण्याची पूर्वीची वाट पाचाडकडून नसून वाडीकडून होती. वाडीपासून पाव मैल अंतर चढून आल्यावर रायगडच्या चढास प्रारंभ होतो. वाडीकडील मार्गाने गड चढू लागले म्हणजे उजव्या बाजूस वायव्य कोपऱ्यात दिसतो तो **खूबलढा** बुरूज. **१८१८ मध्ये रायगड धुळीस**— दुसऱ्या बाजीरावाची बायको वाराणशीबाई रायगडावर बंदोबस्तानिशी होती. मेजर हॉल व कर्नल प्रॉथर या इंग्रज अधिकाऱ्यांनी पायथ्यावरूनच तोफा डागल्या, त्यामुळे किल्ल्यावरील इमारती पेटल्या. वाराणशीबाईने ९ मे १८१८ रोजी शरणागती पत्करली व शेख अबू नावाच्या किल्लेदाराने वाडी येथे येऊन तहनाम्यावर सही केली. **गोदावरी**— ही रायगडावरील शिवाजीच्या अधिकाऱ्याची एक ब्राह्मणकन्या असून संभाजीने तिच्याशी अतिप्रसंग केला म्हणून ती सती गेली अशी दंतकथा आहे. **टकमक टोक**— पूर्वपश्चिम पसरलेल्या रायगडच्या सुमारे दीड मैल लांब माथ्याच्या पश्चिमेचे उत्तुंग टोक. **पावठ्या**—पाऊलवाट. **बंबाळ्या**—जबर, विस्तृत, मोकाट पसरलेले, भयाण. **शंखान् दध्मुः**— कौरव-पांडवांमधील भारतीय युद्धाच्या सुरुवातीला दोन्ही बाजूंच्या वीरांनी आव्हान देण्याकरिता आपापले शंख फुंकिले असे गीतेच्या पहिल्या अध्यायात वर्णन आहे. इथे शंख करणे म्हणजे बोंब मारणे या ग्राम्य अर्थाने गमतीने हा शब्दप्रयोग वापरला आहे. **चोंढा**— बांध घातलेले भाताचे खाचर. **खेंव**— आलिंगन. **अक्रीत**— विलक्षण, असंभाव्य, जगावेगळे.

## १२ . तरंगता दिवस

**गंगाधर गोपाळ गाडगीळ**— ( १९२३ ) आजच्या मराठी नवकथेचा सर्वांगांनी साक्षात्कार घडविला तो **गंगाधर गाडगीळांनी**. अनेक अंगांनी, अनेक

वळणांनी, अनेक प्रकारांनी, अनेक घाटांनी त्यांनी ' कथा ' या वाङ्मयप्रकारातील सारी लवचिकताच जणू मूर्त स्वरूपात उभी केली. मनुष्यस्वभावाच्या रंगीबेरंगी छटांचे विभ्रम अनेक पातळ्यांवरून न्याहाळताना मराठी ललित वाङ्मयाला त्यांनी एक वेगळे परिमाण प्राप्त करून दिले. या त्यांच्या लेखनवैशिष्ट्याने त्यांचे प्रवासवर्णनपर लेखनही विनटलेले आहे. ' गोपुरांच्या प्रदेशात ' आणि ' साता समुद्रापलीकडे ' ही त्यांची दोन प्रवासवर्णनात्मक पुस्तके. पहिल्या पुस्तकात दक्षिण भारताच्या प्रवासाचे वर्णन आहे, तर दुसऱ्या पुस्तकात साता समुद्रांपलीकडील परदेशांतून मारलेला फेरफटका साकार केला आहे. प्रस्तुतचा लेख दुसऱ्या पुस्तकातील आहे. जहाजातून केलेल्या समुद्रप्रवासाचे सुंदर चित्र या लेखात आढळते.

## १३. नोएल

**सई परांजपे** [ १९३१ ]—रँग्लर रघुनाथराव परांजपे यांची नात. शकुंतला परांजपे यांची कन्या. शकुंतलाबाईंचा आंतरराष्ट्रीय विवाह होता. त्यामुळे सईचे वडील रशियन आहेत. लहानपणापासून सई आपले आजोबा रँ. परांजपे यांजकडेच राहिली. आजोबांच्या मृत्युनंतर १९६६ साली ती आपल्या खऱ्याखुऱ्या माहेरी जाऊन ३५ वर्षांनी आपल्या वडिलांना भेटली. या आगळ्यावेगळ्या प्रवासाचे व भेटीचे व तेथल्या ' नोएल ' या सणाचे हृद्य वर्णन या लेखात आढळते. नाटककर्ती, मराठी रंगभूमीवरील अभिनेत्री आणि चोखंदळ बालवाङ्मयाच्या लेखिका म्हणून सई परांजपे प्रसिद्ध आहेत. अरुण जोगळेकर या अभिनेत्यांशी त्यांचा विवाह झालेला आहे. प्रस्तुत लेख ' सत्यकथा ' मासिकातून घेतला आहे.

**आप्पा**— लेखिकेचे आजोबा सर रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे ( १८७६–१९६६ ). १८९९ साली इंग्लंडमध्ये गणितात सर्वोच्च गुण मिळवून सीनियर रँग्लर परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. १९०२ ते १९२६ मध्ये पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य होते. मध्यवर्ती कौन्सिलचे सदस्य, मुंबई राज्याचे शिक्षणमंत्री व पुणे विद्यापीठाचे कुलगुरु, आस्ट्रेलियातील भारताचे राजदूत इ. अनेक पदे त्यांनी सन्मानाने भूषविली. **हॅन्स अँडरसन**— हॅन्स ख्रिस्तियन अँडरसन (१८०५–१८७५) हा प्रख्यात डॅनिश कवी, कादंबरीकार व नाटककार होता. त्याच्या परीकथांनी त्याला जगभर प्रसिद्धी मिळाली. सई परांजपे यांनी अँडरसनच्या काही परीकथा मराठीत रूपांतरित केल्या आहेत.

## १४. सालबर्डीचा रानचेहरा

**प्रा. मधुकर केचे**–( १९३२ ) प्रख्यात वैदर्भीय ललित लेखक व कवी. त्यांच्या मोजक्या परंतु खुमासदार प्रवासवर्णनपर लेखांनी चांगलेच लक्ष वेधून घेतले आहे. वैदर्भी मोकळेपणा, स्थळकाळाशी निगडित अशा असंख्य स्मृतींची वेधक आणि नाट्यपूर्ण मांडणी, सूक्ष्म निसर्गवर्णने आणि वैदर्भी वाणीचा बाज यामुळे त्यांची ही

वर्णने परिणामकारक उतरली आहेत.

' एक भटकंती ' नावाचे त्यांचे प्रवासवर्णनात्मक पुस्तक आहे. प्रस्तुतचा लेख मात्र त्याच्या ' आखर आंगण ' या ललितनिबंधसंग्रहातून घेतला आहे.

## १४. अतामी

**प्रभाकर आत्माराम पाध्ये**–( १९०९ ) पत्रकार, कथालेखक, विवेचक ग्रंथकार व समीक्षक. पाध्यांनी व्यवसायानिमित्त साहित्यिक या नात्याने जवळ जवळ जगातील सर्व प्रमुख देशांना भेटी दिल्या. ' नवे जग : नवी क्षितिजे ', ' अगस्तीच्या अंगणात ', 'उडता गालिचा ', ' तोकोनामा ', ' हिरवी उने ' आणि 'युगोस्लाविया' ( इंग्रजी ) ही त्यांची प्रवासवर्णनात्मक पुस्तके. प्रस्तुतचा उतारा त्यांच्या ' तोकोनामा' या जपानच्या प्रवासवर्णनात्मक पुस्तकामधून घेतला आहे.

**तोकोनामा**– जपानी घरांच्या खोल्यांत, निदान आगतस्वागताच्या खोलीत, कोनाकडे भिंतीला, एखादा लांबरुंद कोनाड्यासारखा भासणारा एक भाग असतो. त्यात खाली एका चौरंगावर अगर पाटावर एक पुष्पपात्र असते. पुष्पपात्राच्या मागे भिंतीला त्या त्या ऋतूला योग्य असे एखादे निसर्गचित्र अगर चित्ररूप काव्य-चरण टांगलेला असतो. त्या भागाला तोकोनामा म्हणतात. **हर्बट पासीन**–हे जपान-मधले एक प्राध्यापक. जपानच्या पहिल्या प्रवासात प्रत्येक मुक्कामात ते स्नेहभावाने पाध्ये यांजबरोबर होते.

## १६. विलीविली

**व्यंकटेश दिगंबर माडगूळकर**– ( १९२७ ) मराठी ग्रामीण वाङ्मयाच्या क्षेत्रात व्यंकटेश माडगूळकर या नावाला फार महत्त्व आहे. ' माणदेशी माणसं ' या कथासंग्रहाने अस्सल ग्रामीण कथेचे विश्व माडगूळकरांनी खुले केले. त्यानंतर प्रसिद्ध झालेल्या कथासंग्रहांनी ग्रामीण कथेच्या क्षेत्रातील त्यांचे माहात्म्य निरपवादपणे सिद्ध केले. ' बनगरवाडी ' ही त्यांची कादंबरी प्रादेशिक कादंबऱ्यांतील एक वैशिष्ट्यपूर्ण टप्पा ठरली आहे. त्यांनी पंधरा वर्षांपूर्वी ऑस्ट्रेलियाचा प्रवास केला व त्या प्रवासाची वर्णने लेखरूपाने प्रसिद्ध झाली. त्यांच्या फ्रान्सच्या प्रवासाची वर्णनेही प्रसिद्ध झालेली आहेत. ' माडगूळ ते मेलबोर्न ' हा त्यांच्या प्रवासवर्णनाचा संग्रह पूर्वीच प्रसिद्ध झाला आहे. नुकताच प्रसिद्ध झालेला ( महाराष्ट्र टाइम्स– दिवाळी अंक १९७५ ) त्यांच्या ऑस्ट्रेलियाच्या प्रवासातील नाट्यपूर्ण आठवणींचा हा लेख या संग्रहातील सर्वांत अलीकडचा होय.

□ □

५९१ ग्र.५

REFBK-0022148